तीन वर्षे गतिमानतेची, नवनिर्मिती महाराष्ट्राची...

ऑक्टोबर २०१७ / पाने १०० / किंमत ₹१०

# लोकराज्य








## संकल्प ते सिद्धी

योगदान महाराष्ट्राचे : नवनिर्माण भारताचे २०१७-२०२२

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

# आमच्या असंख्य प्रवासी बांधवांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

**प्रवासी बांधवांनो...**

दिवाळी सणाला **सुखरूप** जा आपल्या घरी...!
केवळ एसटीच देते **सुरक्षित व वक्तशीर** प्रवासाची हमी
कशाला करता **खासगी बसने** प्रवास...!
सणा सुदीला **अव्वाच्या सव्वा तिकीट** दराचा त्रास
नकोच ऐनवेळेच्या **घाई गर्दीचा** ताप...!
त्यासाठी आत्ताच **आरक्षण** करा
**मागील वर्षाच्या** तिकीट दरात...!

**सुरक्षित आणि वक्तशीर प्रवासाची हमी...**
**आपली एसटीच लई भारी... !**

दिवाळी सुट्टीचे आगाऊआरक्षण सुरू आहे.
ऑनलाइन आरक्षणासाठी
http://public.msrtcors.com
या संकेतस्थळाला भेट द्या.



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री





# अंतरंग



## घडवू या.. नवा भारत ६

'छोडो भारत' आंदोलनाला ९ ऑगस्ट २०१७ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर लोकसभा सभागृहात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे भाषण झाले. या वेळी त्यांनी नवभारत निर्मितीचा संकल्प जाहीर करून, या संकल्पसिद्धीसाठी सर्वांनी योगदान करावे असे आवाहन केले. प्रधानमंत्र्यांच्या या भाषणाचा गोषवारा...

## स्वच्छता हीच सेवा... १३

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

युनिसेफच्या मते, चांगली स्वच्छता बाळगल्यास प्रत्येक कुटुंबाचे दरवर्षी ५०,००० रुपये वाचू शकतात. भारतात केवळ अतिसारामुळे दरवर्षी १ लाखांहून अधिक मुले मृत्युमुखी पडतात. अस्वच्छतेमुळे मुलांच्या शारीरिक आणि संतुलित वाढीस बाधा येते. स्वच्छता बाळगल्यास निरोगी जीवन जगता येते.

## स्वच्छतेची संकल्पसिद्धी १५

व्यक्तिगत किंवा कौटुंबिक जीवनामध्ये आरोग्य सांभाळण्यासाठी काही बाबी आवश्यक असतात. मात्र सामाजिक जीवनाच्या बाबतीत मनुष्य तेवढासा दक्ष राहत नाही. त्यामुळे आरोग्याचे विविध प्रश्न निर्माण होतात. अस्वच्छता वेगवेगळ्या रोगांना आमंत्रण देते. ही बाब लक्षात घेऊन केंद्रात आणि राज्यात स्वच्छता अभियान मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येत आहे. त्याचा निश्चितच चांगला फायदा झाला आहे.



## अर्थव्यवस्थेची नवी दिशा १७


निश्चलनीकरणाचा ऐतिहासिक निर्णय देशहितासाठी आणि सामान्य माणसाच्या हितासाठीच होता. काळा पैसा रोखणे आणि अर्थव्यवस्था सशक्त करणे हे या निर्णयामागचे आधीच जाहीर केलेले उद्देश आता फलद्रूप होऊ लागले आहेत.



## सर्वसमावेशकतेची संस्कृती २०




सर्वसमावेशकता हीच या भूमीची खरी ओळख आहे. जातवाद आणि संप्रदायवादमुक्तीचा संकल्प आपण सर्वांनीच एकदिलाने करायला हवा.




## संकल्प ते सिद्धी नेमके काय आहे? २२

२०१७ ते २०२२ या कालावधी दरम्यान देशातून 'अस्वच्छता, गरिबी, भ्रष्टाचार, दहशतवाद, जातवाद, संप्रदायवाद' दूर करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले आहे.



वर्ष ६९ वे | अंक ४ | ऑक्टोबर २०१७

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

**संपादन**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर

**प्रशासन**

- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — भारती वाघ

**मांडणी**

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

**पत्ता**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

**वितरण आणि वर्गणीदार**

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in



# संकल्प सर्वश्रेष्ठ बनण्याचा

प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी 'संकल्प ते सिद्धी' हा नारा दिला आहे. २०२२ पर्यंत अस्वच्छतामुक्त, दारिद्र्यमुक्त, भ्रष्टाचारमुक्त, आतंकवादमुक्त, जातवाद आणि संप्रदायवादमुक्त करण्याचे ध्येय त्यांनी ठेवले आहे. यासाठी पाच वर्षांचा कालावधी त्यांनी निर्धारित केला आहे. ही एक नवी क्रांती त्यांना अपेक्षित आहे. त्यामुळेच त्यांनी ९ ऑगस्टच्या क्रांतिदिनी या मोहिमेचे सूतोवाच करून त्यासाठी सर्व भारतीयांनी शपथबद्ध व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.


समृद्ध, सर्वसमावेशक आणि प्रगतिशील नव्या भारताच्या निर्माणाचे उत्तुंग ध्येय प्रधानमंत्री महोदयांनी देशापुढे ठेवले आहे. आता जबाबदारी आपणा सर्वांची असून त्या दृष्टीने सर्वांनी योगदान देणे गरजेचे आहे. नवा भारत हा जगातील सामर्थ्यशाली आणि महत्त्वाचा देश ठरण्यासाठी आपण सर्व प्रधानमंत्री महोदयांना अपेक्षित उद्दिष्टपूर्तीसाठी कार्यप्रवण झालो तर अपेक्षित सिद्धी २०२२ पर्यंत नक्कीच साध्य करू शकू.

प्रधानमंत्री महोदयांच्या आवाहनानुसार मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनीसुद्धा महाराष्ट्राच्या नवनिर्मितीसाठी दुष्काळापासून मुक्ती, शेतकऱ्यांना कर्जापासून मुक्ती, प्रदूषणापासून मुक्ती, करजंजाळापासून मुक्ती, अस्वच्छतेपासून मुक्ती, बिल्डरांच्या मनमानीपासून मुक्ती, भ्रष्टाचारापासून मुक्ती अशा सप्तमुक्तीचा संकल्प केला आहे. त्या दृष्टीनेच महाराष्ट्र शासन गेल्या तीन वर्षात अविरत कार्यरत आहे. राज्य व नागरिकांच्या हिताचे अनेक महत्त्वाचे आणि दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची पावले नवनिर्मितीच्या दिशेने ठोसरीत्या पडल्याचे दिसून येते. ३० ऑक्टोबर रोजी या सरकारला तीन वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त आणि प्रधानमंत्री महोदयांच्या 'संकल्प ते सिद्धी' या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाच्या अनुषंगाने आम्ही लोकराज्यचा विशेषांक प्रकाशित करत आहोत.

या अंकात 'संकल्प ते सिद्धी' या कार्यक्रमाच्या अनुषंगाने केंद्र शासनामार्फत आणि मुख्यमंत्र्याच्या सप्तमुक्तीच्या संकल्पाच्या अनुषंगाने राज्य शासनामार्फत राबवण्यात येणारे उपक्रम, घेण्यात आलेले निर्णय, धोरण, योजना आणि त्यांची फलश्रुती यांची विस्तृत माहिती समाविष्ट केली आहे. राज्य शासनाच्या तीन वर्षपूर्तीनिमित्त, मंत्रिमंडळातील प्रत्येक मंत्रिमहोदयांनी त्यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या विभागातील कामगिरीचा लेखाजोखा मांडला आहे. त्यातून महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचे दर्शन घडते. हा अंक आपणास आवडेल अशी खात्री आहे.

या महिन्यात येत असलेल्या दिवाळीनिमित्त आमचे सर्व वाचक, लेखक, विक्रेते, वर्गणीदार यांना मन:पूर्वक शुभेच्छा.

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**


संकल्प
ते सिद्धी
नव्या भारताची चळवळ (२०१७-२०२२)
१२५ कोटी देशवासीयांच्या संकल्पातून घडणार....
नवा भारत 2022

**आज देशाला गरिबी, अस्वच्छता, भ्रष्टाचार, दहशतवाद, जातिवाद, सांप्रदायिकतेपासून मुक्त करण्याची शपथ घेऊ या. देशाला नव्या वाटेवर घेऊन जाऊ आणि २०२२ मध्ये नव्या भारताची उभारणी करू, असा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.**
**'चले जाव' आंदोलनाला ९ ऑगस्ट २०१७ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर लोकसभा सभागृहात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे भाषण झाले. या वेळी त्यांनी नवभारत निर्मितीचा संकल्प जाहीर करून, या संकल्पसिद्धीसाठी सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन केले. प्रधानमंत्र्यांच्या या भाषणाचा गोषवारा...**

आदरणीय अध्यक्ष महोदया, मी आपले आणि सदनातील सर्व आदरणीय सदस्यांचे आभार मानतो. आज, या सदनासारख्या पवित्र ठिकाणी ऑगस्ट क्रांतिदिनाचे स्मरण करण्याची संधी मिळाली आहे, याबद्दल आपणा सर्वांनाच अभिमान वाटत आहे. आपल्यापैकी अनेक जण असे असतील ज्यांना ऑगस्ट क्रांतिदिन अर्थात ९ ऑगस्टच्या अनेक आठवणी स्मरत असतील. मात्र, त्यानंतरही त्या सर्व घटना पुन्हा आठवणे हे निश्चितच प्रेरक आहे. संपूर्ण आयुष्यातील अशा अनेक चांगल्या आणि महत्त्वपूर्ण घटनांच्या स्मरणातून आपल्या आयुष्याला एक नवी शक्ती मिळते, राष्ट्रजीवनालाही एक नवी शक्ती मिळते. त्याचप्रमाणे आपली जी नवीन पिढी आहे, त्यांच्यापर्यंत हा वारसा पोहोचवणे, हे आपले कर्तव्य आहे. पिढ्यान्‌पिढ्या इतिहासाची ही सुवर्णपाने, त्या काळातील वातावरण, त्या काळी आपल्या देशातील महापुरुषांनी केलेले बलिदान, कर्तव्य, सामर्थ्य हे सर्वकाही येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम करतील.

जेव्हा ऑगस्ट क्रांतिदिनाला २५ वर्षे पूर्ण झाली, ५० वर्षे पूर्ण झाली, तेव्हा देशातील सर्व लोकांनी त्या घटनांचे स्मरण केले होते. आज त्या घटनेला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत आणि हा दिवस माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. म्हणूनच आज आम्हाला ही संधी मिळाल्याबद्दल मी अध्यक्ष महोदयांचे आभार मानतो.

देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामात ९ ऑगस्टची चळवळ हे असे एक व्यापक आणि तीव्र आंदोलन होते, ज्याची कल्पनाही इंग्रजांनी केली



नव्हती.

महात्मा गांधींसह अनेक ज्येष्ठ नेते तुरुंगात गेले होते. ही अशी वेळ होती, जेव्हा नवे नेतृत्व जन्माला आले. लाल बहादूर शास्त्री, राम मनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण अशा अनेक युवा नेत्यांनी नेतृत्वाची ती उणीव भरून काढली आणि चळवळ पुढे नेली. इतिहासातील या घटनांमधून आपल्या लोकांना नवी प्रेरणा, नवे सामर्थ्य, नवे संकल्प, नवी कृतिप्रवणता जागवण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहिले पाहिजे.

## आंदोलनाचे अनेक टप्पे

१९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले. १८५७ पासून १९४७ पर्यंत, देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या आंदोलनाचे अनेक टप्पे पाहायला मिळाले, अनेकांनी बलिदान केले, अनेक चढउतार होत राहिले. या आंदोलनाला वेगवेगळ्या दिशा मिळाल्या. मात्र १९४७ पूर्वी १९४२ साली घडलेली घटना, ही व्यापक आंदोलनाची सुरुवात होती, तो अंतिम व्यापक लोकसंघर्ष होता. त्या लोकसंघर्षाने जनतेला अंतिम लढ्यासाठी योग्य आणि अनुकूल अशी संधी उपलब्ध करून दिली. जेव्हा आपण या आंदोलनाकडे त्रयस्थपणे पाहतो, तेव्हा लक्षात येते की, १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धातच देशाच्या कान्याकोपऱ्यांत १९४२ च्या लढ्यासाठीचे रणशिंग फुंकले गेले होते. महात्मा गांधीजी परदेशातून मायदेशी परतले, लोकमान्य टिळकांनी संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे,' अशी सिंहगर्जना केली, १९३० साली गांधीजींनी दांडी यात्रा काढली, नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली आणि या सर्वांच्या बरोबरीने भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आजाद, चाफेकर बंधू अशा असंख्य वीरांनी देशाला स्वतंत्र करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली.

या सर्व घटनांनी वातावरण निर्मिती केली. परिणामी १९४२ मध्ये संपूर्ण देशभरात अशी स्थिती निर्माण झाली की, स्वातंत्र्य मिळवायचेच. आता नाही, तर कधीच नाही. सर्व देशवासीयांच्या मनात हीच भावना रुजली आणि त्याचमुळे या आंदोलनात लहान-मोठे सर्वच सहभागी झाले. १९४२ च्या आंदोलनात देशाच्या कान्याकोपऱ्यांतील, प्रत्येक सामाजिक स्तरातील, प्रत्येक वर्गातील सर्व नागरिक हिरिरीने उतरले. गांधीजींच्या शब्दाखातर या सर्वांनी आपले पाऊल पुढे टाकले. हीच ती चळवळ होती, ज्यात निर्वाणीचा संदेश देण्यात आला, 'भारत छोडो'. या महापुरुषाने शब्द उच्चारले, करेंगे या मरेंगे. गांधीजींच्या मुखातून 'करेंगे या मरेंगे', हे शब्द बाहेर पडणे हा देशासाठी चमत्कार होता. गांधीजींनी त्या वेळी सांगितले की, आजपासून आपल्यापैकी प्रत्येकाने स्वत:ला स्वतंत्र महिला आणि स्वतंत्र पुरुष समजावे आणि आपण स्वतंत्र आहोत, असे मानूनच आपले सर्व व्यवहार करावे. संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय इतर कशानेही माझे समाधान होणार नाही. आता करेंगे या मरेंगे, हेच खरे. हे बापूंचे शब्द होते आणि त्याच वेळी बापूंनी स्पष्ट केले होते की, त्यांनी अहिंसेचा मार्ग सोडलेला नाही. मात्र तेव्हा अशी परिस्थिती निर्माण झाली होती, सर्वसामान्यांवर इतका ताण होता की, त्यांचे नेतृत्व करणाऱ्या बापूंना जनसामान्यांच्या भावना व्यक्त करणारे शब्द उच्चारावेच लागले.

माझ्या आकलनाप्रमाणे, त्या काळी समाजातील सर्व लोक त्या चळवळीत सहभागी झाले. शेतकरी असो, मजूर असो, शिक्षक असो, विद्यार्थी असो, प्रत्येक जण या आंदोलनात उतरले. करेंगे या मरेंगे, हीच भावना त्यांच्या मनात होती. बापूंनी तर इथवर सांगितले होते की, इंग्रजांच्या हिंसेमुळे जर कोणी हुतात्मा होत असेल, तर त्याच्या शरीरावर एका पट्टीवर 'करेंगे या मरेंगे' तसेच हा या स्वातंत्र्य युद्धातील हुतात्मा आहे, असे लिहिले जावे. बापूंनी हे आंदोलन इतक्या मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले होते. आणि त्याची परिणती भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीत झाली. या मुक्तीसाठी देशाची तडफड सुरू होती. नेता असो वा सर्वसामान्य नागरिक, प्रत्येकाच्या मनात देशभक्तीची भावना सारखीच प्रखर होती. म्हणूनच मला असे वाटते की, जेव्हा अवघा देश उठून उभा राहतो आणि सामूहिकतेतून शक्ती निर्माण होते, ध्येय ठरलेले असते आणि ते ध्येय प्राप्त करण्यासाठी जेव्हा एका विचाराने भारलेले लोक निर्धाराने पुढे चालू लागतात, तेव्हा १९४२ ते १९४७ अशा अवघ्या पाच वर्षांच्या अवधीत पारतंत्र्याच्या साखळ्या गळून पडतात आणि भारतमाता स्वतंत्र होते.

## अद्‌भुत वातावरण

त्या काळी रामवृक्ष बेनीपुरी यांनी एक पुस्तक लिहिले होते, 'जंजीर और दिवारे'. त्याचे वर्णन करताना त्यांनी लिहिले होते, संपूर्ण देशभरात एक अद्‌भुत वातावरण निर्माण झाले आहे. प्रत्येक व्यक्ती नेता झाला असून प्रत्येक घराचा उंबरठा हा 'करेंगे या मरेंगे' या आंदोलनाचा भाग झाला आहे. देशाने स्वत:ला क्रांतीच्या हवनकुंडात झोकून दिले. क्रांतीची ज्वाला देशभरात धडाडून पेटली होती. मुंबईने नेतृत्व केले. दळणवळणाचे सर्व मार्ग ठप्प झाले होते. सर्व कचेऱ्या ओस पडल्या होत्या. भारतीय नागरिकांचे शौर्य आणि ब्रिटिश सरकारच्या नृशंस वर्तणुकीच्या बातम्या येत होत्या. महात्मा गांधीजींच्या 'करेंगे या मरेंगे' या मंत्राचा सर्वांनीच ध्यास घेतला होता.

तेव्हा देशात काय परिस्थिती असेल हे पुस्तकातून त्या काळचे वर्णन वाचताना सहज लक्षात येते. या घटनाक्रमावरून एक लक्षात येतो की, ब्रिटिशांचा वसाहतवाद भारतात सुरू झाला आणि त्याचा अंतही भारतातच झाला. भारताचे स्वतंत्र होणे हे केवळ भारतापुरते मर्यादित नव्हते. १९४२ नंतर आशियामध्ये, आफ्रिकेमध्ये ज्या ज्या देशांमध्ये वसाहतवादाविरोधात ठिणगी पडली, त्यामागे भारताच्या लढ्यातून मिळालेली प्रेरणा होती. म्हणूनच भारताचे स्वातंत्र्य हे भारतापुरते मर्यादित नव्हते तर स्वातंत्र्याची लालसा, जगातील सर्व देशांतील नागरिकांच्या मनात जागवण्यात; भारतातील सर्वसामान्य जनतेचा संकल्प आणि कर्तृत्वाचा मोठा वाटा होता. प्रत्येक भारतीयाला याचा निश्चितच अभिमान वाटेल. एक गोष्ट आपण पाहिली आहे की भारत स्वतंत्र झाल्यानंतर ठरावीक क्रमाने

वसाहतवादाला बळी पडलेले देश गुलामगिरीतून मुक्त झाले. भारताची इच्छाशक्ती हे प्रबळ इच्छाशक्तीचे एक उत्तम उदाहरण होते, हे यावरून सहज लक्षात येते. यावरून आपण शिकले पाहिजे की, जेव्हा आपण एकदिलाने संकल्प करून संपूर्ण ताकदीनिशी आपले निर्धारित ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करू, तेव्हा आपण निश्चितच देशाला संकटातून बाहेर काढू शकतो, गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त करू शकतो. नवे लक्ष्य साध्य करण्यासाठी देशाला सज्ज करू शकतो. इतिहासाने हे सिद्ध केले आहे. त्या काळच्या संपूर्ण आंदोलनाचा आढावा घेताना आणि आदरणीय बापूंच्या व्यक्तित्वाला जाणून घेताना, राष्ट्रकवी सोहनलाल द्विवेदी यांची कविता अतिशय उत्तमरीत्या व्यक्त होते. आपल्या कवितेत ते म्हणाले होते,



***चल पड़े जिधर दो डग, मग में***
***चल पड़े कोटि पग उसी ओर***
***गड़ गई जिधर भी एक दृष्टि***
***गड़ गए कोटि दृग उसी ओर***

अर्थात, ज्या दिशेला गांधीजी दोन पावले टाकत, त्या दिशेला आपोआप कोट्यवधी लोक चालू लागत. जिथे गांधीजी पाहत, तिथे कोट्यवधी लोक पाहू लागत. म्हणूनच गांधीजींचे व्यक्तिमत्त्व खऱ्या अर्थाने महान होते. आज २०१७ साली आपण या गोष्टीला नाकारू शकत नाही. आज आपल्याकडे गांधीजी नाहीत, आज आपल्याकडे तितकी उंची असणारे नेतृत्वही नाही. मात्र सव्वाशे कोटी नागरिकांच्या विश्वासासह आज जर आपण त्यांची स्वप्ने साकार करण्याचा प्रयत्न केला तर मला असे वाटते की, गांधीजींची स्वप्ने, त्या सर्व हुतात्म्यांची स्वप्ने पूर्ण करणे हे फार कठीण काम नाही.

## पुढचे पाऊल

आजचा दिवस हा त्या दृष्टीने पुढील पाऊल टाकण्यासाठी अनुकूल आहे. १९४२ साली जी जागतिक स्थिती होती, ती भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या दृष्टीने अनुकूल होती. ज्यांना इतिहासाची चांगली जाण आहे, त्यांना मी काय म्हणतो, ते योग्य प्रकारे समजत असेलच. आज २०१७ साली भारत छोडो चळवळीला ७५ वर्षे पूर्ण होत असताना, भारतासाठी तशीच अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. या अनुकूल परिस्थितीचा लाभ आपण घेतला पाहिजे. त्या काळी अनेक देशांसाठी आपण प्रेरणास्थान झालो होतो, आता पुन्हा एकदा त्याच वळणावर आपण उभे आहोत.

१९४७ आणि २०१७ या दोन्ही वर्षांवर दृष्टिक्षेप टाकला असता लक्षात येते की, या दोन्ही कालखंडात भारतासाठीच्या संधी समान पद्धतीने समोर उभ्या ठाकतील. आता या परिस्थितीत आपण काय भूमिका घ्यावी, कोणती जबाबदारी स्वीकारावी, हे आपण ठरवायचे आहे. मला असे वाटते की, इतिहासातील या अध्यायांतून प्रेरणा घेऊन आपण पक्षांपेक्षा देश मोठा असतो, हे मान्य केले पाहिजे. राजकारणापेक्षा राष्ट्रकारण जास्त महत्त्वाचे असते आणि माझ्यापेक्षा माझे सव्वाशे कोटी देशवासी जास्त महत्त्वाचे आहेत. जर ही भावना मनात बाळगून, आपण सोबत पुढे पाऊल टाकले तर सर्व समस्यांवर आपण यशस्वीरीत्या मात करू शकू; यात शंकाच नाही.

आज आपल्या देशाला भ्रष्टाचाराची कीड पोखरत आहे, याची आपणा सर्वांना जाणीव आहे. भ्रष्टाचार, मग तो राजकीय असो, सामाजिक असो किंवा व्यक्तिगत असो. काल काय झाले आणि कोणी केले, असे वाद अनेकदा होतात. मात्र आजच्या पवित्र क्षणी, आपण येणाऱ्या काळात प्रामाणिकपणाचा उत्सव साजरा करण्याचा निर्धार करू शकतो, प्रामाणिकपणाचा संकल्प मनाशी बाळगून देशाचे नेतृत्व करू शकतो. ही काळाची गरज आहे. देशातील सर्वसामान्य माणसाची गरज आहे. गरिबी, कुपोषण, निरक्षरता ही केवळ सरकारसमोरची आव्हाने नाहीत, ही देशासमोरची आव्हाने आहेत. देशातील गरिबांसमोर आज अनेक समस्या उभ्या आहेत आणि म्हणूनच देशासाठी प्राण पणाला लावू इच्छिणाऱ्या आणि देशासाठी संकल्प करणाऱ्या लोकांचे कर्तव्य आहे की, त्यांनी देशाला पुढे घेऊन जाताना सर्वांना सोबत घ्यावे. १९४२ च्या चळवळीत उतरलेले लोकही वेगवेगळ्या विचारांचे होते. सुभाषबाबूंचे विचार वेगळे होते. मात्र १९४२ च्या आंदोलनात सर्वांनी एका सुरात सांगितले की, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारत छोडो, हीच आमची मागणी आहे, हाच आमचा मार्ग आहे. आम्ही वेगवेगळ्या विचारांच्या मुशीतून घडलो असू. मात्र काही समस्यांमधून देशाला बाहेर काढण्यासाठी या संकल्पाच्या निमित्ताने आम्ही एकत्र आलो आहोत. गरिबी असो, उपासमार असो किंवा निरक्षरता असो. महात्मा गांधीजींचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न किती दूर गेले आहे. लोक गावे सोडून शहरात वस्ती करण्यासाठी गर्दी करत आहेत. ही जी समस्या आहे, तिचे निराकरण करण्यासाठी महात्मा गांधीजींच्या कल्पनेतील गाव साकारणे हा पर्याय असू शकतो. आजही आपण या कल्पनेवर

काम करू शकतो. या गावांमधील गरीब शेतकरी, दलित, शोषित, वंचितांचे आयुष्य मार्गी लावण्यासाठी आपण काही करू शकत असू, तर ते आपण केले पाहिजे. हा प्रश्न माझा किंवा तुमचा नाही, हा आपला सर्वांचा प्रश्न आहे, हा सव्वाशे कोटी भारतीयांचा प्रश्न आहे, सव्वाशे कोटी भारतीयांच्या लोकप्रतिनिधींचा हा प्रश्न आहे. हीच खरी वेळ असते, जेव्हा ती प्रेरणा आपल्याला बरेच काही साध्य करण्याची शक्ती देते आणि त्या प्रेरणेसह आपण आगेकूच करू शकतो.

## कर्तव्याची भावना उणावली

देशात फार पूर्वी कधीतरी कळत-नकळत अधिकाराची भावना प्रबळ होत गेली आणि कर्तव्यभावनेचा लोकांना विसर पडत गेला. राष्ट्रजीवनात, समाजजीवनात अधिकाराचे महत्त्व अबाधित असले तरी, कर्तव्याची भावना उणावली तर समाजजीवनात अनेक समस्या उद्‌भवतात. दुर्दैवाने आपल्या रोजच्या जगण्यात अनेक अनिष्ट बाबींचा शिरकाव झाला आहे आणि त्याबद्दल आपल्याला फारसे वाईटही वाटत नाही. आपले काही चुकते आहे, याची जाणीवही होत नाही. चौकात सिग्नलचा लाल दिवा पेटला असतानाही, मी माझी गाडी सहज पुढे घेऊन जातो आणि मी नियमाचा भंग करीत असल्याची जाणीवही मला होत नाही. कुठेही थुंकायचे, कचरा टाकायचा आणि हे करताना आपले त्यात काही चुकते आहे, याची जाणीवही मला होत नाही. आपल्या स्वत:च्याही नकळत अशा प्रकारे चुकीचे वागणे हा आपला स्वभाव होऊ लागला आहे. लहानसहान बाबीत आपण हिंसक प्रतिक्रिया देऊ लागलो आहोत. रुग्णालयात रुग्णाच्या जिवाचे काही बरेवाईट झाले तर डॉक्टर जबाबदार आहे की, रुग्णालय दोषी आहे की, इतर कोणाचा दोष आहे, हे लक्षात न घेताच रुग्णाचे नातेवाईक डॉक्टरला मारहाण करू लागतात, रुग्णालय पेटवून देतात. कुठे रस्ते अपघात झाला तर गाडी जाळून टाकतात, वाहनचालकाला मारहाण करतात. या सर्व घटना म्हणजे नागरिकांनी कायदा हातात घेण्याचे प्रकार आहेत. कायद्याचे पालन करणारे सुज्ञ नागरिक म्हणून आपलेही काही कर्तव्य आहे. आपल्या रोजच्या जगण्यात आपण अशा अनेक अनिष्ट बाबींना स्थान दिले आहे आणि त्यात आपले काही चुकते आहे, याची जाणीवही आपल्याला होत नाही. अशा वेळी हे दोष दूर करून समाजमनात कर्तव्यभावना जागवणे, ही आपली जबाबदारी असते, नेतृत्वाची जबाबदारी असते.

## शौचालयांची स्वच्छता

शौचालयांची स्वच्छता हा थट्टा-मस्करीचा विषय नाही. शौचालय उपलब्ध नसते तेव्हा रात्री अंधार पडण्याची वाट बघत ज्यांना दिवस ढकलावा लागत असेल, त्या माताभगिनींचा जरा विचार करा. म्हणूनच शौचालये तयार करणे आणि त्यांचा वापर करणे, यासाठी समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे. शौचालयांचा वापर करायला शिकवणे अत्यावश्यक आहे, ही भावना जनमानसात रुजवण्याची गरज आहे. त्यासाठी केवळ कायदा करणे पुरेसे नाही. कायदा मदत करू शकतो, मात्र कर्तव्यभावना मनात असेल तर ते काम अधिक चांगले होते, प्रभावी होते. म्हणूनच आपल्याला हे काम करावे लागेल. आपल्या देशातील माताभगिनींसाठी तरी आपल्याला यासाठी प्रयत्न करावे लागतील.

देशातील माता, भगिनी आणि महिला यांचे सामर्थ्य आम्हाला मोठी ताकद देते, त्यांच्या भागीदारीतून आपल्या विकासाला बळ मिळते. स्वातंत्र्यलढ्यावर फक्त एक दृष्टिक्षेप टाका. महात्मा गांधीजींनी ज्या ज्या ठिकाणी आंदोलने उभारली. त्या सर्व ठिकाणी आमच्या माताभगिनींनी नेतृत्व केले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यातही आमच्या या माताभगिनींचा सारखाच सहभाग होता. आजही राष्ट्र जीवनात त्यांचे समान योगदान दिसून येते. त्यांच्या सोईसुविधांकडेही आपण पुरेसे लक्ष दिले पाहिजे.





### स्वातंत्र्यलढ्याचे वेगवेगळे टप्पे

१८५७ पासून १९४२ पर्यंत देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचे वेगवेगळे टप्पे होते, हे आपण पाहिले. या आंदोलनकाळात अनेक चढउतार आले, नवनवी नेतृत्वे आली, कधी क्रांतीचा पक्ष वरचढ ठरला तर कधी अहिंसेच्या पक्षाने बाजी मारली. काही वेळा दोन्ही विचारप्रवाहांमध्ये मतभेद झाले तर काही वेळा दोघांमध्ये सलोखा निर्माण झाला. मात्र १८५७ पासून १९४२ पर्यंतचा कालखंड हा चढत्या भाजणीचा होता, हे लक्षात येते. तो हळूहळू व्यापक होत होत विस्तारत होता, हळूहळू लोक त्यात सहभागी होत होते. मात्र १९४२ ते १९४७ पर्यंतचा कालखंड अधिक वेगवान होता. ते एक वेगळेच भारावलेले वातावरण होते आणि त्याने इतर सर्व बाबी बाजूला सारून भारत स्वतंत्र करण्यास इंग्रजांना भाग पाडले, त्यांना हा देश सोडून जाण्यास भाग पाडले. १८५७ ते १९४२ पर्यंतच्या काळात हळूहळू क्रांती रुजत गेली. मात्र १९४२ ते १९४७ चा कालखंड हा वेगळा होता. आपण सामाजिक आयुष्याचा गेल्या १००-२०० वर्षांचा इतिहास लक्षात घेतला, तर विकासाचा प्रवासही असाच संथ गतीने होत आला आहे. हळूहळू जग पुढे चालले होते, हळूहळू जग आपल्यालाही बदलवत होते. मात्र गेल्या ३०-४० वर्षात हे चित्र फार चटकन बदलून गेले आहे. यात तंत्रज्ञानाची मोठी भूमिका आहे. गेल्या ३०-४० वर्षांमध्ये जगात जे वेगवान बदल झाले आहेत, त्याची कोणी कल्पनाही केली नसेल. मानवी आयुष्यात, विचारांमध्ये इतके मोठे बदल होतील, अशी कल्पनाही कोणी केली नसेल. अत्यंत वेगवान घडामोडींनी भारलेले सकारात्मक बदल आपण सध्या अनुभवतो आहोत.

ज्याप्रमाणे आपण हळूहळू होणाऱ्या बदलांच्या टप्प्यातून बाहेर पडून एका विशिष्ट अवधीत फार मोठी झेप घेतली, त्याचप्रमाणे २०२२ साली जेव्हा भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होतील तोपर्यंत; आपल्या स्वातंत्र्ययोद्ध्यांनी आपल्या भारतासाठी जी स्वप्ने पाहिली होती, ती साकार करण्याचा आपण सर्व मिळून प्रयत्न करू. त्यासाठी शर्थीचे प्रयत्न करू. आजपासून पाच वर्षांचा अवधी आपल्यासमोर आहे. १९४२ ते १९४७ प्रमाणेच २०१७ ते २०२२ हा असा संक्रमणाचा काळ असेल, ज्यात एका विशिष्ट ध्येयाच्या पूर्तीसाठी आपण आगेकूच करू. आपल्या संकल्पासह पुढची वाटचाल करू. ज्याप्रमाणे १९४२ च्या आपल्या आंदोलनाने अनेक देशांना प्रेरणा दिली, स्वातंत्र्यप्राप्तीची लालसा त्यांच्या मनात जागवली, त्याचप्रमाणे आजही असे अनेक देश नव्या प्रेरणेसाठी भारताकडे अपेक्षेने पाहत आहेत. २०१७ ते २०२२ या जबाबदारीच्या काळात आपण भारताला प्रगतीच्या एका नव्या उंचीवर घेऊन गेलो तर, नेतृत्वासाठी अपेक्षेने पाहणाऱ्या मोठ्या समुदायाला आपण एक नवी प्रेरणा देऊ शकू. जे नेतृत्वासाठी, प्रेरणेसाठी, इतरांच्या अनुभवांवरून शिकून पुढे जाण्यासाठी उत्सुक आहेत; अशा सर्वांची इच्छा पूर्ण करण्याच्या दृष्टीने भारत सर्वतोपरी सक्षम आहे. आपण या कामी हातभार लावला तर ती फार मोठी देशसेवा होईल, असे मला वाटते. म्हणूनच सामूहिक इच्छाशक्ती जागृत करणे, संपूर्ण देशाला संकल्पबद्ध करणे, देशातील सर्वांना सोबत घेऊन पुढची वाटचाल करणे गरजेचे आहे. या पाच वर्षांच्या अवधीत जर अशा प्रकारे आपण वाटचाल करत राहिलो तर काही मुद्द्यांवर सहमती मिळवून आपण फार मोठे काम पार पाडू शकू.

### इच्छाशक्तीचे यश

आताच आपण वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटीचे उदाहरण पाहिले. मी वारंवार सांगतो की, हे माझे राजकीय वक्तव्य नाही तर हे माझे वैयक्तिक मत आहे. जीएसटीचे यश हे एका सरकारचे यश नाही, जीएसटीचे यश हे एका पक्षाचे यश नाही. जीएसटीचे यश हे या सदनात बसलेल्या सदस्यांच्या इच्छाशक्तीचे यश आहे. ते येथे बसले असोत, वा नसोत. हे सर्वांचे यश आहे. राज्यांचे आहे, देशातील सर्वसामान्य व्यापाऱ्यांचे आहे. त्यामुळे हे शक्य झाले आहे. देशाचे राजकीय नेतृत्व आपल्या वचनबद्धतेची बूज राखत इतके मोठे काम करते, ही जगासाठी आश्चर्याची बाब आहे. जीएसटी हा जगासाठी फार मोठा चमत्कार आहे. देश हे करू शकत असेल तर

सर्वच निर्णय आपण एकत्र बोलून, चर्चा करून घेऊ शकतो असा विश्वास या निर्णयाने दिला. सव्वाशे कोटी देशवासीयांचे प्रतिनिधी म्हणून, सव्वाशे कोटी भारतीयांना सोबत घेऊन २०२२ पर्यंत ध्येय साध्य करण्याच्या संकल्पासह; आपण वाटचाल सुरू केली तर आपण आपला इच्छित परिणाम निश्चितच साध्य करू शकू, असा मला विश्वास वाटतो.

### नवा संकल्प

'करेंगे या मरेंगे', अशी घोषणा महात्मा गांधीजींनी केली होती. आज २०१७ ते २०२२ या काळात भारत कसा असावा, याचा संकल्प करून आपल्याला पुढे जायचे आहे. या संकल्पासह आपण पुढे पाऊल टाकले तर आपण सर्व मिळून देशातील भ्रष्टाचार नक्कीच संपवू शकू. आपण सर्व गरिबांना त्यांचे अधिकार मिळवून देऊ शकू. आपण सर्व मिळून युवकांना रोजगार मिळवून देऊ शकू, आपण सर्व मिळून देशातील कुपोषणाचा प्रश्न निकाली काढू शकू. आपण सर्व मिळून महिलांना पुढे जाण्यापासून, प्रगती करण्यापासून रोखणाऱ्या बेड्या तोडून टाकू शकू. आपण सर्व मिळून देशातील निरक्षरता दूर करू. असे अनेक विषय आहेत. करेंगे या मरेंगे, हा त्या काळातील मंत्र होता. आज देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या ७५ व्या वर्षाकडे वाटचाल करताना, देशाला समस्यांमधून बाहेर काढण्याचा संकल्प करून आपण पुढे पाऊल टाकू. हा संकल्प कोणत्याही एका पक्षाचा नाही, हा संकल्प कोणा एका सरकारचा नाही, हा संकल्प सव्वाशे कोटी भारतीयांचा आहे; त्यांच्या लोकप्रतिनिधींचा आहे. असे सर्व मिळून जेव्हा संकल्प करतील तेव्हा या संकल्पापासून तो सिद्धीला जाईपर्यंतचा प्रवास निर्धोक होईल, असा विश्वास मला वाटतो. २०१७ ते २०२२ पर्यंतचा हा काळ, आपल्याला स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या स्वप्नांची पूर्ती करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास मला वाटतो. ऑगस्ट क्रांतिदिनी त्या महापुरुषांचे स्मरण करीत, त्यांचे आशीर्वाद घेत आपण सर्व एकत्र येऊन, काही बाबतीत सहमती जुळवून; देशाचे नेतृत्व करू या व देशाला समस्यांमधून बाहेर काढू या. स्वप्ने, सामर्थ्य, शक्ती आणि ध्येयपूर्तीच्या इच्छेने पुढे जाऊ या. आदरणीय अध्यक्ष महोदया, याच एकमेव अपेक्षेसह मी आपले आभार मानतो आणि सर्व स्वातंत्र्ययोद्ध्यांना अभिवादन करतो.

**'नवीन भारत मंथन' या संकल्पनेवर देशभरातील जिल्हाधिकाऱ्यांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून प्रधानमंत्र्यांचा संवाद**

प्रधानमंत्र्यांनी नवीन भारत– मंथन या संकल्पनेवर देशभरातील जिल्हाधिकाऱ्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संबोधित केले. भारत छोडो आंदोलनाला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त प्रथमच जिल्हाधिकाऱ्यांशी अशा प्रकारचा संवाद आयोजित करण्यात आला होता. तळागाळापर्यंत नवीन भारत-मंथन घडवून आणणे हा यामागचा उद्देश होता.

प्रधानमंत्री यावेळी म्हणाले,'९ ऑगस्ट ही तारीख 'संकल्प ते सिद्धी' मंत्राशी उत्कटपणे जोडलेली आहे. ही तारीख युवकांच्या इच्छाशक्ती आणि महत्त्वाकांक्षेचे प्रतीक आहे.

भारत छोडो आंदोलनाच्या सुरुवातीला स्वातंत्र्य चळवळीतील ज्येष्ठ नेत्यांना अटक झाल्यानंतर देशभरातील तरुणांनी हे आंदोलन यशस्वीपणे पुढे नेले. जेव्हा तरुण मंडळी नेतृत्वाची भूमिका स्वीकारतात, तेव्हा उद्दिष्टे नक्कीच साध्य होतात. जिल्हाधिकारी हे केवळ त्यांच्या जिल्ह्याचे प्रतिनिधी नाहीत तर त्या भागातील तरुणांचेही प्रतिनिधी आहेत. जिल्हाधिकारी नशीबवान आहेत कारण त्यांना राष्ट्राला स्वतःला समर्पित करण्याची संधी मिळाली आहे. सरकार प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, संघटना यांना विशिष्ट उद्दिष्टे समोर ठेवायला सांगत आहे; जे २०२२ सालापर्यंत त्यांनी साध्य करायचे आहे. जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून आता तुम्ही ठरवायचे आहे की, २०२२ पर्यंत तुम्हाला तुमचा जिल्हा कुठवर पोहचायला हवा आहे, कोणत्या त्रुटी आहेत; त्यावर कसा तोडगा काढता येईल आणि कोणत्या सेवा पुरवता येतील.

काही जिल्ह्यांमध्ये वीज, पाणी, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सेवांचा कायम अभाव असतो. जेव्हा सर्वाधिक मागास अशा १०० जिल्ह्यांमधील सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारेल, तेव्हा देशाच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळेल. म्हणूनच आता मोहीम स्वरूपात हे काम करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची आहे

ज्या जिल्ह्यांनी एखाद्या क्षेत्रात किंवा योजनेत चांगले परिणाम प्राप्त केले आहेत त्यांच्या सर्वोत्तम पद्धतींचे अनुकरण करा.

आपापल्या जिल्ह्यासाठी १५ ऑगस्टपर्यंत व्हिजन डॉक्युमेंट किंवा दूरदर्शी आराखडा तयार करा आणि यासाठी सहकारी, जिल्ह्यातील



वाढत्या नोकऱ्या, वाढती संधी




विद्वान मंडळी, शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थी यांची मदत घ्या. या आराखड्यामध्ये अशी १०-१५ उद्दिष्टे समाविष्ट करा जी २०२२ पर्यंत साध्य करावीत असे त्यांना वाटते. ज्याप्रमाणे रिले रेसमध्ये शर्यत जिंकण्याच्या एकमेव उद्देशाने एका खेळाडूकडून दुसऱ्या खेळाडूकडे बॅटन सोपवले जाते, तशाच प्रकारे विकासाचे बॅटन एका जिल्हाधिकाऱ्याकडून दुसऱ्याकडे यशस्वीपणे सोपवले जाते. अनेकदा जनतेला योजनांची माहिती नसल्यामुळे इच्छित परिणाम साधण्यात योजना अयशस्वी ठरतात. एलईडी दिवे, भीम ॲप यांसारख्या उपक्रमांच्या लाभाविषयी जिल्हाधिकाऱ्यांनी जनतेला अवगत करावे. त्याचप्रमाणे स्वच्छ भारत अभियान हे प्रतिसादात्मक प्रशासन आणि जनतेमधील जागृती यावर अवलंबून आहे. याबाबत खरा बदल केवळ लोकसहभागातून घडेल. जिल्हाधिकारी जितके प्रत्यक्ष दौरे करतील, तितके फायलींवर काम करताना त्यांना मदत होईल. जिल्हाधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यातील व्यापाऱ्यांना जीएसटी हा कसा गुड आणि सिम्पल टॅक्स आहे हे समजावून सांगायला हवे. प्रत्येक व्यापारी जीएसटी अंतर्गत नोंदणी करेल हे सुनिश्चित करायला हवे. तसेच त्यांच्या जिल्ह्यात खरेदीसाठी सरकारच्या ई-बाजारपेठेच्या सुविधेचा लाभ घ्यायला हवा. गरिबातील गरीब व्यक्तीचे जीवनमान सुधारणे हे प्रशासनाचे अंतिम ध्येय असायला हवे. आज मी गरिबाच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी काही केले आहे का? असे दररोज प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने स्वतःला विचारावे. तक्रारी घेऊन येणाऱ्या गरिबांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकावे. जिल्हाधिकारी तरुण आणि सक्षम आहेत आणि आपल्या जिल्ह्यासंदर्भात २०२२ च्या नवीन भारतासाठी ते संकल्प करू शकतात. त्यांचे संकल्प निश्चित पूर्ण होतील आणि पर्यायाने देशही यशाची नवी शिखरे गाठेल.'

## माहिती आणि उपक्रम

प्रधानमंत्र्यांनी या वेळी जिल्हाधिकाऱ्यांना www.newindia.in या संकेतस्थळाची माहिती दिली. ज्यात संकल्प से सिद्धी चळवळीशी संबंधित माहिती आणि उपक्रमांचा समावेश आहे. ते म्हणाले की, ज्याप्रकारे ते जिल्हाधिकाऱ्यांबरोबर मंथन करत आहेत, तसे ते त्यांच्या जिल्ह्यातही करू शकतात. प्रधानमंत्र्यांनी न्यू इंडिया संकेतस्थळाची महत्त्वाची वैशिष्ट्ये उदा. स्वातंत्र्यलढ्याबाबत ऑनलाइन प्रश्नमंजुषा आणि संकल्प से सिद्धी चळवळीचा भाग म्हणून देशभरात होणाऱ्या विविध कार्यक्रमाची सविस्तर माहिती समजावून सांगितली.

## शपथ
## संकल्प ते सिद्धी...

- **आपण सर्व मिळून देशातला भ्रष्टाचार दूर करू आणि करूनच दाखवू.**
- **आपण सर्व मिळून गरिबांना त्यांचे अधिकार मिळवून देऊ आणि देऊनच दाखवू.**
- **आपण सर्व मिळून तरुणांना स्वयंरोजगाराच्या अधिक संधी देऊ आणि देऊनच दाखवू.**
- **आपण सर्व मिळून देशातील कुपोषणाची समस्या दूर करू आणि करूनच दाखवू.**
- **आपण सर्व मिळून महिलांना पुढे जाण्यापासून रोखणाऱ्या बेड्या नाहीशा करू आणि करूनच दाखवू.**
- **आपण सर्व मिळून देशातून निरक्षरता संपवू आणि संपवूनच दाखवू.**



**युनिसेफच्या मते, चांगली स्वच्छता बाळगल्यास प्रत्येक कुटुंबाचे दरवर्षी ५०,००० रुपये वाचू शकतात. भारतात केवळ अतिसारामुळे दरवर्षी १ लाखांहून अधिक मुले मृत्युमुखी पडतात. अस्वच्छतेमुळे मुलांच्या शारीरिक आणि संतुलित वाढीस बाधा येते. त्यामुळे स्वच्छता बाळगल्यास निरोगी जीवन जगता येते. उघड्यावर शौचास बसण्यामुळे स्त्रिया आणि मुलींच्या सुरक्षेस व आरोग्यास धोका निर्माण होतो. या समस्यांकडे आपल्याला मुळीच दुर्लक्ष करून चालणार नाही.**

**एम. व्यंकय्या नायडू**


**उपराष्ट्रपती**

# स्वच्छता हीच सेवा...

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने स्वच्छ भारत अभियानाने गेल्या तीन वर्षांत जोरदार कामगिरी केली आहे. स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी देशभर आता सुरू झालेल्या ‘स्वच्छता ही सेवा’ या व्यापक मोहिमेत आपण सहभागी होऊ या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत, म्हणजेच महात्मा गांधीजींच्या १५० व्या जयंतीपर्यंत भारत स्वच्छ करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्या दृष्टीने १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०१७ दरम्यान ‘स्वच्छता हीच सेवा’ पंधरवाडा राबवला जात आहे. या जनआंदोलनाचा भाग होऊन स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या मोहीमेत हिरिरीने सहभागी व्हावे. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या प्रमुख उपस्थितीत कानपूर येथून ‘स्वच्छता ही सेवा’ या राष्ट्रीय अभियानाला सुरुवात झाली. यात आपण सर्वांनी सहभागी व्हायला हवे.

महात्मा गांधीजींनी आरोग्य आणि स्वच्छतेला सर्वाधिक प्राधान्य दिले होते. स्वच्छतेचे महत्त्व सांगताना ते म्हणतात, स्वच्छता राजकीय स्वातंत्र्यपेक्षा अधिक महत्त्वाची आहे. कुंभमेळ्यासारख्या धार्मिक समारंभात आपण पवित्र होण्याच्या उद्देशाने गंगा नदीला किती



अस्वच्छ करतो, याविषयीदेखील ते नाराजी व्यक्त करतात. रेखाटलेल्या चित्रांच्या प्रदर्शनाची खोली जेवढी स्वच्छ असते तेवढेच स्वच्छ आपले प्रसाधनगृहदेखील असायला हवे असा त्यांचा आग्रह असतो. आपल्या अनेक आजारांचे, रोगांचे कारण म्हणजे दुर्गंधीयुक्त स्वच्छतागृहे आणि कोठेही मलविसर्जनाची आपली वाईट सवय असल्याचेही ते अधोरेखित करतात.

## स्वच्छ भारताचे स्वप्न

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचे स्वच्छ भारताचे स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने, त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणे क्रमप्राप्त आहे. त्यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारत साकारण्यासाठी नामांकितांपासून ते सर्वसामान्यांपर्यंत, आबालवृद्धांनी निःस्वार्थपणे या कार्यक्रमात सहभागी व्हायला हवे. ही स्वच्छता मोहीम केवळ शासनाच्या अंमलबजावणीचा भाग न राहता, त्याची सूत्रे सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या हाती घ्यावी व स्वच्छ भारताचे स्वप्न साकार करावे.

युनिसेफच्या मते, चांगली स्वच्छता बाळगल्यास प्रत्येक कुटुंबाचे दरवर्षी ५०,००० रुपये वाचू शकतात. आपल्या देशात केवळ अतिसारामुळे दरवर्षी १ लाखांहून अधिक मुले मृत्युमुखी पडतात. अस्वच्छतेमुळे मुलांच्या शारीरिक आणि संतुलित वाढीस बाधा येते. त्यामुळे स्वच्छता बाळगल्यास निरोगी जीवन जगता येते. त्याचबरोबर उघड्यावर शौचास बसण्यामुळे स्त्रिया आणि मुलींच्या सुरक्षेस व आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो. या सर्व गंभीर समस्यांकडे आपल्याला मुळीच दुर्लक्ष करून चालणार नाही.

## सुरुवात स्वत:पासूनच...

जागतिक बँकेच्या अहवालानुसार स्वच्छतेचा अभाव आपल्या जीडीपीवर सहा टक्के एवढा परिणाम करतो. मला पुन्हा एकदा महात्मा गांधीजींचे शब्द अधोरेखित करावेसे वाटतात की, 'जोपर्यंत तुम्ही हाती झाडू आणि बादली घेत नाही तोपर्यंत तुम्ही गाव आणि शहरे स्वच्छ करू शकत नाही.' थोडक्यात सुरुवात स्वत:पासूनच करायची आहे.

ऑक्टोबर २०१९ पर्यंत भारत स्वच्छ करण्याच्या दृष्टीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियानाला विविध स्तरांतून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. विविध राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था, लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक समुदायातील लोक या अभियानाशी उत्स्फूर्तपणे जोडले गेले आहेत.


गेल्या तीन वर्षांमध्ये स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहरी आणि ग्रामीण या दोन्ही भागांमध्ये सुमारे पाच कोटी कुटुंबांसाठी शौचालये बांधण्यात आली आहेत. या अभियानाने आता गती घेतली आहे. २०१४ मध्ये उघड्यावर शौचास बसणाऱ्यांची संख्या ५५ कोटी एवढी होती. ती आता ३० कोटींवर खाली आणण्यात यश आले. स्वच्छता मिशनची सुरुवात झाल्यापासून स्वच्छतेची व्याप्ती ३९ टक्क्यांवरून ६७ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. २.३५ लाखांहून अधिक गावे (नमामी गंगे गावांसह), सुमारे १३०० शहरे, २०० जिल्हे आणि पाच राज्ये यांना हागणदारीमुक्त (ओडीएफ) म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच पुढील मार्चपर्यंत १० राज्ये हागणदारीमुक्त म्हणून घोषित होतील.

## स्वच्छता ही सेवा

'स्वच्छ भारत अभियान'च्या यशस्वितेसाठी 'स्वच्छता ही सेवा' ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या मोहिमेसाठी शासकीय यंत्रणा तर सर्व पातळ्यांवर संपूर्ण योगदान देणार आहेच. शिवाय प्रसिद्ध व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, महिला, युवकांचा गट, संरक्षण क्षेत्रातील कर्मचारी, शालेय विद्यार्थी दुहेरी शौचालयांच्या बांधकामासाठी (ट्विन-पीट टॉयलेट्स) च्या श्रमदानात सहभागी होतील असा मला विश्वास आहे. त्याचबरोबर शासकीय-निमशासकीय कार्यालये, बसस्थानके, रेल्वे स्थानके, रुग्णालये, उद्याने, शाळा, बाजार आदी सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छता मोहिमेत हे सर्व उत्स्फूर्तपणे सहभागी होतील याची मला खात्री आहे

'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यादरम्यान देशातील १५ महत्त्वपूर्ण ठिकाणी विशेष मोहीम राबवून ही स्थळे स्वच्छ केली जाणार आहेत. ही ठिकाणे स्वच्छतेचा आदर्श नमुना म्हणून इतरांसाठी मार्गदर्शक ठरतील. यामध्ये मंदिर, वारसा स्थळे आणि समुद्रकिनाऱ्यांचाही समावेश असेल. 'स्वच्छता ही सेवा' मोहिमेंतर्गत सर्व स्तरांमधून दमदार पावले टाकली जात आहेत. या अभियानात केंद्रीय मंत्री, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, खासदार, आमदार आणि इतर मान्यवर प्रमुख भूमिका बजावत आहेत. हे सर्व तसेच सामान्य नागरिक या मोहिमेशी बांधील असून या सर्वांच्या सहभागाने ऑक्टोबर २०१९ मध्ये आपल्याला कायापालट झालेल्या स्वच्छ भारताचे दर्शन घडणार आहे.

**शब्दांकन: प्रा. गणेश तारे**



# स्वच्छतेची संकल्पसिद्धी

डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी

**व्यक्तिगत किंवा कौटुंबिक जीवनामध्ये आरोग्य सांभाळण्यासाठी काही बाबी आवश्यक असतात. मात्र सामाजिक जीवनाच्या बाबतीत मनुष्य तेवढासा दक्ष राहत नाही. त्यातूनच सर्वत्र केरकचऱ्यांचे ढीग जमा होतात. त्यामुळे आरोग्याचे विविध प्रश्न निर्माण होतात. नको तेथे उकिरडे तयार होतात.  बकालपणा वाढतो. ही सर्व घाण वेगवेगळ्या रोगांना आमंत्रण देतो. ही बाब लक्षात घेऊनच केंद्रात आणि राज्यात स्वच्छता अभियान मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येत आहे. त्याचा निश्चितच चांगला फायदा झाला आहे.**

आपण पाहतो की, मनुष्याचे आजचे जीवन फारच धावपळीचे झालेले आहे. या धावपळीमध्ये मनुष्याचे सामाजिक आरोग्यविषयक बाबींकडे दुर्लक्ष होते. मनुष्य आपल्या परीने व्यक्तिगत व कौटुंबिक जीवनामध्ये स्वच्छता व नीटनेटकेपणा सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करत असतो. आपले घर, आपले आंगण सतत आवरतो, वेळोवेळी झाडलोट करून स्वच्छ ठेवतो. तसेच जेवणाखाणाच्या बाबींबाबत शुद्धता व स्वच्छता सांभाळतो. कपडेलत्ते, आंथरुण, पांघरुणे स्वच्छ ठेवतो. तसेच घरातील सर्व वस्तूसुद्धा जागच्या जागी ठेवण्याचा प्रयत्न करतो. याबाबत आळस, दिरंगाई, बेशिस्त किंवा हलगर्जीपणा झाला तर वस्तूंच्या जागा बदलतात. नेमक्या घाईच्या वेळी त्या सापडत नाहीत. याचे दुष्परिणाम स्वत:ला व कुटुंबातील इतरांनासुद्धा भोगावे लागतात. म्हणजेच आपल्या अंतरीची स्वच्छतेबाबतची व नीटनेटकेपणाची जाणीव त्यामध्ये स्वयंशिस्त निर्माण करते. यातूनच त्याला घर स्वच्छ व निरोगी ठेवण्याची प्रेरणा देत असते. परिणामस्वरूप, घरातील सर्वांचे आरोग्य सांभाळले जाते.



स्वच्छता अभियान कार्यक्रमात डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्यासमवेत सहभागी झालेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर मान्यवर.

### घाणीचे साम्राज्य

व्यक्तिगत किंवा कौटुंबिक जीवनामध्ये आरोग्य सांभाळण्यासाठी ज्या ज्या बाबी आवश्यक आहेत, त्याच बाबींची सार्वजनिक अथवा सामाजिक जीवनामध्येसुद्धा तेवढीच आवश्यकता आहे. मात्र सामाजिक जीवनाच्या बाबतीत मनुष्य तेवढासा दक्ष राहत नाही ही वस्तुस्थिती आहे. परिणामस्वरूप आपल्याला दिसते की, आपल्याच परिसरामध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. जागोजागी केरकचऱ्यांचे ढीग जमा झालेले दिसतात. नको तेथे उकिरडे तयार झालेले असतात. बकालपणा वाढलेला आढळतो. ही सर्व घाण वेगवेगळ्या रोगांना आमंत्रण देत असते. अनेक प्रकारच्या रोगांचे जंतू यातून निर्माण होतात. कॉलरा, गॅस्ट्रो, विषमज्वरासारख्या साथीच्या रोगांचा फैलाव होतो. अनेक प्रकारच्या डासांचा प्रादुर्भाव होतो. मलेरिया, डेंग्यूसारखे रोग संपूर्ण वस्तीला वेढा घालतात. याशिवाय वातावरणामध्ये प्रदूषण निर्माण होते ते वेगळेच असते. अशा आरोग्यासाठी अपायकारक घटकांमुळे आपल्या गावाची किंवा शहराची ओळख एक अस्वच्छ,  गलिच्छ गाव किंवा शहर म्हणून होत असते.

स्वच्छ व नीटनेटक्या घरांमध्ये राहणाऱ्या व्यक्ती परिसरातील अस्वच्छता पाहून वैतागतात, त्रागा करतात. मात्र परिसराला अस्वच्छ करण्यामध्ये अभावितपणे याच व्यक्ती सहभागी होत असतात. कोणाचे लक्ष नाही असे पाहून आपणच घरातील केरकचरा बाहेर फेकतो. म्हणजेच घरातील स्वच्छता व बाहेरील परिसरातील स्वच्छता याबाबत मनुष्याच्या वृत्तीमध्ये आंतरिक विरोधाभास जाणवतो. परिसरातील अस्वच्छता पाहून मनुष्य त्राग्याने विचारतो की, सरकार काय करते? नगरपालिकेचे याकडे लक्ष आहे की नाही? वास्तविक शासन आपले काम करतच असते. स्थानिक संस्थाचे अल्पसंख्येने असलेले कर्मचारी बहुसंख्य व्यक्तींनी केलेला कचरा काढतच असतात. मनुष्य मात्र याबाबतीत सर्व त्यांच्यावर ढकलतो व स्वत:ला त्यातून मोकळे करतो.

अत्यंत जबाबदारीतून शासकीय यंत्रणा याबाबत आवश्यक नियम, कायदे व दंडात्मक कार्यवाही करतच असते. तसेच हे सर्व राबवण्याचा आटोकाट प्रयत्न करते. तरीपण आपण पाहतो की, दिवसेंदिवस बकालपणा वाढीस लागला आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे जी स्वयंशिस्त मनुष्य वैयक्तिक जीवनात पाळतो तिचा सामाजिक जीवनात अभाव आहे. शासनाकडे दोषारोपण करताना मनुष्य सोयीस्करपणे आपल्या सामाजिक कर्तव्यांकडे दुर्लक्ष करत असतो.

## जबाबदार नागरिकांची कर्तव्ये

एक जबाबदार नागरिक म्हणून आपलीही कर्तव्ये आहेत. सार्वजनिक व सामाजिक जीवनामध्ये स्वच्छता सांभाळणे हे एक उत्तम नागरिकतेचे द्योतक आहे. पाश्चात्त्य व इतर देशांमध्ये आपण पाहतो की, तेथील नागरिकही स्वच्छता सांभाळण्याबाबत कमालीचे सावध आहेत. किंबहुना या स्वच्छता जाणिवेला ते दैनंदिन जीवनाचे एक अविभाज्य अंग म्हणून समजतात. ही बाब त्यांच्या एवढी अंगवळणी पडली आहे की, ते याला देशभक्तीचा, देशप्रेमाचा एक प्रमुख घटक मानतात. अस्वच्छता करणे किंवा सार्वजनिक ठिकाणी केरकचरा करणे हा त्यांच्या दृष्टीने एक सामाजिक व राष्ट्रीय गुन्हा आहे. स्वयंशिस्तीने सार्वजनिक स्वच्छता उत्स्फूर्तपणे सांभाळली जाते. आपल्याकडे याचे भरपूर कौतुक केले जाते. याबाबत आश्चर्यसुद्धा वाटते. मात्र आपल्या आचरणात याचे अनुकरण होताना आढळत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या वृत्तीमध्ये, स्वभावामध्ये अंतर्विरोध आहे.

## वृत्तीमध्ये परिवर्तन आवश्यक

स्वच्छतेबाबतच्या आपल्या जाणिवा फक्त स्वत:पुरत्या किंवा घरापुरत्याच मर्यादित राहता कामा नयेत. या जाणिवांना अधिक व्यापकता व विशालता प्राप्त होणे गरजेचे आहे. आपले स्वास्थ उत्तम राहण्यासाठी परिसरामध्ये स्वच्छता राखणे हे माझे कर्तव्य आहे. याकडे जबाबदारीच्या भूमिकेतून पाहता आले पाहिजे. आपला समाज एक कुटुंब आहे व मीसुद्धा त्यातील एक जबाबदार घटक आहे. म्हणून माझीसुद्धा सामाजिक कर्तव्ये आहेत ही जाण उभी राहिली पाहिजे.

यासाठी स्वेच्छेने परिसराला स्वच्छ ठेवण्याबाबत आपण पुढाकार घेतला पाहिजे. मग इतर नागरिकसुद्धा स्वच्छतेसाठी आपोआपच पुढे येतील. 'एकमेका साह्य करू' या तत्त्वानुसार गावच्या गाव स्वच्छ होऊन सार्वजनिक आरोग्य सांभाळण्याचा प्रतिबंधात्मक उपाय अमलात येईल.

याच भूमिकेतून स्वच्छता अभियानाचे आयोजन व अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. स्वयंप्रेरणेशिवाय हे अशक्य आहे. समाज किंवा शासन माझ्यासाठी काय करते यापेक्षा आपण समाजासाठी अथवा देशासाठी काय केले पाहिजे, ही जाणीव वाढीस लागली पाहिजे. जाणीवपूर्वक दृष्टिकोनातून देशप्रेम व देशभक्ती वृद्धिंगत होण्यात मदत होईल, यात संशय नाही.

या भूमिकेला साकार करण्यासाठी डॉ. नानासाहेब प्रतिष्ठान गेल्या दशकापासून सजगपणे समाजभिमुख उपक्रम राबवणारे प्रतिष्ठान असून, गेली अनेक वर्षे व्यापक स्वरूपात स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहेत. दिनांक १६ नोव्हेंबर २०१४ रोजी घेतलेल्या स्वच्छता अभियानाची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये करण्यात आली. प्रतिष्ठानच्या स्वच्छता अभियानामध्ये लाखों नागरीकांचा सहभाग असतो.

२ ऑक्टोबर २०१७ रोजी महात्मा गांधी यांच्या जयंती दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'स्वच्छता हीच सेवा' या अभियानामध्ये आपले एक अल्पसे योगदान देण्याचा प्रामाणिक प्रयत्न प्रतिष्ठानातर्फे करण्यात येत आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने हा संकल्प निश्चितच सिद्धीस जाईल.



भिमेश्वर तलाव, नागाव येथे स्वच्छता अभियान

निश्चलनीकरणविरोधी टीकाकारांच्या सर्व तर्कवितर्कांना निष्प्रभ करीत, या साऱ्या व्यवहाराचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यात यश मिळाले. त्यामुळे अर्थव्यवस्था वाढीच्या नव्या मार्गाकडे वाटचाल करू लागली आहे. ही प्रक्रिया सामान्य माणसाला कमीतकमी त्रास होईल, अशा प्रकारे तडीस नेली आहे. निश्चलनीकरणाचा ऐतिहासिक निर्णय देशहितासाठी आणि सामान्य माणसाच्या हितासाठीच होता. काळा पैसा रोखणे आणि अर्थव्यवस्था सशक्त करणे हे या निर्णयामागचे आधीच जाहीर केलेले उद्देश आता फलद्रूप होऊ लागले आहेत.

# अर्थव्यवस्थेची नवी दिशा

अनिल बलुनी



रिझर्व्ह बँकेने प्रसृत केलेली ताजी आकडेवारी स्पष्टपणे दाखवते की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा निश्चलनीकरणाचा ऐतिहासिक आणि निर्भीड निर्णय देशहितासाठी आणि सामान्य माणसाच्या हितासाठीच होता. याचे परिणाम आधीच आपणास दिसू लागले आहेत. काळा पैसा रोखणे आणि अर्थव्यवस्था सशक्त करणे हे या निर्णयामागचे आधीच जाहीर केलेले उद्देश आता फलद्रूप होऊ लागले आहेतच, पण आणखी फलदायी परिणाम येणाऱ्या काळात दिसू लागतील.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) आकडेवारीने हे दिसून येते की लाखो बनावट आणि गैरव्यवहार आधीच तपासयंत्रणांकडे सुपुर्द आहेत. तसेच, तीन लाखांहून अधिक 'शेल कंपन्या' आता उघडकीला आल्या असून २.१ लाख कंपन्यांची नोंदणी गैरव्यवहारांमुळे रद्द करण्यात आलेली आहे. तब्बल ११५० कंपन्या काळा पैसा पांढरा करताना पकडल्या गेल्यामुळे १३,३०० कोटी रुपये त्यांच्याकडून उघड झाले आहेत, परत मिळवले जात आहेत.

## मोठा प्रहार

निश्चलनीकरणाचे प्राथमिक परिणाम फार उत्साहवर्धक आहेत. निश्चलनीकरणाचा निर्णय हा काळा पैसा, बनावट नोटा, करचुकवेगिरी आणि काळा पैसा पांढरा करण्याचे प्रकार यावर मोठा प्रहार होता. सरकारची ही कृती सामान्य माणसांपुढील समस्याच असून सरकारचा हा निर्णय योग्य नाही, असा आरोप काही जणांनी पहिल्या पहिल्यांदा केला; परंतु भारतीयांनी रांगांमध्ये उभे राहून ही चळवळ तिच्या ईप्सित साध्यापर्यंत नेली, तिचे हृद्य लाभ आता मिळू लागलेले आहेत.

निश्चलनीकरणासोबतच, रोकडरहित अर्थव्यवस्थेचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ लागलेले आहे. देशातील करदात्यांच्या संख्येत प्रचंड वाढ झालेली आहे. या साऱ्याची सुरुवात आठ नोव्हेंबर २०१६ पासून झाली, जेव्हा सरकारने निश्चलनीकरणाचे- रु. ५०० व रु. १००० च्या सर्व नोटा रद्द करण्याचे - ठाम पाऊल उचलून पुढील वाटचाल केली. मग रिझर्व्ह बँकेने तोवर चलनात असलेल्या नोटांपैकी ९७ टक्के, म्हणजे १५.२८ लाख कोटी रुपये मूल्याच्या, नोटा परत मिळवून मर्यादित कालावधीत एवढ्या मोठ्या संख्येने नोटा जमा करून घेण्याचे आव्हान पेलून दाखवले.

सामान्य भारतीय माणसाने प्रधानमंत्र्यांच्या या निर्भीड निर्णयांना अविचल साथ दिली. लांब रांगांमध्ये उभे राहून आणि बँकांसमोर तासन्‌तास थांबून, नरेंद्र मोदी यांचा राष्ट्रउभारणीच्या उद्देशाने झालेला हा निर्णय आम्ही स्वीकारतो आहोत, हे भारतीयांनी दाखवून दिले. याचेच चालनादायी परिणाम आज आपल्यापुढे आहेत.

रिझर्व्ह बँकेची ताजी आकडेवारी हे दाखवते की, केवळ काळा पैसा खणून काढण्यातच नव्हे तर काश्मीर व नक्षलवादग्रस्त राज्यांमधील दहशतवादाला मिळणारा अर्थपुरवठा तोडण्यातही सरकार यशस्वी झालेले आहे. निश्चलनीकरणाचा आणखी एक मोठा प्रभाव असा की, दहशतवादी त्यांच्या दहशती कारवायांना अर्थपुरवठा करून आपली अर्थव्यवस्था कमकुवत करण्यासाठी ज्या भारतीय चलनाच्या बनावट नोटा (फेक इंडियन करन्सी नोट्स किंवा एफआयसीएन) वापरत, त्यांचेही निराकरण झाले.

## राष्ट्रहिताचे पाऊल

सरकार उचलत असलेले प्रत्येक पाऊल हे राष्ट्राच्या हितासाठीच असते. निश्चलनीकरणामागेदेखील औपचारिक अर्थव्यवस्था मजबूत आणि व्यापक करणे तसेच दहशतवादी, काळाबाजारवाले आणि हवाला-दलाल यांना जोरदार तडाखा देणे अशी महत्त्वाची आणि बहुविध उद्दिष्टे होती. या पावलांमुळे अनौपचारिक अर्थव्यवस्थेचे रूपांतर औपचारिक अर्थव्यवस्थेत झाले, त्यामुळे कर-आधार वाढून सामाजिक आणि विकासात्मक प्रकल्पांकरिता निधी उपलब्ध होऊ लागला. पण याचा मोठाच प्रभाव जाणवलेला आहे तो भारतीय लोकांनी ज्या प्रकारे रोकडरहित व्यवहारांचा अंगीकार केलेला आहे, त्यातून अर्थव्यवस्थेच्या अंकियीकरणाला (डिजिटलायझेशनला) मोठे प्रोत्साहन मिळाले आहे. ऑक्टोबर २०१६ मध्ये ७१.२७ कोटी डिजिटल व्यवहार होत होते, त्यानंतर वाढून हा आकडा मे २०१७ पर्यंत १११.४५ कोटींवर गेला, ही प्रचंड उडी (वाढ) ५६ टक्क्यांची आहे. तज्ज्ञ सांगतात की, २०२० पर्यंत भारतातील डिजिटल व्यवहार ५०० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचतील. अशा घडामोडीने आपल्या अर्थव्यवस्थेवर केवढा सकारात्मक परिणाम होईल याची कल्पना करा.

## कारवाईचा बडगा

निश्चलनीकरणामुळे करचुकव्यांवर आणि काळा पैसा व्यवहारात आणण्यात गुंतलेल्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. आतापर्यंत १.७ लाख कोटी मूल्याचे संशयास्पद व्यवहार पकडले गेले असून यातून काळ्या पैशाची समांतर अर्थव्यवस्था आदल्या सरकारांनी निर्णयच न केल्यामुळे कशी सुखेनैव वाढत होती, हे स्पष्ट दिसून येते. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये संशयास्पद व्यवहारांच्या एकंदर ३.६१ लाख तक्रारी नोंदवल्या गेल्या, ती संख्या २०१५-१६ मध्ये ६१,००० होती. यातून करघोटाळे आणि काळा पैसा याबाबत सरकार किती परिणामकारकरीत्या काम करीत होते, हे स्पष्टपणे दिसून येते. निश्चलनीकरणाच्या नंतर, कर-अधिकाऱ्यांनी १५,४९७ कोटी रुपयांहून अधिक मूल्याचे बेहिशेबी उत्पन्न/ काळा पैसा उघड केलेला आहे, ही ३८ टक्क्यांची उडी लक्षणीय आहे.

## काही उत्तम गोष्टी

बँकांमध्ये जमा झालेल्या 'स्पेसिफाइड बँक नोट्स' (एसबीएन, म्हणजेच विशिष्ट (रद्द झालेल्या) नोटा) हा कदाचित काळा पैसा असण्याची शक्यता आहे. या अनुषंगाने, 'ऑपरेशन क्लीन मनी' (किंवा स्वच्छ पैसा मोहीम) या वर्षी ३१ जानेवारीपासून सुरू झाली असून त्याअंतर्गत १८ लाख संशयास्पद खात्यांची छाननी सुरू करण्यात आली, हेही भारताच्या इतिहासात प्रथमच घडले. हे सगळे शक्य होण्याचे कारण म्हणजे मोदी सरकारने व्यवस्था स्वच्छ करण्याची राजकीय इच्छाशक्ती दर्शविली.

आणखी एक बाब प्रथमच घडली, ती म्हणजे निश्चलनीकरणानंतर आयकर-परताव्यांसाठीची (आयटीआर) अर्जसंख्या लक्षणीयरीत्या वाढली. आयकर परताव्यांमध्ये झालेली वाढ ३४ टक्के असून, वैयक्तिक प्राप्तिकराचे अग्रिम कर संकलन (कंपनीकर म्हणजे कॉर्पोरेट टॅक्सपेक्षा निराळे) देखील ४२ टक्क्यांची उडी घेऊन लक्षणीय प्रकारे वाढले आहे.

निश्चलनीकरण मोहिमेच्या परिणामी बचतीच्या सवयीत लक्षणीय बदल झाला आणि मालमत्ता-बाजाराचे औपचारिकीकरण किंवा व्यवस्थात्मीकरण झाले. व्यवस्थात्मक वित्तीय बाजारांमध्ये दखल घेण्याइतका जास्त निधी आला. उदाहरणार्थ, म्युच्युअल फंडांच्या 'व्यवस्थापनाखालील एकंदर मालमत्ता'मधील वाढ मार्च २०१६ ते जून २०१७ या काळात ५४ टक्के इतकी झाली.

रिझर्व्ह बँकेने चार ऑगस्ट २०१७ रोजीपर्यंत, आपल्या बँकिंग व्यवस्थेमध्ये १०.५ लाख कोटी रुपयांची तरलता (लिक्विडिटी) उपलब्ध केली, जी वर्षभरापूर्वी ५.२ लाख कोटी रुपये होती. याची परिणती बँकांनी व्याजदर घटवण्यात झालेली आहे. आपापल्या कर्जावर आता कमी 'ईएमआय' (सुलभ मासिक हप्ता) भरणारे लोक, हे याचे थेट लाभधारक आहेत.

जीएसटीखाली प्रभावशाली महसूल संकलन झाले, हेदेखील अप्रत्यक्षरीत्या निश्चलनीकरण मोहिमेशी संबंधित आहे. जीएसटीखाली जमा करून घेतला गेलेला एकंदर महसूल २९ ऑगस्ट २०१७ पर्यंत ९२,२८३ कोटी होता आणि तोही केवळ एकंदर जीएसटीदात्यांपैकी ६४.४२ टक्के जणांनीच जीएसटी चुकता करण्याची प्रक्रिया पूर्ण केलेली असताना. जीएसटी क्रमांकधारक अशा नव्याने नोंदणी झालेल्या करदात्यांची संख्या १९ लाख आहे.




### अर्थव्यवस्थेची नवी दिशा

निश्चलनीकरणविरोधी टीकाकारांच्या सर्व तर्कवितर्कांना निष्प्रभ करीत, या साऱ्या व्यवहाराचे प्रभावीपणे व्यवस्थापन करून, अर्थव्यवस्थेला वाढीच्या नव्या मार्गाकडे नेण्याचे काम मोदी सरकारने सामान्य माणसाला कमीतकमी त्रास होईल; अशा प्रकारे तडीस नेले आहे. समर्थ प्रधानमंत्र्यांनी नवभारताच्या निर्मितीसाठी धाडसी पावले उचलण्याचा निश्चय केला आणि निश्चलनीकरण आणि जीएसटीची सुरुवात हे दोन्ही निर्णय भारतीय इतिहासात महत्त्वाचे क्षण म्हणून नोंदवले गेले. निश्चलनीकरणाचे अल्पकालीन परिणाम दिसतात, त्यापेक्षा या मोहिमेचे दूरगामी आणि दीर्घकालीन सकारात्मक परिणाम भारतीय अर्थव्यवस्था अधिक मजबूत करणारे आणि भारतीय लोकांचे निश्चित कल्याण करणारे आहेत. **(साभार : लोकसत्ता)**

# सर्वसमावेशकतेची संस्कृती

रमेश पतंगे

**संकल्प ते सिद्धी या अभियानांतर्गत जातीयवाद, संप्रदायवाद यापासून मुक्तीचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले आहे. या दोन्ही बाबींना थारा न दिल्यास भारताची सर्वांगीण आणि परिपूर्ण प्रगती होणे शक्य आहे. भारतीय संस्कृतीमध्ये या दोन्ही बाबींचा समावेश होत नाही. सर्वसमावेशकता हीच या भूमीची खरी ओळख आहे. जातीयवाद आणि संप्रदायवाद मुक्तीचा संकल्प आपण साऱ्यांनीच एकदिलाने करायला हवा.**

भारत हा जगातील अतिप्राचीन देश आहे. येथे सर्व प्रकारची विविधता असून जगातील सर्व मानववंशाचे मिश्रण झाले आहे. 'भारतातील जाती' या प्रबंधात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारत हा एकवंशीय लोकांचा देश नाही तर, अनेक वंशाच्या मिश्रणातून निर्माण झालेला देश असल्याची मांडणी केली आहे. हीच बाब डॉ. राधाकृष्णन यांनी 'हिंदू व्ह्यू ऑफ लाईफ' या पुस्तकात मांडलेली आहे. भिन्न वंशीयांच्या मिश्रणाची प्रक्रिया वेदकाळापासून म्हणजे आठ ते दहा हजार वर्षांपासून झालेली आहे. या प्रक्रियेविषयी डॉ.बाबासाहेबांनी म्हटले की, 'भारतात असंख्य जाती आहेत आणि त्या एकमेकांपासून अलग असल्या तरी येथे खोलवरची सांस्कृतिक एकता आहे.' हीच गोष्ट राधाकृष्णन यांनी उपरोक्त पुस्तकात मांडली.



## सांस्कृतिक धागा

विभिन्न मानववंशाना एका सांस्कृतिक धाग्यात गुंफण्याचा प्रयोग जगात फक्त भारतात झाला, असे आपण म्हणू शकतो. प्रत्येक समूहाला त्याच्या वैशिष्ट्यानिशी, त्याच्या देव-देवतांनिशी स्वीकारून सांस्कृतिक एकतेच्या प्रवाहात त्यांना बसवण्यात आले. या प्रक्रियेतून जाती निर्माण झाल्या. दीर्घ काळापर्यंत त्या स्वायत्त आणि आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण राहिल्या. समाजरचनेमध्ये त्यांचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान राहिले. परंतु कालांतराने जातिभेद निर्माण झाले. उच्चनीचतेची भावना निर्माण झाली. अधिकारांचे विषम वाटप झाले आणि समाजरचनेचा पाया विषमता झाला. काही जातींना सर्व प्रकारचे अधिकार मिळाले. काही जाती अस्पृश्य झाल्या तर काही अतिशय मागास झाल्या. समाज संघटनेच्या दृष्टीने याचे अत्यंत घातक परिणाम झाले. समाज सहस्रखंडित झाला. जनसंख्या प्रचंड असूनदेखील समाज दुर्बल झाला. प्रत्येक जात स्वतः पुरताच विचार करू लागली. परक्याचे राज्य आले तेव्हा सर्वसामान्य भावना अशी झाली की, राज्य करणाऱ्या जातीचे राज्य गेले, आमचे काय गेले? आम्हाला तर आमचीच पारंपरिक कामे करायची आहेत. राज्य बदलल्याने आमच्यात काही फरक पडत नाही अशी भावना निर्माण झाली.

## जातिभेदावर कठोर प्रहार

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जातिभेदावर कठोर प्रहार केले आहेत. 'जाती राष्ट्रविरोधी आहेत.' असे त्यांनी घटना समितीच्या अखेरच्या भाषणात म्हटले. जातीची भावना संपल्याशिवाय राजकीय, सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण होऊ शकत नाही, असे त्यांचे मत होते. आपली राज्यघटना जातींना मान्यता देत नाही. जातीविरहित समाजरचनेचे ध्येय राज्यघटनेने ठेवलेले आहे. घटनेने सर्वांना समान अधिकार आणि समान संधी बहाल केली आहे. घटनेच्या सतराव्या कलमाप्रमाणे अस्पृश्यता संपवून टाकण्यात आली आहे, असे असले तरी सामाजिक जीवनातून जातीयता संपली आहे, असे म्हणता येत नाही. राज्यघटनेचा ध्येयवाद एका बाजूला आणि सामाजिक वस्तुस्थिती दुसऱ्या बाजूला असे विसंगतीने भरलेले आपले जीवन झाले आहे.

## सर्व धर्मांच्या शिकवणुकीचे सार

भारतात जशा असंख्य जाती आहेत तसे अनेक उपासना पंथ आहेत. या उपासना पंथांना त्यांचे उपासनाप्रमुख स्वतंत्र धर्म मानतात. धर्म आणि रिलिजन एक नव्हेत, हे जरी खरे असले तरी ज्या परिभाषेत लोक विचार करतात. त्या परिभाषेत विषय मांडावा लागतो. माणूस आणि ईश्वर यांच्या संबंधाची चर्चा जेथे होते त्याला रिलिजन किंवा रूढ भाषेत धर्म म्हणतात. विश्वाचे नियंत्रण करणारी एक शक्ती आहे आणि तिच्या शक्तीद्वारेच विश्वाचे संचालन होत असते. त्या शक्तीपुढे आपण नम्र असले पाहिजे. तिने घालून दिलेल्या नियमांचे पालन केले पाहिजे. परमेश्वर आपला पिता आहे आणि आपण सर्व त्याची संतान आहोत. ही भावना मानत ठेवली पाहिजे. सर्वांशी प्रेमाने आणि समानतेने व्यवहार केला पाहिजे. वाईट गोष्टीचे भय बाळगले पाहिजे. चांगल्या

गोष्टी केल्या पाहिजेत, हे थोडक्यात सर्व धर्मांच्या शिकवणुकीचे सार आहे. भारतात वैदिक, सनातनी, बौद्ध, जैन, शीख, ख्रिश्चन, इस्लाम, ज्यू, पारशी अशा सर्व उपासना पंथांचे लोक राहतात. शेकडो वर्षांपासून ते एकत्र राहतात. काही वेळा काही धर्म अनुयायांमध्ये धार्मिक कारणावरून संघर्ष होतात. यातील काही धर्म विस्तारवादी आहेत. ते धर्मांतराचे काम करतात. गरीब आणि भोळ्याभाबड्या लोकांचा बुद्धिभेद करून आणि आमिषे दाखवून धर्मांतर केले जाते. काही धर्मउपासना पंथांचे म्हणणे असे आहे की, आमचाच ईश्वर खरा आहे, बाकी सर्व खोटे आहेत. आमच्या मार्गानेच गेले असता मुक्ती मिळू शकते आणि आमच्या या विचारांचा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य आम्हाला राज्यघटनेने दिले आहे. या भूमिकांमुळे देखील धार्मिक संघर्ष उत्पन्न होतात.

### समाजाला दुर्बल करणारे मार्ग

आधुनिक काळाचा विचार करता जातिवाद असो की धर्मवाद असो, समाजाला दुर्बल करणारे हे मार्ग आहेत. आधुनिक काळाची आव्हाने फार वेगळी आहेत. आज व्यक्तीला पारलौकिक कल्याणापेक्षा इहलोकी माझे कल्याण कसे होणार आहे याची चिंता असते. सुखी जीवन जगण्यासाठी रोजगार, सुरक्षित जीवनाची हमी, आरोग्य रक्षणाची हमी, भविष्यकाळाची तरतूद या गोष्टींना खूप महत्त्व आले आहे.

### जातीभेद आणि धर्मभेदाच्या वर उठणे आवश्यक

विज्ञान आणि तंत्रज्ञान युगाशी जर आपल्याला जुळवून घ्यायचे असेल आणि प्रत्येकाला स्वतःचे सुख स्वतःच्या मार्गाने शोधण्याचा अधिकार अमलात आणायचा असेल तर त्याला जातिभेद आणि धर्मभेदाच्या वर उठल्याशिवाय ते शक्य होणार नाही. विज्ञानाच्या कसोट्या लावल्या तर जातिभेद या कसोट्यांवर उतरणार नाही आणि धर्माचे अनेक सिद्धान्त विज्ञानाच्या कसोट्यांवर टिकतच नाहीत. म्हणून आपल्याला विज्ञाननिष्ठ समाजाकडे जायचे आहे की, जातिनिष्ठ /धर्मनिष्ठ समाजाला कवटाळून बसायचे आहे. याचा निर्णय आपणच केला पाहिजे.

### सामाजिक समरसता

जातिनिष्ठ समाजरचनेवर सामाजिक समरसता हा उपाय आहे. सामाजिक समरसता म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा व्यवहार. रोजच्या जीवनात ही तीन महान तत्त्वे आचरणात आणता आली पाहिजेत. मनुष्य या नात्याने आपण सर्व समान आहोत. कोणत्याही प्रकारचे कृत्रिम भेद आणि मनुष्यनिर्मित भेदांचे पालन करण्याची जबाबदारी आपल्यावर नाही. या भेदांच्या पलीकडे जाऊन मी माणूस आहे आणि माणसासारखाच व्यवहार दुसऱ्या माणसाशी करीन अशा प्रकारची भावना प्रत्येक माणसात निर्माण झाली पाहिजे. केवळ आपल्याच जातीच्या संघटना निर्माण करता कामा नये, सर्व जातींचा ज्यात सहभाग असेल अशा संघटना उभारल्या पाहिजेत. एकमेकांना साहाय्य करण्याची मनोवृत्ती जोपासली पाहिजे.

### सत्य एक असून ते जाणण्याचे मार्ग अनेक

धर्ममतांच्या संदर्भात भारताचा सनातन विचार, सत्य एक असून ते जाणण्याचे मार्ग अनेक आहेत, हा आहे. स्वामी विवेकानंदांनी हाच विचार शिकागोच्या सर्वधर्म परिषदेत मांडला. कोणत्याही देवाला केलेला नमस्कार एका परमात्म्याला पोहोचतो ही आपली शिकवणूक आहे. भारतीय संस्कृतीची अनेक मूल्ये आहेत. त्यातील एक मूल्य सर्व उपासना पंथांचा आदर करावा हे आहे. दुसरे मूल्य सर्व पंथांच्या थोर पुरूषांचा सन्मान करावा हे आहे. तिसरे मूल्य कोणत्याही पंथाची मते दुसऱ्यावर लादू नये, त्याला त्याच्या मार्गाने जाऊ द्यावे. चौथे मूल्य सर्व धर्मग्रंथांचा सन्मान करावा. पाचवे मूल्य मनुष्याप्रमाणे सृष्टीतील प्राणी जीवनालाही जगण्याचा अधिकार आहे. त्याचे रक्षण करावे. सहावे मूल्य यातूनच अहिंसेचा जन्म झाला आहे. एकच चैतन्य सर्वात विद्यमान असल्यामुळे कोणत्याही अन्य जीवाची हत्या करता कामा नये. या सर्व मूल्यांच्या आधारे जर आपण जगू लागलो तर धर्मकलहाला काही स्थान राहणार नाही. सर्वपंथात आदराची भावना निर्माण होईल.

जातीविरहित आणि सर्वपंथीय आदरणीय समाज कसा निर्माण होणार? तो कोण निर्माण करणार? आपल्या राज्यघटनेने ही जबाबदारी भारताच्या प्रत्येक नागरिकावर टाकलेली आहे. भारताच्या संविधानाची उद्देशिका म्हणते की, 'आम्ही भारताचे लोक भारताचे एक (सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य) घडवण्याचा व त्याचा सर्व नागरिकास, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता- निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व (राष्ट्राची एकता आणि एकात्मता) यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा गांभीर्यपूर्वक निर्धार करून हे संविधान अंगीकृत करून स्वतः प्रत अर्पण करत आहोत.

### संविधानाचा ध्येयवाद

संविधानाचा हा ध्येयवाद प्रत्यक्ष येण्यासाठी शिक्षण व्यवस्थेचा हा अनिवार्य भाग झाला पाहिजे. इयत्ता पहिलीपासून ते शिक्षण पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांच्या बुद्धीला जितके आकलन होईल एवढे हे शिक्षण व्यवस्थेत बसवले पाहिजे. अध्यापक वर्गाचे कठोर प्रशिक्षण केले पाहिजे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे केवळ शब्द नसून त्यामागे मानवी इतिहास आहे. संघर्ष आहे, बलिदान आहे, शेकडो जीवने आहेत, शेकडो ग्रंथ आहेत. त्यांचे यथामती आणि यथाशक्ती आकलन करून द्यायला पाहिजे. या आकलनाशिवाय 'जाती निरपेक्ष व्हा' 'धर्मनिरपेक्ष व्हा' असे शब्द केवळ शब्द राहतात. त्याच्यामागे कोणताही भव्य आशय उभा राहत नाही. राज्यघटनेने समाजावर आणि समाजाचे नियमन करणाऱ्या राज्यव्यवस्थेवर ही जबाबदारी टाकली आहे.

# संकल्प ते सिद्धी नेमके काय आहे?

दयानंद कांबळे, रितेश भुयार

**भारत छोडो आंदोलनाला यावर्षी ७५ वर्ष पूर्ण झाली. १९४२ साली ब्रिटिशांच्या जोखडातून भारत देशाला मुक्त करण्याचा संकल्प करून १९४७ साली भारतदेश स्वतंत्र झाला. ही पार्श्वभूमी लक्षात घेता २०१७ ते २०२२ या कालावधी दरम्यान देशातून 'अस्वच्छता, गरिबी, भ्रष्टाचार, दहशतवाद, जातीवाद, संप्रदायवाद' दूर करण्याचा संकल्प करून 'नव्या भारता'च्या निर्मितीचा ध्यास देशातील प्रत्येक नागरिकांनी घ्यावा व २०२२ मध्ये देशाच्या ७५व्या वर्धापन वर्षापर्यंत, हा संकल्प सिद्ध करण्यासाठी प्रत्येक देशवासीयाने योगदान देण्याचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले आहे.**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमात आणि ९ ऑगस्ट २०१७ या 'क्रांतिदिनी' संसदेत आयोजित विशेष चर्चेत उपस्थितांसह देशवासियांना 'संकल्प सिद्धीतून नव्या भारता'चे आवाहन केले. याशिवाय विविध कार्यक्रमाप्रसंगीच्या संबोधनात आणि परदेशात भारतीयांशी संवाद साधतानाही प्रधानमंत्र्यांनी संकल्प से सिद्धीचे आवाहन केले आहे.

आकाशवाणीवरून दर महिन्याला 'मन की बात' या कार्यक्रमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे देशवासीयांना संबोधित करतात. ३० जुलै २०१७ च्या 'मन की बात'च्या संबोधनात सर्वप्रथम प्रधानमंत्र्यांनी देशवासीयांना 'संकल्प से सिद्धीतून' नव्या भारत निर्माणाचे आवाहन केले. या भाषणात ते म्हणाले, 'माझ्या प्रिय देशवासीयांनो, ऑगस्ट महिना क्रांतीचा महिना म्हणून ओळखला जातो. १ ऑगस्ट १९२० मध्ये 'असहकार आंदोलना'स प्रारंभ झाला. ९ ऑगस्ट १९४२ मध्ये 'भारत छोडो आंदोलन' प्रारंभ झाले आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. अर्थात ऑगस्ट महिना हा भारत देशाच्या स्वांतत्र्यासाठींच्या महत्त्वाच्या घटनांचे स्मरण करून देतो. १९४२ ते १९४७ या पाच वर्षात देशात जनमन घडले. देश स्वतंत्र करण्याच्या संकल्पातून ५ वर्षांच्या निर्णायक काळात देशात निर्माण झालेल्या अभुतपूर्व वातावरणाच्या फलस्वरूप भारत स्वतंत्र झाला.

### महत्त्वाचा काळ

यालाच अनुसरून २०१७ ते २०२२ हा पाच वर्षांचा कालावधी संकल्पातून सिद्धीच्या दिशेने महत्त्वाचा काळ माझ्या डोळ्यासमोर आहे. १५ ऑगस्ट २०१७ आपण सर्व देशवासी 'संकल्प पर्व' म्हणून साजरा करू आणि २०२२ मध्ये जेव्हा भारत देशाच्या स्वातंत्र्याची ७५ वर्ष पूर्ण होतील तेव्हा आपण त्या संकल्पाला प्रत्यक्ष सिद्ध करू.



९ ऑगस्ट या क्रांतीदिनाचे स्मरण करून १५ ऑगस्टला प्रत्येक भारतीयाने संकल्प करावा की, व्यक्तिगतरीत्या देशाचा नागरिक म्हणून, कुटुंबांच्या रूपाने, समाजाच्या रूपाने गाव आणि शहराच्या रूपाने, सरकारी विभागाच्या रूपाने, सरकार म्हणून मी हा संकल्प करेन. २०१७ वर्ष आपणास संकल्पाचे वर्ष बनवायचे आहे. 'अस्वच्छता, गरिबी, भ्रष्टाचार, दहशतवाद, जातिवाद, संप्रदायवाद' मुक्त भारत देश निर्माण करण्याचा आपण सर्वांनी संकल्प केला पाहिजे. 'करू किंवा मरू' या घोषणेची आज गरज नाही तर, देशासोबत संकल्पाने जुळण्याची गरज आहे.

प्रत्येक भारतीय, सामाजिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, शाळा, महाविद्यालय, वेगवेगळ्या संघटना प्रत्येकाने नव्या भारतासाठी काही न काही संकल्प करा. असा संकल्प जो पुढील ५ वर्षात आपण सिद्ध करून दाखवू. यासाठी युवकांच्या संघटना, छात्र संघटना, सामाजिक संघटना आदी सामूहिक चर्चेचे आयोजन करू शकतात. नवीन संकल्पना मांडू शकतात. एक राष्ट्र म्हणून आपल्याला कोठे पोहोचायचे आहे? एक व्यक्ती म्हणून माझे यात काय योगदान असू शकते? सर्वजण मिळून या संकल्पपर्वात सहभागी होऊ या.

## तरुणांना आवाहन

'मन की बात'मधेच प्रधानमंत्री मोदी यांनी ऑनलाइन जगात संचार करणाऱ्या तरुणांना आवाहन करताना नव्या भारताच्या निर्मितीसाठी संशोधनात्मक विचार मांडण्यास सांगितले. तंत्रज्ञानाचा उपयोग करून व्हीडियो, पोस्ट, ब्लॉग, लेख, नव-नवीन कल्पना युवकांनी मांडाव्यात आणि 'संकल्पातून सिद्धी' या मोहिमेस आंदोलनामधे परावर्तित करावे. narendramodiapp वर युवकांसाठी 'क्वीज इंडिया क्वीज'च्या माध्यमातून युवकांना भारत देशाच्या गौरवशाली इतिहासासोबत जोडून स्वातंत्र्य संग्रामातील नायकांचा परिचय करून देण्यात येत आहे. देशातील तरुणांनी या मोहिमेचा प्रचार प्रसार करावा, असे आवाहनही प्रधानमंत्र्यांनी केले.

## समाज माध्यमांवर संकल्प सिद्धी अभियान

'संकल्प सिद्धीतून नव भारत निर्मिती' अभियान दूरवर पोहोचवण्यासाठी नव माध्यमांचाही उपयोग करण्यात येत आहे. Mygov.in आणि NewIndia.in ही संकेत स्थळे, ट्वीटरवर @SankalpSeSiddhi नावाने हँडल आणि #Sankalpsesiddhi आणि #NewIndiaManthan हे हॅशटॅग वापरून तसेच Narendramodiapp वर देशवासीयांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असून, त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

'संकल्पातून सिद्धी अभियाना'च्या घोषनेनंतर Mygov.in या संकेतस्थळावर 'संकल्प से सिद्धी' नावाचे स्वतंत्र पृष्ठ तयार करण्यात आले आहे. या पृष्ठावर १२ सप्टेंबर २०१७ पर्यंत ४३ हजार ८८४ जणांनी 'संकल्पातून सिद्धी' कार्यक्रमाची शपथ घेतली आहे.

नवभारत मंथन, २०२२ पर्यंत नवभारत निर्मितीची शपथ, 'अस्वच्छता, गरिबी, भ्रष्टाचार, दहशतवाद, जातिवाद, संप्रदायवाद यापासून मुक्ती यासंबंधी ५ हजार१६२ प्रतिक्रिया आल्या आहेत. या पृष्ठावर संकल्पातून सिद्धीसंदर्भातील विषयावर घेण्यात आलेल्या मतदानात ४ हजार ५९० जणांनी मत दिले आहे. या पृष्ठावर भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील २५ नेत्यांची छायाचित्रे देण्यात आली असून त्याआधारावर प्रोफाइल तयार करण्याची सुविधा देण्यात आली आहे, त्यानुसार ७ हजार १३६ जणांनी प्रोफाइल तयार केली आहेत. ट्विटरवरील @SankalpSeSiddhi हँडलद्वारे या मोहिमेची माहिती देणारे ३ हजारांवर अधिक ट्विट देण्यात आले आहेत. #Sankalpsesiddhi आणि #NewIndiaManthan हे हॅशटॅग वापरून देशात संकल्प सिद्धीतून नव भारत निर्माण मोहिमेंतर्गत कार्यक्रमांची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. (नव माध्यमांबाबतची आकडेवारी १२ सप्टेंबर २०१७ पर्यंतची माहिती)

## नव्या भारताचा संकल्प

लोकसभेत ९ ऑगस्ट या 'ऑगस्ट क्रांती' दिनानिमित्त आयोजित विशेष चर्चेत बोलताना उपस्थित संसद सदस्य आणि केंद्रीय मंत्र्यांना संकल्पातून सिद्धीची शपथ घेऊन, नव भारताच्या निर्मितीत सहभाग देण्याचे प्रधानमंत्र्यांनी आवाहन केले. याच दिवशी त्यांनी व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून देशातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधला व येत्या ५ वर्षात आपापल्या जिल्ह्यात महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेऊन, त्यासंबंधात उद्दिष्ट निश्चित करून; गावागावांपर्यंत 'नव्या भारताचे मंथन' पोहोचवण्याचे आवाहन केले. यास महाराष्ट्रासह देशभरातील विविध जिल्हाधिकाऱ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. आपल्या जिल्ह्यात येत्या ५ वर्षात पूर्ण करावयाच्या संकल्पाविषयी त्यांनी थेट प्रधानमंत्र्यांना आपला मनोदय सांगितला.

१५ ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून केलेल्या संबोधनात प्रधानमंत्र्यांनी 'संकल्प सिद्धीतून नव्या भारता'चे आवाहन केले. याशिवाय २२ ऑगस्ट रोजी निती आयोगाच्या वतीने आयोजित 'चॅम्पियन्स ऑफ चेंज' कार्यक्रमांतर्गत देशातील विविध कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना संबोधित करताना, २४ ऑगस्ट रोजी पुणे येथील भारतीय कृषी औद्योगिक संस्थेच्या(बायफ) स्वर्णजयंती कार्यक्रमास व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संबोधित करताना, केंद्र शासनातील विविध विभागांच्या सहसचिव व संयुक्त सचिवांच्या तिसऱ्या व चौथ्या बैठकीला संबोधित करताना आणि ६ सप्टेंबर रोजी रंगून येथे म्यानमारमधील भारतीयांना संबोधित करताना; प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'संकल्प सिद्धीतून नवा भारत' निर्मितीचे आवाहन केले.


## 'संकल्पातून सिद्धी' कार्यक्रमास सुरुवात

प्रधानमंत्र्यांच्या आवाहनावरून देशभरात खासदार, आमदारांसह अन्य लोकप्रतिनिधींनी आपापल्या परिसरात तसेच केंद्र शासनातील विविध मंत्रालयांनीही आपल्या मंत्रालयांतर्गत संकल्पातून सिद्धी कार्यक्रम ही मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे.

### २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे दुप्पट उत्पन्न

केंद्रीय कृषी मंत्रालयाच्यावतीने 'संकल्प सिद्धीतून नव्या भारताचे निर्माण' हा कार्यक्रम देशभर राबवण्यात येत आहे. केंद्रीय कृषी तथा शेतकरी कल्याणमंत्री राधा मोहन सिंह यांनी या कार्यक्रमाचे १८ ऑगस्ट रोजी उद्घाटन केले. यात मुख्यत्वे मंत्रालयांतर्गत देशभरातील ५७८ कृषी विज्ञान केंद्र, भारतीय कृषी संशोधन केंद्रांच्या देशभरातील २९ शाखा आणि देशातील ५३ कृषी तंत्रज्ञान व व्यवस्थापन संस्थांमध्ये हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. याअंतर्गत शेती व तिचा विकास या विषयावर लघूपट दाखवण्यात येतात. या लघुपटात प्रधानमंत्र्यांनी २०२२ पर्यंत देशातील शेतकऱ्यांचे उत्पादन दुपटीने वाढवण्याचे आवाहन केले आहे.

प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वात कृषी मंत्रालयाच्या वतीने २०२२ पर्यंत देशातील शेतकऱ्यांचे उत्पादन दुप्पट करण्याच्या दिशेने ७ कलमी कार्यक्रम आखून अंमलबजावणीस सुरुवात केली आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक शेताला पाणी उपलब्ध करून देणे, हा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून 'प्रतिथेंब अधिक उत्पादन' ही योजना या कार्यक्रमासाठी तयार करण्यात आली आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात याची तरतूद करण्यात आली आहे. उत्पादन खर्चात घट करण्याचा कार्यक्रम यात अंतर्भूत आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी 'सॉइल हेल्थ कार्ड' योजना सुरू करण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून, खाद्यान्नाचा साठा करण्यात येणार आहे. धान्य कोठारांचा उपयोग करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. धान्य कोठारांसाठी बँकाकडून घेण्यात येणाऱ्या कर्जावर सूट देण्याची योजना आहे. प्रधानमंत्री शेतकरी संपदा योजनेच्या माध्यमातून शेतमालाची गुणवत्ता वाढवण्याचा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या योजनेसाठी ६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. शेतमाल विक्रीसाठी विपणनाची उत्तम सोय उपलब्ध करून देणे व त्यासाठी 'ई-कृषी बाजार' कार्यक्रम हाती घेण्यात आला असून देशातील ४५५ कृषी उत्पन्न बाजार समित्यांना ऑनलाइन पद्धतीने जोडण्यात आले आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा प्रदान करण्यात येईल. या योजनेला देशभरात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. शेतीपूरक व्यवसायासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन त्याचे उत्पादन वाढवणे या कार्यक्रमाचाही ७ कलमी कार्यक्रमात अंतर्भाव आहे.







### कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन

या कार्यक्रमांतर्गत देशभर शेतकऱ्यांसाठी कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात येत आहे. या कार्यक्रमात शेतकरी उत्साहाने सहभाग नोंदवत आहेत. संबंधित कृषी विज्ञान केंद्रांर्तगत शेतकऱ्यांनी केलेल्या नावीन्यपूर्ण प्रयोगाबाबत माहिती ते इतर शेतकऱ्यांना देत आहेत. या कार्यक्रमात संबंधित राज्यांतील मंत्री, खासदार आणि आमदारांसह अन्य लोकप्रतिनिधी सहभागी होत आहेत.

### गावे ब्रॉड बँडने जोडण्याचा संकल्प

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाच्यावतीने संकल्प सिद्धीतून नवभारत निर्माणाचा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. प्रधानमंत्र्यांचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम म्हणून ओळख असणाऱ्या 'भारत नेट' कार्यक्रमांतर्गत देशातील जवळपास २ लाख ५० हजार गावांमध्ये ब्रॉड बँड सुविधा पोहोचवण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या वर्षा अखेर १ लाख गावांमध्ये ब्रॉड बँड सेवा पुरवण्याचा संकल्प मंत्रालयाने केला आहे. प्रधानमंत्र्यांनी केलेल्या संकल्प सिद्धीतून भारत निर्माणाच्या घोषणेनंतर ३० ऑगस्ट २०१७ पर्यंत देशातील १७५ ग्रामपंचायतींमध्ये इंटरनेट सेवा पुरवण्यात आली. मोबाइल निर्मितीत देश स्वावलंबी करण्याचा संकल्पही मंत्रालयाने केला आहे. संकल्प सिद्धीतून भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत वर्ष २०२० पर्यंत देशातच मोबाइल फोन निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. सध्या परदेशी कंपन्याच्या बनावटीची मोबाइल विक्री भारतात होते. हे चित्र बदलवून वर्ष २०२० पर्यंत देशातील एकूण मोबाइल निर्मितीपैकी ९६ टक्के निर्मिती देशातच करण्याचा संकल्प करण्यात आला. त्यानुसार, मंत्रालयाने संकल्प सिद्धीसाठी पाऊले उचलली आहेत.

### घडवा स्वच्छ भारत

केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाच्या वतीने नव्या भारतासाठी संकल्पातून सिद्धीसाठी तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. मंत्रालयाच्या वतीने २३ ऑगस्ट २०१७ रोजी मुंबईत आयोजित केलेल्या या तिरंगा यात्रेत मंत्रालयाशी संबधित अधिकारी कर्मचारी, मंत्रालयाच्या भागधारक असलेल्या विविध कंपन्यांचे अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले. तत्कालीन केंद्रीय कामगार व रोजगार राज्यमंत्री ( स्वतंत्र प्रभार) बंडारू दत्तात्रेय यांनी वांद्रे येथील इंडियन ऑईलच्या कार्यालयाशेजारी आयोजित कार्यक्रमात तिरंगा यात्रेचे उद्घाटन केले. 'भ्रष्टाचार भारत

छोडो, घडवा स्वच्छ भारत 'अशी घोषणा श्री. दत्तात्रेय यांनी यावेळी दिली. वर्ष २०२२ पर्यंत मंत्रालयाच्या वतीने असंघटित कामगारांसाठी घरे उपलब्ध करून देण्याचा संकल्प करण्यात आला असून, या संकल्पाच्या सिद्धीसाठी सर्वांनी एकदिलाने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यांनी या वेळी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना 'करेंगे और करके रहेंगे' अशी शपथ दिली. तिरंगा यात्रेत राज्यातील मंत्री, खासदार आणि आमदार यांनी सहभाग घेतला.



स्वच्छता अभियानात सहभागी झालेले ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन.

## लोककलांच्या माध्यमातून नव्या भारताविषयी जनजागृती

आकाशवाणीवरील 'मन की बात' कार्यक्रमाद्वारे प्रधानमंत्री मोदी यांनी देशातील तरुणांना ९ ऑगस्ट १९४२ या क्रांतिदिनाचे महत्त्व कळावे यासाठी आवाहन केले होते. त्यानुसार केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या राष्ट्रीय अभिलेखागार येथे भारत छोडो आंदोलनावर आधारित भव्य प्रदर्शनीचे ९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०१७ या कालावधी दरम्यान आयोजन करण्यात आले. 'संकल्पातून सिद्धी' या विषयावर याच मंत्रालयाच्या वतीने दिनांक १२ ऑगस्ट रोजी कोईम्बतूर येथे, १६ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे आणि १७ ऑगस्ट रोजी नॉयडा येथे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत लोकगीते, लोक नृत्य आदी लोक कलांच्या माध्यमातून; संकल्पातून सिद्धी या विषयांबाबत जनजागृती करण्यात येते. अहमदाबाद-भूज, बेंगळुरू-मैसुर, वाराणसी-अलाहबाद, शिलाँग-ऐजवाल, अगरतला-कोहिमा, धर्मशाला-शिमला, कोलकाता-शांतीनिकेतन, पाँडेचरी-चैन्नई या ठिकाणीही सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीने संकल्प सिद्धीचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

## स्वच्छतेच्या संकल्पांसाठी जनजागृती

केंद्रीय पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाच्या वतीने दिनांक १८ ऑगस्ट रोजी 'संकल्प सिद्धीतून- नवा भारत' या मोहिमेंतर्गत 'स्वच्छ संकल्प से स्वच्छ सिद्धी स्पर्धा' जाहीर करण्यात आली. दिनांक १८ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधी दरम्यान आयोजित या स्पर्धेंतर्गत 'मी स्वच्छतेसाठी काय करणार?' या विषयावर निबंध स्पर्धा, 'भारत देशाला स्वच्छ बनवण्यासाठी माझे योगदान' या विषयावर लघूचित्रपट निर्मिती स्पर्धा आणि 'माझ्या स्वप्नातील स्वच्छ भारत' या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

## संसदीय कार्य मंत्रालयाचा उपक्रम

प्रधानमंत्र्यांच्या 'संकल्प सिद्धीतून नवा भारत' निर्माणाच्या आवाहनाला अनुसरून, संसदीय कार्य मंत्रालयाच्या वतीने विविध संस्थांच्या सहयोगाने देशभरात ३९ ठिकाणी 'नया भारत करके रहेंगे' अर्थात 'नवा भारत' या संकल्पनेवर आधारित प्रदर्शन आणि चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमांची सुरुवात लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन यांच्या हस्ते आणि तत्कालीन संसदीय कार्यमंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांच्या उपस्थितीत दिनांक १ सप्टेंबर रोजी लोकसभेत करण्यात आली. सुमित्रा महाजन यांनी या वेळी सांगितले, '२०२२ पर्यंत संकल्प सिद्धीतून नवा भारत घडवण्यासाठी देशभरातील सर्व पक्ष एकत्रित झाले आहेत. संसदीय कार्य मंत्रालयाच्या वतीने आयोजित प्रदर्शन व चर्चासत्रांच्या माध्यमातून शालेय विद्यार्थी आणि युवकांना भारत देशाची उज्ज्वल परंपरा याविषयी ज्ञान होईल व नवीन भारत घडवण्याच्या दिशेने त्यांना कार्य करण्याची स्फूर्ती मिळेल.'

वर्षात २०२२ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्धापन वर्षात नव भारताचे उद्दिष्ट देशासमोर ठेवले आहे. प्रधानमंत्र्यांनी दिलेल्या या घोषणेला देशभरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.



# ‘सप्तमुक्ती’चा संकल्प

भारतीय स्वातंत्र्याच्या ७० व्या वर्धापनदिनी तमाम भारतीयांना आणि महाराष्ट्रातील ११ कोटी २० लाख जनतेला मी खूप खूप शुभेच्छा देतो. हे वर्ष आपल्याकरता अत्यंत महत्त्वाचे वर्ष आहे. कारण या वर्षी इंग्रजी साम्राज्याच्या विरुद्ध महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली जी निर्णायक लढाई सुरू झाली होती. त्या ‘चले जाओ’ आंदोलनाला ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. या ७५ वर्षपूर्तीच्या निमित्ताने भारतीय स्वातंत्र्याकरता ज्या ज्या लोकांनी हौतात्म्य दिले, ज्यांनी कारावास भोगला, अनंत यातना सहन केल्या अशा सर्व स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांना मी मानवंदना अर्पित करतो. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर एक मोठा बदल, एक परिवर्तन देशामध्ये घडताना पाहत आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून नवभारताची संकल्पना मांडण्यात येत आहे. २०२२ साली देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होतील. त्यामुळे प्रत्येक भारतीयाने संकल्पबद्ध होऊन, नवभारताच्या निर्मितीकरता पुढील ५ वर्षात प्रत्येक नागरिकाला अविश्रांत कार्य करायचे आहे. सव्वाशे कोटी भारतीयांनी हाच संकल्प केला तर पाच वर्षात भारत जगाची महाशक्ती बनल्याशिवाय राहणार नाही.

## संकल्पपूर्तीकडे वाटचाल

महाराष्ट्रामध्ये त्याच संकल्पपूर्तीकडे आपण चाललो आहोत. राज्यातील शेतकऱ्यांना/बळीराजाला दिलासा देण्याकरिता कर्जमाफी जाहीर केली. ३४ हजार कोटींची कर्जमाफी ८९ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. मात्र, कर्जमाफीमुळे शासनाचे समाधान होणार नसून कर्जमाफीकडून कर्जमुक्ती हेच आपले उद्दिष्ट आहे. त्यासाठी शेतीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून, शेती क्षेत्राचा शाश्वत विकास करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. राज्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण सुलभ व्हावे यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी किंवा खुल्या मागास प्रवर्ग तसेच सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत: छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ६०५ अभ्याक्रमांसाठी सर्व प्रवर्गातील आर्थिक मागासवर्गीयांना ईबीसीच्या माध्यमातून सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे.

समाजातील वंचित घटक विशेषत: अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे विद्यार्थी यांच्याकरिता रहिवासाची व्यवस्था व्हावी, त्यांना वसतिगृहात जागा मिळाली नसल्यास; त्यांना खासगी वसतिगृहात राहण्यासाठी, सर्व प्रकारच्या व्यवस्था उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने मोठ्या योजना तयार केल्या आहेत. विद्यार्थ्यांना शहरी भागात राहिल्यानंतर ६० हजार रुपयांची मदत शासनाकडून शिकण्याकरिता, राहण्याकरिता, जेवणाकरिता त्यांना देण्यात येत आहे. राज्यामध्ये सर्वांसाठी घरे या योजनेंतर्गत ३ लाखांपेक्षा अधिक घरे बांधण्याची सुरुवात करण्यात आली आहे. येत्या कालावधीमध्ये ग्रामीण भागात १२ लाख घरे आणि शहरी भागात १० लाख घरे बांधून प्रत्येक बेघराला घर मिळेल, अशा प्रकारचे नियोजन करण्यात आले आहे. २०१९ पर्यंत राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या सर्व बेघरांना घर देण्याचा संकल्प शासनाने केला आहे.

## महिलांना सुरक्षितता

महिलांना सुरक्षितता मिळावी यासाठी अनेक प्रकारच्या उपाययोजना शासनाने सुरू केल्या आहेत. तसेच या योजनांच्या माध्यमातून महिलांना सुरक्षा पोहोचवायची आणि त्या माध्यमातून खऱ्या अर्थाने एक मजबूत असा महाराष्ट्र तयार करायचा हा प्रयत्न आहे. विविध प्रकारच्या योजनांच्या माध्यमातून, समाजातील वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न या सरकारच्या माध्यमातून करण्यात येत आहे. सर्वांनी संकल्पबद्ध होत प्रयत्न केला तर येत्या ५ वर्षांमध्ये एक अत्यंत बलशाली महाराष्ट्र आणि बलशाली भारत निर्माण करू शकू. राज्यात युवकांना रोजगार देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न होत आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. गेल्या वर्षी संपूर्ण देशामध्ये जेवढी परकीय गुंतवणूक आली, त्यापैकी ५० टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली. ही महाराष्ट्राची ताकद, महाराष्ट्राची शक्ती कोणीच नाकारू शकत नाही. राज्यामध्ये इतर मागासवर्गीयांसाठी वेगळा मंत्रालयीन विभाग निर्माण करून, या घटकाच्या कल्याणाकरिता विविध योजना सुरू केल्या आहेत.

### सप्तमुक्ती

**दुष्काळापासून मुक्ती, शेतकऱ्यांना कर्जापासून मुक्ती, प्रदूषणापासून मुक्ती, भ्रष्टाचारपासून मुक्ती, करजंजाळ मुक्ती, अस्वच्छतेपासून मुक्ती, बिल्डरांच्या मनमानीपासून मुक्ती.**

या निमित्ताने सर्वांना विनंती करतो जर देश बलशाली करायचा असेल तर आपण देखील काही गोष्टींपासून मुक्तीचा संकल्प केला पाहिजे. ज्या प्रकारे ‘चले जाव’च्या आंदोलनामध्ये इंग्रजांपासून मुक्तीचा एक संदेश आपण घेतला होता. आता स्वातंत्र्याच्या सात दशकांनंतर आपण देखील सप्तमुक्तीचा एक संदेश घेतला पाहिजे. देश बलशाली करण्यासाठी सर्वांनी ‘सप्तमुक्ती’चा संकल्प करा.

**(मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १५ ऑगस्ट २०१७ रोजी केलेल्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे)**

संकल्पमुक्ती #१

# दुष्काळापासून मुक्ती

कोरेगाव तालुक्यातील साधारण १ हजार ३७८ लोकसंख्येच्या हिवरे गावाला सलग तीन वर्षे टँकरने पाणीपुरवठा होत होता. मात्र, गेल्या वर्षी जलयुक्त शिवारने या गावात हिरवीगार पिके डोलू लागली. जलयुक्तच्या मोठ्या प्रमाणात झालेल्या कामांमुळे हा बदल घडून आला आहे. सिन्नरपासून २० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या देवपूर गावात गेल्या चार वर्षापासून पावसाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. उन्हाळ्यात टँकरने पाणी पुरवठा करावा लागत होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी ग्रामस्थांनी एकत्र येऊन, जलयुक्त शिवार योजना गावात राबवली. लोकसहभागातून देव नदीपात्रातील गाळ काढल्याने, गावातील पन्नास टक्के विहिरींच्या पाणीपातळीत पहिल्याच पावसात वाढ झाली. टंचाईचा त्रास सहन करणाऱ्या या गावाची वाटचाल आता टँकरमुक्तीच्या दिशने सुरू झाली आहे.

### टँकरमुक्तीच्या दिशेने

महाराष्ट्रातील ही प्रातिनिधिक गावांची कहाणी. अशी अनेक गावे सध्या सापडतील जी दरवर्षी दुष्काळाच्या झळा सोसत होती. मात्र, राज्य शासनाच्या मदतीने व लोकांच्या सहभागामुळे दुष्काळमुक्तीच्या दिशेने या गावांची वाटचाल सुरू आहे. पावसाने सलग काही वर्षे ओढ दिल्याने शिवारे ओसाड झाली होती. अशा परिस्थितीत कायमस्वरूपी उपाय योजण्यासाठी जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार, सिंचनासाठी बंद पाईपमधून पाणी पुरवठा अशा योजना राबवण्यात आल्या.

यामुळे अनेक गावांत मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले आहे. या गावांमध्ये आज मोठ्या प्रमाणात कृषी उत्पादन घेण्यात येते. जलयुक्तच्या कामामुळे गावातील नद्या, नाले पुनरुज्जीवित झाली आहेत. शेततळ्यांमुळे शेताला मुबलक पाणीपुरवठा सुरू झाला आहे.

'हिवरे गावातील शिवारात मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्याने आम्ही निश्चितपणे आता बारमाही पिके घेऊ शकतो,' ही गावातील शेतकरी हणमंत जगदाळे यांची प्रतिक्रिया खूप बोलकी आहे.

येवला तालुक्यातील अंदरसूल गावचा मेळानाला दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे परिसरात हिरवीगार पिके उभी राहिली आहे. विहिरींना जमिनीलगत पाणी लागल्याचे चित्र परिसरात दिसते आहे.

मलकापूर हे गाव कायम पाणीटंचाईग्रस्त होते. गावात ग्रामीण पाणी पुरवठा योजना आहे. मात्र, या योजनेसाठी वापरण्यात येणारी विहीर उन्हाळ्यात कोरडी होत असल्याने गावात पाणी पुरवठा होत नव्हता. जलयुक्त शिवारमध्ये पाणी पुरवठा योजनेच्या स्रोत विहिरीजवळ, रिचार्ज शाफ्टची कामे करण्यात आली. यामुळे या वर्षी विहिरीची पाणी पातळी वाढली आहे. पुढील उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणार नाही अशी आशा आहे, अशी प्रतिक्रिया मलकापूरच्या सरपंच साधना नेहारे यांनी दिली.

गेल्या तीन वर्षांत अनेक गावागावांमध्ये झालेले हे परिवर्तन



जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार अशा योजनांचे यश आहे.

२०१५-१६ सालापासून मृद व जलसंधारण विभागामार्फत सुरू झालेले हे महाराष्ट्र जलयुक्त करण्याचे मिशन अविरत सुरू आहे. यापुढे दरवर्षी पाच हजार गावे जलयुक्त करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले आहे. या दृष्टीने नियोजन आणि त्याची अंमलबजावणी सुरू आहे. गेल्या दोन वर्षात एकूण २१.११ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असून १५.७४ लाख सहस्त्र घनमीटर पाणीसाठा निर्माण झाला आहे.

लातूर शहराला गेल्या वर्षी रेल्वेने पाणीपुरवठा करावा लागला होता. पण तेथे लोकसहभागातून जलयुक्त शिवारची चांगली कामे झाली. अनेक गावे टँकरमुक्त झाली. पिण्याच्या पाण्याच्या ४१ हजार स्रोतांच्या बळकटीकरणाचे काम सुरू आहे. जलसंपदा, जलसंधारण आणि पाणीपुरवठा विभागात समन्वय निर्माण करून, महाराष्ट्र कायमचे टँकरमुक्त करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

सिंचनाबरोबर टँकरमुक्ती हेसुद्धा जलयुक्त शिवार अभियानाचे एक मुख्य उद्दिष्ट आहे. राज्यात ज्या ज्या ठिकाणी जलयुक्त शिवारची कामे झाली त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात टँकरमुक्ती झाली. मागच्या वर्षी मे महिन्यात जवळपास ६ हजार २०० टँकर सुरू होते. ही संख्या यंदाच्या वर्षी मे महिन्यामध्ये बाराशे झाली. राज्यात आतापर्यंत १ हजार १९० गावे टँकरमुक्त झाली असून, साधारण ५ हजार गावे टँकरमुक्तीच्या मार्गावर आहेत.

### जलसंपदा विभागाच्या उपाययोजना

पूर्वी सगळ्याच प्रकल्पांना थोडा-थोडा निधी देऊन सगळेच प्रकल्प अर्धवट ठेवण्यात आले होते. आता त्यातील जे प्रकल्प पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत त्यांना निधी देऊन त्यांची कामे पूर्ण करण्यात येत आहेत. पंधरा-पंधरा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रकल्पांची कामे प्राधान्याने हाती घेण्यात आली. मागील वर्षी १०० प्रकल्प पूर्ण करून, घळभरणीपर्यंत आणले आहेत. यातून सुमारे १ लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता नव्याने निर्माण झाली आहे. याशिवाय १४० प्रकल्प येत्या २ वर्षात पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या वॉररूमच्या माध्यमातून राज्यातील महत्त्वाच्या २३ प्रकल्पांच्या कामांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. पुढच्या दोन वर्षात साधारण ३२ ते ४० लाख हेक्टरइतकी अधिक सिंचन क्षमता निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.

**– नंदकुमार वाघमारे**

**संकल्पमुक्ती #२**

## शेतकऱ्यांना कर्जापासून मुक्ती

शेतीमालाला हमीभाव देऊन, शेती क्षेत्रातील गुंतवणूक वाढवण्यासाठी 'उन्नत शेती, समृद्ध शेतकरी' अभियान राबवण्यात येत आहे. त्या माध्यमातून शेतकऱ्यांची उत्पादन क्षमता वाढवून, कर्जमाफीपेक्षा कर्जमुक्ती करणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे.




शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ जाहीर केली. याअंतर्गत ३४ हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा होणार आहे. यापूर्वी पंजाब राज्याने १० हजार कोटी रुपयांची, आंध्र प्रदेशने १५ हजार कोटी रुपयांची, कर्नाटकने ८ हजार कोटींची तर तेलंगणाने १० हजार कोटी रुपयांची कर्जमाफी केली आहे. या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने केलेली ३४ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी ही देशभरात सर्वाधिक आहे. या योजनेंतर्गत कर्जमाफी व इतर प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी शेतकरी कुटुंब हा निकष विचारात घेण्यात आला आहे.

दीर्घकाळ कर्ज थकीत राहिल्याने शेतकरी कर्ज मिळण्यापासून वंचित राहत होते. जे शेतकरी अनेक वर्षापासून थकबाकीदार आहेत, अशा शेतकऱ्यांना बँकांकडून नव्याने कर्ज मिळत नाही. २००९ नंतर कर्ज मंजूर झाले आहे आणि ३० जून २०१६ पर्यंत थकबाकीदार असलेल्या सर्व अल्प आणि मध्यम मुदतीच्या कर्जदारांसाठी ही कर्जमाफीची योजना आहे. २०१२-२०१३ ते २०१५-१६च्या दरम्यान दुष्काळी परिस्थितीमुळे पिकाचे नुकसान झाल्याने शेतकरी कर्जाची परतफेड करू शकले नाहीत. त्यांना आणि कर्जाचे पुनर्गठन केले आहे अशा शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांनी पैसे भरले आहेत अशा शेतकऱ्यांना, प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी त्यांचा या कर्जमाफीत समावेश करण्यात येईल. ३० जून २०१६ पर्यंत ज्या शेतकऱ्यांची थकबाकी आहे त्यांनी ३१ जून २०१७ पर्यंत काही रकमेची परतफेड केली असल्यास; त्यांना ३१ जुलै २०१७ पर्यंत परतफेड केलेली रक्कम वजा करून, व्याजासह दीड लाखाच्या मर्यादेपर्यंतची कर्जमाफी केली जाईल. दीड लाखाच्या वर कर्जाची रक्कम असणाऱ्यांसाठी एकरकमी परतफेड योजना जाहीर केली आहे. या योजनेत ३१ जून २०१६ पर्यंत व्याजासह थकबाकीची दीड लाखाच्या वरची रक्कम शेतकऱ्याने बँकेत भरावयाची आहे. ती रक्कम भरल्यास शेतकऱ्याला दीड लाख रकमेचा लाभ मिळणार आहे. या योजनेसाठी पती, पत्नी व त्यांची अठरा वर्षांखालील मुले यांचा कुटुंब या संज्ञेत समावेश होतो. अठरा वर्षांवरील मुले ही कुटुंबात धरली जाणार नाहीत.

## ऑनलाइन प्रक्रिया

कर्जमाफी योजनेसाठी ऑनलाइन अर्ज पहिल्यांदाच मागविण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना अडचण येऊ नये, हा यामागील उद्देश आहे. अनेक योजनांसाठी या कर्जमाफीच्या माहितीचा भविष्यात निश्चित उपयोग होणार आहे. अंगठा आणि मोबाइलच्या वन टाइम पासवर्ड (ओटीपी)च्या माध्यमातून अर्ज कुणाचा आला आहे, याची शहानिशा होते. खरे शेतकरी या योजनेचे लाभार्थी ठरतील. अपात्र वगळले जातील. यातून खऱ्या लाभार्थ्यांना फायदा होईल. मंत्री, आमदार, खासदार, महानगरपालिका व जिल्हा परिषद सदस्य, शासकीय अधिकारी व कर्मचारी आयकर भरणाऱ्या व्यक्ती यासाठी पात्र नाहीत. मात्र १५ हजारांच्या खाली निवृत्ती वेतन घेणाऱ्यांना ही योजना लागू केली आहे.

## अर्ज भरण्यासाठी ई-सुविधा केंद्र

आपले सरकार, कॉमन सर्व्हिस सेंटर आदी शासनाच्या ऑनलाइन सुविधा आहेत. राज्यभरात २६ हजार केंद्रे खेड्यापर्यंत कार्यरत आहेत. कर्जमाफीचे अर्ज २४ जुलै २०१७ पासून भरणे सुरू करण्यात आले होते. १५ सप्टेंबर २०१७ ही कर्जमाफी अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती. त्या वेळी ५२ लाख १५ हजार शेतकरी कुटुंबांचे अर्ज प्राप्त झाले. त्यानंतरही अनेक शेतकऱ्यांचे अर्ज भरण्याचे शिल्लक राहिल्याने पुन्हा सात दिवसांची म्हणजे २२ सप्टेंबर २०१७ पर्यंत ही मुदतवाढ देण्यात आली होती. तोपर्यंत ५६ लाख ५९ हजार शेतकरी कुटुंबांचे अर्ज प्राप्त झाले. त्यामध्ये ७७.२६ लाख खातेदारांचा समावेश आहे. या याद्यांचे चावडीवाचन करण्यात आले.

## छाननी प्रक्रिया

शेतकऱ्यांनी त्यांचे संपूर्ण नाव, कुटुंबातील सदस्याचे नाव, आधार क्रमांक आणि बँकेचा खाते क्रमांक अशी प्राथमिक माहिती कर्जमाफी प्रक्रियेसाठी दिली आहे. काही लोकांनी चुकीची किंवा अपूर्ण माहिती भरली आहे का त्याची छाननी करण्यात आली. त्यानंतर ही माहिती पोर्टलवर टाकण्यात आली. कोणत्या शेतकऱ्यांनी कोणत्या बँकेतून, कोणत्या शाखेतून कर्ज घेतले आहे अशी सर्व माहिती पोर्टलवर उपलब्ध आहे.

३० जून २०१६ पर्यंत किती थकबाकीदार आहेत, किती लोकांनी कर्ज घेतले आहे, कर्जाचे पुनर्गठन किती? किती लोकांचे हप्ते बाकी आहेत, किती लोकांनी विहित मुदतीपर्यंत कर्ज परतफेड केली आहे, किती शेतकऱ्यांनी आतापर्यंत कर्ज घेतले आहे आणि त्या कर्जाची परतफेड केली आहे? ही सर्व माहिती जाणून घेण्यासाठी एक तक्ता तयार केला आहे. शेतकऱ्यांचे अर्ज आल्यानंतर किती अर्ज आधारकार्डला जोडले आहेत वा ज्या अर्जदारांनी जोडलेले नाहीत त्यांचे कार्ड (लिंक करावे) जोडावे, अशा सूचना बँकांना देण्यात आल्या आहेत. माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून शेतकऱ्यांनी भरलेल्या अर्जाची माहिती आणि बँकांनी दिलेल्या माहितीची तपासणी करण्यात येत आहे. ही तपासणी पूर्ण झाल्यानंतर जे शेतकरी या योजनेसाठी पात्र ठरतील त्या शेतकऱ्यांचे दीड लाखापर्यंतचे कर्ज शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. ऑक्टोबर महिन्यात पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात येणार आहे.

## अर्ज नामंजूर झाला तर काय?

कर्जमाफी यादीमध्ये ३ प्रकारचे वर्गीकरण करण्यात आले आहे. जे शेतकरी कर्जमाफी यादीत येतील त्यांची संपूर्ण माहिती पोर्टलवर टाकण्यात येईल. आपल्या गावात घरबसल्या अर्ज क्रमांक टाकल्यानंतर, यादीत असणाऱ्या लोकांची माहिती पोर्टलवर दिसू शकते. ज्यांचे अर्ज नामंजूर झाले आहेत, त्यांची नावेदेखील यादीत दिसू शकतील. तालुका पातळीवर ही यादी उपलब्ध करून देण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांची नावे कर्जमाफीच्या यादीमध्ये नाहीत किंवा जे कर्जमाफीसाठी पात्र नाहीत अशा लोकांची चौकशी करून, स्थानिक



पातळीवर परत तपासणी करून ऑनलाइन पोर्टलवर माहिती टाकण्यात येईल. कर्जदार शेतकऱ्यांचा मृत्यू झाला असेल किंवा एकाच कुटुंबातील २ ते ३ लोकांची खाती असतील अशा कुटुंबांनी, बँकेत जाऊन वारसांच्या हिश्श्यांची रक्कम निश्चित करून घ्यावी. रकमेची फोड करून प्रत्येकाच्या वाट्याला किती रक्कम आहे, त्याची माहिती अर्जाद्वारे बँकांना द्यावी. मयत व्यक्तीचे वारस एकापेक्षा अधिक असतील तर बँकांमध्ये जाऊन, प्रत्येकी आपल्या नावे किती हिस्सा येणार हे निश्चित करावे. मयत व्यक्तीच्या नातेवाइकांनी त्याची संपूर्ण माहिती बँकांना द्यावी. म्हणजेच त्यात बदल करून, कर्जदारांना त्याचा फायदा होऊ शकतो.

विदर्भ आणि मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची १०० टक्के रक्कम सरकारने भरून, शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले आहे. सावकारांकडून कर्ज घेतलेल्या ४६, हजार ८०९ पात्र शेतकऱ्यांचे ६४.५३ कोटी रकमेचे कर्ज माफ करण्यात आले आहे.

**- काशीबाई थोरात**

संकल्पमुक्ती #३

# प्रदूषणापासून मुक्ती



महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ निवडक शहरामधील हवा गुणवत्ता सनियंत्रण यशस्वीरीत्या राबवत आहे. राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकानुसार २०११-२०१५ या कालावधीमध्ये ज्या शहरांमधील हवा गुणवत्तेची पातळी निर्धारित मानकांपेक्षा अधिक आहे, अशा १७ शहरांची यादी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकाशित केली. त्यात अकोला, अमरावती, औरंगाबाद, बदलापूर, चंद्रपूर, जळगाव, जालना, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नाशिक, नवी मुंबई, पुणे, सांगली, सोलापूर व उल्हासनगर या शहरांचा समावेश आहे. या शहरातील व गुजरातमधील सुरत शहराकरिता हवा गुणवत्ता सनियंत्रण, शुद्ध हवा संकल्प- महाराष्ट्र २०२२ या प्रकल्पाची सुरुवात झाली आहे.

## नद्यांचे प्रदूषण

नदी पाण्याच्या गुणवत्तेच्या आधारावर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या अहवालानुसार महाराष्ट्रातील ४९ नद्यांचे पट्टे प्रदूषित असल्याचे निदर्शनास आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या ४९ पट्ट्यांच्या पाण्याची गुणवत्ता तपासली असता १३ नद्या प्रदूषित असून १ नदी कोरडी असल्याचे निदर्शनास आले. १४ नद्यांचे पट्टे प्रदूषणाच्या बाहेर निघाले आहेत. शासनाने प्रदूषण वाढण्याच्या कारणांचा अभ्यास केला असून, त्याप्रमाणे कार्यवाही सुरू आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत लोकसहभाग व शासकीय सहभागातून नमामी गंगेच्या धर्तीवर नमामी चंद्रभागासारखे अभियान राबवण्यात येत आहे. जलसिंचन, जलयुक्त शिवार, शेततळे, नदी खोलीकरण व सरळीकरण या उपक्रमांमुळे नद्यांचे स्रोत वाढले आहेत. स्मार्ट शहर योजनेंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाचे काम करण्याकरिता महानगरपालिका व नगरपालिकांना भांडवली खर्चाच्या २५ टक्के रक्कम राखून ठेवणे बंधनकारक केले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०१५-१६ च्या अहवालानुसार नद्यांमधील प्रदूषण कमी झाल्याचे आढळले आहे.

## नमामी चंद्रभागा प्राधिकरण

प्रदूषण कशाने वाढत आहे याचा विचार करता असे लक्षात येते की, हा प्रश्न सांडपाण्याशी निगडित आहे. महाराष्ट्रात एकूण २६ महानगरपालिकांपैकी १६ महानगरपालिकांमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्र सुरू आहेत. राज्यात जवळपास २५२ स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. त्यापैकी २६ महानगरपालिका ८६ टक्के सांडपाणी निर्माण करतात. उर्वरित २२६ स्थानिक स्वराज्य संस्था (नगरपालिका) १४ टक्के सांडपाणी निर्माण करतात.

नदी प्रदूषित होणाऱ्या कारणांचा विचार केला असता, त्यापैकी एक कारण म्हणजे धरण होय. साधारणतः प्रत्येक नदीच्या वरच्या बाजूला धरणे बांधलेली आहेत. त्यामुळे खालच्या बाजूला नदी पात्रामध्ये पावसाळ्यानंतर प्रवाह राहत नाही. खेड्याचे शहरामध्ये व शहरांचे मोठ्या शहरामध्ये रूपांतर होताना दिसत आहे. अशा शहरातून नागरी वस्त्यांची वाढ होत आहे. या वस्त्यांमधून निघणारे सांडपाणी कमी प्रवाहाच्या नदीमध्ये जाते. त्यामुळे सुद्धा नद्या प्रदूषित होतात.

नद्या या नैसर्गिकरीत्या स्वतःचा प्रवाह निर्माण करून स्वच्छ पाणी देतात. हा त्यांचा गुणधर्म असला तरी अलीकडच्या काळात, रेतीच्या उपशामुळे नदी प्रवाहात अडथळे निर्माण होऊन नदी स्वच्छ राहत नाही. त्याचबरोबर नदीलगतची बांधकामे व झोपडपट्ट्यांमुळे नदी प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पुणे येथील मुळामुठा नदीच्या संवर्धनासाठी ९९०.२६ कोटी निधीचा प्रस्ताव, केंद्र शासनाने मंजूर केला आहे. त्यापैकी २६ कोटी पुणे महानगरपालिकेस देण्यात आले आहेत. प्रदूषण निर्मूलनासाठी शासनाने 'नमामी चंद्रभागा प्राधिकरण' स्थापन केले आहे.

## तांत्रिक उपाययोजना

गणेशोत्सवापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत हवेचे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी तांत्रिक उपाययोजना करणे, कृती आराखडा तयार

करणे व तो अमलात आणणे यासाठी मार्गदर्शक तत्त्वे बनवण्यात आली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे विटभट्ट्यांमुळे होणारे हवा प्रदूषण, खनिज पदार्थांचे चढ-उतार व साठवणुकीमुळे होणारे हवा प्रदूषण, टायर्सपासून तेल निर्माण करणाऱ्या उद्योगांमुळे होणारे प्रदूषण, दगडखाणीमुळे होणारे हवा प्रदूषण याबाबतचे अभ्यासगट तयार करण्यात आला. या अभ्यासगटाने हवा प्रदूषण रोखण्यासाठी व कमी करण्यासाठी तांत्रिक पद्धतीच्या उपाययोजना सुचवलेल्या आहेत. धुलिकण संकलन केंद्र स्थापन करून पर्यावरण पूरक उत्पादन करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे, धोरणे मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहेत. कारखान्यांच्या प्रदूषणाच्या पातळीचे मूल्यांकन करण्यासाठी मंडळाने पर्यावरण दक्षता केंद्र स्थापन केले आहे. या केंद्रांमुळे प्रदूषित कारखान्यांची देखरेख करणे मंडळास सोपे झाले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी उपक्रम महाराष्ट्रात २५ शहरांमध्ये ७४ ठिकाणी राबविण्यात येत आहे. मंडळाने मुंबई-२, पुणे, सोलापूर, चंद्रपूर-२, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व डोंबिवली या १० ठिकाणी स्वयंचलित वातावरणीय हवा गुणवत्ता तपासणी संयंत्रणा उभारली आहे.



कोळसा वाहतूक हवा प्रदूषणास कारणीभूत ठरत आहे. यासाठी मंडळाने अवजड वाहन उत्पादक उद्योगांसोबत चर्चा करून मेकॅनिकल क्लोज्ड टाईप ट्रकचे डेमो मॉडेल तयार केले आहे. त्याची प्रात्यक्षिके कोळसा वाहक एजन्सी व उद्योगांना दाखवून याचा उपयोग करण्याचे निर्देश दिले आहेत. वाहतुकीमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी वायू या संयंत्रणेची उभारणी मुंबईमध्ये विविध ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर केली आहे.



## ऑनलाइन अर्जप्रणाली

पर्यावरण विभागाने पर्यावरणविषयक सर्व परवानग्यांसाठी ऑनलाइन अर्जप्रणाली विकसित केली आहे. ध्वनी प्रदूषण नियम २०००ची प्रभावी अंमलबजावणी केली असून सर्व ठिकाणी ध्वनी प्राधिकारी नियुक्त केले आहेत. पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणारे ७५ कत्तलखाने बंद केले आहेत. मुंबईतील ५ महत्त्वाच्या ठिकाणी हवा शुद्धीकरण संयंत्रे बसवण्यात आली आहेत. शिवस्मारकासंदर्भातील पर्यावरणविषयक सर्व अटींची पूर्तता करण्यात आली आहे. प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आणण्याचा निर्णय गुढीपाडव्यापासून घेण्यात येणार असून कागदी पिशव्यांचा वापर करण्यासाठी जनतेचे प्रबोधन करण्यात येणार आहे. ध्वनिप्रदूषण बंदी, डिजेला बंदी, मोठ्या आवाजातील फटाक्यावर बंदी, चिनी आणि देशी नायलॉन मांज्यावर बंदी असे अनेक निर्णय विभागाने घेतले आहेत.

**– डॉ. संभाजी खराट**

## वृक्षलागवडीतून प्रदूषणमुक्ती

जगण्यासाठी प्रत्येकाला प्राणवायू लागतो की, पैसा हे एकदा श्वास बंद करून नोटा मोजा म्हणजे लक्षात येईल असे जेव्हा सांगितले जाते तेंव्हा अर्थशास्त्र मोठे की; पर्यावरणशास्त्र हे लक्षात आल्याखेरिज राहात नाही. पर्यावरणाचा प्रचंड ऱ्हास होत असताना ग्लोबल वॉर्मिंग, क्लायमेट चेंजसारखे शब्द शब्दकोशातून बाहेर पडले. आता आपण त्याची चिंता करत आहोत. ज्या वसुंधरेने मनुष्याचे पोषण केले तो मनुष्य मात्र, वसुंधरेचे शोषण करण्यात धन्यता मानत आहे. यामुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. हे प्रश्न सोडवायचे असतील, पर्यावरणाचे संतुलन टिकवायचे असेल तर एकच रामबाण उपाय आहे तो म्हणजे वृक्षलागवड.

याच विषयावर लक्ष केंद्रित करून वन विभाग काम करत आहे. राज्याचे सध्याचे वनाच्छादन जवळपास २० टक्के आहे. ते राष्ट्रीय वननीतीनुसार ३३ टक्के करायचे आहे. त्यासाठी राज्यात वन आणि वनेतर जमिनीवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन वन विभागाने तीन वर्षात ५० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम निश्चित केला आहे.

विभागाने १ जुलै २०१६ रोजी लोकसहभागातून २ कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प केला होता. या एकाच दिवशी २ कोटी ४३ लाखाहून अधिक वृक्षलागवड राज्यात झाली. लोकांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन वन विभागाने तीन वर्षात ५० कोटी वृक्षलागवडीचा कार्यक्रम घोषित केला. त्यात २०१७ मध्ये ४ कोटी २०१८ मध्ये १३ कोटी आणि २०१९ मध्ये ३३ कोटी वृक्षलागवड करण्यात येणार आहे. यासाठी सर्व संबंधित विभागांचा सहभाग, त्यांनी पार पाडावयाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांची निश्चिती

करण्यात आली आहे.

पहिल्या वर्षी १ जुलै २०१७ रोजी १ जुलै ते ७ जुलै २०१७ या कालावधीत ४ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यासाठी राज्यातील रोपवाटिकांमधून दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण रोपे विकसित करण्यात आले. भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन कुठला वृक्ष कुठे लावायचा याची निश्चिती झाली. रोप आपल्या दारी, रोपांची भिशी, माय प्लांट ॲप अशा विविध माध्यमांचा उपयोग करून घेताना लोकांच्या मनात वृक्षलागवडीचे बीजारोपण करण्यात वन विभाग यशस्वी ठरला. राज्यभरात विशेष ग्रामसभांचे आयोजन झाले. विविध माध्यमातून त्यांनी वृक्षलागवडीचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्यात आले. त्याचे फलित म्हणून १ जुलै ते ७ जुलै २०१७ या वनमहोत्सवाच्या कालावधीत ५ कोटी ४३ लाख ३५ हजार ०४९ वृक्षांची लागवड झाली. येत्या २०१८ च्या पावसाळ्यात तेरा कोटी वृक्षांची लागवड करण्याचे उद्दिष्ट विभागाने निश्चित केले आहे. यासाठी शासनाच्या विविध विभागांबरोबरच जनता, स्वंयसेवी संस्था, पर्यावरणरक्षणासाठी काम करणाऱ्या संस्था, आध्यात्मिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, शाळा महाविद्यालयांचे विद्यार्थी, राज्यातील उद्योजक- व्यापारी यांच्या आस्थापना या सर्वांना यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात तीन वर्षात ५० कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट आहे.

### हरितसेना

भारतीय संस्कृती ही पर्यावरणावर प्रेम करणारी, वन आणि वृक्षांशी नाते जोडा असे सांगणारी आहे. आपल्या प्रत्येक धर्मात वृक्षांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे साद घातली तर लोक पुढे येतात हा शासनाचा मागच्या दोन कोटी वृक्षलागवडीचा अनुभव आहे.

राज्यात पर्यावरण रक्षणासाठी १ कोटी लोकांची ग्रीन आर्मी (हरितसेना) तयार करण्यात येत आहे. ३० लाखांहून अधिक लोकांनी याचे सदस्यत्व घेतले आहे. राज्यातील प्रत्येक व्यक्ती हरितसेनेचा सदस्य होऊन, त्याने पर्यावरण रक्षणाचा सेनापती व्हावा यासाठी शासन प्रयत्न करत आहे. वृक्ष लागवडीच्या कामात पारदर्शकता ठेवण्यात आली आहे. मोहिमत लावल्या जाणाऱ्या झाडांची अक्षांश-रेखांशासह, त्याच्या प्रजातीसह वन विभागाच्या संकेतस्थळावर नोंद करण्यात आली आहे. गुगल मॅपिंगचा यात उपयोग करण्यात आला आहे. अतिशय शास्त्रोक्त पद्धतीने वृक्षलागवडीचे काम करताना वन, वन्यजीव यांच्या रक्षणासाठी राज्यात १९२६ हॅलो फॉरेस्ट नावाची देशातील पहिली हेल्पलाइन वन विभागाने सुरू केली आहे. त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. मराठवाड्याचे वनाच्छादन खूप कमी आहे. त्यामुळे तिथे दर तीन वर्षांनी दुष्काळ आणि पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेऊन १४८ निवृत्त सैनिकांची इको बटालियन मराठवाड्यात स्थापन झाली आहे. राज्यातील रेल्वेच्या रिकाम्या जागेत, राष्ट्रीय महामार्गाच्या दुतर्फा वृक्षलागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. जगात आणि देशात पर्यावरणाच्या ऱ्हासावर चिंता व्यक्त होत असताना महाराष्ट्राने पर्यावरण संरक्षणासाठी दमदार आणि आशादायी पाऊल टाकले आहे.

**– डॉ. सुरेखा म. मुळे**

**संकल्पमुक्ती #४**

## भ्रष्टाचारापासून मुक्ती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय स्पष्ट संदेश दिला आहे की, पारदर्शकता आणि जबाबदारीत शासन तडजोड करणार नाही. अधिक चांगल्या सेवा पुरवणे आणि भ्रष्टाचार संपुष्टात आणण्याकरिता सुधारणा हे शासनाचे सर्वोच्च प्राधान्य राहील.

### प्रमुख सुधारणा

**राज्य शासनाचा डिजिटलकरण प्रकल्प –** २९,००० ग्रामपंचायतींना डिजिटली जोडण्याच्या निर्णयामुळे महाराष्ट्रामधील ४०,९१३ गावांच्या कायापालटाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. मागील ३ वर्षांमध्ये राज्य शासनाला १४,००० ग्रामपंचायतींना डिजिटल करण्यात यश आले आहे. उर्वरित १५,००० ग्रामपंचायतींचे २०१८ सालापर्यंत डिजिटलकरण होईल.

केंद्रातील 'भारत नेट'च्या धर्तीवर आधुनिक महाराष्ट्रात 'महानेट'ची स्थापना करण्यात आली आहे. ही केवळ तंत्रज्ञानापुरती मर्यादित राहणार नाही. डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे प्रत्येक व्यक्तीपर्यंत



विकास पोहोचेल. दळणवळण आणि कनेक्टिव्हिटी वाढवण्यात येईल.

मेळघाटातील आदिवासी भागातील सर्वात दुर्गम खेड्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा खरा हेतू आहे. गावांच्या डिजिटलकरणामुळे; ई-सेवांद्वारे, दर्जेदार शिक्षण आणि आरोग्य-सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. या प्रकल्पाकरिता लागणाऱ्या ४००० कोटी रुपयांच्या खर्चापैकी १२०० कोटी रुपये राज्याने तर २८०० कोटी रुपये केंद्राने पुरवले आहेत.

### 'महाडीबीटी' आणि 'महावास्तू'

'महाडीबीटी' आणि 'महावास्तू' या 'पोर्टल्स'चा शुभारंभ म्हणजे मॅट्रिकनंतरच्या शैक्षणिक शिष्यवृत्त्या आणि इमारत बांधणीच्या प्रस्तावांकरिता सर्व ऑनलाइन प्रक्रियांचा कायापालट करणारा ठरेल. 'महाडीबीटी'ने असे सुनिश्चित केले आहे की, ५००० कोटी रुपयांचे शैक्षणिक शुल्क हे थेट पात्र विद्यार्थ्यांच्या वैयत्तिक खात्यांमध्ये जमा होईल. जवळपास ५० लक्ष विद्यार्थी याचा लाभ घेऊ शकतील.

हा निधी चुकीच्या पद्धतीने वळता केला गेल्यामुळे त्याचा गैरवापर व्हायचा, शैक्षणिक संस्थांत बनावट विद्यार्थी नोंदवले जायचे. ते आता पूर्णपणे थांबेल. यापुढे खऱ्या विद्यार्थ्यांनाच त्याचा लाभ मिळेल.

### इमारत बांधणी प्रस्तावांमधील गैरव्यवहार थांबवणे

इमारत बांधणी प्रस्तावांमधील गैरव्यवहार थांबवणे ही सर्वात मोठी सुधारणा आव्हानात्मक. जटील कार्यपद्धतीसोबत बहुस्तरीय परवानगी प्रणाली हे आव्हान होते. 'महावास्तू'द्वारे सर्व इमारत बांधणी प्रस्ताव ऑनलाइन करणे अनिवार्य करून, शासनाने भ्रष्टचाराला संपुष्टात आणले. यासाठी तयार केलेल्या ॲप्समध्ये अंतर्गत (इनबिल्ट) यंत्रणा आहे. ज्याद्वारे ठरवलेल्या मापदंडानुसार निव्वळ गुणवत्तेच्या आधारावर आणि पात्रतेच्या निकषांवर, प्रस्ताव पारखून घेतले जातात. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होतो. गैरव्यवहार आणि भ्रष्टाचाराला वाव उरत नाही.




प्रत्येक योग्य पात्र विद्यार्थ्याला आर्थिक मदत मिळेल. कुणीही निधीचा गैरवापर करू शकणार नाही. मानवी हस्तक्षेप होणार नाही व कार्यप्रणाली त्रुटी आहेत त्या नाहीशा होतील.

### ऑनलाइन सुधारणा

इमारत बांधणी प्रस्तावांना ऑनलाइन करण्याची सुधारणा, शासनाने परवडणाऱ्या घरांच्या दिशेने जाहीर केलेले आणि घेतलेले पाऊल आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत २०२१ सालापर्यंत परवडणाऱ्या घरांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य शासन कार्यरत आहे. शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी १० लाख घरे आणि ग्रामीण भागांतील जनतेकरिता १२ लाख घरे उपलब्ध करून दिली जातील. विविध श्रेण्यांची स्वस्त घरे ज्यात दुर्बल घटकांचा आणि मागासवर्गीयांचा समावेश आहे. या घरांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.

सध्या, दोन लाख परवडणाऱ्या घरांचे प्रकल्प कामाच्या विविध टप्प्यांमध्ये आहेत. ३१ ऑक्टोबर २०१४ पासून, जेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राची धुरा हातात घेतली; त्यांनी जनतेच्या हिताच्या योजनांना अधिक निधी उपलब्ध करून दिला आहे. निधीच्या तरतुदींसोबतच असेही प्रयत्न केले जात आहेत की, विकासाद्वारे त्यांचा फायदा हा जास्तीत जास्त जनतेला व्हावा.

### सर्वात मोठी कर्जमाफी

३४,००० कोटी रुपये ही आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी जाहीर केल्यानंतर राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या अर्जांसाठी एका ऑनलाइन 'ॲप'ची निर्मिती केली. राज्यातील ही अशा प्रकारची पहिली कर्जमाफी आहे ज्यात शासनाने प्रत्येक अर्जदाराची छाननी आणि लेखापरीक्षण स्वयंस्पष्ट केले आहे. प्रत्येक गरीब, कर्जबाजारी, लहान आणि खरोखर योग्य अशा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना ऑनलाइन कर्जमाफीचा लाभ मिळाला पाहिजे, यावर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. अयोग्य व्यक्ती अथवा आर्थिक संस्था त्यांची अनुत्पादक मालमत्ता (नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स) बुडीत खात्यात परिवर्तित करण्यासाठी किंवा त्यांच्याकडील ठेवी वाढवण्याकरिता कर्जमाफीच्या निधीचा गैरवापर होत नाही, हेदेखील सुनिश्चित करायचे आहे. शासनाला कर्जमाफीद्वारे जास्तीत जास्त शेतकऱ्यांना संस्थात्मक पत प्रणाली अंतर्गत आणायचे आहे. कृषी सुविधा पुरवून, त्यांना एकास्तरावर आणून सक्षम करायचे आहे.

उदाहरणार्थ, शेततळ्यांसाठीचे ऑनलाइन अर्ज हे उत्तम उदाहरण ठरते. ५१,३६९ शेततळ्यांसाठी शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये २०६ कोटी रुपये जमा केले गेले. 'मागेल त्याला शेततळे' या योजनेला प्रचंड प्रतिसाद मिळाला असून २,८३,२६० ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले आहेत. जवळपास सर्वच विभागांमध्ये विकसित झालेल्या धोरणांत पारदर्शकता आणि जबाबदारी या पैलूंना वाव दिला आहे. सेवा अधिकार कायद्यांतर्गत शासनाने १.१४ लाखाहून अधिक लोकांना सेवा पुरवल्या आहेत. ३९९ सेवा त्याच्या कक्षेत आल्या आहेत.

पूर्वीपेक्षा आता प्रकल्प राबवण्याकरिता तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, त्याच्या अंमलबजावणीचा पाठपुरवठा करणे, त्याचा लोकांवर काय परिणाम आहे त्याचे मूल्यांकन करणे यावर भर दिला जात आहे. त्यामुळे, शेतकऱ्याला शेततळ्यासाठी दिलेली मंजुरी आणि ५०,००० रुपयांच्या अनुदानाचा कामाच्या प्रगतीच्या रूपात पाठपुरवठा केला जातो. प्रत्येक प्रकल्प 'जिओ-टॅग्ड' आहे.




ई-गव्हर्नन्समुळे पारदर्शकतेमध्ये वाढ, भ्रष्टाचाराला आळा

### भ्रष्टाचार हाताळण्याचे उत्तम उदाहरण

जलयुक्त शिवार या प्रकल्पाला भ्रष्टाचार हाताळण्याचे उत्तम उदाहरण म्हणता येऊ शकते. अत्यल्प निधीमधून जल संवर्धन प्रकल्पांनी यश संपादन केले आहे. ज्यातून ११,४९४ गावे दुष्काळमुक्त झाली. संपूर्ण निधी हा ३८०० कोटी रुपयांच्या वर जात नाही.

राज्य शासनाने भ्रष्टाचाराला हटवण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे - मग ते सार्वजनिक अन्न वाटपामध्ये बायोमेट्रिक प्रणाली सुरू करणे असो अथवा महसूल जमिनीच्या नोंदीचे ऑनलाइन डिजिटलकरण असो. कृषी उत्पादन बाजार समितीमधील धोरणातील पुढाकार - शेतकऱ्यांच्या भाज्या आणि फळांना योग्य भाव मिळण्याकरिता, खुले बाजार उपलब्ध करून देणे हेदेखील दलालांद्वारे शोषण आणि भ्रष्टाचार थांबवण्याकरिता; उचललेले लक्षणीय पाऊल आहे.

**- शुभांगी खापरे, मानसी सोनटक्के**

## पारदर्शक, सर्वसमावेशक व कार्यक्षम

राज्य शासनाने ऑनलाइन प्रशासनाकडे वाटचाल सुरू केली असून या माध्यमातून भ्रष्टाचाराला आळा बसेल. प्रशासन पारदर्शक होईल. प्रशासनातील विलंब टळण्यास मदत होईल. तसेच सर्वांना समान न्याय मिळेल.

पारदर्शकता, सर्वसमावेशकता व कार्यक्षमता या त्रिसूत्रीच्या आधारावर शासनाचे सुशासनात रूपांतर करण्यात येत आहे. त्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा ठरणार असून शासन त्यावर भर देत आहे.

विहित वेळेत नागरिकांना सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र सेवा हमी अधिनियम २०१५ पारित करण्यात आला. माहिती तंत्रज्ञानाआधारीत आपले सरकार वेबपोर्टलच्या माध्यमातून ३९९ सेवा ऑनलाइन दिल्या जातात. या माध्यमातून एकूण १.१४ कोटी अर्ज प्राप्त झाले. त्यातून १.०८ कोटी प्रकरणांमध्ये सेवा पुरविण्यात आल्या. ८८ टक्के सेवा विहीत कालावधीत पुरवण्यात आल्या.

'आपले सरकार' या पोर्टलवर सुरू केलेल्या तक्रार निवारण प्रणालीमध्ये एकूण १.७७ लाख ऑनलाइन तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ८५ टक्के तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. ७८ टक्के नागरिक या तक्रार निवारणावर समाधानी असल्याचे त्यांनी दिलेल्या प्रतिक्रियेवरून दिसते. ऑनलाइन शेततळे योजना राबवल्यामुळे अंमलबजावणी प्रक्रियेत पारदर्शकता आली. एकूण २ लाख ८३ हजार ६२० शेततळ्यांचे अर्ज प्राप्त झाले. त्यातील ५१ हजार ३६९ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली असून २०४ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत केलेल्या डिजिटायझेशनमुळे सध्या राज्यात २.५ कोटी शिधापत्रिका डिजिटल झाल्या आहेत. आधार लिंकिंगमुळे सुमारे १० लाख शिधापत्रिका कमी झाल्या आहेत. रास्तभाव धान्य दुकानांमध्ये ई-पॉस उपकरणे बसवण्यात आली आहेत. लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून धान्य वितरण केले जाते. डिजिटायझेशनमुळे दरमहा ३८ हजार मेट्रिक टन धान्याची बचत झाली आहे.

उद्योग विभागाच्या मैत्री प्रकल्पाच्या माध्यमातून ७४८ घटकांच्या ८९१ अडचणी ऑनलाइन स्वीकारून, त्यांचे निराकरण करण्यात आले असून; ९० हजार कोटींच्या प्रकल्पांना मैत्री प्रकल्पाचा फायदा

झाला आहे. ग्रामपंचायत पातळीवर जनतेस ऑनलाइन सेवा देण्यासाठी राज्यामध्ये ३०,००० 'आपले सरकार' सेवा केंद्र सुरू करण्यात आली आहेत. या केंद्रांमधून सर्व शासकीय सेवा नागरिकांना दिल्या जाणार आहेत. महसूल विभागाच्या अंतर्गत सात बारा संगणकीकरणाचा प्रकल्प प्रगतिपथावर आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड हे तीन जिल्हे वगळता इतर ठिकाणी ऑक्टोबरपासून ऑनलाइन सातबारा देण्यास सुरुवात होणार आहे. महानेट प्रकल्पामध्ये सुमारे २९ हजार गावांमध्ये शाश्वत इंटरनेट सेवा उपलब्ध करून दिली जाईल. डिसेंबर २०१८ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी राज्याकडून १२०० कोटी तर केंद्राकडून २८०० कोटी असे एकूण ४ हजार कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील. राज्य शासनामार्फत विविध विभागात आपल्या स्तरावर नोकरभरती होत होती. मात्र आता सर्व विभागांच्या नोकर भरतीसाठी एकत्रच परीक्षा घेण्यात येणार आहेत. यासाठी महापरीक्षा या वेबपोर्टलद्वारे भरती प्रक्रिया राबवण्यात येईल. या माध्यमातून दीड कोटी तरुणांना फायदा होणार आहे.

जनतेला सुविधा देण्याबरोबरच भ्रष्टाचाराला आळा बसावा यासाठी माहिती आणि तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येत आहे.

– अर्चना शंभरकर

**संकल्पमुक्ती #५**

# करजंजाळातून मुक्ती

देशभरात १ जुलै २०१७ पासून जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर प्रणालीची अंमलबजावणी सुरू झाल्याने अप्रत्यक्ष कर प्रणालीत मोठी सुधारणा झाली आहे. या कर प्रणालीत केंद्र आणि राज्य शासनाचे मिळून जवळपास १७ कर कायदे विलीन झाले आहेत. त्यामुळे उद्योग-व्यापाऱ्यांची करजंजाळातून मुक्ती झाली. तर करावरील कराचा बोजा कमी झाल्याने ग्राहकांना वस्तू कमी किमतीत मिळणे शक्य झाले.

संपूर्ण देशामध्ये अप्रत्यक्ष कराच्या एकसमान पद्धतीकरिता जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर प्रणालीचा अवलंब करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यासाठी संविधानात आवश्यक असलेले बदल करून, लोकसभा आणि राज्यसभेच्या मान्यतेनंतर, राज्यांच्या विधानमंडळाच्या मान्यतेनंतर १ जुलै २०१७ पासून जीएसटीची देशभरात अंमलबजावणी सुरू झाली आहे.

## कर लावण्याची पद्धत

जीएसटीमध्ये वस्तू व सेवेच्या प्रत्येक विक्री व्यवहारावर (करमाफ वस्तू व
सेवाव्यतिरिक्त) दोन कर लावण्यात येतात. एक कर केंद्र शासनामार्फत लावण्यात येतो. त्याचे केंद्रीय वस्तू व सेवा कर (सीजीएसटी) असे नाव आहे तर दुसरा कर राज्य शासनामार्फत लावण्यात येतो. त्यास राज्य वस्तू व सेवा कर (एसजीएसटी) असे नाव आहे. आंतरराज्य विक्रीकर इंटिग्रेटेड जीएसटी कर (सीजीएसटी) लावण्यात येतो.

## खालील वस्तूंवर केवळ ५% जीएसटी


भाजलेल्या कॉफीबिया



चहा


खाद्यतेल



पॅकबंद पनीर


कापसाचे सूत


कापड


सौर फोटोव्होल्टीक सेल व मॉड्यूल्स


पादत्राणे (५०० रुपयांपर्यंतची)


कोळसा


सुती धागे


न्यूजप्रिंट


पीडीएस केरोसिन


लहान मुलांसाठीचे दुग्धजन्य पदार्थ


स्किम्ड दूध पावडर


घरगुती एलपीजी गॅस


पोषाख (१००० रुपयांपर्यंत)


साखर


खराटे, केरसुणी

**जीएसटी**

**कमी कर, अधिक लोककल्याण**

या करप्रणालीचा ग्राहकांना फायदा होत आहे. जीएसटी कर प्रणालीमध्ये खरेदीवरील कराची पूर्ण वजावट मिळत असल्याने वस्तूच्या विक्रीवरील कराचा भार कमी होतो. मालाची किंमत अदा करताना मालावरील कर हा एक भाग असतो. कराचा भार जास्त असल्यास मालाची किंमत जास्त असते. आतापर्यंत मालाच्या करावर कर लावण्यात येत होता. उदाहरणच द्यायचे झाले तर एखाद्या वस्तूचा उत्पादनखर्च १०० रुपये आहे त्यावर १६ रुपये एक्साईज ड्यूटी लागल्यानंतर त्या वस्तूची किंमत ११६ व्हायची. त्यावर १२.५ टक्के व्हॅट लागायचा नंतर त्याच वस्तूची किंमत साधारणत: १४० रुपयांच्या आसपास जायची. ही १४० रुपयांची वस्तू १६० रुपयांना विकली तर त्यात व्हॅटचा परतावा मिळायचा परंतु एक्साईज ड्युटी किंमतीमध्ये विलीन झाल्याने त्याचा परतावा मिळायचा नाही. अशा प्रकारे मालाच्या करावर कर लागला जायचा आणि ग्राहकाला ती वस्तू महाग मिळायची. परंतु, जीएसटीमध्ये करावरील कर काढण्यात आल्यामुळे मालाच्या विक्रीवरील कराचा भार कमी होऊन परिणामी वस्तूंची किंमत कमी होईल.

### जीएसटीची गरज का होती?

जीएसटी लागू होण्यापूर्वी अप्रत्यक्ष कर प्रणालीमध्ये करावर कराची आकारणी केली जात असे. केंद्र शासनाद्वारे उत्पादित वस्तूंवर लावण्यात येणाऱ्या केंद्रीय उत्पादन शुल्कावर (सेंट्रल एक्साइज) राज्यात विक्रिकराची आकारणी व्हायची. यालाच करावर कर म्हणजेच 'कॅसकेडिंग ऑफ टॅक्स' असे म्हटले जाते, ते व्हायचे. अप्रत्यक्ष कर केंद्र आणि राज्य शासनाकडून लावले जायचे. यात खालीलप्रमाणे अनेक त्रुटी होत्या त्या आता जीएसटीमुळे दुरुस्त झाल्या आहेत.

- मूल्यवर्धित कर राज्य शासनामार्फत आणि उत्पादनशुल्क आणि सेवा कर हे केंद्र शासनामार्फत आकारले जायचे. या कराची आकारणी राज्य आणि केंद्र शासनामार्फत स्वतंत्रपणे होत होती त्यामुळे एका कराची वजावट दुसरा कर भरताना मिळत नव्हती किंवा दिली जात नव्हती.
- उत्पादित मालावर केंद्रीय उत्पादन शूल्क लागू व्हायचे, त्यावर मूल्यवर्धित कर आकारला जायचा त्यामुळे करावर कराची आकारणी होऊन कराचा बोजा वाढायचा. जीएसटीमुळे करावर कर हा प्रकार नाहीसा झाला असल्याने, कराचा बोजा कमी झाला आहे. परिणामत: वस्तूंचे दर कमी होण्यास मदत होणार आहे.
- आंतरराज्य माल विक्रीवर पूर्वी ज्या राज्यातून मालाची विक्री झाली असेल, त्या राज्यातून २ टक्के केंद्रीय विक्रीकर लावला जायचा. परंतु ज्या राज्यामध्ये खरेदी झाली आहे त्या राज्यामध्ये आकारण्यात आलेल्या केंद्रीय विक्रीकराची वजावट मिळायची नाही. कराची वजावट मिळत नव्हती त्यामुळे कराचा भाग मिळून वस्तूंच्या किमती निश्चित व्हायच्या, त्या चढ्या राहायच्या. जीएसटींतर्गत केंद्रीय विक्रीकर कायदा जीएसटी परिघाच्या बाहेर असलेल्या सहा वस्तूंवर सोडून, निरसित करण्यात आला आहे.

### जीएसटीचे लाभ

- केंद्र आणि राज्य शासनाचे बहुतांश अप्रत्यक्ष कर एकत्र आल्याने करप्रणाली सोपी आणि सुटसुटीत झाली आहे.
- व्यापारी व उद्योगधंद्यास हिशेब ठेवणे सोपे झाले आहे. कारण अनेक कर कायद्याऐवजी एकच कर कायदा लागू झाला आहे.
- करावर कर लागत नसल्याने वस्तूंच्या किमतीत घट होऊन त्याचा लाभ ग्राहकांना मिळणार आहे
- देशभर एकच अप्रत्यक्ष करप्रणाली अस्तित्वात आल्याने संपूर्ण देशात एक कर, एकसंध बाजारपेठ आणि एक कर कायदा अमलात आला आहे.
- या करप्रणालीत संपूर्णत: संगणकाचा वापर होत असल्याने ती पारदर्शक आहे

### जीएसटीत विलीन झालेले केंद्रीय कर

केंद्रीय उत्पादनशुल्क, अतिरिक्त उत्पादनशुल्क (विशेष महत्त्वाच्या वस्तू), उत्पादन शुल्क (औषधी आणि प्रसाधन शुल्क), अतिरिक्त उत्पादन शुल्क (कापड आणि कापड उत्पादने), अतिरिक्त सीमा शुल्क (सीव्हीडी), विशेष अतिरिक्त सीमाशुल्क (एसएडी), सेवा कर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असलेला केंद्रीय अधिभार आणि उपकर.

### जीएसटीत विलीन झालेले राज्याचे कर

राज्य मूल्यवर्धित कर, केंद्रीय विक्रीकर, ऐषआराम कर, प्रवेश कर (ऑक्ट्रॉय, एलबीटी, वाहनांवरील प्रवेश कर, वस्तूंवरील प्रवेश कर इ), करमणूक आणि मनोरंजन कर (स्थानिक संस्थांकडून आकारल्या जाणाऱ्या कराशिवाय), जाहिरातीवरील कर, खरेदीकर, वन विकास कर(वन उपजांच्या विक्रीवरील कर), लॉटरी/बेटिंग आणि जुगारावरील कर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असलेला राज्य अधिभार आणि उपकर, जीएसटी कार्यक्षेत्राबाहेर सध्या मद्य, कच्चे तेल, डिझेल, पेट्रोल, नॅचरल गॅस, विमानाचे इंधन या वस्तू ठेवण्यात आल्या असल्या तरी ठरावीक कालावधीनंतर त्यांना जीएसटींतर्गत आणण्याचे प्रयोजन; संविधान संशोधनात करण्यात आले आहे. यासंबंधीचा निर्णय योग्यवेळी जीएसटी परिषद घेईल.

जीएसटीमध्ये २० लाख रुपयांपर्यंतची उलाढाल असलेल्या करदात्याला करातून सूट देण्यात आली आहे. त्यापेक्षा अधिक रकमेची उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना जीएसटींतर्गत नोंदणी करणे अनिवार्य आहे. ५० लाखांपेक्षा कमी उलाढाल असलेल्या छोट्या करदात्यांसाठी 'आपसमेळ' योजनेची तरतूद आहे. मात्र या योजनेंतर्गत हॉटेल व्यावसायिक वगळता, इतर सर्व सेवा पुरवठादार तसेच आंतरराज्य विक्री करणारे करदाते यांना लाभ घेता येणार नाही अशी तरतूद आहे.

**– डॉ. सुरेखा म. मुळे**

### संकल्पमुक्ती #६

# अस्वच्छतेपासून मुक्ती

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ‘स्वच्छ भारत’ या संकल्पाला प्रतिसाद देत राज्य शासनानेही ‘स्वच्छ महाराष्ट्र अभियान’ राबवण्यास सुरुवात केली. गेल्या दोन वर्षाच्या कालावधीत राज्यातील सर्व शहरे २ ऑक्टोबर २०१७ पर्यंत हागणदारीमुक्त करण्याचा संकल्प केला. त्यासाठी स्वच्छतेची सप्तपदी आखण्यात आली. हा संकल्प पूर्णत्वास येत आहे. राज्याने हागणदारीमुक्त करण्यात ४ कोटी ९२ लाख शौचालये बांधून, देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

## स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची प्रगती

राज्य शासनाने शौचालय बांधण्यासाठी प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली असून, त्यातून १८ सप्टेंबर २०१९ पर्यंत सुमारे ४ लाख ९२ हजार शौचालयांचे बांधकाम पूर्ण झाले. केंद्र शासनाच्या त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात आलेल्या प्रमाणीकरणात आतापर्यंत १८४ शहरे पात्र ठरली आहेत. शहरे हागणदारीमुक्त करण्याचे काम पूर्णत्वास येत आहे. हागणदारीमुक्त शहरांच्या तपासणीसाठी केंद्रशासनाने नियुक्त केलेल्या त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात आलेल्या तपासणीत देशातील १० शहरांमध्ये पाचगणी, कागल, मुरूगुड, पन्हाळा व वेंगुर्ला या ५ शहरांचा समावेश आहे.

## घनकचरा व्यवस्थापनांतर्गत शहरे स्वच्छ करणे

घनकचरा व्यवस्थापनांतर्गत राज्यातील सर्व शहरांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी, प्रत्येक महसुली विभागाकरिता एका संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्थेमार्फत शहरांच्या घनकचरा व्यवस्थापनाचे प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू असून, डिसेंबर २०१७ पर्यंत हे अहवाल तयार होतील. आतापर्यंत २२ शहरांच्या प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार राज्यातील सर्व शहरांमध्ये घनकचरा विलगीकरण मोहीम १ मे, २०१७ पासून राबवण्यात येत असून, विलगीकरण केलेल्या विघटनशील कचऱ्यापासून शहरात विकेंद्रित पद्धतीने कंपोस्ट खत तयार करण्यात येते. या खताच्या विक्री व विपणनासाठी राज्य शासनाने ‘महाहरित सिटी कंपोस्ट’ या ब्रँडची नोंदणी केली आहे. अशा प्रकारे पाचगणी, वेंगुर्ला, विटा, सासवड व यवतमाळ या शहरांनी निर्माण केलेल्या कंपोस्ट खतास ‘महाहरित सिटी कंपोस्ट’ हा ब्रँड देण्याचे प्रस्तावित आहे.



घनकचरा व्यवस्थापनात राज्यातील अनेक नगरपालिका व नगरपरिषदांनी उत्कृष्ट काम केले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर नगरपरिषदेने प्लास्टिकच्या कचऱ्यावर नामी उपाय शोधला. बल्लापूर नगरपरिषदेने ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घातली असे असतानाही, ५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा प्रश्न सुटला नव्हता. तेव्हा घनकचरा व्यवस्थापनात काम करणाऱ्या रोटरी क्लब ऑफ चंद्रपूरची यासाठी नगरपरिषदेने मदत घेतली. त्यातून प्लास्टिकच्या पिशव्यांपासून रस्त्यांसाठी व गटारावरील झाकणे बनवण्यासाठी लागणारे साहित्य तयार करण्यात आले. वेगळ्या केलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या क्रशर व मेल्टिंग मशिनद्वारे बारीक करण्यात आल्या. हे क्रश झालेले प्लास्टिक डांबरी रस्ते तयार करण्यासाठी हे प्लास्टिक क्रश वापरण्यात आले. प्रायोगिक तत्त्वावर डांबरामध्ये प्लास्टिक क्रश मिसळण्यात आले. शहरातील विद्यानगरमधील यशवंतराव चव्हाण नगरपरिषद शाळा ते बेघर जनकल्याण सोसायटी या एकूण ३६० मीटरच्या बीटी रोडसाठी हे डांबर मिश्रित क्रश वापरण्यात आले. यामुळे रस्त्याचा दर्जा वाढला. या प्लास्टिक क्रशसोबत रेती मिक्स करून गटारावरील चेंबर कव्हर तसेच सिमेंट पोल आदी बनवण्यात आले. यामुळे घनकचरा केंद्रावर प्लास्टिक पिशव्यांचे काय करायचे याची चिंता मिटली. प्लास्टिक पिशव्यांपासून मुक्ती मिळाली. रस्त्यांसाठी लागणाऱ्या डांबरामध्येही बचत झाली व रस्त्याचे आयुष्यही वाढले. घनकचरा व्यवस्थापनांतर्गत असे विविध प्रयोग केले आहेत.

– नंदकुमार वाघमारे

## संकल्प स्वच्छ महाराष्ट्राचा

संपूर्ण देशात हागणदारीमुक्त ग्रामपंचायतींच्या संख्येत महाराष्ट्र प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले आहे. देशातील सर्वाधिक स्वच्छ जिल्ह्यांमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ग्रामीण व नागरी भागात राबवण्यात येत आहे. ग्रामीण भागातील स्वच्छतेसाठी गाव आणि परिसर हागणदारीमुक्त करण्याकडे भर देण्यात आला. गावातील सांडपाणी, घनकचरा याचे व्यवस्थापन करण्याकडेही लक्ष देण्यात आले. स्वच्छता अभियानात गावाचा सहभाग वाढावा यासाठी जनजागृती करण्यात आली. राज्य, विभागीय आणि जिल्हास्तरावर स्वच्छतेचे पुरस्कार देण्यात आले आहेत.

स्वच्छतेचे महत्त्व यापूर्वी महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा यांनी सांगितले आहे. स्वच्छ भारत मिशन कार्यक्रमामुळे स्वच्छतेविषयी अधिक जाणीवजागृती निर्माण झाली असल्याने लोकसहभाग मिळत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान सुरू झाले तेव्हा महाराष्ट्रातील ५६ लाख कुटुंबांकडे शौचालय नव्हते. या कार्यक्रमांतर्गत शौचालय बांधण्याच्या कामाला प्रोत्साहन देण्यात आले. राज्यातील ११ जिल्हे हागणदारीमुक्त झाले आहेत. चार जिल्ह्यात ही कामे ९५ ते ९९ टक्के पूर्ण झाली आहेत. लवकरच हे जिल्हे हागणदारीमुक्त होतील. १६५ तालुके, जवळपास २७ हजार ३०१ गावे, १८ हजार ७२८ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत.

जिल्हापरिषदेच्या अधिकाऱ्यांनी एक-एक गाव दत्तक घेण्याचा उपक्रम हाती घेतला. या उपक्रमामध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी दत्तक घेतलेल्या गावात एक-दोन दिवस मुक्काम करून लोकांना स्वच्छतेविषयी माहिती दिली. उघड्यावर शौचास जाऊ नये यासाठी लोकांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. जालना




जिल्ह्याने 'लोटाबंदी' असा उपक्रम राबवला. काही वेळा दंडात्मक कारवाई करण्यात आली. 'भेटीगाठी स्वच्छतेसाठी' या कार्यक्रमांतर्गत १८ लाख कुटुंबांना भेटी देऊन स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

गावातील लोकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी तेथील पाणी स्रोत, नद्या, विहिरी स्वच्छ ठेवण्यासाठी गावपातळीवर जनजागृती करण्यात आली. पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे, पाण्यामुळे आजार पसरू नयेत यासाठी पाणी तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या. गावातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन तेथेच करण्याबाबत लोकांना माहिती देण्यात आली.

स्वच्छता कार्यक्रमात लोकसहभाग अधिक वाढावा; नवनवीन कल्पना, तंत्रज्ञान यांचा वापर व्हावा या उद्देशाने नुकतीच 'स्वच्छथॉन' ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेच्या कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्रातून करण्यात आली. 'स्वच्छथॉन' या स्पर्धेत महाराष्ट्राच्या 'स्वच्छ रेडिओ' या उपक्रमाला राष्ट्रीय पातळीवर दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. 'महाराष्ट्र स्वच्छ रेडिओ' म्हणजे स्वच्छता अभियानात राबवत असलेले विविध उपक्रम, कार्यक्रम यांचे दररोज माहिती देणारे बातमीपत्र ते व्हॉट्सअप ग्रुपवर देण्यात येते. यामध्ये अनेक ग्रुप समाविष्ट असल्याने गतीने माहिती पोहोचवली जाते. हे काम करण्यासाठी संवादकाची टीम नेमण्यात आली आहे.

देशपातळीवर 'स्वच्छता हीच सेवा' हे अभियान १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०१७ या कालावधीत राबवले जात आहे. राज्यातही हे अभियान राबवण्यात येत आहे. स्वच्छ भारत करण्याचे उद्दिष्ट प्रधानमंत्र्यांनी वर्ष २०१९ हे दिले आहे. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्च २०१८ पर्यंत स्वच्छ महाराष्ट्र करण्याचा संकल्प केला आहे.

**- विष्णू काकडे**

---

### संकल्पमुक्ती #७

# बिल्डरांच्या मनमानीपासून मुक्ती

आपले स्वतःचे घर असावे, असे प्रत्येकाचे स्वप्न असते. नोकरदार, व्यापारी वर्ग घर घेण्यासाठी विकासकाकडे जातो. विकासक त्याला प्रस्तावित अपार्टमेंटमधील घर इतरांपेक्षा कसे वेगळे आहे, तेथे अनेक सुविधा कशा असतील याविषयी गैरवाजवी माहिती देतो. त्यामुळे ग्राहकाची फसवणूक होऊ शकते. विकासक हळूहळू घराच्या किमती वाढवतो. वेळेवर घर तयार करत नाही. घराच्या रचनेत बदल करतो. आतापर्यंत ग्राहकांना अशा बाबींविरुद्ध फारसे काही करता येत नव्हते. विकासकाविरुद्ध तक्रार करण्याची त्याची हिंमत होत नव्हती. त्यामुळे त्याचे आर्थिक, शारीरिक आणि मानसिक खच्चीकरण व्हायचे. विकासकाची ही दादागिरी, फसवणुकीची प्रवृत्ती मोडून काढण्यासाठी तसेच बांधकाम क्षेत्रातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि ग्राहकाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी शासनाने १ मे २०१७ पासून स्थावर संपदा अधिनियम २०१६ अंतर्गत महारेराची स्थापना केली आहे.

### महाराष्ट्र पहिले राज्य

बांधकाम क्षेत्रातील संबंधित प्राधिकरण स्थापन करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. महारेरा हे बांधकाम क्षेत्राचे नियमन

करणार आहे. ग्राहकांचे हित व विवाद गतीने निवारण्यासाठीही स्वतंत्र यंत्रणा आहे. त्यामुळे बांधकाम क्षेत्रात पारदर्शकता व कार्यक्षमता येणार आहे.

यापूर्वी विकासक हा त्याच्या प्रकल्पाची कुठेही नोंदणी करीत नव्हता. या प्रकल्पाबद्दल संपूर्ण आणि खरी माहिती जाहीर करीत नव्हता. त्यामुळे खोट्या जाहिराती करून ग्राहकाला आकर्षित केले जायचे. त्यात ग्राहकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत होती. हे सर्व थांबविण्यासाठी खुल्या बाजारात सदनिका विक्री करण्यापूर्वी प्रत्येक विकासकाला त्याचे प्रस्तावित आणि चालू असलेले दोन्ही प्रकल्प महारेरामध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे. बांधकाम प्रकल्पाबद्दल संपूर्ण माहिती जाहीर करणे आवश्यक आहे.

## संकेतस्थळावर माहिती

एखाद्या ग्राहकाला विकासकाने चुकीची माहिती देणे, प्रकल्पाची माहिती सातत्याने बदलणे अशा घटना अनेकदा घडलेल्या आहेत. परंतु आता विकासकाने त्याचे सर्व तपशील व माहिती महारेराच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. प्रकल्पाचे ठिकाण, विकासकाचे नाव किंवा सदनिकांचा प्रकार महारेरा या संकेतस्थळावर इच्छुक खरेदीदार शोधू शकतो. संबंधित विकासकाने खरी माहिती दिली आहे किंवा नाही हे तपासताना मंजूर प्रकल्पाची योजना, इमारत आराखडा, सदनिकेची वैशिष्ट्ये, सोयीसुविधा, करारपत्र आणि कन्व्हेएन्स डीड आदी कागदपत्रे ग्राहक तपासू शकतो.




## प्रकल्पाचे दरवर्षी लेखा परीक्षण

यापूर्वी प्रकल्पाचे बांधकाम वेळेवर पूर्ण होत नव्हते, परंतु आता प्रकल्प वेळेवर पूर्ण करणे आणि ग्राहकाला सुपुर्द करणे हे बंधनकारक केले आहे. बांधकाम विकासकाच्या प्रत्येक प्रकल्पाचे आता दरवर्षी लेखा परीक्षण केले जाणार आहे. या कायद्यान्वये विकासकाला प्रकल्पामध्ये हवे तसे बदल करता येणार नाहीत. प्रस्तावित प्रकल्पाच्या आराखड्यात, योजनेत किंवा इतर कोणत्याही बाबींमध्ये बदल झाल्यास विकासकाला खरेदीदाराची संमती घेणे आवश्यक ठरेल.

एखाद्या ग्राहकाला घराचा ताबा मिळाल्यानंतर दीड दोन वर्षातच पडझड व्हायला सुरुवात व्हायची. तेव्हा विकासक लक्ष द्यायचा नाही. असा अनुभव अनेकांना आला आहे. मात्र आता विकासकाला यातून स्वतःची सुटका करून घेता येणार नाही. संरचनात्मक दोष, बांधकामातील दोष, सेवा किंवा इतर दुरुस्ती यासाठी विकासक या कायद्यान्वये जबाबदार ठरणार आहे. प्रकल्पाच्या वितरणास उशीर झाल्यास खरेदीदाराला व्याज देण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे.

## खरेदीदाराला कायदेशीर संरक्षण

महारेरा या कायद्यामुळे घर खरेदीदाराला कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. या कायद्याचे विकासकाने पालन न केल्यास कठोर दंड आणि शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. घर घेणाऱ्या नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याबरोबरच, फसवणूक करणाऱ्या विकासकांना चाप लावण्यासाठी; गृहनिर्माण नियमन कायदा उपयुक्त ठरत आहे. महारेरांतर्गत आतापर्यंत १० हजार विकासक, सहा हजार एजंट आणि २१०० प्रकल्पांची नोंदणी झाली आहे.

रियल इस्टेट रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट ॲक्ट, २०१६ हा कायदा सध्या १३ राज्य सरकार आणि ७ केंद्रशासित प्रदेशामध्ये लागू झाला आहे. या नवीन कायद्यानुसार बिल्डरांच्या योजनेप्रमाणे घर खरेदी निश्चित झाल्यावर करारनाम्याआधी आता घराच्या किंमतीच्या १०% रक्कम खरेदीदारांनी विकासकास द्यायची आहे. २०% रक्कम करारानंतर आणि अन्य रक्कम टप्प्याटप्प्याने घराची कामे झाल्यावर देता येतील. विशेष म्हणजे ग्राहकांनी तीनदा हप्ता चुकवला तर १५ दिवसांच्या सूचनेनंतर विकासक करार रद्द करू शकतो. या कायद्यान्वये कुठलीही जात, धर्म वा लिंग या कारणावरुन विकासकाला ग्राहकांमध्ये भेदभाव करता येणार नाही. ग्राहकाला घर नाकारता येणार नाही.

महारेराचे कार्यालय मुंबई येथे असून गृहबांधणीविषयी या मंडळाकडे तक्रार करता येईल. त्या तक्रारीचा तपास करण्याचे आणि निवाडा करण्याचे अधिकार या प्राधिकरणाला देण्यात आले आहेत. विकासक विरोधातील तक्रारीचे ३० दिवसांच्या आत निराकरण करावे लागणार आहे.

– डॉ. संभाजी खराट

# संकल्प ते सिद्धीची प्रेरणा

स्मरण

**महात्मा गांधी यांनी १९४२ साली 'चले जाव' ची चळवळ सुरू केली. त्यास यंदा ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी 'संकल्प ते सिद्धी' या उपक्रमाचा प्रारंभ केला. २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंती सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात साजरी केली जाते. महात्मा गांधीजींच्या कार्याविषयी थोडक्यात माहिती.**



## महात्मा गांधी

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म गुजरातमधील पोरबंदर येथे एका सुसंस्कृत व प्रतिष्ठित कुटुंबात २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला. महात्मा गांधींचे वडील करमचंद हे प्रथम पोरबंदर संस्थानचे व नंतर राजकोट संस्थानचे दिवाण होते. आई पुतळीबाई व वडील हे दोघेही शीलसंपन्न व धर्मनिष्ठ होते. १८८५ मध्येच करमचंद यांचे निधन झाले. १८८७ साली गांधी मॅट्रिकच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. बॅरिस्टर होण्याकरिता १८८८ मध्ये ते इंग्लंडला गेले. इंग्लंडमध्ये असताना गांधींनी शाकाहारी मंडळ स्थापन केले. ते १० जून १८९१ रोजी बॅरिस्टर झाले. तत्पूर्वी लंडनची मॅट्रिक परीक्षाही ते उत्तीर्ण झाले होते.

सुमारे २० वर्षे गांधी आफ्रिकेत राहिले. नाताळ इंडियन काँग्रेस नावाची संस्था त्याकरिता स्थापन केली. सार्वजनिक फंडातील पैसा न घेता वकिली सुरू करून अगदी साधी राहणी अवलंबिली. इंडियन ओपिनियन हे वृत्तपत्र सुरू केले. १९१२ साली गोपाळकृष्ण गोखले हे जनरल स्मट्सने काळा कायदा रद्द करावा, म्हणून आफ्रिकेत गेले. तेव्हापासून गांधी व गोखले यांचा स्नेह जमला. गोखले यांना गांधीजींनी आपले राजकीय गुरू म्हणून अत्यंत पूज्य मानले. आफ्रिकेतील दरबान शहराजवळ फिनिक्स आश्रम स्थापन केला. तेथूनच ते इंडियन ओपिनियन हे साप्ताहिक छापून प्रसिद्ध करू लागले. हिंद स्वराज्य हे पुस्तक प्रश्नोत्तररूपाने लिहून प्रसिद्ध केले.

९ जानेवारी १९१५ रोजी गांधीजी मुंबईस परत आले. हरद्वार येथे कांगडी गुरुकुलाचे आचार्य श्रद्धानंद यांनी प्रथम गांधींचा महात्मा म्हणून निर्देश करून गौरव केला. अहमदाबाद येथे साबरमती काठावर २५ मे १९१५ रोजी त्यांनी सत्याग्रहाश्रम स्थापन केला. गांधीजींनी १९१७ मध्ये शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी बिहारमधील चंपारण्यास भेट दिली. त्या परिसरात गोऱ्या लोकांचे ऊसाचे व निळीचे मळे होते व तेथील हिंदी शेतकरी यांची कुळे होती. हे मळेवाले शेतकऱ्यांना छळीत, लुबाडीत, मारीत व त्यांची आर्थिक पिळवणूक करीत. चंपारण्य जिल्ह्यातील ८५० खेड्यांतील सुमारे ८,००० शेतकऱ्यांच्या तक्रारी गांधीजींनी लिहून घेतल्या. १३ जून १९१७ रोजी सरकारला चौकशी समिती नेमावी लागली. समितीच्या शिफारशीप्रमाणे सरकारने शेतकऱ्यांकडून खंड कमी घेतला जाईल, वेठबिगार रद्द होईल व इतर जुलमी प्रकार होणार नाहीत, असे १८ ऑक्टोबर रोजी जाहीर केले. गांधीजींनी १९३० साली सविनय कायदेभंगाची घोषणा केली. १२ मार्च १९३० रोजी साबरमती आश्रमातून गांधीजींनी स्वराज्य मिळाल्याशिवाय परत येणार नाही; अशी प्रतिज्ञा करून समुद्र किनाऱ्यावरील दांडीकडे मिठाचा कायदा तोडण्याकरिता ७२ सत्याग्रही वीरांसह यात्रा सुरू केली. ६ एप्रिलला यात्रा संपली.

गांधीजींनी जमनालाल बजाज या आपल्या अनुयायाच्या सांगण्यावरून वर्धा येथील सेवाग्राम येथे आश्रम स्थापन केला. तेथे ते अखेरपर्यंत राहिले आणि विधायक कार्यक्रमाला पुन्हा वाहून घेतले. २९ जुलै १९४६ रोजी मुस्लीम लीगने पाकिस्तानच्या मागणीकरिता आंदोलन उभारले. भारताची फाळणी अपरिहार्य झाली. गांधीजींना ती मुळीच मान्य नव्हती. एक वेळ माझ्या देहाचे दोन तुकडे पडले तरी चालेल, पण भारताची फाळणी मी होऊ देणार नाही, असे त्यांनी जाहीर केले. परंतु भारताची फाळणी ते टाळू शकले नाहीत. ३० जानेवारी १९४८ रोजी बिर्ला भवनमधून गांधी प्रार्थनास्थानाकडे जावयास निघाले. प्रार्थनास्थानाकडे जातानाच एक माथेफिरू सभेत शिरला. गांधीजींच्या जवळ जाऊन त्याने गांधीजींच्या अंगावर गोळ्या झाडल्या. गांधी 'हे राम' म्हणत धरणीवर पडले आणि गतप्राण झाले. 'राष्ट्रपिता' म्हणून सर्वश्रेष्ठ अद्वितीय बहुमान गांधींना प्राप्त झाला.

**वृत्तपत्रकार गांधी :** ७ एप्रिल १९१९ पासून सत्याग्रही या संपादकीय नावाखाली 'सत्याग्रह' नावाचे साप्ताहिक सरकारी परवान्याशिवाय प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. मुंबईमध्ये 'बॉम्बे क्रॉनिकल' नावाचे दैनिक बी. जी. हर्निमन यांनी चालवले होते. यंग इंडिया (इंग्रजी) व नवजीवन (गुजराती) ही नियतकालिके १९१९ पासून गांधीजींच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होऊ लागली. ११ फेब्रुवारी १९३३ रोजी हरिजन (इंग्रजी) साप्ताहिक त्यांनी सुरू केले.

**(संदर्भ : मराठी विश्वकोश )**

**संकलन: गजानन पाटील**

# अग्रेसर महाराष्ट्राचे पर्व नवे नवनिर्माणाचे


| | |
|---|---|
| सूत्रबद्ध नियोजनाकडून सर्वसमावेशक विकासाकडे..! | ४२ |
| दिलासा, सुरक्षा आणि गतिमानता | ४६ |
| मिळेल सर्वांच्या स्वप्नांना हक्काचा आधार | ४८ |
| गुणवत्ता वाढवण्याला प्राधान्य | ५० |
| परवडणारी घरे मिळतील सर्वांना... | ५२ |
| ग्रामविकासाला चालना, कुपोषणमुक्तीचे ध्येय | ५४ |
| आदिवासी विद्यार्थी हाच केंद्रबिंदू | ५६ |
| धान्याची बचत आणि ग्राहकांचा लाभ | ५८ |
| गुणवत्तापूर्ण आरोग्य शिक्षण | ६० |
| प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य | ६२ |
| कायम पहिला क्रमांक | ६४ |
| शेतकरी हिताशी बांधिलकी | ६६ |
| पर्यावरण समतोल, प्रदूषणमुक्ती | ६८ |
| चौफेर समृद्धीची सुवर्णसंधी... | ७० |
| स्वयंपूर्णतेची ऊर्जा | ७२ |
| स्वच्छतेची संकल्पपूर्ती... | ७४ |
| सक्षम आरोग्यसेवा | ७६ |
| सर्वांगीण विकासाचा ध्यास | ७८ |
| जलसमृद्धी करेल टंचाईमुक्ती | ८० |
| संधी रोजगाराची, समृद्ध होण्याची... | ८२ |
| सन्मान आणि सक्षमीकरण | ८४ |
| उत्पन्न वाढीला चालना | ८६ |
| कौशल्यातून कामगारांचे हित | ८८ |
| सर्वांना समान न्याय | |
| विकास आणि कुपोषणमुक्ती | ९० |
| आरोग्यदायी महाराष्ट्र /धोरणात्मक सुधारणा | ९१ |
| गावांची स्वयंपूर्णता / जलसमृद्धीच्या दिशेने | ९२ |
| सर्वांना सुरक्षा / आदिवासींचे सक्षमीकरण | ९३ |
| घर हक्काचे... / स्वच्छता आणि सुरक्षितता | ९४ |
| समतोल विकास / सहकाराची शक्ती | ९५ |
| शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य / पारदर्शी प्रशासन | ९६ |
| शेतकऱ्यांना दिलासा / लोकहिताची आघाडी | ९७ |
| येथे कर माझे जुळती... | ९८ |


### सूत्रबद्ध नियोजनाकडून सर्वसमावेशक विकासाकडे..!



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देश विकासाच्या संकल्प सिद्धीसाठी पुढील पाच वर्षात म्हणजेच २०२२ पर्यंत ठरवलेली उद्दिष्टे साध्य करावयाची आहेत. संकल्पापासून सिद्धीपर्यंतचा हा प्रवास हे एक परिवर्तन पर्व असेल.

४२

### मिळेल सर्वांच्या स्वप्नांना हक्काचा आधार

मागील ३ वर्षात शासनाने कृषी आणि संलग्न क्षेत्राच्या विकासावर विशेष भर दिला. त्यामुळेच कृषी क्षेत्राचा उणे विकास दर अधिक (१९.३ टक्के) झाला. राज्याचा विकास दर ५.४ टक्क्यांहून वाढून तो ९.४ टक्के इतका झाला.

४८

### गुणवत्ता वाढवण्याला प्राधान्य



प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्यातील शाळा डिजिटल करण्यासह विद्यार्थ्यांचा लर्निंग आऊटकम १०० टक्के करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. गेल्या काही वर्षातील शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला असता महाराष्ट्राने शिक्षण क्षेत्रात १८ व्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

५०

### परवडणारी घरे मिळतील सर्वांना...

सर्वसामान्य नागरिकांना परवडतील अशी घरे देण्यासाठी राज्य व केंद्र शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

५२

### आदिवासी विद्यार्थी हाच केंद्रबिंदू



आदिवासी विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश देण्यात आला. त्यांना सकस व ताजा आहार मिळावा यासाठी अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृह योजना राबवण्यात येत आहे. पेसा ग्रामपंचायतींना पाच टक्के मुक्तनिधी देण्यात येत आहे. कमी वेळेत व अचूक पद्धतीने जात पडताळणी व्हावी यासाठी ऑनलाइन 'आदि' प्रमाण प्रणाली सुरू करण्यात आली आहे.

५६



**आणखी पाच वर्षांनी देश आपल्या स्वातंत्र्याची पाऊण शतकपूर्ती साजरी करणार आहे. एका ऐतिहासिक टप्प्याचे हे औचित्यपूर्ण महत्त्व केवळ सांख्यिकी दृष्टीने ठरू नये यासाठी प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी यंदाचे वर्ष हे संकल्प वर्ष म्हणून जाहीर केले आहे. या संकल्पांच्या सिद्धीसाठी पुढील पाच वर्षात म्हणजेच २०२२ पर्यंत ठरवलेली उद्दिष्टे साध्य करावयाची आहेत. संकल्पापासून सिद्धीपर्यंतचा हा प्रवास हे जणू एक परिवर्तन पर्वच असणार आहे.**


**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री


# सूत्रबद्ध नियोजनाकडून सर्वसमावेशक विकासाकडे..!

देशासोबतच राज्याच्या परिवर्तन पर्वातील एका निर्णायक टप्प्यावर सध्या आपण आहोत. देशाच्या स्वातंत्र्याला ७० वर्षे पूर्ण झाली असून स्वातंत्र्यप्राप्तीचे ध्येय गाठण्यात निर्णायक लढा ठरलेल्या चलेजाव आंदोलनाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. सध्या या आंदोलनाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे. आणखी पाच वर्षांनी देश आपल्या स्वातंत्र्याचाही अमृत महोत्सव साजरा करणार आहे. एका ऐतिहासिक टप्प्याचे हे औचित्यपूर्ण महत्त्व केवळ सांख्यिकी दृष्टिकोनातून ठरु नये यासाठी प्रधानमंत्र्यांनी यंदाचे वर्ष हे संकल्प वर्ष म्हणून जाहीर केले आहे. या संकल्पांच्या सिद्धीसाठी पुढील पाच वर्षात प्रयत्न करून २०२२ पर्यंत ते पूर्ण करावयाचे आहेत. संकल्पापासून सिद्धीपर्यंतचा हा प्रवास हे जणू एक परिवर्तन पर्वच असणार आहे.

या पर्वातील आपल्या महायोगदानासाठी महाराष्ट्रानेही सप्तमुक्तीचा वैशिष्ट्यपूर्ण संकल्प केला असून त्यातील संकल्पांच्या पूर्ततेतून सिद्धी साध्य करण्याचा आमचा निर्धार आहे. पुढील तीन वर्षांनी म्हणजे २०२० मध्ये महाराष्ट्राच्या निर्मितीस ६० वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर अमृत महोत्सवी भारतातील हीरक महोत्सवी महाराष्ट्रही अधिक संपन्न, सक्षम आणि सर्वसमावेशक विकासाचा ठरावा यासाठी आमचा निर्धार आहे. महाराष्ट्राने केलेल्या सप्तमुक्तीच्या निर्धारात दुष्काळ, शेतकऱ्यांचे कर्ज, प्रदूषण, भ्रष्टाचार, करजंजाळ, अस्वच्छता आणि बिल्डरांची मनमानी या सात प्रश्नांपासून मुक्तींचा समावेश आहे.

## आव्हानांची मालिका

महाराष्ट्राने सप्तमुक्ती संकल्पांच्या पूर्तीचा अनौपचारिक प्रवास तीन वर्षांपूर्वीच सुरू केलेला आहे. राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर माझ्या नेतृत्वाखालील सरकारपुढे आव्हानांची एक मोठी मालिका उभी होती. या सर्व आव्हानांचा आढावा घेऊन राज्याच्या सर्वसमावेशक विकासाचे धोरण आम्ही आखले. त्याला अंमलबजावणीच्या पातळीवर आणण्यासाठी आम्ही गेली तीन वर्षे अविरतपणे धडपड करतोय. राज्यातील सरकारच्या वाटचालीला तीन वर्षे पूर्ण होत असताना तिचे सिंहावलोकन करणेही गरजेचे आहे. त्यातूनच भविष्यातील वाटचाल अधिक निर्दोष आणि परिणामकारी ठरू शकेल.

महाराष्ट्रापुढचा सर्वात प्राधान्याचा प्रश्न हा शेती अरिष्ट दूर करण्याचा होता. शेतकरी आत्महत्यांनी पोळलेल्या महाराष्ट्राच्या वेदनेवर फुंकर घालून तिच्यावर प्रभावी उपाययोजना करण्याचे आव्हान सरकारपुढे



होते. त्यामुळे आपसुकपणे सरकारच्या अजेंड्यावर शेतीचा विषय अग्रभागी होता. केवळ तात्पुरती मलमपट्टी करून शेतीप्रश्नांची सोडवणूक होणार नाही याची जाणीव असल्याने आणि मतांचे राजकारण करावयाचे नसल्याने शेती विकासासाठी दीर्घकालीन धोरण आखून त्याची कठोर आणि काटेकोर अंमलबजावणी आम्ही सुरू केली.

या धोरणानुसार गेल्या तीन वर्षात शेती क्षेत्रात ४० हजार कोटींहून अधिक गुंतवणूक केली आहे. शेती सुधारण्यासाठी सरकारने केलेल्या प्रयत्नांची निती आयोगानेही प्रशंसा केली असून याबाबतीत महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर असल्याचे स्पष्ट केले आहे. सरकारच्या या उपायांमुळे कृषी आणि संलग्न क्षेत्राचा उणे ११.२ टक्के असलेला विकासदर आता १२.५ टक्के इतका वाढला आहे. याचाच अर्थ शेती क्षेत्राच्या उत्पन्नात जवळपास ४० हजार कोटींनी वाढ झाली आहे. सरकारने केलेल्या विविध उपाययोजनांमुळे गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणावर उत्पादन झालेल्या तुरीची देशात सर्वाधिक म्हणजे ६७ लाख क्विंटल एवढी विक्रमी खरेदी करण्यात आली. शेतकऱ्यांना माफक दरात आणि सोयीनुसार वीजपुरवठा होण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतून पुढील तीन वर्षात ९० टक्के शेतीपंप सौर फिडरला जोडण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना १० लाख सौर पंपांचा लाभ देण्यात येत आहे. याशिवाय राज्यात गटशेतीचा अतिशय महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात येत असून १२०० हून अधिक शेतकरी उत्पादन कंपन्या स्थापन झाल्या आहेत. या सर्व उपाययोजनांवर कळस ठरणारी उपाययोजना म्हणजे देशातील सर्वात मोठी कर्जमाफी योजना होय. छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान योजनेंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येत असून ५६ लाखाहून अधिक शेतकऱ्यांचे अर्जही सरकारकडे दाखल झाले आहेत.


## शाश्वत सिंचन

शाश्वत सिंचनाशिवाय शेती विकास होणार नाही हे स्पष्ट असल्याने सरकार त्या दृष्टीने प्रभावी उपाययोजना करीत आहे. वर्षानुवर्षे रखडलेल्या १४१ सिंचन प्रकल्पांना गेल्या दोन वर्षांत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून येत्या वर्षभरात ४०० प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येणार आहे. यासोबतच ६० टक्के, ५० टक्के आणि ४० टक्के कामे झालेले सुमारे २२५ प्रकल्प दोन वर्षात पूर्ण करून साडेसात लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्यात येणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत राज्यातील २६ प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. यावर्षी या प्रकल्पांद्वारे सुमारे ८२ हजार ६०० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. तसेच अपूर्ण सिंचन प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून २६ हजार कोटी रुपये मिळणार आहेत. राज्यातील धरणे व जलसाठ्यांच्या साठवण क्षमतेत वाढ करण्यासह शेतकऱ्यांची जमीन सुपीक होण्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना राबवण्यात येत आहे. त्यासाठी सुमारे ६ हजार २३६ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. मनरेगा योजनेंतर्गत गेल्या दोन वर्षात ६० हजाराहून अधिक विहिरी पूर्ण करण्यात आल्या आहेत. मागेल त्याला शेततळे योजनेत ४० हजाराहून अधिक शेततळी पूर्ण झाली आहेत.

जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून साडेअकरा हजार गावांमध्ये सुमारे साडेपाच हजार कोटी रुपयांची जवळपास चार लाख कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या कामांतून आतापर्यंत जवळपास १६ लाख टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला असून या पाण्यातून सुमारे २१ लाख हेक्टर क्षेत्रास एकवेळचे संरक्षित सिंचन उपलब्ध होणार आहे. जलयुक्त शिवार अभियान हे लोकचळवळ झाली असून ५७० कोटींची कामे लोकसहभागातून झाली आहेत. या अभियानामुळे टँकर्सच्या संख्येत घट झाली असून जमिनीतील पाण्याच्या पातळीतही वाढ झाली आहे.

## उत्तम कायदा आणि सुव्यवस्था

उत्तम कायदा आणि सुव्यवस्थेमुळे देशातील एक शांत आणि सुसंस्कृत राज्य अशी महाराष्ट्राची असलेली प्रतिमा मागील काही वर्षात प्रश्नांकित झाली होती. याबाबत सरकारने गेल्या तीन वर्षात घेतलेल्या निर्णयांमुळे त्यात लक्षणीय सुधारणा झाली आहे. २०१४ मध्ये नऊ टक्के इतका घसरलेला गुन्हे सिद्धतेचा दर आता ५२ टक्क्यांहून अधिक झाला आहे. हा वाढलेला दर सरकारने जाणीवपूर्वक राबवलेल्या विविध उपाययोजनांचा दृश्यपरिणाम आहे. गुन्हे सिद्धीच्या प्रक्रियेला अधिक गती देण्यासाठी पुणे येथील गुन्हे अन्वेषण विभाग व महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी आणि मुंबई येथील राज्य गुप्तवार्ता विभाग या तीन ठिकाणी तंत्रज्ञान सहाय्यित गुन्हे अन्वेषण केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. देशात सर्वप्रथम सीसीटीएनएस कार्यप्रणाली महाराष्ट्रात कार्यान्वित झाली आहे. १०४१ पोलिस ठाणे आणि ६३८ वरिष्ठ पोलीस कार्यालये या प्रणालीच्या माध्यमातून जोडली गेली असून पोलीस विभागाच्या कामकाजाला डिजिटल गतिमानतेचा आयाम लाभला आहे. राज्यात २४ फॉरेन्सिक प्रयोगशाळा सुरु करण्यात आल्या आहेत, तसेच ४५ मोबाइल सपोर्ट युनिट कार्यान्वित झाली आहेत. गुन्ह्यांची उकल करुन पुराव्यांबरोबरच गुन्हेगारांना शिक्षेसाठी महाराष्ट्र पोलीस दलाकडून 'म्बिस' आणि पको-२५ प्रणालीचा यशस्वी उपयोग करण्यात आला आहे.




## नवी आयुक्तालये व पोलीस ठाणी

गेल्या तीन वर्षात ६१ पोलीस ठाणी स्थापित करण्यात आली आहेत. तसेच कोल्हापूर, अकोला, पिंपरी-चिंचवड आणि मिरा-भाईंदर येथे पोलीस आयुक्तालये स्थापन करण्यात येणार आहेत. वाहतूक नियंत्रण आणि सर्वच प्रकारच्या हालचालींवर निगराणी ठेवण्यासाठी महत्त्वाच्या शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. सुरक्षेबरोबरच वाहतूक व्यवस्थापन करण्यात ही यंत्रणा सहाय्यभूत ठरत

आहे. वाहतूक विषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांकडून दंड आकारण्यासाठी कार्यान्वित करण्यात आलेली ई-चलन योजना यशस्वीपणे अंमलात आली आहे.

पोलीस दलाच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी परसेप्शन इंडेक्स तयार करण्याची प्रक्रिया नागपूरपासून सुरु झाली आहे. या इंडेक्समुळे पोलीस दलाबाबतच्या जनतेच्या अपेक्षा आणि कामगिरीची माहिती मिळण्यास मदत झाली असून त्याप्रमाणे दलात सुधारणा करण्यात येत आहे. सायबर गुन्हेगारीला पायबंद घालण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे गेल्या तीन वर्षात दाखल झालेल्या आठ हजार १०८ प्रकरणांपैकी तीन हजार ७३६ प्रकरणांमध्ये आरोपींना अटक झाली.


पुणे येथे प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आलेल्या ई-कम्प्लेन्ट सेवेंतर्गत ई-स्वाक्षरीची सुविधा निर्माण केल्यावर त्याचे रुपांतर ई-एफआयआरमध्ये करुन ती राज्यभर लागू करण्याचे नियोजन आहे. त्याचप्रमाणे अग्निशमन आणि पोलिसांसाठी असणारे विविध क्रमांक एकत्र करुन डायल ११२ हा एकमेव क्रमांक सुरु करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. पोलीस गृहनिर्माणाच्या कार्यक्रमातून पोलीस दलासाठी आठ ते दहा हजार कोटींच्या विविध प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली आहेत. या माध्यमातून पोलिसांसाठी ५१ हजारांचा हाऊसिंग स्टॉक निर्माण केला जाईल. आतापर्यंत १९ गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण केले असून त्या माध्यमातून २ हजार ३९५ घरे उपलब्ध होत आहेत. तसेच १८३ प्रकल्प नियोजनाच्या अंतिम टप्प्यात असून त्याद्वारे ३७ हजार ५४३ घरे बांधण्यात येणार आहेत. महिलांवरील अत्याचार कमी करण्याबरोबरच त्यांच्या संरक्षणासाठी राबविण्यात आलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच हैदराबादच्या धर्तीवर महाराष्ट्रात भरोसा सेल स्थापन करण्यात आली आहे.

### शिक्षणाची गुणवत्तावाढ

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांतीमुळे शैक्षणिक क्षेत्र मोठ्या प्रमाणावर प्रभावित झाले असून या तंत्रज्ञानाचा एकूणच शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी योग्य वापर करण्याचे धोरण आखले आहे. त्यानुसार प्रगत शिक्षण अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत असून ४४ हजारांहून अधिक शाळा प्रगत केल्या आहेत. त्यामुळे पूर्वी शिक्षणाबाबत देशात अठराव्या क्रमांकावर असलेले आपले राज्य आता तिसऱ्या क्रमांकावर आले असून शैक्षणिक सुधारणांच्या या प्रयत्नांमुळे लवकरच देशात पहिल्या क्रमांकावर जाईल. या अभियानांतर्गत प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन्ही स्तरावर की रिझल्ट एरिया (KRA) निश्चित करून काम करण्यात आले. सर्व शाळा डिसेंबर २०१८ पर्यंत डिजिटल होण्यासाठी लोकसहभाग व सामाजिक उत्तरदायित्वातून सहकार्य घेण्यात येत असून आतापर्यंत ५८ हजार शाळा डिजिटल झाल्या आहेत. शाळांचा लर्निंग आऊटकम १०० टक्के करण्यावर भर दिला जातोय. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी तसेच नेमकी पटसंख्या समजण्यासाठी विद्यार्थ्यांची माहिती आधार क्रमांकाशी जोडण्याचे काम पूर्ण करणे सुरू आहे. अशा सर्व प्रयत्नांमुळे इंग्रजी शाळेतील ४० टक्के विद्यार्थी आता जिल्हा परिषद शाळेकडे वळत आहेत. इंग्रजी माध्यमातून जवळपास १५ हजार विद्यार्थी मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये स्थलांतरित झाले आहेत.

### गैरप्रकारांना आळा

महाराष्ट्रातील सर्व शाळांमधील शिक्षकांची भरती आता चाचणी परीक्षा घेऊन केंद्रीय पद्धतीने होणार आहे. यामुळे खाजगी व शासकीय अनुदानित शाळांमधील भरती प्रकरणात होणाऱ्या गैरप्रकारांना आळा बसेल. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्ताधारक शिक्षक उपलब्ध होऊ शकतील. शिक्षणापासून वंचित राहिलेल्या व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून दूर गेलेल्यांना पुन्हा शिक्षणाची संधी उपलब्ध करुन




### कौशल्य विकास

**रोजगार आणि स्वयंरोजगार यावर उत्तर म्हणजे कौशल्य विकास असून नवीन आंतरवासिता (ॲप्रेंटिस) कायद्यामध्ये बदल करण्यात आला असल्याने महाराष्ट्रात सर्वाधिक ॲप्रेंटिस निर्माण झाले आहेत. या कायद्यातील सकारात्मक बदलामुळे उमेदवारांना 'हॅण्ड्स ऑन ट्रेनिंग' मिळू लागले आहे. महाराष्ट्रात पहिल्या वर्षी ६९ हजार तर गेल्या वर्षी एक लाख ॲप्रेंटिस होते. आता ही संख्या वाढतच जाणार आहे. राज्यातील तीन लाख शेतकऱ्यांच्या मुलांकरिता शेती आणि शेतीपूरक उद्योगातील प्रशिक्षण देण्यासंदर्भातील अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून, या कार्यक्रमास केंद्र सरकारचेही सहकार्य लाभत आहे.**

देण्यासाठी तसेच गळती व नापासांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

## डिजिटल कार्यपद्धती

प्रशासनाचा पारंपरिक चेहरा बदलून त्याला डिजिटल कार्यपद्धतीची जोड दिल्याने ते अधिक गतिमान आणि पारदर्शी झाले आहे. सरकारकडून यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांमध्ये आपले सरकार, महाडीबीटी, महावास्तू, महास्वयंम, महापरीक्षा आदी प्रकल्पांचा समावेश आहे. डीबीटी अर्थात थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून कृषी औजारे तथा उपकरणे आणि शिष्यवृत्तीसंबंधीच्या ४३ सेवांच्या अनुदानाची रक्कम लाभार्थींच्या बँक खात्यात थेट जमा होत आहे. आपले सरकार या एकाच व्यासपीठावर ३७९ सेवा उपलब्ध असून त्या माध्यमातून १ कोटी १० लाखांहून अधिक लोकांना सेवा दिली गेली आहे. महावास्तू पोर्टलमुळे घर बांधणीसाठी नकाशा मंजूर करणे तसेच इतर बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या परवानग्या मिळणे सोपे झाले आहे. युवकांच्या कौशल्य विकासासाठी महास्वयंम हे वेब पोर्टल वन स्टॉप शॉप म्हणून उपयुक्त ठरत आहे.



## सामाजिक न्याय

सामाजिक न्याय हा विषय सरकारने उक्तीवरुन कृतीच्या पातळीवर आणला आहे. राज्य सरकार सर्व समाजघटकांच्या आकांक्षांना पुरेपूर न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात शासनाची सकारात्मक भूमिका आहे. राजर्षी शाहू महाराज शैक्षणिक प्रतिपूर्ती योजनेंतर्गत ईबीसी सवलतीसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा १ लाखांवरुन ६ लाख रुपये करण्यात आली असून या योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे. ही शिष्यवृत्ती योजना सर्व ६०५ अभ्यासक्रमांसाठी लागू करण्यात आली असून ६० टक्क्यांची अट काढून ती ५० टक्क्यांची करण्यात आली. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला यापूर्वी राज्य सरकारने २०० कोटींचा निधी दिला होता. महामंडळामार्फत शेतकऱ्यांच्या ३ लाख मुलांना केंद्र शासनाच्या कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून कौशल्य प्रशिक्षण देण्यात येईल. प्रशिक्षित मुलांना रोजगार सुरू करण्यासाठी १० लाख रुपयांचे कर्ज बँकेमार्फत देण्यात येईल व त्याचे व्याज महामंडळामार्फत भरण्यात येईल. विविध समाजघटकांच्या विशेषत: मराठा, कुणबी व शेती व्यवसायातील बहुजन समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासावर सरकारने प्राधान्याने लक्ष केंद्रित केले आहे. यासंदर्भात व्यापक संशोधन करण्यासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (SARTHI) स्थापनेसंदर्भात पूर्वतयारीसाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत अल्पभूधारक शेतकरी तसेच नोंदणीकृत मजुरांच्या मुलांना शहरात राहून उच्च शिक्षण घेणे शक्य होण्यासाठी त्यांना मोठ्या शहरांमध्ये ३० हजार, तर छोट्या शहरांमध्ये २० हजार वार्षिक भत्ता देण्यात येणार आहे. ओबीसी प्रवर्गासाठी स्वतंत्र मंत्रालयीन विभाग कार्यान्वित करण्यात आला आहे. यंदा त्यासाठी २३८४ कोटींचा भरीव निधी उपलब्ध करण्यात आला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती आणि नवबौद्ध विद्यार्थ्यांना वार्षिक ४३ हजार ते ६० हजार अनुदान देण्यासाठी योजना सुरू करण्यात आली आहे. शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना राबविण्यासाठी दरवर्षी १०७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुलींचा जन्मदर वाढविण्यासह त्यांचे शिक्षण व आरोग्याचा दर्जा वाढविण्यासाठी माझी कन्या भाग्यश्री योजना राबविण्यात येते. त्याचा लाभ घेण्यासाठी एक लाखाच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करून ती साडेसात लाख करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून नागरी आणि ग्रामीण अशा दोन्ही प्रकारांत राज्य देशामध्ये अग्रेसर राहिले आहे. राज्याचा नागरी भाग जवळपास पूर्णपणे हागणदारी मुक्त झाला आहे. सर्वांना घरे या उपक्रमांतर्गत राज्याची घोडदौड अतिशय वेगाने सुरू असून देशातील सर्वांना २०२२ पर्यंत घरे मिळणार आहेत. मात्र, राज्य सरकारने मुदतीआधीच जनतेला घरांचा लाभ देण्यासाठीचे नियोजन केले आहे. उपेक्षित-वंचितांना २०१९ पर्यंत घरे देण्यात येणार असून त्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. मेक इन महाराष्ट्र अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपायांमुळे देशातील सर्वात मोठी गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. राज्याचा विकास दर भविष्यात १० टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. सेवा क्षेत्राचा विकासदरही ११ टक्क्यांपर्यंत गेला आहे.

सध्या राज्यात सहा लाख कोटींची पायाभूत सुविधांची कामे सुरू आहेत. यापूर्वी विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या मंजुऱ्या प्रलंबित होत्या. सरकारने त्यांच्या पूर्ततेसाठी सर्व पातळ्यांवर पाठपुरावा केला. प्रधानमंत्र्यांनीही त्यात वैयक्तिक लक्ष घातल्याने केंद्र सरकारशी संबंधित विविध परवानग्या मिळाल्या. विशेषत: मुंबईशी संबंधित मेट्रो रेल्वे, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, कोस्टल रोड, उपनगरी रेल्वेचे विविध प्रकल्प मार्गी लागले आहेत. या प्रकल्पांमुळे मुंबईच्या सार्वजनिक परिवहन यंत्रणेच्या माध्यमातून पुढील चार वर्षात प्रतिदिन ९० लाख प्रवासी क्षमता निर्माण होणार आहे. यासोबतच नुकताच भूमीपूजन झालेला बुलेट ट्रेनचा प्रकल्प या साऱ्यांमुळे राज्यातील दळणवळण सुविधा जागतिक परिमाण गाठणाऱ्या ठरतील, असा विश्वास वाटतो.

**शब्दांकन: हेमराज बागुल**, मा. मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी



**सार्वजनिक बांधकाम आणि महसूल हे दोन्ही विभाग जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहेत. त्यामुळे या विभागांच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षात महाराष्ट्राच्या हिताचे अनेक निर्णय घेण्यात आले. सामान्य माणूस कसा सुखी होईल या दृष्टीने सरकारने व्यापक दृष्टिकोन ठेवून योजनांची आखणी केली. त्याला केंद्र शासनाची उत्कृष्ट साथ मिळाली. त्यामुळेच महाराष्ट्र हे देशात अग्रेसर राज्य म्हणून पुढे येत आहे.**

**चंद्रकांतदादा पाटील**

**मंत्री, महसूल, मदत पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)**

# दिलासा, सुरक्षा आणि गतिमानता

वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्तीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना घोषित केली. याद्वारे दीड लाखापर्यंतचे थकीत कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला. एकवेळ समझोता योजनेद्वारे दीड लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना दीड लाखापर्यंतचे कर्ज माफ करण्यात येणार आहे. नियमितपणे कर्जपरतफेड करणाऱ्यांचाही विचार या वेळी शासनाने केला. अशा शेतकऱ्यांना २०१५-१६ यावर्षातील पूर्ण परतफेड केलेल्या पीक कर्जाच्या २५ टक्के अथवा २५ हजार रुपये यापैकी कमी असलेली रक्कम देण्याचे ठरवले आहे. यामुळे राज्यातील सुमारे ८९ लाख शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळेल. त्यासाठी अंदाजे रुपये ३४ हजार ०२२ कोटी खर्च अपेक्षित आहे. ही आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी आहे. शेतकरी सक्षम व्हावा, त्याला पुन्हा कर्ज घेण्याची वेळ येऊ नये, यासाठी शासनाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

### अपघात विमा

ग्रामीण भागात विविध प्रकारचे अपघात, नैसर्गिक आपत्ती उदा. सर्प/विंचू दंश, वीज कोसळणे, नदीत बुडणे, विहिरीत पडणे, झाडावरून पडणे यामुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण अधिक असून, त्याकरिता कै.गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना सुरू केली आहे. मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांस २ लाख रुपये साहाय्य देण्यात येईल.

### आपत्ती व्यवस्थापनात सक्षमीकरण

गेल्या दोन वर्षात आपत्ती व्यवस्थापनामध्ये जास्तीत जास्त सक्षम होत चाललो आहोत. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापनासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांना व्यापक अधिकार तसेच सुसज्ज व अद्ययावत यंत्रणा देण्यात आली आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या (एनडीआरएफ) धर्तीवर राज्य आपत्ती निवारण मदत दल (एमडीआरएफ) यंत्रणा स्थापन करण्यात येत आहे. त्याची कार्यालये धुळे आणि अकोला येथे असतील.

शेती उत्पादन वाढीस चालना मिळावी तसेच वादविवादामुळे वादात अडकून पडलेल्या जमिनींची प्रकरणे गतीने निकाली निघून, या जमिनी उत्पादन प्रक्रियेमध्ये समाविष्ट राहण्याच्या उद्देशाने; महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या संबंधित कलमांमध्ये सुधारणा करण्यात आली. यामुळे वादात अडकलेल्या अनेक जमीन मालकांना दिलासा मिळत आहे.

महाराष्ट्र कूळवहिवाट व शेतजमीन अधिनियमामध्ये व अन्य कूळवहिवाट कायद्याच्या संबंधित तरतुदीत सुधारणा करण्यात आली.



त्यामुळे महानगरपालिका आणि नगरपालिका, विशेष नियोजन प्राधिकरण यांच्या क्षेत्रात अकृषिक कारणांसाठी; आरक्षित जमिनी शेतकरी नसलेल्या व्यक्तीस, खरेदी करण्याची मुभा प्राप्त झाली आहे. त्यामुळे राज्यात औद्योगिक व आर्थिक विकासाला चालना मिळण्यास मदत झाली आहे. राज्यातील रस्त्यांची स्थिती सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. येत्या तीन वर्षात रस्त्यांच्या स्थितीत आमूलाग्र बदल झालेले दिसून येतील.

## रस्ते व पुलांची कामे मार्गी

ग्रामीण भागातील ७४२ पुलांची कामे आणि ६९४३ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा/दुरुस्ती पूर्ण झाली आहे. फाटकमुक्त रस्ते करण्याची योजना पूर्ण करण्यात आली आहे. यामुळे रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी होणाऱ्या अपघातांची संख्या शून्यावर आणण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्ग व राज्य रस्त्यांवर २२६ रेल्वे उड्डाणपूल बांधण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील रस्त्यांच्या सुधारणा कार्यक्रमांतर्गत २७ हजार ३७१ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा/दुरुस्ती पूर्ण झाली आहे. वारंवार पडणारे खड्डे व त्यामुळे होणारे अपघात, जीवितहानी टाळण्यासाठी दर १० कि.मी. रस्त्यांसाठी द्विवार्षिक रस्ते देखभाल व दुरुस्ती करार करण्यात येत आहे. तसेच खड्डे बुजवण्यासाठी जेट पॅचर या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शास्त्रोक्त पद्धतीने कामे करण्यात येत आहे.

राज्यात गुणवत्तापूर्ण व राष्ट्रीय दर्जाचे रस्ते उभारणीसाठी एकूण ३० हजार कोटी रुपयांचे हायब्रीड ॲन्युटी मॉडेलद्वारे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. एकूण १० हजार कि.मी. लांबीचे रस्ते बांधण्यासाठी प्रकल्प अहवाल प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

## महामार्गांच्या कामांना गती

नाशिक-पुणे महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात आहे तर पनवेल इंदापूर महामार्गाच्या ८४ कि.मी. चौपदरीकरणाचे कामही ५५ टक्के पूर्ण झाले. मुंबई गोवा महामार्गावरील इंदापूर ते झाराप या मार्गाचे चौपदरी क्रॉंक्रिटीकरणासाठी भूसंपादनाचे ७० टक्के काम पूर्ण झाले. ३५३ कि.मी.च्या कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. सातारा कागल महामार्गाच्या सहापदरी करणाच्या कामास मंजुरी देण्यात आली.

राज्यातील सर्व शासकीय इमारती, हरित इमारत संकल्पनेचा वापर करून; बांधण्याबाबत प्रथमच धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरून सद्य:स्थितीत राज्यातील ११ नव्या इमारतींची बांधकामे हरित इमारत संकल्पनेनुसार प्रगतिपथावर आहेत.

**स्ट्रीट वुइथ सायकल ट्रॅक :** रस्त्यावरील वाढते वाहतूक प्रदूषण कमी करण्यासाठी राज्यात प्रथमच स्ट्रीट वुइथ सायकल ट्रॅक हा सायकलस्वारांसाठी रस्ते मार्गाचा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. अमरावती, नागपूर, चंद्रपूर, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, नाशिक, लातूर, औरंगाबाद व जळगाव या शहरांमध्ये प्रायोगिक तत्वावर हा प्रकल्प राबवण्यात येईल.

## ऊर्जा संवर्धन

विभागाच्या विद्युत शाखेमार्फत 'स्पर्श' प्रकल्प हाती घेण्यात आला असून पहिल्या टप्प्यात राज्य शासनाच्या अनिवासी इमारतीमधील ११.५० लक्ष ट्यूबलाइट व दिवे, ६.५० लक्ष छत पंखे, ६०,००० वातानुकूलित यंत्रे व इमारतीच्या परिसरातील पथदिवे इत्यादी नवीन व ऊर्जा कार्यक्षम उपकरणे शासनातर्फे कोणताही खर्च न करता बदलण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. यामुळे राज्य शासनाच्या इमारतीमधील वीज जोडभारामध्ये बचत होणार असून सुमारे वार्षिक १२४ दशलक्ष युनिट्स विजेची बचत होणार आहे. वार्षिक वीज देयकांमध्ये ११९ कोटी रुपये वीजबिलाची कायमस्वरूपी बचत अपेक्षित आहे.

**शब्दांकन: नंदकुमार वाघमारे,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- शेतकऱ्याला होणाऱ्या त्रासापासून वाचवण्यासाठी सर्व जमिनींच्या अभिलेखाचे संगणकीकरण. ७/१२ ची ऑनलाइन उपलब्धता. संगणकीकृत अभिलेख्यांचे चावडी वाचन होऊन त्यात आवश्यक त्या दुरुस्त्या पूर्ण. १५ ऑगस्ट, २०१७ पर्यंत राज्यातील ३८९३ गावातील ७/१२ उतारे ऑनलाइन उपलब्ध.
- ५ हजार नवीन तलाठी सज्जे व ५०० नवीन मंडळे निर्माण करण्याचा निर्णय.
- शेतीचे नकाशे डिजिटाईज्ड करण्यात येणार असून उपग्रहाच्या माध्यमातून जमिनीची ई-मोजणी.
- पुढील दोन वर्षात एकही प्रकल्पग्रस्त पुनर्वसनापासून वंचित राहणार नाही, यासाठी सर्वोच्च प्राधान्य.
- राजस्व अभियानांतर्गत जात, उत्पन्न, अधिवास, रहिवासी तसेच नॉन क्रिमिलेअर असे विविध सुमारे ४० लाख ५३ हजार ६८८ दाखल्यांचे वितरण. चार हजार ८३४ अर्धन्यायिक प्रकरणे निकाली. ई-फेरफार अदालतीमध्ये जमिनीविषयक ७८ हजार १७ प्रकरणे निकाली. ३५ हजार ५९६ गावांमध्ये ई-फेरफार सुविधेची उपलब्धता. १२,६३२.८८ कि.मी. लांबीचे ८ हजार ६३३ पाणंद/शिवार रस्ते मोकळे.
- कूळकायद्यांतर्गत जमिनीसंबंधी बेकायदेशीर व्यवहार नियमानुकूल करून घेण्यासाठी तरतूद.
- १ जून २०१५ पासून ५३ पथकर स्थानकांवर कार, जीप व तत्सम हलकी मोटार वाहने तसेच २० जून २०१५ पासून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या व स्कूल बसेस यांना पथकर भरण्यापासून सूट. त्यामुळे नागरिकांना दिलासा.
- ऑक्टोबर २०१४ पासून ऑगस्ट २०१७ पर्यंत ९०१२.५० कि.मी.च्या नवीन राष्ट्रीय महामार्गांना मंजुरी.



**मागील ३ वर्षात शासनाने कृषी आणि संलग्न क्षेत्राच्या विकासावर विशेष भर दिला. त्यामुळे कृषी क्षेत्राचा उणे विकास दर अधिक (१९.३ टक्के) झाला. राज्याचा विकास दर ५.४ टक्क्यांहून वाढून तो ९.४ टक्के इतका झाला. अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे राहिले. ३४ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेचे शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले. बळीराजाला संरक्षण देणारे अनेक निर्णय घेतले. उन्नत शेती - समृद्ध शेतकरी अभियानाला गती दिली.**


**सुधीर मुनगंटीवार**

**मंत्री, वित्त व नियोजन, वने**


# मिळेल सर्वांच्या स्वप्नांना हक्काचा आधार



*नको कुणाच्या चेहऱ्यावरती दु:खाचा अंधार*
*अन् वृद्धांच्या खांद्यावरती तरुणाईचा भार*
*कौशल्याचा विकास देईल रोजगाराची हमी*
*मिळेल साऱ्यांच्या स्वप्नांना हक्काचा आधार*

ही भूमिका घेऊन मागच्या तीन वर्षांपासून युती शासन वाटचाल केली आहे. विविध माध्यमातून टंचाईमुक्त महाराष्ट्राची भक्कम पायाभरणी केली आहे. सामाजिक आर्थिक सुरक्षिततेचे निर्णय घेतानाच जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा करप्रणालीसारखी देशाला एका करसूत्रात बांधणारी आणि मेक इंडिया वनचा नारा देणारी करप्रणाली एकमताने अमलात आणण्यात शासन यशस्वी ठरले.

## महसुलाची नुकसानभरपाई

वित्तीय सुधारणेच्या प्रक्रियेत सामील करून घेताना, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महसुलाची नुकसानभरपाई कायद्याच्या चौकटीत राहून नियमित स्वरूपात देण्याची भूमिका शासनाने स्वीकारली. हे सर्व करत असताना कुठेही राज्याच्या विकासगतीवर परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली. विविध प्रकारच्या सामाजिक आर्थिक सुरक्षेची कवचकुंडले दिली आहेत. विकासापासून वंचित राहिलेल्या माणसाला आर्थिक, सामाजिक सुरक्षितता देणे, त्यांच्या कौशल्यात भर टाकून रोजगाराच्या व्यापक संधी निर्माण करणे आणि राज्याचा पर्यावरणस्नेही शाश्वत विकास करणे यासाठी अधिक वेगाने आणि दृढ संकल्पाने पुढे जाण्याची गरज आहे.

## मुद्रा योजनेचे यश

मागील वर्षी राज्यात मुद्रा योजनेत १३ हजार कोटींचे कर्ज वितरण झाले तर यावर्षी २० ऑगस्ट २०१७ पर्यंत ४ हजार ६२५ कोटी रुपयांपेक्षा अधिक जास्त रकमेचं कर्ज वितरण झालं आहे. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली या योजनेच्या अंमलबजावणीसाठी संनियंत्रण समितीची स्थापना केली आहे. जनधन योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना, पहेल, सुकन्या समृद्धी योजना अशा योजनांच्या समन्वयातून सामान्यातल्या सामान्य माणसाला संरक्षण देण्याचे काम या तीन वर्षात झाले आहे.




## लाभार्थ्यांना थेट निधी

विविध विभागांच्या योजनांचे लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करत आहोत. आतापर्यंत ७४ विविध योजनांचा यात समावेश करण्यात आला आहे तर ६२ वस्तूस्वरूपातील लाभ रोख रकमेच्या स्वरूपात आधार जोडणी झालेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करत आहोत. या वर्षी जिल्हा वार्षिक योजनेसाठी ७५६२ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. त्याच्या १३.५ टक्के म्हणजे जवळपास १०२१ कोटी

## कामगिरी दमदार

● जलयुक्त शिवार अभियानात वन विभागाचे काम उत्कृष्ट. वन विभागाने १०,९२४ गावांमध्ये केली २८,६५३ कामे. ● वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईची रक्कम पाच लाख रुपयांहून आठ लाख रूपये. ● वन्यप्राण्यामुळे होणाऱ्या नासाडीसाठी पीक नुकसानभरपाई - किमान १ हजार व कमाल २५ हजार रुपये. ● वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे पशुधन मृत्यू पावल्यास २५ हजार रुपयांची नुकसानभरपाई ● मोहाफुले आणि बांबू वन विभागाच्या वाहतूक परवान्यातून मुक्त.● विकलांग अपत्य असलेल्या राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यास ७३० दिवसांची विशेष बाल संगोपन रजा. पत्नी नसलेल्या शासकीय पुरुष कर्मचाऱ्यास या विशेष संगोपन रजेचा लाभ.● दत्तक मूल घेणाऱ्या राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यास १८० दिवसांची विशेष रजा ● वस्तू आणि सेवा करप्रणालीचा अवलंब करताना महानगरपालिकांना जकात व स्थानिक संस्था करापोटी द्यावयाच्या नुकसानभरपाईचा आदेश १ जुलै २०१७ रोजी पासून अमलात. ● विक्रीकर विभागामार्फत २०१६-१७ मध्ये ९० हजार ५२५ कोटी रुपयांच्या महसुली उत्पन्नाचे उद्दिष्टपूर्ण ● कालबद्ध पदोन्नती, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अंमलबजावणीच्या वेळी तात्पुरती सेवा विचारात घेण्यास मान्यता ● मृत्यू पावलेल्या एकट्या (अविवाहित किंवा कुटुंब अस्तित्वात नसलेला एकटा) शासकीय कर्मचाऱ्यावर संपूर्ण अवलंबून असलेल्या त्याच्या आई-वडिलांना कुटुंब निवृत्तीवेतन.
● शासकीय कर्मचाऱ्यांना देय असलेल्या रजा प्रवास सवलतीतील (स्वग्राम/ महाराष्ट्र दर्शन) तरतुदीत सुधारणा.
● ८० वर्षे व त्यावरील निवृत्तीवेतन/ कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांच्या निवृत्ती वेतनात १ एप्रिल २०१४ पासून १० टक्के वाढ ● सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन १ नोव्हेंबर २००५ पूर्वी राज्य शासनाच्या सेवेत नागरीपदावर पुनर्नियुक्ती झालेल्या माजी सैनिकाचा सेवेत असताना/ सेवानिवृत्तीनंतर मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबास सैनिकी व नागरी अशा दोन्ही सेवेतील कुटुंबनिवृत्तीवेतन देण्याचा निर्णय. ● विधवा महिलेने पुनर्विवाह केल्यानंतर, तिचे पूर्वीच्या पतीचे निवृत्तीवेतन कायम सुरू ठेवणार.● शासनाच्या सेवेत भरतीच्या मान्यतप्राप्त माध्यमाने रुजू झालेल्या आणि दोन वर्षांपेक्षा कमी सेवा झालेल्या शासकीय महिला कर्मचाऱ्यास पूर्णवेतनी प्रसूती रजा. ● सरोगसी पद्धतीने जन्मलेल्या अपत्याचे संगोपन करण्यासाठी महिला कर्मचाऱ्यास १८० दिवसांची विशेष रजा ● चतुर्थ श्रेणी वर्गातील पदोन्नतीची टक्केवारी २५ टक्क्यांहून ५० टक्के इतकी वाढवली.

रुपयांचा निधी जलयुक्त शिवारच्या कामासाठी तसेच जिल्हा वार्षिक योजनेच्या एकूण निधीतील १५ टक्के म्हणजे जवळपास ११३४ कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील कामास वापरण्यास मान्यता दिली आहे. चांदा ते बांदा कार्यक्रमात सिंधुदुर्ग आणि चंद्रपूर जिल्ह्याचा सूक्ष्म विकास आराखडा करून तो राबवत आहोत. त्यासाठी एकूण २०० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. २६६ कोटींचा सेवाग्राम विकास आराखडा तयार केला आहे. यासाठी यावर्षी जवळपास ९४ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. दारिद्र्य निर्मूलनाचा लढा अधिक तीव्र करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या सहकार्यातून कार्यक्रम राबवला जात आहे. राज्यातील कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या २५ तालुक्यांवर पहिल्यांदा लक्ष्य केंद्रित करून हा कार्यक्रम राबवला जाईल.

## महावृक्षलागवड



वन विभागाने १ ते ७ जुलै २०१७ या वनमहोत्सवाच्या काळात चार कोटी वृक्षलागवडीचा संकल्प केला होता. या सात दिवसात राज्यात पाच कोटी ४३ लाख झाडे लागली. लोकसहभागातून वन आणि वनेतर जमिनीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प केला आहे. सेवा हमी कायद्यांतर्गत वन विभागाच्या ११ सेवा ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या आहेत. मराठवाड्यात १४८ सैनिकांची स्थापन झालेली इको बटालियन ही बटालियन मराठवाड्याचे वृक्षाच्छादन वाढवण्याचे काम करील. मागच्या तीन वर्षात ठाणे खाडी फ्लेमिंगो पक्षी अभयारण्य, तोरणमाळ संवर्धन राखीव आणि अंजनेरी संवर्धन राखीव अशी तीन नवीन वन्यजीव संरक्षित क्षेत्र घोषित करण्यात आली आहेत.

कांदळवन क्षेत्र जवळपास ३६ चौ.कि.मी ने वाढले आहे. हॅलो फॉरेस्ट नावाने १९२६ ही हेल्पलाइन सुरू केली आहे. राज्यात जवळपास ३० लाख लोकांची हरित सेना उभी राहिली आहे. हे लोकांचे सरकार आहे. लोकांच्या मनातील विकासाची पूर्तता करण्याचा आमचा निर्धार आहे.

**शब्दांकन: डॉ. सुरेखा मुळे,** विभागीय संपर्क अधिकारी



**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्यातील शाळा डिजिटल करण्यासह विद्यार्थ्यांचा शैक्षणिक निष्पत्ती (लर्निंग आऊटकम) १०० टक्के करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. गेल्या काही वर्षातील शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला असता महाराष्ट्राने शिक्षण क्षेत्रात १८ व्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच ध्येय ठेवून शिक्षण व्यवस्थेत गुणवत्ता वाढवण्याला प्राधान्य देण्यात आले आहे.**


## विनोद तावडे

**मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्याक विकास व वक्फ**


# गुणवत्ता वाढवण्याला प्राधान्य

विद्यार्थ्याला शालेय शिक्षणातून नेमके काय दिले पाहिजे, याचे निकष निश्चित केले असल्याने शिक्षक, पालक आणि विद्यार्थी तिघांचे उत्तरदायित्व वाढले आहे. जिल्हा परिषद शाळेतले शिक्षक राबवत असलेले वेगवेगळे प्रयोग, शिक्षकांची शिकवण्याची कल्पकता यामुळे खासगी शाळांमधून जवळपास १५ हजार विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत शिकत आहेत. या शाळांमधील शिक्षण आणि प्रयोगशील शिक्षकांचे हे यश आहे. विद्यार्थ्यांना घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि माहिती-तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या ५० हजार शिक्षकांनी स्वतःला 'टेकसॅव्ही' घोषित केले आहे. या शिक्षकांनी वेगवेगळे ॲप्स तयार करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण डिजिटल शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे.

वेगवेगळ्या खासगी शाळांमध्ये भरमसाठ शैक्षणिक शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत, या तक्रारी दूर करण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरण काम करीत असून, त्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश डॉ. व्ही.जी. पळशीकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

### डिजिटल शाळा

**शालेय शिक्षण विभागामार्फत 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियान' राबवण्यात येत आहे. आतापर्यंत ग्रामीण भागातील ४४ हजार शाळा डिजिटल झाल्या आहेत. ही संख्या शहरांपेक्षा अधिक आहे. डिसेंबर २०१८ पर्यंत राज्यातील सर्व शाळा डिजिटल होतील. याचबरोबर इन्फर्मेशन ॲण्ड कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी इन स्कूल (आयसीटी) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत ८००० शाळा सुसज्ज आणि संगणकीकृत करण्यात आल्या आहेत. येत्या काळात अजून १५०० शाळा संगणकीकृत करण्यात येणार आहेत. या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना आनंददायी, गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार आहे.**



### उच्च व तंत्र शिक्षण : रोजगाराच्या नवीन संधी

जोपर्यंत विद्यापीठ अभ्यासक्रमांमध्ये बदल करीत नाही तोपर्यंत महाविद्यालयांना/ शैक्षणिक संस्थांना बदल करता येत नाही. सध्या तरी दहा अधिक दोन अधिक तीन अशा सूत्रात बदल करण्यात येणार नाही. नवीन विद्यापीठ कायद्यातील लवचीकता यामुळे आता गरजेनुसार विद्यापीठांना अभ्यासक्रमांची प्रासंगिकता तपासून अभ्यासक्रम बदलणे शक्य होणार आहे. विद्यापीठांमध्ये शिकवले जाणारे अभ्यासक्रम आणि उद्योगधंद्याची आवश्यकता यात समन्वय असणे आवश्यक आहे.

### शैक्षणिक प्रतिपूर्ती

आजच्या विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच विविध कंपन्यांमध्ये जाऊन प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मिळणे महत्त्वाचे आहे. राजर्षी शाहू महाराज प्रतिपूर्ती योजनेमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध होत असून, विविध महामंडळामार्फत शैक्षणिक कर्जही देण्यात येत आहे. राज्यातील तंत्रनिकेतनांचे श्रेणीवर्धन करून अभियांत्रिकी (पदवी अभ्यासक्रम) महाविद्यालयात रूपांतर करण्यात आले आहे. जे.जे.स्कूल ऑफ आर्ट्स यांची अंगीकृत संस्था असलेल्या जे.जे. स्कूल ऑफ ऑर्किटेक्चरला स्वायतत्ता देण्यात आली आहे.

## क्रीडा : नोकरीत आरक्षण आणि थेट नियुक्ती



राज्यात चांगले खेळाडू घडावे यासाठी शासन प्रोत्साहन देत आहे. सर्वांसाठी शिक्षण या कायद्यानुसार शाळांना मैदान असणे अनिवार्य करण्यात आले आहे. शासनामार्फत राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना नोकरीमध्ये प्राधान्य देण्याबरोबरच काही खेळाडूंना त्यांच्या कामगिरीनुसार थेट नियुक्ती देत आहे. प्रावीण्यप्राप्त खेळाडूंना शासकीय, निमशासकीय आणि इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

## सांस्कृतिक कार्य

राज्यातील मान्यवर वृद्ध साहित्यिक आणि वृद्ध कलावंत यांच्यासाठी मानधन योजना, पारितोषिकप्राप्त एकांकिका स्पर्धा, राज्य नाटय स्पर्धा अनुदानात वाढ, वृद्ध कलाकरांना देण्यात येणारे मानधन ऑनलाइन करणे, सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रणेते लोकमान्य टिळक यांच्या जयंतीचे औचित्य साधून; लोकमान्य सार्वजनिक गणेशोत्सव अभियान, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आंबेडकरी जलसा, एक भारत श्रेष्ठ भारत अशा विविध योजना आणि उपक्रम राबवण्यात आले. गॅझेटिअरची ई-बुक आवृत्ती विभागाकडून उपलब्ध करण्यात आली. वस्तूसंग्रहालयाचे बळकटीकरण करण्यात येत असून, पुराभिलेख संचालनालयामध्ये जतन करून ठेवण्यात आलेल्या ऐतिहासिक महत्त्वाच्या अभिलेखांचे सूक्ष्मचित्रीकरण करण्यात येत आहे. ऐतिहासिक दुर्मीळ कागदपत्रांचे आणि छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात येत आहे. येत्या काही वर्षांमध्ये प्रत्येक जिल्ह्यात नाट्यगृह बांधण्यात येणार आहे. तसेच जी नाट्यगृहे नगरपालिका व नगरपरिषदेच्या ताब्यात आहेत, त्यांची दुरुस्ती करून, ही नाट्यगृहे सांभाळण्याची जबाबदारी उचलण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे.

नजीकच्या काळात नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाची शाखा महाराष्ट्रामध्ये सुरू करण्यात येईल, तसेच दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा सुरू करण्याचा शासनाचा विचार आहे. संगीत नाटके आणि व्यावसायिक नाटके पुढे यावीत आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीत त्यांची जोपासना व्हावी या दृष्टीने सरकार प्रयत्नशील आहे.

## अल्पसंख्याक शिष्यवृत्तीत वाढ

उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त २५ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. बारावीनंतरच्या सर्व अभ्यासक्रमांसाठी जास्तीत जास्त ५ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा २.५० लाख रुपयांवरून ६ लाख रुपये करण्यात आली आहे. वक्फ मालमत्तांच्या सुरक्षिततेसाठी आणि मालमत्तांवरील अतिक्रमण रोखण्यासाठी वक्फ मालमत्तांचे दुसरे सर्वेक्षण घेण्यात येणार आहे. जमाबंदी आयुक्त यांची सर्वेक्षण आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, पुणे आणि परभणी जिल्ह्यात सर्वेक्षणाचा पथदर्शी प्रकल्प राबवण्यात येत आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **दहावी आणि बारावी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची तत्काळ फेरपरीक्षा.**
- **कलमापन चाचणीमुळे विद्यार्थ्यांना त्यांचा कल कोणत्या शाखेकडे आहे, आपण कोणते करिअर निवडले पाहिजे हे समजण्यास सोपे होणार. आगामी काळात कलमापन चाचणी. अधिक आधुनिक केली जाणार.**
- **शासकीय योजनांचा लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण करण्याकरिता MahaDBTportal सुरू करणार. शालेय शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती आणि उपस्थिती भत्ता याबाबतच्या योजनांचा यामध्ये समावेश.**
- **मराठी चित्रपटाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या हेतूने कान्स आंतरराष्ट्रीय आणि गोवा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात शासनामार्फत मराठी सिनेमांचा समावेश.**
- **केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अखिल भारतीय सेवांमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढावे याकरिता विशेष प्रयत्न. लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची पूर्वतयारी करून घेणाऱ्या, दिल्ली येथील नामांकित खासगी प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी गुणवंत उमेदवारांना शिष्यवृत्ती.**
- **सिंधुदुर्ग किल्ल्याच्या ३५० व्या वर्धापन दिनानिमित्त सिंधुदुर्ग महोत्सवाचे आयोजन.**
- **छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शौर्याचा इतिहास लोकांना कळावा यासाठी रायगड महोत्सव आयोजित**
- **गड संवर्धन समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील १४ किल्ले आदर्श किल्ले (मॉडेल फोर्ट) म्हणून विकसित करणार.**
- **१०० किल्ल्यांवर गेल्या वर्षी गडकिल्ले स्वच्छता अभियान हाती घेण्यात आले.**

**सर्वसामान्य नागरिकांना परवडतील अशी घरे देण्यासाठी राज्य व केंद्र शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. महाराष्ट्रासाठी २०२२ पर्यंत १९.४ लाख घरांचे उद्दिष्ट ठरवण्यात आले असून, यासाठी १४२ शहरांची निवड करण्यात आली आहे. या योजनेद्वारे सर्वांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यात येतील.**



**प्रकाश महेता**

मंत्री, गृहनिर्माण

# परवडणारी घरे मिळतील सर्वांना...

सर्वांसाठी घरे या अभियानाखाली केंद्र शासनाच्या १ लाख रुपये अनुदानाव्यतिरीक्त, राज्य शासनाकडून १.५ लाख रुपये इतके साहाय्य करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पांसाठी म्हाडाला शासकीय जमीन १ रुपये प्रति चौ.मी. या दराने उपलब्ध करून दिली आहे. आतापर्यंत ११४.४६ हेक्टर जमीन उपलब्ध झाली आहे. या योजनेकरिता केवळ १००० रुपये एवढे मुद्रांक शुल्क आकारण्यात येत असून विकास शुल्क व मोजणी शुल्कामध्ये सवलती देण्यात येत आहेत.



प्रधानमंत्री आवास योजना

प्रधानमंत्र्यांनी या योजनेंतर्गत राज्यातील १९ मान्यताप्राप्त प्रकल्पातील एकूण ४१३७९ सदनिकांच्या कामाचे भूमिपूजन केले आहे. सद्य:स्थितीत या योजनेंतर्गत म्हाळुंगे-पुणे, श्रीरामपूर-नगर, सांगली व वंजाळा-नागपूर येथे एकूण १७७७ घरकुलांचे बांधकाम प्रगतिपथावर आहे.

## केंद्राकडून निधी प्राप्त

राज्यातील १४२ शहराव्यतिरीक्त नागरीकरणाची मोठी टक्केवारी लक्षात घेऊन इतर शहरांचादेखील यामध्ये समावेश व्हावा यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्या शहरांमध्येदेखील पंतप्रधान आवास योजनेंतर्गत परवडणारी घरे योजना राबवण्यात येईल. या योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या हिश्श्याचा पहिला हप्ता म्हणून ३७१.५१ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत.

## झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून आतापर्यंत २३१७ झोपडपट्टी क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. ८१६५ एकर झोपडपट्टी क्षेत्राचे सीमांकन करण्यात आले. द्वार ते द्वार बायोमेट्रिक सर्वेक्षणाद्वारे १००३९१ झोपड्यांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. झोपडीधारकांची पात्रता निश्चित करण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांची व त्यांच्या आदेशाविरुद्ध अपील करण्यासाठी अपिलिय प्राधिकाऱ्यांच्या नियुक्तीची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भातील विविध तक्रारी व पात्रतेच्या अनुषंगाने तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

१ जानेवारी १९९५ च्या मतदार यादीत नावे असलेल्या नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील पात्र झोपडपट्टीवासीयांना त्यांच्या भोगवट्याखालील जमीन भाडेपट्ट्यावर देऊन किंवा त्यांना पर्यायी भूखंड देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. झोपडपट्टीवासीयांची पात्रता निश्चित करण्याकरिता पुराव्यांची संख्या दोन करून स्वयंघोषणा पत्र देण्यास मान्यता देण्यात आली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची मर्यादा ठाणे शहरापर्यंत वाढवण्यात आली असून त्याकरिता स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात आली आहे.

## बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास

मुंबईतील वरळी, नायगाव, एन.एम.जोशी मार्ग व शिवडी येथील बी.डी.डी. चाळींचा म्हाडामार्फत पुनर्विकास करण्यात येणार आहे. मूळ रहिवाशांना ५०० चौरसफूट चटईक्षेत्राची घरे मालकी तत्त्वावर देण्यात येतील. या दोन्ही ठिकाणच्या एकूण ६०० कुटुंबांचे पुनर्वसन नवीन वास्तूत होईल. वरळी बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी ४ एप्रिल २०१७ रोजी जागतिक निविदा काढण्यात आल्या. या ठिकाणच्या १०,१०५ रहिवाशांना पुनर्रचित इमारतीमध्ये मालकी तत्त्वावर घरे उपलब्ध होतील. शिवडी येथील जमीन केंद्र शासनाच्या मालकीची असल्यामुळे सद्य:स्थितीत म्हाडामार्फत पुनर्विकासाची निविदा काढता

आलेली नाही. याबाबत केंद्र शासनाशी बोलणी चालू असून, लवकरच ही जमीन राज्य शासनाकडे हस्तांतरित होईल. त्यानंतर तेथील १०६५ सदनिकाधारकांना पुनर्विकासाचा लाभ देण्यात येईल. गिरणी कामगारांसाठी गृहनिर्माण योजना टप्पा क्रमांक २ अंतर्गत ९ मे २०१६ रोजी सेंच्युरी मिल, भारत मिल येथील जागेवर ९.५ लाख रुपये प्रतिसदनिका याप्रमाणे एकूण २६३४ सदनिकांची सोडत काढण्यात आली.


### म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास

मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतीतील १०६ अभिन्यासातील इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न दीर्घ काळापासून विविध कारणांमुळे प्रलंबित आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी पुनर्विकासात अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक देण्याचे धोरण शासनाने जाहीर केले आहे. त्यानुसार ४००० चौ.मी. पर्यंतच्या भूखंडावरील इमारतींच्या पुनर्विकासाकरिता अधिमूल्यावर आधारित ३.० चटईक्षेत्र निर्देशांकाचे वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

### खार जमिनीचा पुनर्विकास

बृहनमुंबई महानगरपालिका क्षेत्रात कांजूर, भांडूप, मुलूंड व वडाळा या भागात अंदाजित २५६ हेक्टर खार जमीन उपलब्ध आहे. या जमिनी केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहेत. या जमिनीवर मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्या आहेत. त्यांच्या पुनर्विकासासह परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्यासाठी या जमिनीचा उपयोग व्हावा यासाठी, या जमिनी राज्य शासनाकडे वर्ग करण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. मुंबईमध्ये उपकरप्राप्त भाडेकरू इमारतींच्या पुनर्विकासाकरिता ज्याप्रमाणे प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र निर्देशांक देण्यात येतो, त्याच सूत्रानुसार उपनगरातील भाडेकरूव्याप्त इमारतींचा पुनर्विकास व्हावा यासाठी नव्याने नियम तयार करण्यात येत आहेत. त्यानुसार उपनगरातील अशा हजारो इमारतींचा पुनर्विकास शक्य होईल.

### महारेरा कायदा



शासनाने ८ मार्च २०१७ रोजी महाराष्ट्र गृहनिर्माण नियमन आयोगाची स्थापना केली. महारेराचे अध्यक्ष व दोन सदस्य नियुक्त करण्यात आले असून पूर्णत: ऑनलाइन पद्धतीने कामकाज करण्यात येत आहे. यासाठी maharera.mahaonline.gov.in हे संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. गृहनिर्माण अपिलीय न्यायाधिकरण स्थापन करण्यात येत आहे. महारेरा स्थापनेनंतर राज्यातील घरखरेदीदारांच्या तक्रारींचे त्वरित निर्मूलन केले जाईल.

### संरक्षक भिंती

डोंगरउतार व धोकादायक दरडीखाली राहणाऱ्या झोपडपट्टीवासीयांच्या संरक्षणासाठी बांधावयाच्या संरक्षक भिंतीकरिता प्रथमच शासनाने मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्याप्रमाणे म्हाडामध्ये लोकसेवा मित्र प्रणालीद्वारे ऑनलाइन सुविधा सुरू करण्यात आली आहे. धारावी पुनर्विकासाकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या धर्तीवर छोट्या समूहाचा विकास करण्याची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे योजना तयार करण्यात येत आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सदस्यांची मुंबईतील उपकरप्राप्त (सेस), उपकर लागू नसलेल्या (नॉन सेस), बॉम्बे इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट (बी.आय.टी.), प्राइम मिनिस्टर ग्रांन्ट प्रोजेक्ट (पी.एम.जी.पी.) इमारती व दुरुस्ती मंडळ तसेच विकास नियंत्रण नियमावली इ. विषयांचा अभ्यास करून पुनर्विकासासंदर्भात नवीन उपाययोजना सूचवाव्यात यासाठी समिती गठित करण्यात आली आहे.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट**, विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **सर्वांसाठी घरे या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून राज्याचे ४६ प्रस्ताव मान्य. एकूण १,४६,५०५ घरकुलांना मान्यता प्रदान.**
- **केंद्रीय लिंक सबसिडी योजनेंतर्गत महाराष्ट्रातील २५६ शहरांचा समावेश. ७७३२ लाभार्थ्यांना ९०१.७७ कोटींचे कर्ज वाटप. १५६.०७ कोटींची सबसिडी प्रदान.**
- **महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियमामधील अधिकारांचा वापर करून ज्या महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्राचा या अधिनियमात समावेश नव्हता त्यांचा नव्याने समावेश. तेथे सक्षम प्राधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती.**
- **२०१६ मध्ये मुंबईसह राज्यातील इतर भागात म्हाडामार्फत बांधण्यात आलेल्या एकूण ७८१७ इतक्या सदनिकांचे सोडतीद्वारे वितरण.**
- **झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना गती मिळावी तसेच आर्थिक अडचणींमुळे अशा योजना रखडू नयेत यासाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कंपनी (एस.पी.पी.एल.)मार्फत या योजनांच्या विकासकांना स्टार्टअप कॅपिटल म्हणून ५०० कोटींचा निधीकोष. या निधीमुळे मिळेल रखडलेल्या योजनांना संजीवनी. योजनांच्या विकासाकरिता देण्यात येणारा कर्जरूपी निधी, अधिकतम ८.५ टक्के दराने उपलब्ध व्हावा यासाठी प्रयत्न.**
- **बीएसयूपी व आयएचएसडीपी अंतर्गत २०१५-१६ मध्ये ३५११७ इतक्या सदनिकांची निर्मिती.**
- **मुंबईतील संक्रमण गाळ्यांबाबत नवीन धोरण जाहीर करून त्यानुसार घुसखोरांना नियमित करणे व रहिवाशांना हक्काचे घर देण्याबाबतची कार्यवाही सुरू.**



**ग्रामीण विकास विभागामार्फत घरकुलांची निर्मिती, स्वच्छता अभियान, रस्ते विकास, जलसंधारण, कौशल्यविकास, महिलांचे सक्षमीकरण अशा योजनांना गती देण्यात आली. गावांचा सर्वांगीण विकास करण्याचा निर्धार करण्यात आला. महिला आणि बालविकास विभागामार्फत राज्य कुपोषणमुक्त करण्यासाठी योजना राबवण्यात आल्या. अशा रीतीने विविध योजनांमध्ये उत्कृष्ट काम केल्याने विभागाला राष्ट्रीय पातळीवर गौरवण्यात आले.**

**पंकजा मुंडे**

**मंत्री, ग्रामविकास, महिला व बालविकास**

# ग्रामविकासाला चालना, कुपोषणमुक्तीचे ध्येय

गेल्या तीन वर्षात ग्रामविकाससंदर्भात फार मोठे कार्य राज्यात झाले आहे. राज्यातील न जोडलेल्या वाड्या - वस्त्यांना जोडण्यासाठी व ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दर्जोन्नतीसाठी 'मुख्यमंत्री ग्रामसडक योजने'ची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमध्ये रस्तेबांधणी कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारत सरकारने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन महाराष्ट्राला गौरवले आहे. संशोधन आणि विकास कार्यक्रमांतर्गत डांबरामध्ये प्लास्टिकचा वापर, कोल्ड मिक्स, राखेपासून वीट निर्मिती (फ्लाय अॅश) इ. नवनवीन प्रयोग करण्यात येत आहेत.

## बचतगटांना कर्ज

उमेद अभियान (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) आणि महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत महिला सक्षमीकरणाचे काम सुरू आहे. बचतगटांना विविध उद्योग व्यवसायासाठी बँकेमार्फत पतपुरवठा केला जातो. शासनाने बचत गटांना बिनव्याजी बँक कर्ज उपलब्ध करून देण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे.

## आपले सरकार सेवा केंद्रे

पंचायत राज संस्थांचा सर्व कारभार ई - पंचायत प्रकल्पांतर्गत संगणकीकृत करून त्यामध्ये एकसूत्रता व पारदर्शता आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. नागरिकांना विविध प्रकारचे दाखले, सेवा एकाच केंद्रावर उपलब्ध करून देण्यासाठी २० हजार २९९ आपले सरकार सेवा केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामपंचायत दप्तराचे नमुना १ ते ३३ संगणकीकृत करण्यात आल्याने, नागरिकांना आवश्यक असलेले १९ दाखले, प्रमाणपत्र तत्काळ देण्यात येतात. लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत १३ दाखले, प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याशिवाय रेल्वे, बस आरक्षण, डीटीएच रिचार्ज, बँकिंग सेवा, पॅन कार्ड, आधार नोंदणी, विमा हप्ते भरणे, पारपत्र, वीजबिल भरणे, पोस्ट विभागाच्या सेवा यासारख्या ऑनलाइन सेवा गावातच उपलब्ध करून देण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफीचा अर्ज भरण्याची सुविधा या केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आल्याने, खेड्यापाड्यातील नागरिकांचा वेळ व पैसा वाचला आहे.



## हक्काचे घर

केंद्र शासनाने २०२२ पर्यंत 'सर्वांसाठी घर' हे धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार ग्रामीण गरीब गरजू कुटुंबांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना राबवण्यात येत आहे. तीन वर्षांच्या कालावधीत ६ लाख घरकुले बांधण्यात येतील. शासनाच्या विविध विभागाच्या घरकूल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली आहे. या योजनेंतर्गत थेट लाभार्थ्यांच्या खाती अर्थसाहाय्य जमा करण्यात येत आहे. घर बांधण्यासाठी जागा नसलेल्या ग्रामस्थांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेतून ५०

हजार रुपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य देण्यात येत आहे.

ग्रामीण प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्याला राष्ट्रीय पातळीवर दोन सुवर्ण व दोन कांस्यपदकाने गौरवण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या उत्कृष्ट कामाबद्दल सातारा जिल्ह्याला देशपातळीवर द्वितीय क्रमांकाने गौरवण्यात आले आहे.

### स्मार्ट ग्राम योजना

सर्व गावांचा शाश्वत विकास करण्यासाठी 'स्मार्ट ग्राम' योजना राबवण्यात येत आहे. स्वच्छता, व्यवस्थापन, दायित्व, अपारंपरिक ऊर्जा आणि पर्यावरण व पारदर्शकता, तंत्रज्ञानाचा वापर या पंचसूत्रीचा त्यासाठी आधार घेतला जात आहे.

प्रत्येक तालुक्यामधून एका ग्रामपंचायतीला दरवर्षी १० लाख रुपयांचा तालुका स्मार्ट ग्राम पुरस्कार देऊन गौरवण्यात येत आहे. प्रत्येक जिल्ह्यातून एका ग्रामपंचायतीला ४० लाख रुपयांचा जिल्हा स्मार्ट ग्राम पुरस्कार देऊन गौरवण्यात येत आहे. या योजनेसाठी पाच वर्षात २६९ कोटी रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे.

### विभागाचा गौरव

७३व्या घटना दुरुस्तीनंतर राज्यांनी पंचायतराज संस्थांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्याला २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय पातळीवर प्रधानमंत्र्यांच्या हस्ते द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला. जिल्हा परिषद शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीसाठी एनआयसीकडून विकसित करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीला नवी दिल्ली येथील स्कॉच ग्रुप या संस्थेचा स्कॉच ऑर्डर ऑफ मेरिट पुरस्कार ग्रामविकास विभागास प्राप्त झाला आहे.

### माझी कन्या भाग्यश्री

मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'माझी कन्या भाग्यश्री योजना' सुरू करण्यात आली आहे. वार्षिक उत्पन्न ५ लाख रुपये असणाऱ्या घटकांना याचा लाभ मिळेल. एका मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास या योजनेतून मुलीच्या नावे ५० हजार रुपये फिक्स डिपॉझिटद्वारे बँकेत गुंतवले जातात. मुलीच्या वयाच्या सहाव्या व बाराव्या वर्षी तिचे शिक्षण आणि पोषणासाठी व्याजाची रक्कम काढून घेण्यास व अठराव्या वर्षी मुलीच्या उच्च शिक्षणासाठी व्याजाची रक्कम मूळ गुंतवणूक रकमेसह काढून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. दोन मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास प्रत्येकी २५ हजार रुपये इतकी रक्कम मुलीच्या नावे बँकेत गुंतवली जाते.

### ग्राम बालविकास केंद्र

राज्यात आदिवासी क्षेत्रात अंगणवाड्यांमध्ये अतितीव्र कुपोषित बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्रे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कुपोषणावर मात करण्यासाठी पूरक पोषण आणि आरोग्य सेवा या दोन्ही एकत्रित आणि समन्वयाने पुरवल्या तर हा प्रश्न सोडवता येऊन, अतितीव्र कुपोषित बालकांमधील कुपोषण कमी होण्यास त्यामुळे मदत होणार आहे.

### मनोधैर्य योजना

मनोधैर्य योजनेंतर्गत महिला व बालकांना शारीरिक आणि मानसिक आघातातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले जातात. या योजनेंतर्गत पीडितांना पुनर्वसनासाठी जुन्या निकषानुसार २ ते ३ लाख रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य दिले जात होते. पीडितांचे पुनर्वसन करण्यात येत होते. तथापि, नवीन निकषानुसार गंभीर व तीव्र स्वरूपाच्या प्रकरणामध्ये पीडितास १० लाख रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शब्दांकन : इर्शाद बागवान,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **रस्ते दर्जोन्नतीची १०१४ किमी लांबीची कामे पूर्ण. त्यावर ६६३ कोटी रुपये एवढा खर्च. न जोडलेल्या वाड्या – वस्त्यांची (७३० कि.मी.) जोडणी २०१९ पर्यंत करणार. ३० हजार किमी लांबीच्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास प्राधान्य.**
- **महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत अडीच लाख बचतगट आणि २५ लाख कुटुंबांना लाभ. २०१६-१७ साठी शासनामार्फत व्याज अनुदानासाठी १० कोटी रुपये तरतूद. २०१९ पर्यंत ५ लाख बचतगटांना म्हणजेच साधारण ५० लाख कुटुंबांना या योजनेचा लाभ देण्याचा निर्धार.**
- **'आपले सरकार' सेवा केंद्रांमार्फत २५ हजार ५२५ ग्रामपंचायतींचे २०१६-१७ चे लेखे संगणकीकृत.**
- **या सरकारच्या काळात एकूण ३ लाख १० हजार ५०३ लाभार्थ्यांना हक्काचे घर सुपूर्द. २०१६-१७ या आर्थिक वर्षात २,२९,२०८ घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट निर्धारित. त्यापैकी ८८,०३७ घरकुले बांधून पूर्ण.**
- **'आमचं गाव, आमचा विकास' या योजनेंतर्गत चौदावा वित्त आयोग, ग्रामपंचायतीचे स्वतःचे उत्पन्न व इतर योजना, स्रोतांमधून उपलब्ध होणाऱ्या निधीचे नियोजन. त्यातून प्रत्येक गावाच्या पंचवार्षिक व वार्षिक विकास आराखड्याची निर्मिती. यासाठी सर्व ग्रामपंचायतींमध्ये प्रशिक्षण.**
- **सरपंचाची निवड थेट जनतेतून करण्याचा महत्त्वाचा निर्णय. यामुळे सरपंचाला आता पूर्ण क्षमतेने सलग ५ वर्षे काम करता येणे शक्य.**
- **मनोधैर्य योजनेंतर्गत पीडितांना २०१३-१४ मध्ये ५ कोटी ९ लाख, २०१४-१५ मध्ये ३० कोटी ६३ लाख, २०१५-१६ मध्ये ३६ कोटी ८८ लाख तर २०१६-१७ मध्ये ४३ कोटी २३ लाख रुपये इतके अर्थसाहाय्य.**



**आदिवासी विकासासाठी गेल्या तीन वर्षात विभागाने महत्त्वाचे निर्णय घेतले. आदिवासी विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळेत प्रवेश देण्यात आला. त्यांना सकस व ताजा आहार मिळावा यासाठी अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृह योजना राबवण्यात येत आहे. पेसा ग्रामपंचायतींना पाच टक्के मुक्तनिधी देण्यात येत आहे. कमी वेळेत व अचूक पद्धतीने जात पडताळणी व्हावी यासाठी ऑनलाइन आदि प्रमाण प्रणाली सुरू करण्यात आली आहे.**


**विष्णु सवरा**

**मंत्री, आदिवासी विकास**


# आदिवासी विद्यार्थी हाच केंद्रबिंदू

ऑक्टोबर २०१४ मध्ये महाराष्ट्रात नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर आदिवासी विकास विभागाने आदिवासींच्या सर्वांगीण विकासाकरिता महत्त्वाचे व क्रांतिकारी निर्णय घेतले. कोणत्याही समाजाचे, राष्ट्राचे भवितव्य हे विद्यार्थ्यांच्या कामगिरीवर अवलंबून असते. आदिवासी विकास विभागाचा मंत्री म्हणून काम करताना आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विद्यार्थीच सर्वाधिक योगदान देऊ शकतील, असा मला विश्वास आहे.

## नामांकित शाळेत प्रवेश

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याबाबतची योजना राबवण्यात येत आहे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी मातृभाषेसोबतच इंग्रजी भाषा महत्त्वाची आहे. या योजनेद्वारे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्यात येते. प्रवेशित अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इयत्ता १२वी पर्यंत इंग्रजी माध्यमाच्या खासगी निवासी शाळांमध्ये मोफत शिक्षण देण्यात येते. तसेच त्यांना निवासी व शैक्षणिक सुविधा मोफत पुरवण्यात येतात.



याव्यतिरिक्त, शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळाल्यास गुणवंत विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय 'स्वयम्' योजना राबवण्यात येते. उच्च शिक्षणाकरिता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या आधारसंलग्नित बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरित करण्यात येते. मुंबई व तत्सम मोठ्या शहरात वार्षिक ६० हजार रुपये तर 'क' वर्ग महानगरपालिका क्षेत्रात ही रक्कम ५१ हजार रुपये आणि इतर जिल्ह्याच्या ठिकाणी ही रक्कम ४३ हजार रुपये एवढी आहे.

## अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृह

मुंढेगाव (जि. नाशिक) व कांबळगाव (जि. पालघर) येथे आदिवासी विकास विभाग, टाटा ट्रस्ट व अक्षयपात्र फाऊंडेशन यांच्या सहकार्याने अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृह उभारण्यात आले आहे. याचा मुख्य उद्देश शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पौष्टिक, संतुलित, ताजा व रुचकर आहार वेळेवर उपलब्ध व्हावा हा आहे. आहार आरोग्यदायी बनवण्यासाठी स्वयंपाकगृह, स्वयंपाकाची भांडी व परिसर स्वच्छ ठेवण्यात येते. या स्वयंपाकगृहात स्वयंचलित यंत्रणेद्वारे काम होत असल्याने येथील अन्न आरोग्यदायी आहे.

## अमृत आहार

आदिवासी क्षेत्रातील कुपोषणाचे व रक्तक्षयाचे प्रमाण कमी करण्यासाठी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृतआहार योजना सुरू केली. या योजनेंतर्गत गरोदर स्त्रियांना तीन महिने व स्तनदा मातांना तीन महिने एक वेळचा चौरस आहार दिला जातो. या योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. गर्भधारणेपासून बाळंतपणापर्यंत व स्तनदा मातांना पहिले सहा महिने एक वेळचा चौरस आहार देण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेच्या टप्पा-२ अंतर्गत अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंगणवाड्यांतर्गत ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना प्रतिदिन शाकाहारी मुलांना दोन केळी व मांसाहारी मुलांना उकडलेले एक अंडे आठवड्यातून ४ वेळा म्हणजेच महिन्यातून १६ दिवस, एक वेळेचा अतिरिक्त आहार म्हणून देण्यात येतो. कमी वजनाची बालके, वाढ

खुंटलेली मुले, उंचीच्या प्रमाणात कमी वजन असलेली बालके इत्यादी समस्या सोडवण्यासाठी याचा उपयोग होणार आहे.

### आदि 'प्रमाण' प्रणाली

पूर्वीच्या जात पडताळणी प्रक्रियेला जास्त वेळ लागायचा कारण ती जातपडताळणी मॅन्युअल पद्धतीने व्हायची. मात्र कमी वेळेत व अचूक पद्धतीने जात पडताळणी व्हावी यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. ऑनलाइन आदि प्रमाण प्रणाली असे या प्रणालीचे नामकरण करण्यात आले आहे.

**वैशिष्ट्ये :** ■ ऑनलाइन पद्धतीने भरलेल्या प्रमाणपत्राच्या पडताळणीची कार्यवाहीदेखील ऑनलाइन करण्यात येणार आहे. ■ अर्जदार ज्या कार्यक्षेत्रातील आहे, त्याच कार्यक्षेत्रातील समिती कार्यालयात याच पद्धतीद्वारे पाठवण्याची सुविधा. ■ अर्जदार त्यांच्या अर्जाच्या सद्य:स्थितीची खातरजमा करू शकतील. प्रत्येक टप्प्यावर प्रकरणाची स्थिती ई-मेल व एसएमएसद्वारे समजण्याची व अर्जदारास ऑनलाइन पोहोच मिळण्याची सुविधा. ■ कारणे दाखवा नोटीस अर्जदारास व ज्या कार्यालयाकडून प्रकरण प्राप्त झाले त्यांना कळवण्याची सुविधा. ■ वैधता प्रमाणपत्राच्या ओळखनिश्चितीसाठी छायाचित्र व युनिक बारकोड क्रमांकाची सुविधा. ■ नागरिकांना प्रत्यक्षरीत्या समिती कार्यालयांना भेटी देण्याची आवश्यकता कमी होणार असून त्यांच्या वेळ व पैशाची बचत होईल. ■ अन्य समित्यांकडून करण्यात येत असलेली जात पडताळणीबाबतची कार्यवाही व दिलेला निर्णय, सर्व समित्यांना उपलब्ध असेल.



**अंमलबजावणी :** ■ आदि 'प्रमाण' प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या कार्यालयास तसेच सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांना संगणक, प्रिंटर्स इ. हार्डवेअर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

### पेसा ग्रामपंचायतीला पाच टक्के मुक्त निधी

आदिवासी उपयोजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या एकूण नियतव्ययाच्या ५ टक्के निधी अनुसूचित क्षेत्रांतर्गत १३ जिल्ह्यातील ५९ तालुक्यातील २८८० ग्रामपंचायतींना व त्या अंतर्गत गावे/वाड्या/वस्त्या/पाडे (५९७९ गावे) यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वितरित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार २०१६-२०१७ साठी २१४ कोटी ३० लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**शब्दांकन : शैलजा वाघ-दांदळे**
विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याबाबतच्या योजनेंतर्गत प्रवेशाच्या क्षमतेत २,५०० वरून २५,००० अशी वाढ. २०१७-२०१८ या वर्षात १९२ शाळांमधून सुमारे ५६,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.**
- **अमृतआहार योजनेंतर्गत २०१६-१७ मध्ये रु.१३२.५८ कोटी एवढा खर्च. २०१७-१८ मध्ये या योजनेसाठी रु.१८४ कोटी एवढी तरतूद. यापैकी १७०.८४ कोटी रुपये आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना वितरीत.**
- **बोगस व बनावटी कागदपत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्र मिळण्यास प्रतिबंध करण्यासाठी प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाइन. ही प्रणाली www.etribevalidity.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध.**
- **अमृत आहार योजना १६ आदिवासी जिल्ह्यातील १४,७६९ अंगणवाड्यांमध्ये सुरू. १,२२,१४६ गरोदर स्त्रिया व स्तनदा माता, तसेच ७ महिने ते ६ वर्षापर्यंतच्या ७,००,०८३ बालकांना या योजनेचा लाभ.**
- **अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृहात एका दिवसात ६०,००० विद्यार्थ्यांसाठी जेवण तयार करण्याची क्षमता. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण, अल्पोपहार व संध्याकाळचे ताजे जेवण देण्याची उत्तम सोय.**
- **आश्रम शाळेतील मुलांना ताजा व सकस आहार मिळावा यासाठी मध्यवर्ती स्वयंपाकगृह चालवण्यासाठी अक्षयपात्र फाऊंडेशनचे पुढील ५ पाच वर्षे आदिवासी विकास विभागास तांत्रिक सहकार्य.**



**राज्यातील शिधापत्रिकाधारकांना शिधावस्तूंचे नियमित, विहित वेळेवर पारदर्शी पद्धतीने वितरण करण्यासाठी संबंधित यंत्रणेच्या संगणकीकरणावर अधिकाधिक भर देण्यात येत आहे. लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून धान्य वितरण केले जाते. डिजिटायझेशनमुळे दरमहा ३८ हजार मेट्रिक टन धान्याची बचत झाली. बोगस रेशनकार्ड वापरून काळाबाजार करणाऱ्यास यापुढे वाव राहणार नाही.**

**गिरीश बापट**


**मंत्री, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्ये**

# धान्याची बचत आणि ग्राहकांचा लाभ

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत केलेल्या डिजिटायझेशनमुळे सध्या राज्यात २.५ कोटी शिधापत्रिका डिजिटल झाल्या आहेत. आधार लिंकिंगमुळे सुमारे १० लाख शिधापत्रिका कमी झाल्या आहेत. रास्तभाव धान्य दुकानांमध्ये ई-पॉस (पॉइंट ऑफ सेल) उपकरणे बसवण्यात आली आहेत. लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून धान्य वितरण केले जाते. डिजिटायझेशनमुळे दरमहा ३८ हजार मेट्रिक टन धान्याची बचत झाली आहे.

राज्यातील सुमारे ५१ हजार रास्तभाव धान्य दुकानांमध्ये पॉईंट ऑफ सेल हे उपकरण बसवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या उपकरणाद्वारे बायोमॅट्रिक पद्धतीने ओळख पटवूनच धान्य देण्याची व्यवस्था होणार आहे. यामुळे बोगस रेशनकार्ड वापरून काळाबाजार करणाऱ्यास पूर्ण अटकाव बसणार आहे.

## शिधापत्रिका बायोमॅट्रिक



पात्र शिधापत्रिकाधारकांना शिधावस्तूंचे नियमित, विहित वेळेत पारदर्शी पद्धतीने वितरण करण्यासाठी संबंधित यंत्रणेच्या संगणकीकरणाचा प्रकल्प सुरू करण्यात आला. याअंतर्गत राज्यातील शिधापत्रिकांची माहिती गोळा करून ती संगणकीय यंत्रणेत भरण्यात आली. सर्व जिल्ह्यातील ५४,९३० रास्तभाव दुकाने व ६०,०४९ केरोसीन परवाने, ४८८ गोडाऊन, गॅस एजन्सीजची माहितीही संगणकीकृत करण्यात आली आहे.

## लाभार्थ्यांचे आधार सिडिंग

लाभार्थ्यांचे आधार क्रमांक शिधापत्रिकांबरोबर सिडिंग (जोडण्याचे) करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत ७ कोटी लाभार्थ्यांपैकी ६.२५ कोटी लाभार्थ्यांच्या आधार क्रमांकाचे सिडिंग पूर्ण करण्यात आले आहे. धान्य व केरोसिनची माहिती थेट ग्राहकांना देता यावी यासाठी त्यांच्या मोबाइलवर एस.एम.एस. देण्याची सुविधा सुरू झाली आहे.

शिधावाटप दुकानातून बँकांचे व्यवहार करता यावेत यासाठी या दुकानांना तसेच किरकोळ केरोसिन दुकानदारांना व्यावसायिक प्रतिनिधी (बिझिनेस करसपॉंडन्ट्स) म्हणून नेमण्यात येणार आहे.

रास्त भाव दुकानदरांना पूर्वी अन्न महामंडळ अथवा राज्य शासनाच्या गोदामातून धान्याची उचल करावी लागत होती. आता या दुकानदारांना थेट द्वारपोच योजनेद्वारे धान्य पुरवण्यात येणार आहे.

## शेतकऱ्यांना स्वस्त दरात अन्नधान्याचा पुरवठा

मराठवाडा व विदर्भातील १४ जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीत मदत व्हावी यासाठी शासनाने संबंधित जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर अन्नधान्याचा लाभ देण्याचा निर्णय घेतला.

## गोदामांच्या बांधकामांना वेग

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे अन्नधान्य ठेवण्यासाठी नवीन गोदामे बांधण्यात येत आहे. त्यासाठी नाबार्डकडून ४८४.१३ कोटी रुपयांच्या आराखड्यास मंजुरी मिळाली आहे. ५.९५ मेट्रिक टन क्षमतेची २३३ गोदामे यामध्ये बांधण्यात येणार आहेत. त्यातील २०० गोदामांची बांधकामे सुरू असून १२५ गोदामे बांधून पूर्ण झाली आहेत.

## वारसाच्या नावे केरोसिन विक्री परवाना

किरकोळ, हॉकर्स, अर्ध घाऊक केरोसिन विक्री परवानाधारकांच्या व रास्तधान्य दुकानदारांच्या मृत्यूनंतर त्यांचा परवाना वारसाच्या नावे करण्यासाठी विशेष निर्णय घेतला आहे. यामुळे राज्यातील अनेक

परवानाधारकांच्या वारसांची प्रकरणे निकाली निघाली आहेत.

### साखर खरेदीचा 'महाराष्ट्र पॅटर्न'

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत दारिद्र्यरेषेखालील व अंत्योदयमधील लाभार्थ्यांना मिळणारी साखर ई-लिलावाद्वारे खुल्या बाजारातून खरेदी करण्याचा निर्णय शासनाने घेतला. या निर्णयामुळे खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, स्पर्धा वाढल्यामुळे बाजारभावाच्या तुलनेत कमी दरात साखर उपलब्ध झाली. यामुळे वार्षिक २५ कोटी इतकी बचत झाली. राज्य शासनाच्या या प्रक्रियेची माहिती इतर राज्यांनी घेऊन त्या ठिकाणीही त्यांनी लिलावाद्वारेच साखर खरेदी सुरू केली आहे.

### शिधावाटप / रास्तभाव दुकानदारांच्या नफ्याच्या प्रमाणात (मार्जिन) भरघोस वाढ

१० ऑगस्ट २०१७ रोजी मंत्रिमंडळाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्नधान्य वितरणासाठी शिधावाटप / रास्तभाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये भरघोस वाढ करण्याचा निर्णय घेतला. रास्तभाव दुकानदारांना दारिद्र्य रेषेवरील कुटुंब (ए.पी.एल.), राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील प्राधान्य गट व अंत्योदय अन्न योजनेंतर्गत गहू, तांदूळ, साखर व भरड धान्याच्या वितरणासाठी सध्या मिळत असलेल्या रु. ७०/- प्रति क्विंटल या मार्जिनमध्ये रु. ८०/- इतकी वाढ केली. या दुकानदारांना आता रु. १५०/- प्रति क्विंटल याप्रमाणे मार्जिनमध्ये वाढ मिळेल.

### दक्षता समित्या

ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी वैधमापनशास्त्र यंत्रणेने पावले उचलली आहेत. यात ग्राहकांचा सहभाग घेण्यात येत आहे. त्यासाठी दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. मुख्यालयात आणि प्रादेशिक विभागात ग्राहक तक्रार निवारण कक्ष निर्माण केले आहेत. समाज माध्यमांचा ग्राहक जागृतीसाठी उपयोग करण्यात येत आहे. ग्राहकांच्या तक्रार निवारण्यासाठी ई-मेल, फेसबुक तसेच व्हॉट्सॲपचा वापर करण्यात येत आहे.

### औषध प्रशासनामध्ये 'ई गव्हर्नन्स'

अन्न व औषध प्रशासन विभागाने गेल्या दोन वर्षात पारदर्शक कारभारासाठी डिजिटल इंडियांतर्गत आपल्या सेवा ऑनलाइन केल्या आहेत. या विभागाचे विविध परवाने, प्रमाणपत्रे व दाखले आता ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे मिळत आहेत. औषध विक्री दुकानांच्या तपासणीमध्ये पारदर्शकता यावी, यासाठी विभागाने यादृच्छिक (रॅन्डमाईज) पद्धत वापरण्यास सुरुवात केली आहे. यामुळे दुकानदारांचा त्रास वाचण्यास मदत झाली आहे. या विभागाच्या चार सेवांचा समावेश, सेवा हमी कायद्याद्वारे ऑनलाइन करण्यात आली आहे. यामध्ये अन्न व्यावसायिकांची नोंदणी, त्यांची परवानगी, किरकोळ औषध विक्री भंडारास परवाने व घाऊक औषध विक्री केंद्रास परवाने देणे आदींचा समावेश आहे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,** विभागीय संपर्क अधिकारी



## कामगिरी दमदार

- सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत राज्यात २.५ कोटी शिधापत्रिकांचे डिजिटलायझेशन. आधार लिंकिंगमुळे सुमारे १० लाख शिधापत्रिका कमी. डिजिटायझेशनमुळे दरमहा ३८ हजार मेट्रिक टन धान्याची बचत.
- शिधापत्रिका आधार क्रमांकाला जोडल्यामुळे दुहेरी नावे कमी. त्यामुळे राष्ट्रीय अन्न सुरक्षेपासून वंचित ९२ लाख केशरी शिधापत्रिका लाभार्थ्यांचा नव्याने या योजनेत समावेश. यामध्ये ग्रामीण भागातील ४८ लाख व शहरी भागातील ४४ लाख लाभार्थ्यांचा समावेश.
- ग्राहक चळवळ बळकट करण्यासाठी राज्य ग्राहक कल्याण सल्लागार समिती पुनरुज्जीवित. राज्याचे ग्राहक धोरण ठरवण्यासाठी मसुदा समिती गठित.
- राज्यातील पात्र शिधापत्रिकांची माहिती संगणकीय यंत्रणेत समाविष्ट. सर्व जिल्ह्यातील ५४,९३० रास्तभाव दुकाने व ६०,०४९ केरोसीन परवाने, ४८८ गोडाऊन, गॅस एजन्सीजची माहिती संगणकीकृत.
- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत ७ कोटी लाभार्थ्यांपैकी ६.२५ कोटी लाभार्थ्यांच्या आधार क्रमांकाची जोडणी पूर्ण.
- धान्य व केरोसिनची माहिती थेट ग्राहकांना देता यावी यासाठी त्यांच्या मोबाइलवर एस.एम.एस. सुविधा सुरू.
- मराठवाडा व विदर्भातील दुष्काळग्रस्त १४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत व्हावी यासाठी संबंधित जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर अन्नधान्याचा लाभ देण्याचा निर्णय.
- अन्न व औषध प्रशासन विभागाने पारदर्शक कारभारासाठी आपल्या सेवा केल्या ऑनलाइन. परवाने, प्रमाणपत्रे व दाखले ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे उपलब्ध.



**वैद्यकीय शिक्षण गुणवत्तापूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले गेले. आरोग्य विद्यापीठांतर्गत येणाऱ्या रुग्णालयांमार्फत महाआरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली. या वर्षात १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एम.बी.बी.एस.च्या ५०० जागा वाढवण्यात यश मिळाले. शासकीय वैद्यकीय / आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये केंद्रीय परिषदांकडून दाखवल्या जाणाऱ्या त्रुटींची पूर्तता करता येणे शक्य व्हावे म्हणून विभागाची अर्थसंकल्पीय तरतूद दुप्पट करण्यात यश मिळाले.**

गिरीष महाजन
मंत्री, वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास

# गुणवत्तापूर्ण आरोग्य शिक्षण

वैद्यकीय शिक्षण मंत्रालयाचा कार्यभार सांभाळून एक वर्ष झाले. हा विभाग महत्त्वाचा आणि संवेदनशील आहे. राज्य घटनेनुसार आरोग्य सेवा जनतेला पुरवणे हे शासनाला बंधनकारक आहे. आरोग्यसेवा पुरवण्याचा मूलभूत आधार आरोग्य शिक्षण आहे. आरोग्य शिक्षण आवश्यकतेनुसार दिले गेले नाही तर आरोग्य सेवा प्रभावीपणे देता येणार नाही.



गेल्या एक वर्षाच्या कालावधीचे मूल्यांकन करावयाचे असल्यास तीन स्तरावर करता येईल. एक म्हणजे यासाठी अस्तित्वात असलेली यंत्रणा सक्षम करणे दुसरी म्हणजे अस्तित्वात नसलेली योजना प्रस्थापित करून कार्यवाही करणे. तिसरी बाब म्हणजे भविष्यातील योजनांची मुहूर्तमेढ करणे. या निकषावर आरोग्य विज्ञानाचा एक वर्षाचा आढावा घेणे योग्य ठरेल.

सध्या सर्व जिल्ह्यात आरोग्य शिबिरे सुरू करण्यात आली असून प्रत्येक जिल्ह्यातील घराघरांत जाऊन रुग्णांची माहिती एकत्रित करून त्यांना प्राथमिक केंद्रावर शिबिरांसाठी बोलवण्यात येते. येथे त्यांचे निदान करून त्याची संगणकीकृत माहिती तयार होते. त्यानंतर त्याचा पाठपुरावा करून त्या त्या पातळीवर तज्ज्ञांकडून त्यांची चिकित्सा, शस्त्रक्रिया करण्याची प्रक्रिया सुरू होते. हे अभियान सर्व महाराष्ट्रात आयोजित केले जात आहे. या माहितीचा उपयोग संशोधन व भविष्यातील उपाय योजनांसाठी होणार आहे. वैद्यकीय महाविद्यालयांच्या माध्यमातून महाअवयवदान अभियान, मुखस्वच्छता अभियान, महिलांसाठी स्तन कर्करोग अभियान, लठ्ठपणा संचेतना अभियान, पंडित दीनदयाळ स्वस्थ महाराष्ट्र अभियान राबवण्यास सुरुवात केली आहे. मोठ्या प्रमाणात नेत्र शिबिरांचे आयोजन करून, त्या माध्यमातून चिकित्सा आणि शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. भारत सरकारच्या सहकार्यातून नागपूर येथे एम्स रुग्णालय सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

राज्यात ऑक्युपेशनल थेरपी / फिजिओ थेरपी महाविद्यालये सुरू करण्याचे ठरले आहे. महाविद्यालयात शिक्षकांच्या जागा भरण्याची प्रक्रिया उशिराने होत असल्याने निवड मंडळामार्फत प्राध्यापक भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान टळले आहे. ॲक्युपंक्चर, योग, निसर्गोपचार यांच्या कौन्सिलची स्थापना करण्यात येणार आहे. चंद्रपूर व गोंदिया येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरू झाली आहेत. रुग्णालयीन यंत्रसामग्री व उपकरणे खरेदीसाठी महामंडळाची स्थापना करण्यात येत आहे.

शासकीय वैद्यकीय / आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये केंद्रीय परिषदांकडून दाखवल्या जाणाऱ्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी, लागणाऱ्या निधीसाठी विभागाची अर्थसंकल्पीय तरतूद दुप्पट करण्यात यश मिळाले आहे. पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ करण्यात आली आहे. फेलोशीप कोर्सेस सुरू केले जात असून आंतरराष्ट्रीय स्तरावरील इतर विद्यापीठांबरोबर सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### सिंचन व्यवस्थापनावर अधिक भर

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सिंचनाखालील क्षेत्रात वाढ करण्यावर भर देण्यात येत आहे. जलवापर कार्यक्षमतेत वाढ करून, कृषी

उत्पादन आणि शेतकऱ्यांच्या एकूण उत्पन्नात वृद्धी व्हावी यासाठी विविध योजनांची एकत्रित अंमलबजावणी करण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कृषी व फलोद्यानाचा विकास करण्यासाठी सिंचन उपलब्ध झाल्यास, राज्य सुजलाम सुफलाम होण्यास वेळ लागणार नाही. त्याबरोबरच कृषी क्षेत्रात व त्याच्याशी निगडित इतर व्यवसायात कुशल व अर्धकुशल बेरोजगारांसाठी रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील.

जलसंपदा मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारतेवेळी राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती होती. राज्यात पडणाऱ्या पावसाची साठवणूक करण्याबरोबरच उपलब्ध पाण्याचे नियोजन करून, जलसिंचन व्यवस्थापनावर अधिक भर देऊन, अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या कारणांनी रखडलेल्या सिंचन प्रकल्पांमधील अडचणी दूर करण्याला प्राधान्य दिले. शाश्वत शेतीसाठी आवश्यक असणारे शाश्वत सिंचन उपलब्ध करून देण्यासाठी आराखडा तयार करून, शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी त्यांच्या शेतीपर्यंत पोहोचवण्यासाठी तसेच प्रधानमंत्र्यांचे 'हर खेतको पानी', 'मोअर क्रॉप पर ड्रॉप' हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले गेले आहेत.

## वर्षभरात राज्यात विक्रमी सिंचन

राज्यात आजपर्यंत जास्तीत जास्त सिंचन ३२ लाख हेक्टर २०१३-१४ मध्ये झाले. २०१६ मध्ये झालेल्या चांगल्या पर्जन्यमानामुळे पाटबंधारे प्रकल्पात विक्रमी पाणीसाठा झाला. २०१६-१७ मध्ये ४० लाख हेक्टरपेक्षा जास्त प्रत्यक्ष सिंचन झाले आहे. हे आतापर्यंतचे विक्रमी सिंचन म्हणावे लागेल. सिंचनाखालील क्षेत्रात वाढ व्हावी व उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करून वहनतूट व अन्य तुटीचे प्रमाण कमी करण्यात येत आहे.

## प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती

महामंडळाकडे जमा होणाऱ्या पाणीपट्टी वसुलीच्या रकमेतून प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती करण्याचे धोरण २९ नोव्हेंबर, २०१६ पासून शासनाने स्वीकारले आहे. राज्यात ३३८० प्रकल्प पूर्ण झाले आहेत. पूर्ण झालेल्या व बांधकामाधीन प्रकल्पांच्या माध्यमातून ४९.५७ लक्ष हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. पूर्ण झालेल्या प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीसाठी भांडवली गुंतवणुकीच्या तुलनेत अत्यल्प निधी उपलब्ध होत होता. या निधीमध्ये देखभाल दुरुस्ती करणे अशक्य होते. त्यामुळे सिंचन व्यवस्थापनामध्ये निर्मित सिंचनक्षमता व प्रत्यक्ष सिंचन यामध्ये फार मोठी तफावत होती. अपुऱ्या व्यवस्थापनेमुळे शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी शेतीपर्यंत उपलब्ध होण्याचे प्रमाण अत्यल्प होते. त्यामुळे शासनाने पाणीपट्टीतून देखभाल दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला. सिंचन व्यवस्थेमध्ये आकस्मिक स्वरूपाच्या दुरुस्तींसाठी क्षेत्रीय स्तरावरच निधी उपलब्ध होऊन वहनतुटीमुळे होणाऱ्या पाण्याचा अपव्यय टाळणे शक्य होणार आहे. सध्या सिंचन व्यवस्थापनासाठी कार्यरत ८३ कार्यालये संबंधित सिंचन महामंडळांना जोडण्यात आली आहेत.

## सूक्ष्म सिंचनावर भर

सूक्ष्म सिंचन धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सिंचन प्रकल्पाच्या वितरण पद्धतीत सुधारणा करण्याच्या धोरणानुसार पाटबंधारे प्रकल्पातून पाझर तलाव, गाव तलाव, छोटे बंधारे इत्यादी विकेंद्रित साठे भरून दिले जातील. ज्या ठिकाणी असे साठे नाहीत तेथे नव्याने साठे तयार केले जातील. या विकेंद्रित साठ्यांवर पाणी वापर संस्थेने पाणी घेऊन, ठिबक सिंचन राबवण्यासाठी; शेतकरी, साखर कारखाना, वित्तीय संस्था असा त्रिसदस्यीय करार करून भांडवल उभारण्याचा विचार करण्यात येत आहे. यासाठीच्या कर्जावरील व्याजात काही प्रमाणात अर्थसाहाय्य देण्याचेही विचाराधीन आहे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **आरोग्य विद्यापीठाशी संलग्न रुग्णालयांमार्फत प्रथमच नाशिक आणि नंदूरबार येथे जागतिक रेकॉर्ड नोंदवणाऱ्या महाआरोग्य शिबिरांचे आयोजन.**
- **नंदूरबार व जळगाव येथे नवीन शासकीय महाविद्यालयांना मान्यता. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शासकीय दंत महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय.**
- **या वर्षात १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एम.बी.बी.एस.च्या ५०० जागा वाढवण्यात यश.**
- **दरवर्षी पाणीपट्टीच्या माध्यमातून जमा होणारे अंदाजे ८०० कोटी रुपये देखभाल दुरुस्तीसाठी उपलब्ध होऊन, सिंचनाखालील क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ होण्यास साहाय्य.**
- **१७ नोव्हेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये पाटबंधारे प्रकल्पातून पिण्यासाठी १५ टक्के, औद्योगिक वापरासाठी १० टक्के व सिंचनासाठी ७५ टक्के असे क्षेत्रीय वाटप निश्चित. यामुळे सिंचनासाठी शाश्वत पाणीसाठा आरक्षित.**
- **टेंभू, उजनी, मुळा, निम्न मनार, हतनूर, उर्ध्व पूस, कान्होळी नाला व आंबोली या ८ पाटबंधारे प्रकल्पांवर जून २०१८ पर्यंत बारमाही पिकांना सूक्ष्म सिंचनाद्वारे पाणी देणे अनिवार्य. या प्रकल्पाचा अनुभव विचारात घेऊन राज्यातील सर्व प्रकल्पांवर टप्प्याटप्प्याने हे धोरण राबवणार.**
- **बंद पाइपलाइनमधून पाणी पुरवठा. यामुळे कालवा व वितरण प्रणालीसाठी लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन व त्यासाठी लागणारा खर्च करण्याची आवश्यकता नाही. पाण्याची बचत घनमापन पद्धतीने पाणी वाटप. सिंचनाखालील क्षेत्राची अचूक मोजणी.**



**प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत दळणवळणाची साधने अधिक दर्जेदार व्हावी यासाठी परिवहन विभागाने गेल्या तीन वर्षात अनेक योजना व उपक्रम राबवले. ऑटोरिक्षा, टॅक्सीच्या माध्यमातून महिलांना रोजगार मिळावा यासाठी परवान्यांवरील निर्बंध उठवले. प्रवास अधिक सुखकर व्हावा म्हणून शिवशाही बसेस सुरू केल्या. यामुळे महाराष्ट्रातील परिवहन सेवा ही देशातील सर्वात चांगली परिवहन सेवा म्हणून नावलौकिक मिळवत आहे.**

दिवाकर रावते

मंत्री, परिवहन, खारभूमी विकास

# प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य

गेल्या तीन वर्षांपासून प्रवासी हीत जोपासत विविध उपक्रम, योजनांच्या माध्यमातून दळणवळणाची साधने अधिक सक्षम करण्याचा परिवहन विभागाचा यशस्वी प्रवास सुरू आहे. तंत्रज्ञानाबरोबर वाटचाल करीत विभागाने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी व सुविधेसाठी नुकतेच मोबाइल ॲप उपलब्ध करून दिले आहे. लवकरच जीपीएस प्रणालीच्या माध्यमातून एखादी एसटी बस नेमकी कुठपर्यंत आली याची एका क्लिकवर माहिती मिळणार आहे.

## महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम

एसटी महामंडळाच्या बसेस किंवा खासगी ऑटोरिक्षा व टॅक्सी यात प्रवाशांच्या सुरक्षेला नेहमी प्राधान्य देण्यात आले आहे. टॅक्सीद्वारे प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. राज्यात अंदाजे ७० हजार संकेतस्थळचलित टॅक्सी कार्यरत असून त्यामधून सर्वसाधारणपणे ७ लक्ष प्रवासी दररोज प्रवास करतात. त्यांची पिळवणूक होऊ नये तसेच प्रवाशांची सुरक्षितता यासाठी नियम करणे आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम २०१७ लागू केले आहेत. याअंतर्गत शहरातील सर्व संकेतस्थळचलित टॅक्सीला नोंदणी आवश्यक असेल. ॲपवर आधारित परवाना दिला जाईल. टॅक्सी स्वच्छ इंधनावर चालणारी आणि टॅक्सीत किंवा टॅक्सी चालकाकडे जीपीआरएस यंत्रणा असणे गरजेचे आहे.

## ऑटोरिक्षा, टॅक्सी परवान्यांवरील निर्बंध उठवले

ऑटोरिक्षा व टॅक्सी हे रोजगाराचे साधन म्हणून झपाट्याने पुढे आले व आज असंख्य लोकांचे ते उदरनिर्वाहाचे साधन ठरले आहे. मात्र, १९९७ पासून ऑटोरिक्षा, टॅक्सीचे नवीन परवाने देण्यावर निर्बंध घालण्यात आले होते. शासन अधिसूचना १७ जून, २०१७ अन्वये हे निर्बंध उठवण्यात आले आहेत. त्यामुळे आता कोणत्याही व्यक्तीला नवीन परवाना घेणे शक्य होणार आहे.

पुरुषांबरोबरच महिलांनाही या क्षेत्रात संधी मिळावी, त्यांनाही



रोजगार मिळावा यासाठी परिवहन विभागाने अनेक उपक्रम व योजना राबवल्या आहेत. त्यातील एक म्हणजे महिलांमार्फत चालवण्यात येणाऱ्या टॅक्सी, रिक्षांना अबोली रंग देण्याचा निर्णय होय. सध्या राज्यात अशा प्रकाराच्या सुमारे १९३ रिक्षा कार्यरत आहेत.

मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी टर्मिनस स्थानकाचा नामविस्तार करून त्याचे नाव छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तसेच पश्चिम रेल्वेच्या एल्फिन्स्टन रोड स्थानकाचे नामांतर करून, त्याचे नाव प्रभादेवी करण्याच्या परिवहन विभागाच्या प्रस्तावास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिल्याने हे नामबदल करण्यात आले आहेत.

कोकण रेल्वे महामंडळात ७०२.५५ कोटी रुपयांचे अतिरिक्त समभाग खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे कोकण रेल्वेवरील पायाभूत संरचनेचे ४ महत्त्वाचे प्रकल्प कार्यान्वित करण्यास मदत होईल. कराड–चिपळूण, बीड–परळी–अहमदनगर या रेल्वे मार्गासाठी शासनाने भरीव तरतूद केली आहे.

नागपूर – नागभीड गेज परिवर्तन प्रकल्पाच्या सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे ५० टक्के आर्थिक सहभागाचा निर्णय घेण्यात आला आहे. विदर्भातील नक्षलग्रस्त भागातील रेल्वे सुविधांचा

विकास होणार आहे.

### सुसज्ज शिवशाही बस

प्रवाशांना माफक दरात अधिक सुखकर प्रवास करता यावा यासाठी सेवासुविधांनी सुसज्ज अशा शिवशाही गाड्या मुंबई – रत्नागिरी, पुणे – लातूर मार्गावर सुरू करण्यात आल्या आहेत. लवकरच महामंडळाच्या ताफ्यात २ हजार गाड्या येणार आहेत.

### स्वच्छ बसस्थानके

एसटीची संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ६०९ बसस्थानके आहेत. त्याचबरोबर २५० आगार आहेत. दररोज सुमारे १८ हजार ५०० बसेसच्या माध्यमातून ६७ लाख प्रवासी प्रवास करत असतात. यांच्या स्वच्छतेसाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. लवकरच भविष्यात सर्व बसेस, बसस्थानके आपणास चकाचक दिसणार आहेत.

### अपघात साहाय्यता निधी

एसटीच्या प्रवासादरम्यान अपघातासारखे संकट उद्भवू नये म्हणून महामंडळामार्फत अधिकाधिक काळजी घेतली जाते. मात्र, अपघात झाल्यास जखमी प्रवाशांना तत्काळ मदत देण्याबरोबरच त्यांच्यावर तत्काळ उपचार करण्यासाठी एसटी महामंडळ नेहमी तत्पर असते. त्या पार्श्वभूमीवर हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अपघात साहाय्यता निधी योजना सुरू करण्यात आली आहे. मृत प्रवाशांच्या वारसांना देण्यात येणाऱ्या मदतीच्या रकमेत वाढ करून आता १० लाख रुपये करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत जुलै २०१७ अखेर अपघातग्रस्तांना ९८.४० कोटी रुपये मदत देण्यात आली आहे.

### एसटी कर्मचाऱ्यांचे हित

एसटी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी अनेक योजना राबवण्यात येत आहेत. एसटी कर्मचाऱ्यांच्या घरी जन्मास येणाऱ्या कन्यांच्या नावे एसटी महामंडळामार्फत तत्काळ विशिष्ट रक्कम मुदत/दाम दुप्पट योजनेत एसटी बँकेत ठेवण्यात येते. संबंधित कन्येच्या वयाच्या २१ वर्षांनंतर १ लाख रूपये तिच्या विवाहासाठी देण्यात येतात. ४५० कर्मचाऱ्यांच्या कन्यांना या योजनेंतर्गत लाभ देण्यात आला आहे.

कर्मचाऱ्यांच्या कनिष्ठ वेतनश्रेणीचा निर्णय तीन वर्षांवरून एक वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कनिष्ठ वेतनश्रेणी ६ महिने झाल्यानंतर वेतनात ५०० रूपये वाढ करण्यात येईल. एक वर्ष समाधानकारक काम केल्यानंतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्यात येईल असा निर्णय १ एप्रिल २०१७ पासून लागू करण्यात आला आहे.

कर्तव्यावर असताना बस अपघातामध्ये कर्मचाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना १० लाखांचा अपघात साहाय्य निधी अथवा अनुकंपा तत्त्वानुसार महामंडळामध्ये नोकरी देण्याची हमी आहे. केंद्र शासनाची अटल पेंशन योजना १८ ते ४० वयोगटातील कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आली आहे.

शब्दांकन : आनंद सुरवाडे




## कामगिरी दमदार

- विविध कारणांमुळे परवाने रद्द किंवा व्यपगत झालेल्या ऑटोरिक्षा परवान्यांचे नूतनीकरण करण्याचा निर्णय. यामुळे ३७ हजार ऑटोरिक्षा परवानाधारकांना लाभ.
- ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या म्हणून ग्रामीण टॅक्सी संवर्गातील वाहनांसाठी इंजिन क्षमता कमी करून (७०० सीसी वर आणून) शिवग्रामीण टॅक्सी म्हणून चालवण्यास मान्यता.
- विमानतळासारख्या साधनसुविधा असणारे १५ बसपोर्ट पनवेल, बोरिवली नॅन्सी कॉलनी, नाशिक महामार्ग, धुळे, जळगाव, पुणे शिवाजीनगर, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, नांदेड, अकोला, नागपूर, कल्याण, भिवंडी या ठिकाणी उभारण्यात येणार.
- पहिला टप्प्यात अतिसंवेदनशील ५७ बसस्थानकांवर तर दुसऱ्या टप्प्यात येत्या सहा महिन्यात उर्वरित बसस्थानकांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय. यातून बसस्थानकावरील गुन्हेगारीस बसेल आळा. प्रवासी तसेच महामंडळाची मालमत्ता होईल सुरक्षित.
- राज्यातील सर्व बसस्थानकांवर जेनेरिक औषधांची दुकाने सुरू करणार.
- अर्थसंकल्पामध्ये एसटीसाठी भरीव तरतूद. त्यातूनच जुन्या बसस्थानकांचे नूतनीकरण, दर्जावाढ तसेच नवीन बसस्थानक बांधण्याच्या विविध प्रकल्पास मंजुरी. प्रकल्पांमध्ये बांधकाम सुरू. उपलब्ध जागा व शहराच्या गरजा लक्षात घेऊन अत्याधुनिक बसस्थानक बांधण्यात येणार. त्यापैकी काही बसस्थानकांवर फक्त मराठी चित्रपटांसाठी ६० ते १०० आसनक्षमतेचे मिनी – थिएटर उभारणार.




**उद्योगवाढीसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांमध्ये राज्य प्रथम क्रमांकावर आहे. परवानामुक्त धोरणानंतर देशात सगळ्यात जास्त औद्योगिक प्रकल्पांनी राज्यात गुंतवणुकीकरिता आवेदन केले. उद्योगक्षेत्रात अग्रेसर राहावे म्हणून राज्याने इलेक्ट्रॉनिक्स धोरण, किरकोळ व्यापार धोरण, माहिती तंत्रज्ञान धोरण अशा नावीन्यपूर्ण धोरणांनी गुंतवणूकदारांना आकर्षित केले आहे. उद्योजकांच्या सोयीसाठी मैत्रीसारखी एक खिडकी योजना राबवली जाते.**

**सुभाष देसाई**
मंत्री, उद्योग, खनिकर्म

# कायम पहिला क्रमांक

राज्यात गुंतवणुकीसाठी सध्या पोषक वातावरण आहे. उद्योगवाढीसाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधांमध्ये राज्य प्रथम क्रमांकावर आहे. डिसेंबर २०१४ ते ऑगस्ट २०१७ या कालावधीत राज्यामध्ये सर्वात जास्त थेट विदेशी गुंतवणूकीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

राज्यात डिसेंबर, २०१४ नंतर ४९४ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली, याद्वारे ३.७९ लक्ष कोटी रुपये गुंतवणूक व ४.१९ लक्ष रोजगार अपेक्षित आहे. यापैकी १६२ विशाल प्रकल्पांना सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पात्रता प्रमाणपत्रे मंजुर केली आहेत. याद्वारे ६७.६६ कोटी रुपये प्रत्यक्ष गुंतवणूक व ९८,७१४ प्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाली आहे. डिसेंबर, २०१४ ते जुलै, २०१७ अखेरपर्यंत एकूण ३,१२,१०० सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम असून, याद्वारे ६९,५७७ कोटी रुपये गुंतवणूक झाली आहे व २२.५१ लक्ष रोजगार निर्मिती झाली आहे.



## महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण

इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाच्या आयातीचे प्रमाण ६५ टक्क्यांवरून ५० टक्के एवढे कमी करणे व राज्याच्या क्षमतांचा व संसाधनाचा पुरेपूर वापर करणे आणि औद्योगिकदृष्ट्या अविकसित भागात फॅब उद्योग स्थापित करणे, यासाठी महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६ जाहीर केले. या धोरणांतर्गत एकूण ४४ इलेक्ट्रॉनिक प्रकल्पांमध्ये ३०,४०१ कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून त्याद्वारे अंदाजे ९४,८५५ रोजगार निर्मिती होणार आहे.

## उद्योजकांसाठी विशेष प्रोत्साहन योजना

अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील उद्योजकांना स्वयंपूर्ण व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने आणि त्यांना औद्योगिकवाढीच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी २०१६ मध्ये 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्योजक विशेष प्रोत्साहन योजने'चा शुभारंभ करण्यात आला. या धोरणांतर्गत या संवर्गातील उद्योजकांना विशिष्ट प्रमाणात अनुदान देण्यात येते.

## किरकोळ व्यापार धोरण

किरकोळ व्यापार हा भारतीय अर्थव्यवस्थेचा एक आधारभूत स्तंभ असून, त्याचा स्थूल ढोबळ उत्पादनातील वाटा १५ टक्के आहे. महाराष्ट्रातील किरकोळ उपक्रमांमध्ये झालेली वाढ व राज्याची अर्थव्यवस्था व रोजगार यास चालना देण्याची किरकोळ व्यापार क्षेत्राची क्षमता याचा विचार करून किरकोळ व्यापार धोरण-२०१६ जाहीर करण्यात आले.

## शासकीय खरेदीमध्ये आरक्षण व प्राधान्य

राज्याच्या सुधारित खरेदी धोरणामध्ये नोंदणीकृत सूक्ष्म व लघू उद्योगांकडून खरेदी करण्यासाठी २४१ वस्तू राखीव ठेवण्यात आल्या आहेत. अशा राखीव वस्तूंची खरेदी १०० टक्के सूक्ष्म व लघू उद्योगांकडून करताना, त्यापैकी २० टक्के खरेदी अनुसूचित जाती /जमाती उद्योजकांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. सर्वसाधारण खरेदीमध्ये सूक्ष्म व लघुउद्योजकांसाठी २० टक्के आरक्षण असून, त्यापैकी अनुसूचित जाती/जमाती उद्योजकांसाठी ४ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. सूक्ष्म व लघू उद्योगांनी निविदेत सहभाग घेतल्यास निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येते.

## ई-मार्केटप्लेस पोर्टल

केंद्र शासनाने शासकीय खरेदीदार विभागांकडून वस्तू व सेवांच्या खरेदीसाठी गव्हर्नमेन्ट ई-मार्केटप्लेस हे पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलवर सद्य:स्थितीत २५,८०० उत्पादक/पुरवठादार नोंदणीकृत आहे. त्यांच्याकडून १,१३,००० वस्तू व १७ सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या पोर्टलवर खरेदी करताना खरेदीदार विभागाच्या गरजेनुसार निविदा अर्ज तयार करण्याची सुविधा आहेत. जास्तीत जास्त पर्याय उपलब्ध होऊन खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे. प्रचलित बाजारभावापेक्षा कमी किमतीत खात्रीशीर रीतीने वस्तू व सेवा उपलब्ध होतील.

## सुविधा कक्ष

गुंतवणूकदारांना साहाय्य करण्यासाठी राज्य शासनाने मुंबई येथे महाराष्ट्र उद्योग व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री) कक्ष स्थापित केला आहे. उद्योगांना परवाने व ना हरकत एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी एक खिडकी योजना कार्यान्वित आहे.

## जिल्हा खनिज प्रतिष्ठान

१२ जिल्ह्यात खनिज प्रतिष्ठान कार्यकारी परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. उर्वरित जिल्ह्यातील खनिज प्रतिष्ठानच्या कार्यकारी परिषदेच्या स्थापनेची कार्यवाही सुरू आहे. खाणबाधित क्षेत्र व व्यक्तींच्या विकासाकरिता जिल्हा खनिज प्रतिष्ठानमध्ये जमा होणाऱ्या अंशदानामधून प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## भूखंड वाटपाची प्रक्रिया ऑनलाइन

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाची वाटप प्रक्रिया पारदर्शी करण्यात येत आहे. औद्योगिक विकास महामंडळाच्या ज्या वसाहतीमधील ८० टक्क्यांपेक्षा जास्त भूखंड वितरीत झाले आहेत, अशा क्षेत्रातील उर्वरित भूखंड वितरणासाठी निविदा पद्धती राबवण्यात येणार आहे. ८० टक्क्यांपेक्षा कमी भूखंड वितरीत झालेल्या क्षेत्रातील वाटप थेट पद्धतीने वाटप समिती करेल. या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेसाठी १५ दिवसांचा अवधी देण्यात येणार असून या प्रक्रियेला व्यापक प्रसिद्धी देण्यात येणार आहे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **फेब्रुवारी २०१६ मध्ये झालेल्या 'मेक इन इंडीया सप्ताह' दरम्यान ८ लक्ष कोटी रुपये गुंतवणुकीचे एकूण २९८४ सामंजस्य करार. त्यामुळे अंदाजे ३० लाख रोजगार शक्य.**
- **राज्यात ४८७ खासगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना मंजुरी. त्यापैकी १७० खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांची नोंदणी. त्यामध्ये ३७ सार्वजनिक क्षेत्रातील उद्यानांना परवानगी. त्यातील गुंतवणूक १८,००० कोटी रुपये, त्यामधून ५,४४,००० रोजगार निर्मिती. उर्वरित ३१७ माहिती तंत्रज्ञान उद्यानांमधून १०,२४० कोटी रुपये गुंतवणूक प्रस्तावित. १४,००,००० रोजगार निर्मिती अपेक्षित.**
- **मेक इन इंडीया कार्यक्रमात महाराष्ट्र शासनासोबत झालेल्या सामंजस्य करारामध्ये किरकोळ व्यापार करणाऱ्या एकूण ७ प्रकल्पांमध्ये ५,०८५ कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित, त्याद्वारे अंदाजे २२,३४० रोजगार निर्मिती अपेक्षित.**
- **देशात एकूण झालेल्या विदेशी गुंतवणूकीपैकी ३० टक्के गुंतवणूक म्हणजेच २,०८,४२९ कोटी रुपये महाराष्ट्रात.**
- **राज्यातील प्रमुख खनिजांच्या खाणपट्ट्यांच्या वितरणाकरिता ई-लिलाव पद्धतीचा अवलंब. या लिलावात बॉक्साइड व चुनखडक या खनिजांच्या २ खाणपट्ट्यांचे वितरण करण्याबाबतची प्रक्रिया सुरू. या लिलावापोटी शासनास २५८४.९५ कोटी रुपये निधी स्वामित्वधनाव्यतिरिक्त पुढील ५० वर्षात प्राप्त होणार.**
- **मैत्री प्रकल्पाच्या माध्यमातून ७४८ घटकांच्या ८९१ अडचणींचे ऑनलाइन निराकरण. त्यामुळे ९० हजार कोटींच्या प्रकल्पांना फायदा.**



**कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास करण्यासाठी शासनाने गेल्या तीन वर्षांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण योजनांची अंमलबजावणी सुरू केली. कृषी उत्पन्न वाढवण्यासाठी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आणि आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मोठ्या प्रमाणावर साहाय्य केले. राज्यभर सूक्ष्म सिंचनाचे जाळे निर्माण केले. या सर्व बाबींचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होत आहे.**

**पांडुरंग फुंडकर**
मंत्री, कृषी, फलोत्पादन

# शेतकरी हिताशी बांधिलकी

कृषी विकासाच्या योजनांना गती देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. गेली सलग चार वर्षे राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने त्याचा परिणाम एकंदरीतच कृषी विकासावर आणि शेतकरी बांधवांवर झाला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे होरपळलेल्या बळीराजाला सावरण्यासाठी गेल्या तीन वर्षात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा भार उतरवून, महाराष्ट्रातील शेतकऱ्याला कर्जमुक्तीकडे नेण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेला मान्यता देण्यात आली. ही आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी आहे. या योजनेच्या माध्यमातून, शेतकऱ्यांचे दीड लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात आले आहे.

### उन्नत शेती, समृद्ध शेतकरी

शेतकऱ्याला अधिकाधिक उत्पन्न मिळाले पाहिजे यासाठी 'उन्नत शेती, समृद्ध शेतकरी' अभियान राज्यभर राबवण्यात आले. या अभियानादरम्यान राज्यभरातील जवळपास २ लाख शेतकऱ्यांशी संवाद साधण्यात आला. शेतीतील उत्पादन आणि पर्यायाने शेतकऱ्याचे उत्पन्न कसे वाढवता येईल याबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. २० हेक्टर शेती असणाऱ्या १० शेतकऱ्यांचा एक गट याप्रमाणे १००० गट महाराष्ट्रात स्थापून, गटशेतीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांचे उत्पादन आणि उत्पन्न वाढवण्यासाठी कृषी क्षेत्रातील अद्ययावत तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्रीसाठी अनुदान देण्यात येत आहे. तंत्रज्ञानाच्या वापरासंबंधीचे प्रशिक्षण देऊन, शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुपटीने वाढ करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या योजनेच्या नवीन सुधारणांनुसार नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, सूक्ष्म सिंचन इ. घटकांसाठी विशिष्ट मर्यादेपर्यंत १०० टक्के अनुदान देण्यात येणार आहे.



### महावेध प्रकल्प

राज्यातील हवामानाची प्रत्यक्ष वस्तुस्थिती दर्शक माहिती शेतकऱ्याला देता यावी यासाठी 'महावेध' प्रकल्पाची सुरुवात केली. याद्वारे राज्यातील सर्व २०६५ महसूल मंडळांमध्ये स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी करण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे प्राप्त होणाऱ्या हवामानविषयक माहितीचा हवामान आधारित पीक विमा योजना, कृषी हवामान सल्ला व मार्गदर्शन, कृषी संशोधन व आपत्ती व्यवस्थापनासाठी उपयोग केला जातो. प्रत्येक स्वयंचलित हवामान केंद्राद्वारे तापमान, पर्जन्यमान, सापेक्ष आर्द्रता, वाऱ्याचा वेग आणि दिशा या हवामानविषयक घटकाची अचूक माहिती दर १० मिनिटांनी उपलब्ध होते. सध्या १४०० ठिकाणी ही यंत्रे बसवण्यात आली आहेत. लहरी हवामानाच्या फटक्यातून सावरण्यासाठी

केंद्र शासनाच्या मदतीची वाट न पाहता शेतकऱ्यांना चार हजार कोटी रुपयांची मदत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दिली आहे.

## पीक विमा

शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात सुरक्षा कवच मिळावे म्हणून केंद्र शासनाची 'प्रधानमंत्री पीक विमा योजना' राज्यात राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यातील १ कोटी ८ लाख शेतकऱ्यांना मदत करण्यात आली. नैसर्गिक आपत्तीत नुकसान झाल्यास भरपाईसाठी असलेली ५० टक्के नुकसानीची अट ३३ टक्क्यांवर आली आहे. शेतकरी बांधवांना झालेला अपघात त्यातून आलेले अपंगत्व यांसाठी अपघातग्रस्त शेतकरी व त्याच्या कुटुंबास अभय देण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबवण्यात आली. या योजनेंतर्गत अपघातग्रस्त शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्यात आले आहे. यासाठी शेतकऱ्याला कुठल्याही विमा हप्त्याची रक्कम भरण्याची आवश्यकता नाही. बियाणे निर्मिती कंपनीच्या नफेखोरीला आळा बसावा यासाठी बी.टी. कापसाच्या किंमतीत पाकिटामागे १०० रुपयांनी कपात केली, त्यामुळे ५० लाख शेतकऱ्यांना फायदा झाला.

## मृद आरोग्य पत्रिका

खताचा समतोल वापर करून शाश्वत शेतीस चालना देण्याकरिता मृद आरोग्य पत्रिकांचे वितरण करण्यात आले आहे. आपल्या जमिनीची प्रकृती कशी आहे याची माहिती शेतकऱ्यांना देण्यासाठी मृदा परीक्षण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे एकूणच जमिनीचा पोत कसा आहे, जमिनीत कुठले पीक घेतले पाहिजे याचा शेतकऱ्याला अंदाज येईल. त्यानुसार शेतकऱ्याने त्याची जमीन कसली तर त्याचा उत्पन्नवाढीत फायदाच होईल. या प्रकल्पान्वये दर ३ वर्षांनी जमिनीची तपासणी करून घेणे शेतकऱ्यांना शक्य होणार आहे.

## कृषी संजीवनी

मराठवाडा आणि विदर्भ या दुष्काळग्रस्त विभागावर शासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेची सुरुवात या विभागातील गावांसाठी करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत मराठवाड्यातील ४००० गावे आणि विदर्भातील क्षारयुक्त जमीन असणाऱ्या १००० गावांमध्ये शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढवण्यासाठी आणि गावातील जमिनीचे मृद संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

## सिंचन

ठिबक सिंचनाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. १.३७ लाख शेतकऱ्यांच्या खात्यावर ४१५ कोटी रुपयांच्या अनुदानाचे थेट वाटप करण्यात आले. २०१२-१३ पर्यंतचे प्रलंबित देयके अदा केली आहेत. एकूण उपलब्ध पाणी साठ्यापैकी सुमारे ६० ते ७० टक्के पाणी सिंचनासाठी वापरण्यात येते. ऊसासारख्या पिकासाठी ठिबक सिंचनाचा वापर केला असता ३० ते ५० टक्के पाण्याची बचत होऊ शकते. ही बाब लक्षात घेऊन राज्यातील ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणण्याच्या योजनेस मान्यता देण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून नाबार्डकडून दीर्घ मुदतीचे कर्ज घेऊन, ते शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ८५,४०० च्या मर्यादेत सवलतीच्या दरात ५ वर्षांसाठी उपलब्ध करून देण्यात येईल. २०१८-१९ पर्यंत ३.०५ लाख हेक्टर क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणण्यात येईल. राज्यात दर्जेदार कृषी शिक्षण देण्यावर शासनाचा भर राहिला आहे. त्यासाठी यवतमाळ, नाशिक व सांगली या ठिकाणी नव्याने शासकीय कृषी महाविद्यालये स्थापन करण्यात येतील. राज्यातील ४ कृषी विद्यापीठांमध्ये सेंद्रिय शेती संशोधन केंद्र स्थापन करण्यात आली आहेत.

**शब्दांकन : अजय जाधव,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **'प्रधानमंत्री पीक विमा' योजनेंतर्गत राज्यातील १ कोटी ८ लाख शेतकऱ्यांना साहाय्य.**
- **कापसाच्या बियाणांच्या संदर्भात महागडी विदेशी बियाणे न वापरता महाराष्ट्रातील ४ कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून बियाणे निर्मिती प्रकल्प.**
- **देशी बियाणांचा वापर वाढावा, त्यासाठी मोठ्या प्रमाणात बीजनिर्मिती राज्यात व्हावी यासाठी जालना येथे 'सीड पार्क'.**
- **अन्न प्रक्रिया उद्योगास चालना देण्यासह शेतीमालाच्या मूल्यवर्धनासाठी मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना कार्यान्वित. कृषी प्रक्रिया उद्योग सुरू करण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के किंवा ५० लाख रुपये एवढे अनुदान.**
- **'डॉ. आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेंतर्गत अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांना विहीर बांधणी, सिंचन साधनांची खरेदी, मोटर पंप इ. कृषी साधने तसेच शेततळ्यांच्या निर्मितीसाठी २ लाख ३५ हजार रुपयांपर्यंतची मदत.**
- **यवतमाळ आणि उस्मानाबाद या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी मोतीरामजी लहाने कृषी समृद्धी योजनेस सुरुवात. या जिल्ह्यातील आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यांना सर्व शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न.**
- **छोट्या गावांचा गट तयार करून गटशेतीच्या माध्यमातून कृषी विकासासाठी प्रयत्न.**
- **शेतकऱ्यांना कृषिविषयक सल्ला देण्यासाठी एम - किसान प्रणाली सुरू. एम-किसान सेवेमध्ये महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर.**
- **नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेसाठी ४००० कोटी रुपयांची तरतूद.**



**वाढती कारखानदारी व शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. प्रदूषणामुळे मानवी जीवनास हानिकारक असलेले श्वसनाचे रोग, कावीळ, दमा इत्यादी आजार वाढले आहेत. प्रदूषणामुळे जलचर, वनचर, पशुपक्षी व वनस्पती यांना हानी पोहोचत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखणे व प्रदूषण प्रतिबंध करून; नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पर्यावरण विभाग यशस्वीपणे पेलत आहे. गेल्या तीन वर्षांत त्या दृष्टीने अनेक निर्णय घेण्यात आले.**


**रामदास कदम**

**मंत्री, पर्यावरण**


# पर्यावरण समतोल, प्रदूषणमुक्ती

पर्यावरणविषयक जनजागृती मोठ्या प्रमाणात होत असली तरी वाढती कारखानदारी व शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. परिणामी प्रदूषणामुळे मानवी जीवनास हानिकारक असलेले श्वसनाचे रोग, कावीळ, दमा इत्यादी आजारांना तोंड द्यावे लागत आहे. प्रदूषणामुळे जलचर, वनचर, पशुपक्षी व वनस्पती यांना हानी पोहोचत आहे. याकरिता पर्यावरणाचा समतोल राखणे व प्रदूषण प्रतिबंध करून नियंत्रण ठेवणे याची जबाबदारी पर्यावरण विभागाची आहे. विभागाचे काम पर्यावरण संरक्षणाचे आहे. जल व वायू प्रदूषणाचे नियंत्रण विभागाच्या अखत्यारीत असलेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केले जाते.

## जबाबदारी

प्रदूषण प्रतिबंध, नियंत्रण किंवा बंदी आणि त्याची सुरक्षितता यासाठी कार्यक्रमांची योजना करणे, प्रदूषणविषयक माहिती गोळा करणे व तिचा प्रचार करणे, त्याचा प्रतिबंध व नियंत्रण करणे, सांडपाणी किंवा व्यापारी सांडपाणी व टाकाऊ पदार्थांच्या निपटाऱ्याच्या सुविधांचे तसेच हवा प्रदूषण नियंत्रण पद्धतीचे निरीक्षण करणे व ट्रीटमेंट संयंत्र, निपटाऱ्याच्या पद्धती तसेच हवा प्रदूषण नियंत्रण पद्धती याविषयीच्या योजना, प्रदूषण नियंत्रण, टाकाऊ पदार्थांचे पुनर्जिवीकरण करून पुन्हा उपयोगात घेणे, पर्यावरण अनुकूल पद्धती इत्यादी क्षेत्रात होणाऱ्या विकासाला साहाय्य करणे व प्रोत्साहन देणे, योग्य प्रदूषण नियंत्रण तंत्रज्ञान व पद्धतीद्वारे पर्यावरण वृद्धीसाठी उद्योजकांना शिक्षित करणे व मार्गदर्शन करणे, स्वच्छ व स्वस्थ पर्यावरणाविषयी सार्वजनिक जागरुकता निर्माण करणे, प्रदूषणासंबंधी सार्वजनिक तक्रारींची दखल घेणे, ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची महत्त्वाची कार्ये आहेत.



वायू व जल प्रदूषण याशिवाय ध्वनी प्रदूषण, औद्योगिक प्रदूषण, घातक कचरा, रद्द कचरा, जैव वैद्यकीय कचरा या विषयांवरही पर्यावरण विभाग काम करतो.

राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना, पर्यावरण विषयक माहिती प्रणाली केंद्र (केंद्रपुरस्कृत योजना), सरदार सरोवर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सुरक्षा उपाय योजनेसाठी सनियंत्रण कक्षाची स्थापना, महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, पर्यावरणविषयक जनजागृती, शिक्षण व वातावरण बदल कृती योजना, राज्य नदी संवर्धन योजना, मुळा-मुठा नदी, (पुणे) प्रदूषण कमी करण्याचा प्रकल्प (केंद्रपुरस्कृत योजना) या विभागाच्या महत्त्वाच्या योजना आहेत.

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या व्यापक जनजागृतीसाठी विविध पुरस्कार सुरू करण्यात आले आहेत. या अंतर्गत दरवर्षी पर्यावरणविषयक स्पर्धा, पर्यावरण प्रकल्प, पर्यावरण छायाचित्र, केस स्टडी इ. स्पर्धांचे आयोजन केले जाते. लक्षणीय अशा प्रवेशिकांना प्रशस्तिपत्रक व पुरस्कार दिले जातात. ५ जून हा जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो.

## प्रदूषण निर्मूलनासाठी ९९० कोटींचा प्रकल्प

पुणे शहरातील मुळा-मुठा नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी राष्ट्रीय नदी कृती योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून राज्य शासनास वेळोवेळी उपलब्ध होणारा निधी पुणे महानगरपालिकेस त्वरित वितरित करता येणे शक्य व्हावे म्हणून प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पांतर्गत नदीत येणारे सांडपाणी अडवणे किंवा वळवणे, प्रक्रिया करणे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र बांधणे, मत्स्यबीज केंद्र, बोटॅनिकल गार्डन, सुलभ शौचालयांची उभारणी आणि जनजागृती यांचा समावेश आहे.

देशातील नद्यांच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयामार्फत राष्ट्रीय नदी कृती योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश नदीकाठावरील शहरातून निघणाऱ्या नागरी सांडपाण्यापासून होणारे नदीचे प्रदूषण रोखणे असा आहे. मुळा-मुठा नदी संवर्धन प्रकल्पाच्या योजनेसाठी केंद्र शासन, जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी (जायका) व पुणे महानगरपालिका यांना निधी देण्यात येईल. या प्रस्तावामध्ये एकूण मंजूर निधी (९९०.२६ कोटी रुपये) पैकी केंद्र शासनाचा ८५ टक्के (८४०.७२ कोटी रुपये) हिस्सा व पुणे महानगरपालिकेचा १५ टक्के हिस्सा (१४८.५४ कोटी रुपये) समाविष्ट आहे. प्रस्तावांतर्गत केंद्र शासनामार्फत मंजूर करण्यात आलेल्या कामांमध्ये नदीत येणारे सांडपाणी अडवणे/वळवणे, प्रक्रिया करणे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र बांधणे, मत्स्यबीज केंद्र, वनस्पती उद्यान, सुलभ शौचालये उभारणी आणि जनजागृती यांचा समावेश आहे. ही मंजूर कामे ३१ जानेवारी २०२२ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक आहे.

## हवा गुणवत्ता निर्देशांक तपासणी

जागतिक हवामानात बदल घडवण्यास कारणीभूत असलेले हवा प्रदूषण ही खूप गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. त्यामुळे हवा प्रदूषण हा विषय एखाद्या विभागापुरता मर्यादित राहिला नसून, जागतिक काळजीचा विषय बनला आहे. अशा प्रकारचे संभवणारे धोके व त्यांच्या मुळाशी बहुतांशी मानवच जबाबदार आहे. या हवामान बदलाचा थेट परिणाम मानवी आरोग्यावर दिसायला लागला आहे. वाहनांमधून उत्सर्जित होणारे वायू, कचरा, सांडपाणी, कारखाने, शेतीजन्य उत्पादने, वीज निर्मिती तसेच खत प्रकल्प अशा अनेक कारणांमुळे व त्यामध्ये वाढत जाणाऱ्या धूलीकणांच्या प्रमाणामध्ये वाढ होत आहे. वातावरणाच्या हवेच्या गुणवत्तेचे मूल्यमापन करणे, हा हवेच्या गुणवत्तेचा सुधार करण्यासाठीचा प्राथमिक टप्पा आहे. ज्यायोगे आपल्याला प्रदूषणाचे सद्य:स्थितीचे प्रमाण जाणण्यास मदत होईल.

हवेच्या गुणवत्तेची सद्य:स्थिती अवगत करण्यासाठीचा प्राथमिक टप्पा म्हणून, तसेच जनतेला या माहितीचे प्रभावीपणे संप्रेषण करण्यासाठी हवा गुणवत्ता निर्देशांक हे साधन परिणामकारक सिद्ध होऊ शकते. हा निर्देशांक वातावरणीय हवेतील गुणवत्तेच्या जटील मूल्यमापनानंतर सर्वसामान्य जनतेस समजण्यास सोपा असा एकक आणि हवेची सद्य:स्थिती व प्रदूषणाचे प्रमाण जाणून घेण्यासाठी उपयुक्त अशी संज्ञा आहे. हवेतील प्रदूषकांच्या प्रमाणानुसार व त्यामुळे होणाऱ्या संभाव्य आरोग्यविषयक समस्यानुसार हवा गुणवत्ता निर्देशांक, वेगवेगळ्या प्रवर्गांमध्ये विभाजित केला जातो. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने, भारतीय प्राद्योगिक अभियांत्रिकी संस्था (आय.आय.टी.) कानपूर या संस्थेच्या मदतीने, हवा गुणवत्ता निर्देशकाद्वारे, भारतातील हवा प्रदूषण व आरोग्यविषयक समस्या यांचे परस्परसंबंध विकसित केले आहे. त्यानुसार या निर्देशकांचे विविध रंगांच्या संकेतांमध्ये रूपांतर केले आहे.

## कामगिरी दमदार

- **केंद्र शासनाकडून राष्ट्रीय नदी कृती योजनेंतर्गत, पुणे शहरातील मुळा-मुठा नदी संवर्धन करण्याबाबत ९९०.२६ कोटी रुपये इतक्या रकमेच्या प्रस्तावास मंजुरी.**
- **केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमून दिलेल्या विहित कार्यपद्धतीनुसार वातावरणीय हवेची गुणवत्ता तपासणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे २५ शहरांमध्ये करणार.**
- **नांदेड, अंबरनाथ, भिवंडी, डोंबिवली, कल्याण, तळोजा आणि पनवेल या शहरांचे हवा गुणवत्ता निर्देशांक काढण्याचे काम प्रगतिपथावर.**
- **ज्या शहरातील हवा गुणवत्ता ही निर्धारित मानकांपेक्षा अधिक आढळून आली. त्या संबंधीचा कृती आराखडा नामांकित संस्थेमार्फत तयार करणार.**
- **महाराष्ट्रातील वातावरणाचा हवा गुणवत्ता निर्देशांक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे दर महिन्याच्या १० तारखेला प्रसारित करण्यात येणार.**
- **घातक कचरा आणि रद्द कचरा यांच्या संकलन आणि व्यवस्थापन केंद्रांना मान्यता. या कचऱ्यावरील प्रक्रियेस प्रारंभ.**

## ध्वनी मर्यादा, प्लास्टिक बंदी..

ध्वनी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी उच्च न्यायालयाने काही मर्यादा घालून दिल्या आहेत. त्यानुसार समाजातील सर्वच घटकांनी ध्वनी मर्यादेचे उल्लंघन होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. लाऊडस्पीकरचा आवाज कमी करणे, डॉल्बीसारखी साऊंड सिस्टिम न लावणे, ढोल-ताशांचा आवाज मर्यादित ठेवणे यासारख्या गोष्टी आपल्या हातात आहेत. त्याचबरोबर सार्वजनिक सभा, समारंभ, सण-उत्सवात मोठ्या आवाजाच्या फटाक्यांचा वापर करू नये, प्रचंड आवाजामुळे लहान मुलांच्या कानाच्या पडद्यावर परिणाम होतो. त्यातील धुरामुळे श्वसनाचे विकार जडतात.

राज्य सरकारने प्लास्टिकवर बंदी घातली आहे. दैनंदिन जीवनात प्लास्टिकच्या पिशव्या वापरू नये. पर्यावरण रक्षणासाठी ध्वनिप्रदूषण, फटाके, प्लास्टिक, मांजा यांच्यावर निर्बंध आणून, आपण पर्यावरणपूरक समाजजीवनाला सुरुवात करू या..

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट,** विभागीय संपर्क अधिकारी



**महाराष्ट्राच्या विकासाला चालना देणाऱ्या नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गासाठी भूसंपादनाचा टप्पा सुरू झाला आहे. या महामार्गावर दोन्ही बाजूंनी देशविदेशातील कारखाने उभारले जाणार असल्याने, मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. शिवाय प्रचंड आर्थिक उलाढाल होणार असल्याने राज्याचा चौफेर विकास साधला जाईल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र हे देशातील प्रथम क्रमांकाचे प्रगतशील राज्य बनेल.**

**एकनाथ शिंदे**

**मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)**

# चौफेर समृद्धीची सुवर्णसंधी...

महाराष्ट्राच्या विकासाला चालना देणाऱ्या नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गासाठी भूसंपादनाचा पहिला टप्पा सुरू झाला आहे. बऱ्याच महिन्यांपासून भूसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध होता. परंतु शेतकऱ्यांशी गावपातळीवर जाऊन चर्चा केल्याने त्यांचा विरोध निवळला. त्यामुळे नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातून भूसंपादनाला सुरुवात झाली.




भूसंपादनाच्या खरेदी पत्रावर साक्षीदार म्हणून स्वाक्षरी झाल्याने शेतकऱ्यांच्या मनातील शंकाकुशंका दूर झाल्या.

## शेतकऱ्यांना पाचपट मोबदला

शेतकऱ्यांचे पूर्ण समाधान झाल्याशिवाय भूसंपादन करायचे नाही, अशीच आमची सुरुवातीपासूनच भूमिका आहे. हिंगणा तालुक्यातील जवळपास ६ शेतकऱ्यांच्या जमिनी या वेळी खरेदी करण्यात आल्या. त्याच वेळी शेतकऱ्यांच्या काही अडचणी असल्यास त्यांनी थेट प्रशासनाशी संपर्क साधावा असे आवाहन केले होते. ४६ हजार कोटीचा हा प्रकल्प महाराष्ट्राला समृद्धीच्या दिशेने पुढे नेणारा आहे. जमीन खरेदीचा ऐतिहासिक टप्पा हिंगणा तहसील कार्यालयात सुरू झाल्याने शेतकऱ्यांचा विरोध असल्याबाबतची चर्चा यामुळे थंडावली. विशेष म्हणजे पहिल्या काही खरेदीखतांवर मी आणि महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक यांनी साक्षीदार म्हणून स्वाक्षऱ्या केल्या आहेत. या महामार्गासाठी हिंगणा तालुक्यातील २१९ शेतकऱ्यांच्या जमिनीची आवश्यकता आहे. १२० शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी देण्यासाठी संमतीपत्रेही दिली. शासनाने या प्रकल्पासाठी जमिनीला आजवरचे सर्वात मोठे पॅकेज जाहीर केले असून ग्रामीण भागातील जमिनींची रेडीरेकनर अथवा बाजारभाव यापेक्षा जो जास्तीचा दर असेल त्याच्या ५ पट रक्कम मोबदला म्हणून या शेतकऱ्यांना मिळणार आहे.

२ कोटी ६० लाख रुपयांचा मोबदला बँक खात्यात जमा झाला आहे. राम आसरे शाहू हे या प्रकल्पासाठी जमीन देणारे पहिले शेतकरी आहेत. त्यांच्या सव्वा हेक्टर जमिनीची शासनाने ५९ लाख ११ हजार रुपयांची खरेदी केली. याशिवाय चंद्रा गायकवाड, सत्यभामा सोनारकर, मंदा फुलझेले, गोपाल मिसाळ आणि कल्पना मिसाळ यांची शेतजमीनदेखील खरेदी करण्यात आली.

## जमिनीची संयुक्त मोजणी

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्रकल्पातील समाविष्ट जमिनीच्या मोजणीकरिता निधी उपलब्ध करून दिला आहे. आतापर्यंत नागपूर, वाशिम, बुलढाणा, जालना, अहमदनगर व ठाणे या जिल्ह्यांमध्ये संयुक्त मोजणीची कार्यवाही १००% पूर्ण झाली आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये वर्धा (९७%), अमरावती (८५%), औरंगाबाद (९७%) व नाशिक (८७ %) या प्रमाणे संयुक्त मोजणीची कार्यवाही पूर्ण झाली आहे. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गालगत १० जिल्ह्यांतील २४ तालुक्यांतील ३९२ गावागावांतून हा महामार्ग जाणार आहे. त्यात नागपूर (२१), वर्धा (३४), अमरावती (४६), वाशिम (५४), बुलढाणा (४९), जालना (२५), औरंगाबाद (६२), अहमदनगर (१०), नाशिक (४९) व ठाणे (४२) अशी गावांची संख्या आहे. याशिवाय महामार्गालगतचे १४ जिल्हे मुंबईशी जोडले जाणार आहेत.

## रोजगार संधी

हा महामार्ग २०२० पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासकीय यंत्रणा वेगाने कामाला लागली आहे. या प्रकल्पामुळे सुमारे २५ लाख लोकांना रोजगाराची संधी मिळणार आहे. हा महामार्ग तयार करण्यासाठी जगातील अनेक देश पुढे आले असून चीन, मलेशिया, कोरिया, रशिया या राष्ट्रांनी काम करण्यासाठी उत्सुकता दाखवली आहे.

## चौफेर विकास

या महामार्गावर दोन्ही बाजूंनी देशविदेशातील कारखाने उभारले जाणार असल्याने मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन प्रचंड आर्थिक उलाढाल होईल. त्यामुळे राज्याचा चौफेर विकास साधला जाईल. हा प्रकल्प झाल्यानंतर महाराष्ट्र हे देशातील प्रथम क्रमांकाचे सर्वात प्रगतशील राज्य बनेल. विकासाचा दर अन्य राज्यांपेक्षा कित्येक पटीने वाढेल. नागपूरहून मुंबई, पुण्याला तसेच अन्य जिल्ह्यातून मुंबईला येणारा शेतीमाल व अन्य उत्पादने वाहून नेणे अधिक सोईचे आणि सुरक्षित होईल. म्हणूनच हा प्रकल्प महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारा विकासाचा, प्रगतीचा आणि एकंदरीत राज्याच्या सर्वंकष समृद्धीचा महामार्ग असेल.

हा महामार्ग एकूण सहापदरी असून सुरक्षिततेचे सर्व उपाय या मार्गावर असतील. या रस्त्याच्या आखणीमध्ये येणारी खेडी, नदी, नाले यावर उड्डाणपूल, छोटे-मोठे पूल आणि आजूबाजूच्या खेड्यातील नागरिकांच्या सोयीसाठी उपमार्ग (सब-वे) असतील तर काही ठिकाणी मोठ्या डोंगरांमधून बोगदा काढून हा मार्ग तयार केला जाईल. या महामार्गाच्या आजूबाजूला असलेली तीर्थक्षेत्रे, पर्यटन स्थळे आणि मुख्यालये ही द्रुतगती मार्गाशी जोडली जातील.

## राज्य मार्गांना राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा

महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळ (एमएसआरडीसी)मार्फत वर्सोवा या सी-लिंक प्रकल्पाचे काम केले जात आहे. हा प्रकल्प वांद्रे-वरळी सी-लिंकला जोडला जाणार असून त्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडीतून सुटका होईल. या प्रकल्पाचा खर्च ७ हजार ५०० कोटी रुपये आहे. एम.एस.आर.डी.सी.ने मुंबई शहर व उपनगरात ५० हून अधिक उड्डाणपुलांचे बांधकाम पूर्ण केले आहे. त्यात दिंडोशी जंक्शन, अंधेरी येथील बर्फीवाला लेन फ्लायओव्हर, सांताक्रुझ विमानतळ येथील फ्लायओव्हर, सुमन नगर जंक्शन, मालाड जंक्शन येथील फ्लायओव्हर आहे. विभागाने बांधलेल्या मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गामुळे मुंबई ते पुणे हा ६ तासांचा प्रवास ३ तासावर आला आहे.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **राज्याच्या अर्थसंकल्पातून राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांच्या माध्यमातून गेल्या ३ वर्षात एकूण ८ हजार ५०० कि.मी. रस्त्यांची सुधारणा.**
- **११ हजार रस्ते व पुलांची ४३ हजार ४५० कोटी रुपयांची कामे मंजूर.**
- **राज्यातील १९ हजार ८१५ कि.मी.चे मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था सुदृढ होण्यास साहाय्य.**
- **नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गासाठी भूसंपादन.**
- **नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग प्रकल्पासाठी जमिनीला आजवरचे सर्वात मोठे पॅकेज शासनामार्फत जाहीर. ग्रामीण भागातील जमिनींची रेडिरेकनर अथवा बाजारभाव यापेक्षा जो जास्तीचा दर असेल त्याच्या ५ पट रक्कम शेतकऱ्यांना मिळणार.**
- **नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग प्रकल्पासाठी नागपूर, वाशिम, बुलढाणा, जालना, अहमदनगर व ठाणे या जिल्ह्यांमध्ये संयुक्त मोजणीची कार्यवाही १००% पूर्ण.**
- **नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गालगत १० जिल्ह्यांतील २४ तालुक्यांतील ३९२ गावातून हा महामार्ग जाणार.**
- **महामार्गालगतचे १४ जिल्हेही मुंबईशी जोडले जाणार.**
- **समृद्धी महामार्ग २०२० पर्यंत पूर्ण करण्याच्या दृष्टीने यंत्रणा कार्यान्वित. सुमारे २५ लाख लोकांना रोजगाराची संधी मिळणार.**
- **या महामार्गालगत उभारण्यात येणारी २४ नवनगरे कृषिपूरक उद्योगांना चालना देणारी व ग्रामीण भागात सुविधा देणारी कृषी समृद्धी केंद्रे असतील.**



**राज्यात ६६० मेगावॅट क्षमतेचा महानिर्मितीचा कोराडी येथील पहिला सुपर क्रिटीकल संच क्र.८ व चंद्रपूर येथील ५०० मेगावॅटचा संच क्र.८ कार्यान्वित करण्यात आला. कोराडी, चंद्रपूर व परळी येथील अन्य औष्णिक संचही कार्यरत करण्यात आले. त्यामुळे महानिर्मितीची औष्णिक क्षमता वर्षभरात २५७० मेगावॅटने वाढली. कोळसा अदलाबदल आणि कोळसा जोडण्यांमधील लवचीकतेमुळे कोळसा वाहतुकीच्या खर्चात ९४५.४१ कोटींची बचत करण्यात यश मिळाले.**

**चंद्रशेखर बावनकुळे**

मंत्री, ऊर्जा, नवीन व नवकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क


# स्वयंपूर्णतेची ऊर्जा

ऊर्जानिर्मिती क्षेत्रात राज्याने महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. १४ एप्रिल २०१७ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते कोराडी येथील ३६६० मेगावॅट सुपरक्रिटीकल प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. महानिर्मितीच्या बहुतांशी औष्णिक विद्युत केंद्राच्या कामगिरीत गेल्या अडीच वर्षापासून सातत्याने सुधारणा होऊन वाढीव भारांक, उपलब्धता याद्वारे कार्यक्षमतेत वाढ झाली. इंधनतेलाचा वापर कमी करण्यातदेखील यश मिळाले. प्रभावी इंधन व्यवस्थापनाच्या माध्यमातून महानिर्मितीने वीजनिर्मितीच्या खर्चात वर्ष २०१५-१६ मध्ये ६७.५५ कोटी रुपयांची बचत साध्य केली. सामग्रीसाठा नियंत्रित ठेवल्याने सुमारे १०० कोटींची बचत झाली.



### वीजनिर्मितीचा नवा उच्चांक

पूर्वी राज्यातील महानिर्मितीच्या वीजकेंद्रात जेमतेम एक दोन दिवसांचा कोळसा साठा उपलब्ध असायचा. आता वीजनिर्मितीमध्ये लक्षणीय सुधारणा झाली असून, कोळसा टंचाईची समस्या दूर करण्यासाठी सर्वंकष पावले उचलण्यात आल्याने; या परिस्थितीत सुधारणा घडून महानिर्मितीच्या बहुतांश औष्णिक केंद्रात सध्या समाधानकारक प्रमाणात कोळसासाठा उपलब्ध आहे. त्याची परिणती म्हणजे महानिर्मितीच्या काही औष्णिक संचानी गेल्या वर्षी विक्रमी कामगिरी गेली असून वीजनिर्मितीचे नवे उच्चांक प्रस्थापित केले आहेत.



### सौर प्रकल्प

कौडगाव, उस्मानाबाद येथे ५० मेगावॅटचा व शिवाजीनगर साक्री येथे २५ मेगावॅटचा सौर प्रकल्प उभारण्याची जागतिक निविदा प्रक्रिया सुरू आहे. शासनाच्या नवीन अपारंपरिक ऊर्जा धोरणास अनुसरून महानिर्मितीने एकूण २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प आगामी काळात उभारण्याचे नियोजन केले असून, त्यापैकी १००० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प स्पर्धात्मक निविदा मागवून महानिर्मितीने संपादित केलेल्या जमिनीवर उभारण्यात येतील. या अंतर्गत वाशिम व यवतमाळ जिल्ह्यात भूसंपादन प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. ५०० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारण्यात येतील. दौंडाइचा येथे ५०० मेगावॅट क्षमतेच अल्ट्रा मेगा सौर पार्क उभारण्याचे नियोजन आहे.


औष्णिक प्रकल्पातील राखेची (फ्लाय अॅश)ची विल्हेवाट योग्य प्रकारे लावणे हे पर्यावरणासाठी महत्त्वाचे असते. शंभर टक्के राखेची उपयोगिता हे महानिर्मितीचे उद्दिष्ट आहे. याबाबतचा एक विशेष राष्ट्रीय पुरस्कार महानिर्मितीला प्राप्त झाला आहे.

## महापारेषण

■ आधीच्या पारेषण क्षमतेत वाढ करून आता या क्षमतेत १५,९००.५ मेगा व्हॉल्ट एम्पियर (एमव्हीए) पर्यंत वाढ. ■ महापारेषण कंपनीद्वारे २३,०५५ मेगावॅट वीज पारेषित ■ अमरावती जिह्यातील मेळघाटमधील आदिवासीबहुल भागातील गेली ६० वर्षे अंधारात असलेल्या १५२ गावांसाठी १३२ केव्हीच्या वीजग्रहण उपकेंद्राची स्थापना आणि त्याद्वारे या गावांचे विद्युतीकरण ■ ४४ नवी उपकेंद्रे स्थापन

## महावितरण

**जिल्हानिहाय जनता दरबार :** वीज ग्राहकांच्या अडचणी सोडवण्यासाठी ऊर्जामंत्र्यांनी लोकप्रतिनिधींना सहभागी करून जिल्हानिहाय जनता दरबार घेतले.



**'उदय' योजनेत महाराष्ट्र प्रथम :** केंद्र शासनाच्या 'उदय' योजनेच्या उद्दिष्टपूर्ततेत मे २०१७ मध्ये महाराष्ट्राने प्रथम क्रमांक पटकावला. या योजनेत महावितरणने २०१६-१७ या आर्थिक वर्षात विविध उपाययोजनेद्वारे ऊर्जा अंकेक्षणात देशात लक्षणीय कामगिरी केली. ८० लाख एलइडी बल्ब वाटपाचे उद्दिष्ट होते. महावितरणने ९१ लाख ग्राहकांना एलइडी बल्बचे वाटप केले. उदय योजनेत आर्थिक नियोजनात महावितरणने उत्कृष्ट कामगिरी केली.

**विदर्भ मराठवाड्यातील उद्योगांना वीजदरात सवलत :** विदर्भ व मराठवाडा या क्षेत्रातील औद्योगिक वीज ग्राहकांना वीजदरात सवलत देण्याची घोषणा २९ जून २०१६ रोजी शासनाने केली. या निर्णयामुळे विदर्भ, मराठवाड्यातील नवीन औद्योगिक ग्राहकांना ७५ ते ५० पैसे प्रतियुनिट सवलत देण्यात आली आहे. यासाठी राज्य शासनाने १ हजार १० कोटी रूपयांची तरतूद केली आहे.

**अटल सौर कृषिपंपाचा पथदर्शी प्रकल्प :** राज्यात १० हजार सौर कृषिपंप बसवण्याचा पथदर्शी प्रकल्प तयार करण्यात आला आहे. यापैकी सुमारे ८ हजार सौर कृषिपंप विदर्भातील बुलडाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये बसवण्यात येतील. अतिदुर्गम आदिवासी भागामध्ये ही योजना राबवली जात आहे.

**दुष्काळी भागात पायाभूत विद्युत सुविधा:** राज्यातील २१ जिल्ह्यात यावर्षी दुष्काळामुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. या जिल्ह्यांमध्ये कृषिपंप वीज जोडण्यासाठी व विद्युत पायाभूत सुविधा व विद्युत प्रणालीचे सक्षमीकरण व बळकटीकरण करण्यासाठी २०१६-२०१७ व २०१७-२०१८ मध्ये महावितरणला १०१९.१८ कोटींचा निधी अनुदान स्वरूपात दिला. यातील सर्वाधिक ५५१ कोटींचा निधी दुष्काळाची आत्यंतिक तीव्रता असणाऱ्या मराठवाडा विभागास देण्यात आला आहे.

**दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना :** केंद्र शासनाने ग्रामीण भागात विश्वासार्ह विद्युत पुरवठा देण्यासाठी दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत ग्रामीण भागात कृषी व बिगर कृषी वाहिन्यांचे विलगीकरण करणे, उपपारेषण व वितरण प्रणालीचे बळकटीकरण, वृद्धीकरण व गरजेनुसार नवीन यंत्रणा उभारणे, ऊर्जा अंकेक्षणकरिता उपकेंद्र, वाहिनी, वितरण रोहित्रे व ग्राहक इत्यादींना मीटर बसवणे तसेच जुने व सदोष मीटर बदलणे अशी कामे केली जातील. या योजनेमुळे कृषी ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा व्हायला मदत होईल. यासाठी केंद्राकडे सुमारे १३,७७७ कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

**शब्दांकन : शैलजा वाघ-दांदळे,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **प्रभावी इंधन व्यवस्थापनाच्या माध्यमातून महानिर्मिती कंपनीला वीजनिर्मितीच्या खर्चात वर्ष २०१५-१६ मध्ये ६७.५५ कोटी रुपयांची बचत साध्य. सामग्रीसाठा नियंत्रित ठेवल्याने सुमारे १०० कोटींची बचत.**
- **कोळसा टंचाईची समस्या दूर करण्यासाठी सर्वंकष पावले उचलण्यात आल्याने महानिर्मितीच्या बहुतांश औष्णिक केंद्रात सध्या समाधानकारक प्रमाणात कोळसासाठा उपलब्ध.**
- **नवीन अपारंपरिक ऊर्जा धोरणास अनुसरून महानिर्मितीचे २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारण्याचे नियोजन. त्यापैकी १००० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प स्पर्धात्मक निविदा मागवून महानिर्मितीने संपादित केलेल्या जमिनीवर उभारणार.**
- **महापारेषण कंपनीद्वारे अमरावती जिह्यातील मेळघाटमधील आदिवासीबहुल भागात गेली ६० वर्षे अंधारात असलेल्या १५२ गावांसाठी १३२ केव्हीच्या वीजग्रहण उपकेंद्राची स्थापना आणि त्याद्वारे या गावांचे विद्युतीकरण.**
- **८० लाख एलईडी बल्ब वाटपाचे उद्दिष्ट असताना महावितरणने ९१ लाख ग्राहकांना एलईडी बल्बचे वाटप केले.**
- **दुष्काळग्रस्त जिल्ह्यांमध्ये कृषिपंप वीज जोडणी, विद्युत पायाभूत सुविधा, विद्युत प्रणालीचे सक्षमीकरण व बळकटीकरणाला प्राधान्य. सर्वाधिक ५५१ कोटींचा निधी दुष्काळाची आत्यंतिक तीव्रता असणाऱ्या मराठवाड्यास प्रदान.**
- **कमी पर्जन्यमान असलेल्या तालुक्यांमध्ये कृषिपंपासाठी १२ तासांचा थ्री-फेज पुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत ७ सप्टेंबर २०१७ रोजी शासन निर्णय जारी.**



**प्रत्येक गावाला पाणीपुरवठा योजना देऊन गाव टंचाईमुक्त आणि टँकरमुक्त करण्याचा निर्धार केला आहे. त्या दृष्टीने गेल्या तीन वर्षात अनेक पाणी पुरवठा योजना सुरू करण्यात आल्या. संपूर्ण देशात हागणदारीमुक्त ग्रामपंचायतींच्या संख्येत महाराष्ट्र प्रथम क्रमांकाचे राज्य ठरले आहे. देशातील सर्वाधिक स्वच्छ जिल्ह्यांमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. मार्च २०१८ पर्यंत संपूर्ण महाराष्ट्र स्वच्छ करण्याचा संकल्प केला आहे.**

**बबनराव लोणीकर**

**मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता**

# स्वच्छतेची संकल्पपूर्ती...

महाराष्ट्रातील सर्व गावे टंचाईमुक्त व्हावी यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. हा कार्यक्रम २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षासाठी राबवण्यात येणार असून त्यासाठी २५०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. याद्वारे १००३ यासाठी १ हजार २८४ कोटी रुपये खर्च करण्यात येतील.

नुकतेच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते १७१ पाणी पुरवठा प्रकल्पाचे ई-भूमिपूजन करण्यात आले. हा कार्यक्रम ११९ कोटी ७७ लाख रुपयांचा आहे. या प्रकल्पात पाणी पुरवठा योजना, हवामान केंद्र, ८ जिल्ह्यांतील



नवीन ग्रामीण पाणीपुरवठा योजना राबवण्यात येतील. ८३ प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या शिवाय ५३१ ग्रामीण योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी प्रत्येक वर्षी १०० कोटी या प्रमाणे चार वर्षासाठी ४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

## जलस्वराज्य

२०१४-२०२० या कालावधीसाठी जलस्वराज्य-२ कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमाद्वारे १० दशलक्ष नागरिकांना पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या योजनेचा लाभ मिळेल. घरगुती नळ जोडणीची संख्या वाढवणे, सुविधांचा दर्जा वाढवणे व १०० टक्के ग्रामीण जनतेला सुरक्षित शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. राज्यातील १२ जिल्ह्यात ८९ टंचाईग्रस्त गावांमध्ये साठवण टाक्या उभारणी प्रकल्प, ९ जिल्ह्यांमधील ४१ गावात पाणी पुरवठा शुद्धीकरण सयंत्र, १६ जिल्ह्यांमध्ये पाणी तपासणी प्रयोगशाळा अशा विविध योजनांचा समावेश आहे.

## टँकर कमी खर्च कमी


जलयुक्त शिवार योजनेत झालेल्या उत्तम कामगिरीमुळे या वर्षी पाणी टंचाई तुलनेने कमी जाणवली. त्याचा परिणाम म्हणून टंचाईग्रस्त गाव-वाड्या वस्त्यांसाठी कमी टँकर लागेल. गेल्या दोन वर्षाच्या तुलनेने या वर्षी लावण्यात येणाऱ्या टँकरची संख्या कमी होती. पर्यायाने टँकरसाठी लागणाऱ्या खर्चात कपात झाली. ऑक्टोबर २०१४ ते जून २०१५ या टंचाई कालावधीत २ हजार ३७८ गावे, ३ हजार २६३ वाड्या यासाठी २ हजार ७७२ टँकर लावण्यात आले. त्यासाठी ७५ कोटी ६७ लाख

७२ हजार रुपये इतका खर्च झाला. ऑक्टोबर २०१५ ते जून २०१६ या कालावधीत ४ हजार ९८९ गावे, ७ हजार ९३९ वाड्यांसाठी ६ हजार १४० टँकर लावण्यात आले. त्यासाठी ३१५ कोटी १७ लाख ४३ हजार रुपये इतका खर्च झाला. ऑक्टोबर २०१६ ते जून २०१७ या कालावधीत १ हजार ७९८ गावे, ४ हजार २८१ वाड्यांना १ हजार ६६६ इतके टँकर लावण्यात आले. यासाठी ५१ कोटी ६९ लाख ५३ हजार इतका खर्च झाला. मागच्या वर्षाच्या तुलनेत या वर्षी जवळपास रु. २६३ कोटी ४७ लाख ९० हजार इतका खर्च कमी झाला.

### संकल्प स्वच्छ महाराष्ट्राचा

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर महाराष्ट्रातही या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. हे अभियान यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. मार्च २०१८ पर्यंत स्वच्छ महाराष्ट्राचा संकल्प पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

देशातील हागणदारीमुक्त ग्रामपंचायतींच्या संख्येत महाराष्ट्र प्रथम क्रमाकांवर आहे. राज्यातील ११ जिल्हे हागणदारीमुक्त झाले आहेत. त्यात सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी, वर्धा, सांगली, ठाणे, भंडारा, पुणे, नागपूर, गोंदिया या जिल्ह्यांचा समावेश आहे. २०१७-१८ अखेर उर्वरित २३ जिल्हे हागणदारीमुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. १६५ तालुके हागणदारीमुक्त करण्यात आले आहेत. राज्यातील २७ हजार ३०१ गावे हागणदारीमुक्त घोषित करण्यात आली आहेत. देशातील १० सर्वाधिक स्वच्छ जिल्ह्यांमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यासह सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी आणि ठाणे या पाच जिल्ह्यांचा समावेश असून सिंधुदुर्ग जिल्ह्याने देशात प्रथम क्रमांत पटकावला आहे. २ ऑक्टोबर २०१४ नंतर ग्रामीण भागात ४०,४६,९८५ वैयक्तिक शौचालये बांधण्यात आली. मागील तीन वर्षात वैयक्तिक शौचालयाची व्याप्ती ८५ टक्क्यांपर्यंत झाली आहे.



मागील वर्षी शौचालयाची गरज व महत्त्व पटवून देण्यासाठी कुटुंबस्तरावर संवाद अभियान राबवले. त्या अंतर्गत १८ लाख कुटुंबांना भेटी देऊन शौचालयाचे महत्त्व पटवून दिले. वैयक्तिक शौचालयाच्या लाभार्थी घटकांना पूर्वी रुपये ४ हजार ६०० एवढे अनुदान देण्यात येत होते. त्यामध्ये वाढ करून हे अनुदान रुपये १२ हजार इतके करण्यात आले आहे. हागणदारीमुक्त घोषित झालेल्या गावांमध्ये कायमस्वरूपी स्वच्छतेसाठी बांधलेल्या शौचालयाचा नियमित उपयोग करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो. गावांमध्ये गुडमॉर्निंग पथकांमार्फत पहाटे गावात जाऊन गुलाबाचे फुल दिले जाते. फोटो काढण्याची भीती दाखवली जाते. दंडात्मक कारवाई केली जाते. असे उपक्रम राबवून लोकांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

### विक्रम

शौचालय बांधण्याच्या कार्यक्रमाला गती येण्यासाठी एकाच दिवसात जास्तीत जास्त खड्डे घेण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. सुरुवातीला उस्मानाबाद जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रात १८ तासात १० हजार पेक्षा जास्त खड्डे खोदण्याचा उपक्रम राबवला. लातूर जिल्ह्यात एकाच तालुक्यामध्ये १२ तासात ८ हजारपेक्षा जास्त खड्डे केले. त्यानंतर नांदेड, हिंगोली आणि जालना जिल्ह्यानेसुद्धा हा उपक्रम राबवला. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) कार्यक्रमामध्ये काही सामाजिक संस्था आणि युनिसेफ यांच्या मदतीने हागणदारीमुक्त गाव कृतिआराखडा तयार करण्यात आला. या कृती कार्यक्रमाच्या आधारे वर्षभर गावामध्ये काम करता येणे शक्य झाले आहे.

**शब्दांकन : विष्णु काकडे,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत मागील तीन वर्षात ६,५१६ गावे/वाड्यात पेयजल सुविधांची निर्मिती. त्यासाठी ३,४८७ कोटी खर्च. २०१७-१८ या वर्षाच्या कृती आराखड्यात प्रगतिपथावरील १,३४९ गावे/वाड्या व नवीन २,७३२ गावे/वाड्यांचा समावेश. त्यासाठी रु.८१४.४४ कोटी एवढ्या निधीची तरतूद.**
- **स्वच्छ पाणीपुरवठा करता यावा यासाठी गाव/वस्त्यांना जलशुद्धीकरण सयंत्रांचा पुरवठा.**
- **पिण्याच्या पाण्याचे सर्व ४ लाख ३२ हजार सार्वजनिक उद्भव तसेच योजनेची उपांगे महाराष्ट्र रिमोट सेंन्सिग ॲप्लीकेशन सेंटर यांच्या विद्यमाने भौगोलिक माहिती प्रणालीवर जोडण्यात आली. अशा प्रणालीचा उपयोग करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य.**
- **मराठवाड्यातील जनतेला पाणी टंचाईशी सामना करावा लागू नये यासाठी वॉटरग्रीड योजना राबवण्यास मंजुरी. मराठवाड्यातील एकूण १२ हजार ९७८ गावांपैकी ९ हजार ७०८ गावांना नळ पाणी योजना उपलब्ध होणार. ७९ शहरांचाही समावेश.**
- **देशातील हागणदारीमुक्त ग्रामपंचायतींमध्ये १८ टक्के ग्रामपंचायती महाराष्ट्रातील. १८ हजार ७२८ ग्रामपंचायती हागणदारीमुक्त घोषित.**
- **आतापर्यंत ४० लाखांपेक्षा अधिक वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम पूर्ण.**
- **देशपातळीवर सुरू करण्यात आलेल्या 'स्वच्छथॉन' या अभियानाचा महाराष्ट्रातून शुभारंभ. देशपातळीवर महाराष्ट्राच्या स्वच्छता अभियानाला केंद्र पातळीवर मिळाली दाद.**

**दुरुस्ती:** सप्टेंबर, २०१७ च्या लोकराज्य अंकातील पृष्ठ क्रमांक ७१ वर असणाऱ्या मुंबई पोरबंदर प्रकल्प या उपशीर्षकामध्ये पोरबंदरऐवजी पारबंदर असे असायला हवे होते. वाचकांनी ते पोरबंदरऐवजी पारबंदर असे वाचावे. **– संपादक**



**सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात महाराष्ट्र कायम अग्रेसर राहिला आहे. गेल्या तीन वर्षात विभागाने राबवलेल्या अनेक योजना आणि उपक्रमांमुळे आरोग्यसेवा अधिक सक्षम होण्यास मदत झाली. या सेवेचा फायदा अधिकाधिक सामान्य माणसाला झाला. टेलिमेडिसीन आणि शिवआरोग्य मोटरबाईक ॲम्ब्युलन्ससारख्या अभिनव योजना राज्यात राबवण्यात येत आहेत, ज्याची दखल इतर राज्यांनीही घेतली आहे.**

**डॉ. दीपक सावंत**

**मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण**

# सक्षम आरोग्यसेवा

गेल्या तीन वर्षात आरोग्य विभागाने राबवलेल्या अनेक योजना आणि उपक्रमांमुळे राज्याची आरोग्यसेवा सक्षम होण्यास मदत झाली आहे. या सेवेचा थेट फायदा सामान्य माणसाला होत आहे. मुंबईसारख्या प्रचंड वर्दळीच्या आणि मोठ्या प्रमाणात रहदारी असणाऱ्या शहरात आपत्कालीन आरोग्यसेवा पुरवण्यासाठी 'बाईक ॲंब्युलन्स' प्रकल्पाचा शुभारंभ ऑगस्टमध्ये मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. शुभारंभानंतर महिनाभरातच २३२ रुग्णांना आपत्कालीन आरोग्यसेवा पुरवण्यात आली आहे. ही आकडेवारी या प्रकल्पाची उपयुक्तता सिद्ध करणारी आहे. मुंबईत शहरात १० वेगवेगळ्या ठिकाणी या बाईक ॲंब्युलन्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यावर प्रशिक्षित डॉक्टर 'रायडर' म्हणून काम करत आहेत. अशा या बाईक ॲंब्युलन्सची सेवा राज्यातील दुर्गम आदिवासी भागातही सुरू करण्याचा मानस आहे.

### जनआरोग्य योजना

'महात्मा फुले जनआरोग्य योजना' या योजनेची अंमलबजावणी आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे. जवळपास २ कोटी ४२ लाख लोक या योजनेच्या कक्षेत येत असल्याने महाराष्ट्रालाच या योजनेचा लाभ घेता येईल. या योजनेसाठी नवीन रुग्णालयांची सुरुवात करण्यात येणार आहे. अंत्योदय योजनेतील लाभधारक, पिवळे आणि केशरी शिधापत्रिकाधारक यांच्यासह १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील पांढरे शिधापत्रिकाधारक आणि माजी स्वातंत्र्यसैनिक यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

'शिवआरोग्य टेलीमेडिसिन' योजनेच्या माध्यमातून दुर्गम भागातील आजारी रुग्णांशी टेलीमेडिसिनद्वारे संपर्क साधुन त्यांना तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन (सेकंड ओपिनिअन) दिले जाते. तज्ज्ञ डॉक्टरांना रुग्णांचा एक्स-रे, एमआरआय, इसीजी यांसारख्या विविध रिपोर्ट्सची पाहणी इंटरनेटमार्फत करता येते. या योजनेसाठी मुंबईतील २५ डॉक्टरांचा एक गट तयार करण्यात आला असून, त्यात विविध तज्ज्ञांचा समावेश आहे. व्ही-सॅट या तंत्रज्ञानाचा वापर या योजनेसाठी करण्यात येत असून, जेथे वीज नाही अशा ठिकाणी सौरऊर्जेचा वापर करण्यात येत आहे. राज्याच्या टेलिमेडिसिन आणि शिवआरोग्य मोटरबाईक ॲम्ब्युलन्सच्या कार्यामुळे उत्तरप्रदेशचे आरोग्यमंत्री खूप प्रभावित झाले. राज्याच्या या सेवांचे मॉडेल उत्तर प्रदेशात राबवण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रकडे सहकार्याची विचारणा केली आहे.

### दर्जात्मक व गुणात्मक वाढ

आरोग्य संस्थांमध्ये दर्जात्मक व गुणात्मक वाढ करण्यासाठी आम्ही गेल्या तीन वर्षांत सर्वाधिक प्राधान्य दिले. ग्रामीण भागात तळागाळांतल्या माणसाला आरोग्य सेवा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. अस्तित्वात असलेल्या आरोग्यसंस्थांच्या सक्षमीकरणासोबतच नव्याने १११ नवीन आरोग्य संस्था निर्माण करण्यात आल्या. शासकीय रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांच्या रक्त व लघवी तपासणीसाठी विनामुल्य सुविधा, अशी सुविधा ३६० ठिकाणी सुरू करण्यात आली आहे. ही प्री डायग्नॉस्टिक सेवा सुरू करून, शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्ण तपासणीसाठी असलेली



महागडी यंत्रसामग्री दुरुस्त करण्यासाठी खासगी संस्थेसोबत करार करण्यात आला. यामुळे गेल्या काही महिन्यात १३ हजार नादुरुस्त उपकरणे सुरू करण्यात आली. विशेषज्ञांची कमतरता लक्षात घेता सीपीएस अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. विभागात कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी १३ विशेष सेवांचा या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला. यामुळे ११५ विशेषज्ञ उपलब्ध झाले. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून दरवर्षी १५० विशेषज्ञ उपलब्ध करून देण्यात येतील. स्वाईन फ्लूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवण्यात येत आहेत. खासगी डॉक्टरांच्या बैठका घेऊन त्यांना स्वाईन संशयित रुग्णांची तातडीने माहिती देण्याबाबत आणि ऑसेलटॅमीवीर औषध देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. जोखमीतील रुग्णांना मोफत स्वाईन फ्लू प्रतिबंधक लस देण्यात येत आहे. हिवताप कमी झाला असून चंद्रपूर वगळता अन्यत्र त्याचा प्रादुर्भाव जाणवला नाही.

### टास्क फोर्स

पालघर जिल्ह्यातील कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूंवर उपाययोजना करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी 'टास्क फोर्स' स्थापन केला. त्यामाध्यमातून होत असलेल्या उपाययोजनांमुळे बालमृत्यू रोखण्यात यश येत आहे. नाशिकमधील जिल्हा रुग्णालयात झालेल्या अर्भक मृत्यूची गंभीर दखल शासनाने घेतली. या घटनांच्या पार्श्वभूमीवर एकंदरीतच अर्भक मृत्यूंची कारणमीमांसा करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमण्यात आली. त्याचबरोबर राज्यातील विशेष नवजात उपचार कक्षातील (एसएनसीयू) खाटांची क्षमता वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. भारतीय बालरोग तज्ज्ञांच्या संघटनेने एसएनसीयूमधील बालकांची तपासणी तसेच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याविषयी तयारी दर्शवली. त्याचबरोबर अर्भकांना देण्यात येणारी प्रतिजैविके वापरावयाची कार्यपद्धती (प्रोटोकॉल) तज्ज्ञांकडून तयार केली जात आहे.

बालरोग तज्ज्ञांच्या संघटनेमार्फत जानेवारी २०१६ ते जुलै २०१७ या कालावधीत राज्यातील बालकांची तपासणी करण्यात आली. त्यात १८३१ बालकांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ९ जिल्ह्यात डिस्ट्रिक्ट अर्ली इंटरव्हेंशन सेंटरची स्थापना करण्यात आली. त्या माध्यमातून २ लाख १५ हजार बालकांची तपासणी व उपचार करण्यात आले. उर्वरित २५ जिल्ह्यात अशी केंद्रे सुरू करण्याची कार्यवाही सुरू आहे.

### प्रेरणा प्रकल्प

मराठवाडा आणि विदर्भ या भागातील १४ जिल्ह्यांमध्ये 'प्रेरणा प्रकल्प' सुरू करण्यात आला. या प्रकल्पांतर्गत दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे समुपदेशन करण्यासाठी व्यावसायिक समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली. १४ जिल्ह्यांमध्ये जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम व दीर्घकालीन आजारी असणाऱ्या परंतु ज्यांची काळजी घेण्यास कुणीही नाही, अशा मानसिक रुग्णांसाठी ठाणे, पुणे, नागपूर व रत्नागिरी या ४ जिल्ह्यांमध्ये मनोरुग्णालयात उपचारांची सुविधा करण्यात आली. १०४ हा 'मानसिक आरोग्य हेल्पलाइन' क्रमांक सुरू करण्यात आला. नैराश्याच्या गर्तेत अडकलेल्या शेतकऱ्याला सावरण्यासाठी या प्रकल्पाच्या माध्यमातून आधार मिळत आहे.

'राष्ट्रीय आरोग्य अभियान' अंतर्गत 'आपत्कालीन वैद्यकीय सेवा' (क्रमांक १०८) सुरू करण्यात आली. अशा प्रकारच्या ९३७ रुग्णवाहिकेच्या माध्यमातून चोवीस तास मोफत आपत्कालीन आरोग्य सेवा पुरवली जात आहे. १०८ हा क्रमांक जनतेला माहीत झाल्याने अनेक वेळा गरोदरपणात उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीसाठी देखील या क्रमांकावर मोठ्या प्रमाणात कॉल केले जातात. टाटा मेमोरियल हॉस्पिटलमधून कर्करोगाचे प्रशिक्षण घेतलेल्या आणि सद्य:स्थितीत राज्यात वैद्यकीय व्यवसाय करत असलेल्या डॉक्टरांच्या मदतीने कर्करोगाबद्दल जनजागृती करण्यासाठी, 'कॅन्सर वॉरियर्स' प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्यासाठी ५७ तज्ज्ञ डॉक्टर गावपातळीवर जाऊन काम करत आहेत. जून २०१७ पर्यंत या प्रकल्पाच्या माध्यमातून ११,८१६ बाह्यरुग्ण तपासणी, २७५४ आयपीडी आणि ६४२ कर्करोग शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

**शब्दांकन : अजय जाधव,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **राज्यातील ३१ जिल्हा रुग्णालयात सिटी स्कॅन बसवण्यासाठी मंजुरी. दोन टप्प्यात ही यंत्रे बसवणार. पहिल्या टप्प्यात १६ ठिकाणी बसवले जातील.**
- **आरोग्य विभागातील रिक्त पदे १०० टक्के भरण्यासाठी विशेष बाब म्हणून मंजुरी. तीन वर्षात वर्ग तीन व चार संवर्गातील ४००० रिक्त पदांची भरती.**
- **विषाणूजन्य रोगांचा अभ्यास करण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यात व्हॉयरॉलॉजी प्रयोगशाळा.**
- **मराठवाडा आणि विदर्भ या भागातील १४ जिल्ह्यांमध्ये 'प्रेरणा प्रकल्प' सुरू. या प्रकल्पांतर्गत दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे समुपदेशन करण्यासाठी व्यावसायिक समुपदेशकांची नियुक्ती.**
- **हरिसाल, गोपिनाथगड, खापर, पोटेगाव आणि गोरा या ५ आरोग्य केंद्रांच्या ठिकाणी सुसज्ज कंटेनरमध्ये ई-हेल्थ सेंटर सुरू.**
- **शहरी तसेच ग्रामीण भागात नव्याने विकसित करण्यात आलेल्या संगणक प्रणालीच्या माध्यमातून जन्म व मृत्यूची नोंदणी.**
- **केंद्र शासनाच्या उपक्रमांतर्गत महिलांसाठी 'अंतरा एमपीए' या गर्भनिरोधनाच्या इंजेक्शन सुविधेचा शुभारंभ करण्यासाठी महाराष्ट्राची निवड.**
- **रस्ते आणि महामार्गावर घडणाऱ्या अपघातात जखमी होणाऱ्या अपघातग्रस्तांना 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळण्याकरिता 'बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजना' कार्यान्वित. या योजनेंतर्गत अपघातग्रस्तांना ३०,००० रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण कवच. राज्यातील २०० ट्रॉमाकेअर रुग्णालयांचा या योजनेत समावेश.**



**समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक असा सर्वांगीण विकास करण्यासाठी गेल्या तीन वर्षात अनेक निर्णय घेण्यात आले. याचा लाभ घेऊन अनेकांचे जीवनमान उंचावले. जुन्या योजनांमध्ये सुधारणा करण्यात आली. काही योजना नव्याने सुरू करण्यात आल्या. पुढील काळातही कल्याणकारी योजना राबवून अनुसूचित जाती, जमाती, दुर्बल व वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.**

**राजकुमार बडोले**

**मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय**

# सर्वांगीण विकासाचा ध्यास

दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी यासाठी विद्यार्थ्यांना विविध स्तरावर वेगवेगळ्या प्रकारची शिष्यवृत्ती देण्यात येते. ही शिष्यवृत्ती महा-डीबीटी या संकेतस्थळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येते. अनुसूचित जातीच्या मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षण घेता यावे यासाठी सुरू करण्यात आलेल्या परदेश शिष्यवृत्ती योजनेत सुधारणा करण्यात आली. उत्पन्नाची मर्यादा आता ६ लाख रुपये करण्यात आली आहे. दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांची निवड केली जाते. जागतिक क्रमवारीमध्ये पहिल्या १०० क्रमांकांमध्ये असणाऱ्या विद्यापीठांमध्ये तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही उत्पन्न मर्यादा लागू नाही.

विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातून इयत्ता १० आणि १२वीच्या परीक्षेत राज्यात व मंडळात (बोर्डात) प्रथम येणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनीस २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून स्व.वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. प्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीस प्रत्येकी १ लाख रुपये तर विभागीय मंडळात प्रथम आलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस प्रत्येकी ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते.



ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही अथवा ज्यांनी प्रवेश घेतला नाही अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी 'स्वाधार' ही योजना नव्याने सुरू करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते. इयत्ता ११ वी, पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वार्षिक खर्चासाठी ४३ हजार ते ६० हजार रुपये अनुदान देण्यात येते. अपंगांच्या खासगी १२३ विशेष निवासी व अनिवासी शाळा व कार्यशाळांना अनुदान तत्त्वावर मंजुरी देण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यात जात पडताळणी समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ३६ समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

### आर्थिक प्रगतीसाठी

औरंगाबाद, पुणे, नागपूर येथे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेच्या तयारीसाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील ५० तरुणांसाठी मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र सुरू केले. दिल्लीत नामांकित प्रशिक्षण केंद्रात ५० विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण दिले जाते.

तरुण-तरुणींना उद्योग/व्यवसाय सुरू करता यावा यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या आर्थिक विकास महामंडळामार्फत साहाय्य करण्यात येते. महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळास केंद्र शासनाच्या दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.

### आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक

इंदूमिल येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याचा प्रश्न मार्गी लागला असून, लवकरच तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याच्या कामास सुरुवात होणार आहे. डॉ. आंबेडकर लंडनमध्ये शिकत असताना ते राहत असलेले, १० किंग हेन्री मार्गावरील घर राज्य शासनाने खरेदी केले. तेथेही स्मारक उभारण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यात ज्या ज्या ठिकाणी विविध सामाजिक चळवळ केली अशी ठिकाणे व डॉ. बाबासाहेबांचे वास्तव झालेली ठिकाणे तीर्थक्षेत्र/पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्यात येतील. तळेगाव दाभाडे येथील बाबासाहेबांचे निवासस्थान ऐतिहासिक स्मारक म्हणून विकसित करण्यात येणार आहे. सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि मुंबईतील घाटकोपर चिरागनगर येथे स्मारक उभारण्यात येणार आहे. पुण्यातील संगमवाडी येथे क्रांतिवीर लहूजी साळवे यांचे स्मारक उभारण्याचा प्रस्ताव आहे.

### समता व सामाजिक न्याय वर्ष

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५वे जयंती वर्ष हे समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. निवडक अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तींच्या सर्वंकष विकासाची योजना तयार करण्यात आली. पाली-त्रिपीटकच्या मराठी भाषांतरासाठी समिती गठित करण्यात आली.

व्यसनमुक्तीच्या जनजागृतीसाठी दरवर्षी साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते. व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्यरत समाजसेवक आणि संस्थांचा सन्मान करण्यात येतो. व्यसनमुक्तीचे कार्य प्रभावी व्हावे, यासाठी १२ स्वयंसेवी संस्थांना अनुदान देऊन व्यसनमुक्ती केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. अनुसूचित जाती/जमाती आयोगाला संविधानिक दर्जा देण्यासाठी तत्वत: मान्यता मिळाली आहे. अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सहा विभागीय ठिकाणी विशेष न्यायालये सुरू करण्यास मान्यता मिळाली असून तीन ठिकाणी न्यायालये सुरू झाली आहेत.

**शब्दांकन : विष्णू काकडे,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **एम.फिल व पीएच.डी. करणाऱ्या नवबौद्ध व अनुसूचित जातीतील महिलांसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती २०१५-१६ पासून सुरू. कनिष्ठ संशोधकासाठी २५ हजार रुपये, वरिष्ठ संशोधकासाठी २८ हजार रुपये फेलोशीप.**
- **लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने ५० विद्यार्थ्यांना एम.फिल. व पीएच.डी. शिक्षणासाठी देशातील पहिली फेलोशीप सुरू.**
- **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा ४.५० लाखांवरून ६ लाख रुपये करण्याचा निर्णय. त्यामुळे ५९ हजार ३१८ विद्यार्थ्यांना याचा लाभ.**
- **वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही अथवा ज्यांनी प्रवेश घेतला नाही अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी 'स्वाधार' योजनेंतर्गत गेल्यावर्षी ७ हजार ११० इतक्या विद्यार्थ्यांना लाभ. २०१७-१८ साठी २५ हजार विद्यार्थ्यांची निवड. मागासवर्गीय शासकीय वसतिगृहात अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनाच्या विद्यार्थ्यांना प्रवेशाचा निर्णय. त्यामुळे थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना लाभ.**
- **ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी धोरण. त्यांच्यासाठी समुपदेशन केंद्र, विरंगुळा केंद्र, आरोग्य सुविधा केंद्र, तक्रार निवारण केंद्र यांची निर्मिती.**
- **मुंबई, पुणे व नागपूर शहरात काम करणाऱ्या महिलांसाठी वर्किंग वुमन्स वसतिगृह. ४३ तालुक्यांमध्ये मुलींसाठी वसतिगृह. विभागीय स्तरावर ७ अशी एकूण ५० वसतिगृहे सुरू.**
- **केंद्र शासनाने स्थापन केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या धर्तीवर महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानाची स्थापना.**

**जलसंधारणाच्या माध्यमातून शेतीला मुबलक पाणी मिळावे यासाठी प्रभावी प्रयत्न करण्यात येत आहेत. जलसाक्षरतेच्या अनुषंगाने जलयुक्त शिवार योजना उपयुक्त ठरत आहे. या अभियानांतर्गत झालेल्या कामांमुळे शेततळी, बंधारे भरण्यास सुरुवात झाली आहे. जलाशयांमुळे भूजल पातळी वाढत असल्याने, भविष्यातील पाणी व चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. टंचाईमुक्त महाराष्ट्र आणि सर्वांसाठी पाणी या उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने महाराष्ट्राने उत्तुंग झेप घेतली आहे.**



**प्रा. राम शिंदे**

**मंत्री, मृद व जलसंधारण, राजशिष्टाचार**

# जलसमृद्धी करेल टंचाईमुक्ती

राज्यातील शेतकऱ्यांना समृद्ध करून, त्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्याचे महत्त्वपूर्ण काम शासन करत आहे. राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील जनतेला मुख्य प्रवाहात आणून; त्यांना सक्षम करण्याचे ध्येय शासनाने ठेवले आहे. या दोन्ही गोष्टी साध्य करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विविध योजनांच्या माध्यमातून कामे होत आहेत. मृद व जलसंधारण आणि विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग मंत्रालयाचा यात मोठा सहभाग आहे. या नव्यानेच सुरू झालेल्या दोन्ही विभागामार्फत शेतकरी व वंचित समाजाच्या सक्षमीकरणासाठी व त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सुरू आहे. जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजना यांच्या माध्यमातून या वर्गाच्या संपन्नतेसाठी योजना आखण्यात येत आहेत.

छायाचित्र : दिलीप कवळी




**जलयुक्त शिवार अभियानांतर्गत विकसित दहिगाव तलाव, शहापूर.**

## कल्पकता आणि प्रयत्न

कल्पकता आणि प्रयत्न यांच्या माध्यमातून माणसाने वाळवंटातही हिरवळ फुलवली आहे. जगाच्या पाठीवर अशी अनेक उदाहरणे आपल्याला दिसतील. पाऊस कमीजास्त प्रमाणात सर्वत्र पडणाऱ्या, आणि सुपीक जमीन असलेल्या महाराष्ट्रात दुष्काळ, नापिकी आणि कर्जाच्या बोज्यामुळे शेतकऱ्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. यातून मार्ग काढण्यासाठी सर्वात महत्त्वाचे आणि पहिले पाऊल म्हणजे महाराष्ट्राला पाणीटंचाईच्या समस्येतून मुक्त करण्यासाठी गेल्या तीन वर्षात ठोस उपाययोजना करण्यात आल्या. २०१४ मध्ये विद्यमान सरकार सत्तेवर आल्यावर 'जलयुक्त शिवार अभियान' राबवण्याची आणि २०१९ पर्यंत महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याची महत्त्वाकांक्षी योजना जाहीर करण्यात आली. या अभियानात २०१५ ते २०१९ या पाच वर्षांत दरवर्षी ५,००० याप्रमाणे २५,००० गावे पाणीटंचाईमुक्त करण्याचे ध्येय शासनाने ठरवले. गेल्या दोन वर्षात झालेल्या कामांमुळे अनेक गावे ही टंचाईमुक्तीच्या दिशेने वाटचाल करू लागली आहेत.

२०१५-१६ मध्ये ६२०२ गावे या योजनेतून निवडण्यात आली. त्यात २,५४,८४७ कामांचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. त्यापैकी २,५३,६२० कामे पूर्ण झाली असून १२२७ प्रगतिपथावर आहेत. तर २०१६-१७ या वर्षात ५,२९१ गावातील १,६४,७९७ कामे घेण्यात आली. त्यातील १,४३,८३७ कामे पूर्ण तर २०,९६० प्रगतिपथावर आहेत. २०१७-१८ वर्षासाठी ५००० गावांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

## लोकचळवळ

शेतकरी, सामान्य नागरिक या अभियानात तनमनधनाने सहभागी झाले आहेत. याचबरोबर स्वयंसेवी संस्था आणि उद्योग कंपन्यांनी या अभियानात

सक्रिय सहभाग नोंदवला आहे. शिर्डी संस्थान आणि सिद्धिविनायक ट्रस्ट अशा धार्मिक संस्थांनीही प्रत्येकी ३४ कोटी रुपये देऊन या अभियानात सहभाग नोंदवला आहे. पाण्याचा ताळेबंद करणे, ग्रामस्थांनी सुचवल्यानुसार कामांचा अंतर्भाव करून, कृती आराखडा तयार करणे, याला ग्रामसभेची मान्यता घेण्यात आल्याने लोकांचा सहभाग या कामात वाढला आहे.

### तंत्रज्ञानाची जोड

जलयुक्त शिवार योजनेच्या यशस्वितेसाठी यंत्रणेला तंत्रज्ञानाची जोड दिली तर पारदर्शकता, वेग, अचूकता अशा अनेक गोष्टी साध्य होतील या दृष्टीने १ सप्टेंबर २०१५ पासून एमआरसॅक प्रणाली अमलात आणली गेली. ही प्रणाली पूर्णपणे जीपीएस टॅगिंगवर आधारित आहे. कामाचे स्थळ निश्चित राहावे यासाठी काम सुरू होण्यापूर्वी, सुरू असताना आणि पूर्ण झाल्यानंतर कामाच्या स्थळाचा अक्षांश-रेखांश अंकित असलेले डिजिटल छायाचित्र काढण्यात आले. यामुळे ग्रामस्थांनी सुचवलेले स्थळ, कामाचे स्थळ याबाबत नेमकेपणा अधोरेखित करता आला. अक्षांश-रेखांश अंकनामुळे स्थळ पुनरावृत्तीची शक्यता मावळली आहे. तसेच या अभियानासाठी विशेष सॉफ्टवेअर ॲप तयार करण्यात आले आहे.

### दिलासा आणि संधी

समाजाच्या अगदी खालच्या स्तरावर असलेला वर्ग म्हणजे विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास व इतर मागास प्रवर्गातील होय. अनेकवेळा शासनाच्या योजना या नागरिकांपर्यंत पोहोचण्यात अडचणी येतात. अनेक योजना या कालबाह्य झाल्या आहेत किंवा सध्याच्या काळात अत्यंत अपुऱ्या आहेत. या सर्व योजनांचा आढावा सध्या घेण्यात येत आहे. सुमारे वीसहून अधिक योजना या लोकांशी थेट निगडित आहेत. २० टक्के बीज भांडवल योजना असो की मागास वर्ग वित्त व विकास महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजना या सर्वांची रचना बदलण्यात येणार आहे. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाचे काम हे लोकांशी निगडित योजनांशी संबंधित आहे. या विभागाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचाव्यात, या योजनांचा लाभ घेण्यासाठी कुठल्याही कार्यालयात जाऊ लागू नये, यासाठी योजनांची सर्व प्रक्रिया ऑनलाइन करण्यावर भर देण्यात येणार आहे. विविध महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या स्वयंरोजगारासाठीच्या योजनाही या ऑनलाइन स्वरूपात आणण्यात येतील. योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जावा यासाठी यंत्रणा उभी करण्यात येणार आहे.

या विभागामार्फत इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्तीच्या माध्यमातून शैक्षणिक मदत केली जाते. विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, केंद्रपुरस्कृत योजनेतून इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर तसेच विशेष मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक सुविधा देण्यात येतात.

### तांडा/वस्ती सुधार

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजनेमध्ये समाविष्ट करण्यासाठी वस्ती/तांड्यांची यादी करण्यासाठी आराखडा सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या योजनेतून स्मार्ट तांडा/वस्ती तयार करण्यावर भर देण्यात येणार आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना व मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना या अधिक लोकाभिमुख करण्यासाठी फेरआराखडा सादर करण्यात येणार आहेत. वाहन चालक प्रशिक्षण योजना जिल्हास्तरावरून राबवण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या कर्ज योजनांचा लाभ हा समाजातील आर्थिक दुर्बल घटक घेत असल्याने, तळागाळांतील जास्तीत जास्त लोकांपर्यंत या योजनांचा लाभ पोहोचण्यासाठी योजनेत बदल करण्यात येणार आहेत.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **जलयुक्त शिवार योजनेंतर्गत गेल्या दोन वर्षात सुमारे ११,४९३ गावातील ४,१८,१०१ कामांपैकी ३,९३,५१५ कामे पूर्ण. २०१७-१८ वर्षासाठी पाच हजार गावांचे उद्दिष्ट निर्धारित.**
- **जलयुक्त शिवार योजनेंतर्गत लोकांच्या गरजेनुसार कामे करण्यास प्राधान्य. त्यामुळे हे अभियान झाले लोकचळवळ.**
- **या अभियानांतर्गत होणारी कामे दीर्घकाळ उपयुक्त ठरतील यासाठी गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि पारदर्शक होण्याकडे शासनाचे लक्ष केंद्रित.**
- **जलयुक्त शिवार अभियानाच्या अंमलबजावणीत ग्रामसभेच्या भूमिकेला महत्त्व देण्यात येत असल्याने अभियानास मोठी चालना.**
- **जलयुक्त शिवार अभियानातील कामांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध. कामात पारदर्शकता.**
- **या अभियानाचे सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन विकसित. त्याअंतर्गत येणाऱ्या कामांचे जीपीएस आधारित सातत्याने अपडेटिंग. एखादी सरकारी योजना अशा रीतीने ऑनलाइन होण्याची पहिलीच वेळ.**
- **उच्च शिक्षण घेणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती. नव्याने या विभागाची निर्मिती झाल्यानंतर या शिष्यवृत्तीच्या व्यापकतेत वाढ. यामध्ये ६०१ विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश.**
- **विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व परीक्षा शुल्क, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, सैनिकी शाळेत शिक्षण घेण्यासाठी निर्वाह भत्ता, मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती.**




**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामीण लोकांना रोजगार व गावांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. मागील तीन वर्षात या योजनेमध्ये काही महत्त्वपूर्ण बदल करत त्याची प्रभावी अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे. पर्यटन विभागामार्फत २०१७ हे वर्ष व्हिजिट महाराष्ट्र वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. महाराष्ट्र हे पर्यटकांचे आवडते डेस्टिनेशन ठरावे, या दृष्टीने शासन विविध उपाययोजना राबवत आहे.**


**जयकुमार रावल**

**मंत्री, पर्यटन, रोजगार हमी**


# संधी रोजगाराची, समृद्ध होण्याची...

देश-विदेशातील पर्यटकांना महाराष्ट्रात आकर्षित करून येथील पर्यटनाला चालना देण्यासाठी व्यापक उपाययोजना हाती घेण्यात आल्या. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये (मनरेगा) महत्त्वपूर्ण बदल करून ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधांचे जाळे उभारण्यात यश आले.




## निधीत वाढ

महाराष्ट्रात मनरेगा योजनेसाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून २०१४-१५ पासून निधी उपलब्धतेमध्ये सातत्याने वाढ करण्यात आली आहे. २०१४-१५ मध्ये १६०८ कोटी रुपये, २०१५-१६ मध्ये १८५३ कोटी रुपये तर २०१६-१७ मध्ये २०९० कोटी रुपयांची कामे या योजनेतून महाराष्ट्रात करण्यात आली. कामांच्या संख्येत दर वर्षी वाढ होत आहे. २०१७-१८ या वर्षात केंद्र आणि राज्य शासनाकडून ३ हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होत आहे. या वर्षात आतापर्यंत पायाभूत सुविधा निर्मितीची ४० हजार कामे पूर्ण झाली आहेत. योजनेंतर्गत सद्य:स्थितीत ४ लाख ९५ हजार ४७० इतकी कामे शेल्फवर असून १२.७३ कोटी मनुष्य दिवस इतकी त्यांची मजूरक्षमता आहे.

## थेट लाभ

मनरेगामधील वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठीचे अनुदान लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय विभागामार्फत घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे लाभार्थी त्यांना लागणारे साहित्य स्वत: अधिकृत दुकानदारांकडून खरेदी करू शकणार असल्याने, कामांना वेग येईल.

सिंचन विहीर, शेततळे, फळबाग लागवड, शौचालय, शोषखड्डे इत्यादी वैयक्तिक लाभाच्या योजना विभागामार्फत राबवण्यात येतात. यासाठीचे सिमेंट, वीट, वाळू, स्टील इत्यादी साहित्य खरेदीसाठीचे अनुदान लाभार्थ्यांना थेट त्यांच्या खात्यावर देण्यात येणार आहे.

## समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण

राज्याची सामाजिक, आर्थिक, कृषीविषयक स्थिती आणि गरजा लक्षात घेऊन १ ऑक्टोबर २०१६ पासून 'समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजना' कार्यान्वित करण्यात आली आहे. ही योजना ११ कलमी कार्यक्रमाच्या स्वरूपात राबवण्यात येत आहे. अहिल्यादेवी सिंचन विहीर, अंकुर रोपवाटिका, निर्मल शोषखड्डा, कल्पवृक्ष फळबाग लागवड, भू-संजिवनी व्हर्मी कंपोस्टिंग, समृद्ध ग्राम, अमृतकुंड शेततळे, भू-संजीवनी नाडेप कंपोस्टिंग, निर्मल शौचालय, समृद्ध गाव तलाव, नंदनवन वृक्षलागवड अशा या योजना आहेत.

## ४८ हजार अमृतकुंड शेततळी पूर्ण

'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत सध्या ७ हजार ८७७ शेततळ्यांची कामे सुरू आहेत. देशातून पंतप्रधान पुरस्काराकरिता १० उत्कृष्ट नावीन्यपूर्ण योजनांची निवड करण्यात आली होती. त्यात महाराष्ट्रातून 'मागेल त्याला शेततळे' योजनेचा समावेश सर्वोत्कृष्ट योजना म्हणून करण्यात आला. याशिवाय या योजनेच्या ऑनलाइन ॲप्लिकेशन मॉडेलला २०१६ सालचा 'स्कॉच वॉर्ड प्लॅटिनम'



पुरस्कार प्राप्त झाला आहे. कल्पवृक्ष फळबाग योजनेंतर्गत १ लाख ११ हजार १११ कामांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून ५३ हजार ४०७ कामे चालू व पूर्ण अवस्थेत आहेत.

### इतेहाद, जेट एअरवेजबरोबर सामंजस्य करार

२०१७ हे वर्ष 'व्हिजिट महाराष्ट्र' म्हणून जाहीर केले आहे. महाराष्ट्र राज्य हे एक पर्यटन ब्रँड व्हावे यासाठी पर्यटन विभाग अनेक उपक्रम राबवत आहे. देशातील आणि परदेशातील पर्यटकांचा राज्यात ओघ वाढून पर्यटनाला चालना मिळावी यासाठी इतेहाद आणि जेट एअरवेज या विमान वाहतूक कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे. या दोन विमान वाहतूक कंपन्यांचे इनफ्लाईट मॅगझीन, संकेतस्थळ, कंपन्यांकडून होणारे प्रवासी मेळावे, प्रदर्शने आदींच्या माध्यमातून महाराष्ट्रातील संस्कृती, पर्यटनस्थळांची माहिती देशविदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचवली जात आहे.

### डिअर पार्क ते क्रोकोडाईल पार्क

अमरावती येथे विकसित होत असलेला डिअर पार्क, चिपळूण येथील क्रोकोडाईल पार्क, भंडारदरा, चिखलदरा, सिंधुदुर्ग, सह्याद्रीच्या रांगा, दुर्लक्षित किल्ले, समुद्रकिनारे, थंड हवेची ठिकाणे अशा विविध ठिकाणी स्थानिकांसमवेत भागीदारी करून निवासव्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. यामुळे स्थानिकांना रोजगार मिळण्याबरोबरच, पर्यटकांनाही दर्जेदार आणि खात्रीची निवासव्यवस्था मिळू शकेल.

### 'मुंबई दर्शन' एक वेगळा उपक्रम

मुंबईतील पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व ओला टॅक्सी कंपनी यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या कंपनीमार्फत 'मुंबई दर्शन' हा एक वेगळा उपक्रम राबवण्यात येत आहे. जुहू बीच, मन्नत बंगला, हाजी अली, मरीन ड्राइव्ह, गेट वे ऑफ इंडिया, सिद्धिविनायक मंदिराबरोबरच इतर ठिकाणांचा समावेश यामध्ये करण्यात आला आहे. सध्या मुंबईत १०० तरुणांना तर उर्वरित महाराष्ट्रात ४०० तरुणांना गाईडचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

### मुंबई शॉपिंग फेस्टिव्हल

राज्यात पर्यटन विकासाला मोठा वाव असून, पारंपरिक पर्यटनासोबत पर्यटनाची नवीन क्षेत्रे शोधून त्यात भर घालण्यात येत आहे. यासंदर्भात विविध देशांना भेटी देऊन सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या देशांसमवेत परस्परसाहाय्य घेण्यात येत असून महाराष्ट्र हे जागतिक दर्जाचे पर्यटन राज्य करण्याच्या दृष्टीने व्यापक प्रयत्न सुरू आहेत. मुंबईतील पर्यटनाला चालना देण्यासाठी दुबई फेस्टिव्हलच्या धर्तीवर २१ डिसेंबर २०१७ ते ६ जानेवारी २०१८ या कालावधीत 'मुंबई मेला शॉपिंग फेस्टिव्हल' घेण्यात येणार आहे.




**शब्दांकन : इर्शाद बागवान,**
विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून (मनरेगा) २०१४-१५ मध्ये १ लाख ४८ हजार, २०१५-१६ मध्ये १ लाख ६ हजार तर २०१६-१७ मध्ये १ लाख ५० हजार इतक्या पायाभूत सुविधा निर्मिती.
- समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेंतर्गत वैयक्तिक व सार्वजनिक लाभाच्या कामांना प्राधान्य.
- अहिल्यादेवी सिंचन विहीर योजनेंतर्गत १ लाख ११ हजार १११ विहिरींच्या बांधकामाचे उद्दिष्ट निश्चित. त्यापैकी १ लाख ८ हजार ९३८ कामे पूर्ण व चालू अवस्थेत. या योजनेच्या माध्यमातून साधारण २.२५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार.
- 'मागेल त्याला शेततळे' योजनेंतर्गत १ लाख ११,१११ शेततळ्यांचे उद्दिष्ट निश्चित. त्यापैकी ४८ हजार ४१३ शेततळ्यांची कामे पूर्ण.
- 'मागेल त्याला शेततळे' या योजनेची आदिवासी उपयोजना क्षेत्रासह कोकणामध्ये व्याप्ती वाढावी म्हणून जमीन धारणेची मर्यादा कमी करण्याचा निर्णय.
- कल्पवृक्ष फळबाग योजनेंतर्गत ७ कोटी ४१ लाख ६० हजार रोपांची निर्मिती.
- पर्यटन विभागामार्फत निवास – न्याहरी योजना कार्यान्वित. त्यासाठी आदरातिथ्य क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय एअर बीएनबी कंपनीबरोबर सामंजस्य करार.
  या माध्यमातून महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांवर दर्जेदार आणि आंतरराष्ट्रीय मानके असलेली निवासव्यवस्था उपलब्ध होण्यास चालना. याद्वारे राज्यभरात आदरातिथ्य (हॉस्पिटॅलिटी) क्षेत्रात किमान ५० हजार लघुउद्योजकांना संधी.



**सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाला अद्यावत तंत्रज्ञानाची जोड देण्यात येत आहे. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाची अर्थवाहिनी असलेल्या सहकारी संस्थांचे सक्षमीकरण केले जात आहे. सहकाराच्या माध्यमातून शेती व बिगरशेती संस्था, साखर कारखाने, सूतगिरण्या अशा सहकारी संस्था ग्रामीण, शहरी भागात स्थापना झाल्या आहेत. 'मेक इन व्हिलेज' ही संकल्पना समोर ठेवून, ग्रामीण विकासाला चालना देण्याचे कार्य शासनाने गेल्या तीन वर्षात केले आहे.**

**सुभाष देशमुख**

मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग

# सन्मान आणि सक्षमीकरण

सहकाराच्या माध्यामतून शेती व बिगर शेती संस्था, साखर कारखाने, सूतगिरण्या अशा सहकारी संस्था ग्रामीण आणि शहरी भागात स्थापना झाल्या आहेत. त्यामुळे 'मेक इन व्हिलेज' ही संकल्पना समोर ठेवून, ग्रामीण विकासाला चालना देण्याचे कार्य शासनाने गेल्या तीन वर्षात केले आहे.

शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. गेल्या वर्षी राज्यात चांगला पाऊस झाल्याने तुरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले होते. तूर उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, त्यासाठी तुरीला ५ हजार ५० रुपये हमीभाव देण्यात आला. देशातील एकूण खरेदीच्या ५० टक्क्यांपेक्षा (६५ लाख क्विंटल) अधिक तूर खरेदी महाराष्ट्रात करण्यात आली.

## कृषी सन्मान




देशाच्या इतिहासातील अभूतपूर्व असा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय शासनाने घेतला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना ३४,०२२ कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात येत आहे. त्याचबरोबर जे शेतकरी नियमित कर्ज भरत आहेत त्यांच्या बँक खात्यात २५ टक्के प्रोत्साहनपर अनुदान जमा करण्यात येत आहे. या कर्जमाफीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.

## शेतकरी आठवडी बाजार

शेतकरी ते ग्राहक या योजनेंतर्गत 'श्री संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडी बाजार' ही नवीन संकल्पना शासन राबवत आहे. यामुळे शेतमालाचा भाव ठरवण्याचा अधिकार थेट शेतकऱ्यांना प्राप्त झाला. यामुळे त्यांची दलालांपासून सुटका आणि शेतीमाल विक्रीसाठी सक्षम पर्याय उपलब्ध झाला आहे.

## कृषी पतपुरवठा संस्थेचे सभासदत्व

राज्यात सुमारे १ कोटी ३६ लाख खातेदार शेतकरी आहेत. या सर्व शेतकऱ्यांना गावपातळीवर सुलभरीत्या पीककर्ज पुरवठा व इतर सुविधा मिळण्याच्या दृष्टीने प्राथमिक कृषी पत पुरवठा सहकारी संस्थेचे सभासदत्व देण्यात आले आहे. त्यामुळे प्राथमिक कृषी पत पुरवठा संस्थांच्या भागभांडवलात ५ कोटी रूपयांची वाढ झाली असून कर्ज उभारण्याची मर्यादा वाढण्यास मदत झाली आहे.


## आंब्याची चारपटीने निर्यात



हापूस व केशर आंब्यास जागतिक बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात मागणी आहे. निर्यात होणाऱ्या देशांमध्ये असलेल्या नियमावलीनुसार गोरेगाव येथील आंबा निर्यात सुविधा व्हेपर हीट ट्रिटमेंट सुविधा, विकीरीकरण सुविधा अद्ययावत करण्यात आल्या आहेत. निर्यातदारांची मागणी विचारात घेऊन विकीरीकरण सुविधेची क्षमता वाढवून घेण्यात आली. त्यामुळे अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, दक्षिण कोरिया या देशांमध्ये या वर्षी चारपट आंबा निर्यात झाली आहे.

## बाजार समितीचे कामकाज ऑनलाइन

राज्यात ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. त्याद्वारे धान्य, फळे यांची मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री होत असते. २०१५-१६ या वर्षात जवळपास ६५ हजार कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल झाली. कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कामकाजात सुसूत्रता, पारदर्शकता यावी, शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये आणि आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावे



यासाठी बाजार समित्यांचे कामकाज ऑनलाइन करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी बाजार योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात वर्धा, दौंड, वरोरा, नागपुर, अहमदनगर, मलकापूर, औरंगाबाद, अकोला, नंदूरबार, वणी, शिरूर, परभणी, तुमसर, लातूर, अर्जुनी, मोरगाव, लोणंद, नेवासा, येवला, सेलू, आटपाडी, कोल्हापूर, अचलपूर, मालेगाव, बसमत, भोकर, अहेरी, सांगली, गेवराई, बार्शी, धुळे या ३० बाजार समित्यांची निवड झाली आहे. या बाजार समित्यांमध्ये संगणक व तत्सम सामग्रीचा पुरवठा करण्यात आला आहे. यापैकी २८ बाजारसमित्यांमध्ये संगणक उपलब्ध करून देण्यात आली आहे. २७ बाजार समित्यांमध्ये ऑनलाइन लिलाव सुरू झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीचे अनेक पर्याय खुले होऊन शेतमालास रास्त भाव मिळत आहे. शेतकरी व व्यापारी यांच्यातील मध्यस्थ साखळीला आळा बसला आहे.

## शेतकऱ्यांना मतदान अधिकार

बाजारसमित्यांमध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या अडचणी काय आहेत हे समजून घेण्यासाठी अधिकृत व्यक्ती नसल्याने शेतकरी उपेक्षित राहतो. समित्यांच्या कामकाजात शेतकरी हित पाहिले जात नाही. शेतकऱ्यांची लुबाडणूक करणाऱ्यांची या समित्यांवर नियुक्ती होते. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना मतदानाचा हक्क देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

## रेशीम कोषाची खुली बाजारपेठ

शेतकऱ्यांना रेशीम कोष विक्रीकरिता इतर राज्यात जावे लागू नये, त्यांना राज्यातच बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी जालना येथे रेशीम कोषाची पहिली खुली बाजारपेठ उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या सुविधेमुळे रेशीम उद्योगाला चालना मिळेल. रेशीम कापडाचे जनतेला आकर्षण असते. परंतु रेशीम कापड कशाप्रकारे तयार केले जाते, याबाबत सर्वसाधारणपणे माहिती नसते, त्याची माहिती व्हावी, यासाठी वाई (जि.सातारा) येथे रेशीम माहिती संग्रहालय सुरू करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना शेतीविषयक सुविधा देणाऱ्या संस्थांचे मोठे जाळे राज्यामध्ये आहे. या संस्था बळकट करण्यासाठी माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने अटल महापणन विकास अभियान सुरू करण्यात आले आहे.

## शेतमाल तारण

शेतमाल काढल्यानंतर आडत्याला विकण्याऐवजी तारण ठेऊन, पैशांची गरज भागावी आणि बाजारपेठेतील गरजेनुसार शेतमालाला योग्य दर मिळावा यासाठी शेतमाल तारण योजना राबवण्यात येत आहे. २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात यासाठी ५० कोटी रुपयांची तरतूद असून २०१६-२०१७ मध्ये ९९ बाजार समित्यांनी ४७७५ शेतकऱ्यांचा २,२३,०९०.२४ क्विंटल शेतमालासाठी तारण स्वीकारले असून ४४.३६ कोटी इतक्या रकमेचे तारणकर्ज दिले आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी अथवा त्यांच्या कुंटुंबातील सदस्यांनी परवानाधारक सावकाराकडून घेतलेले कर्ज माफ करण्यात आले. यामध्ये ४६,८०९ पात्र शेतकऱ्यांचे ६४.५३ कोटी इतक्या रकमेच्या कर्जमाफीचा समावेश आहे. प्रथमच खरीप २०१६ या हंगामासाठी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल रुपये २०० अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.



**शब्दांकन : काशीबाई थोरात,**
विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेंतर्गत ई-सेवांच्या केंद्रावर कर्जमाफीचे ऑनलाइन अर्ज भरण्याची मोफत सुविधा. ऑक्टोबरपासून शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात थेट रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू.**
- **ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा माल व्यापारी, अडते यांच्या मध्यस्थीशिवाय थेट मुंबई, पुणे, नागपूर अशा मोठ्या महानगरापासून ते जिल्हास्तरावरील ग्राहकांना मिळावा यासाठी १५० ठिकाणी आठवडी बाजार सुरू.**
- **राहता, चिखली, अकोट, धामणगाव रेल्वे, हिंगणघाट या पाच बाजार समित्यांचे पूर्ण कामकाज ऑनलाइन. उर्वरित बाजारसमित्यांचे कामकाज ऑनलाइन सुरू करण्याला प्राधान्य.**
- **कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील सातबाराधारक शेतकरी आणि साखर कारखान्यांच्या धर्तीवर जे शेतकरी बाजार समित्यांना शेतमाल पुरवठा करतात, त्यांना मतदानाचा हक्क देण्याचा क्रांतिकारी निर्णय.**
- **कृषी पणन मंडळ राबवत असलेले विविध प्रकल्प, योजना, उपक्रम तसेच देशातील बाजारभावबाबत, बाजार समित्या, बाजार घटक, फलोत्पादन निर्यात प्रशिक्षण, सुगी पश्चात तंत्रज्ञान यांची माहिती शेतकऱ्यांना सहजरीत्या उपलब्ध व्हावी यासाठी कृषी पणन मंडळामार्फत Msambapp मोबाइल ॲप विकसित.**
- **मुंबई येथील सुश्रूषा सहकारी रुग्णालयाच्या धर्तीवर काही जिल्ह्यात सहकारी रुग्णालये स्थापन करण्यास विभागामार्फत प्रोत्साहन. त्याअंतर्गत उस्मानाबाद, नांदेड व कोल्हापूर या जिल्ह्यात नवीन सहकारी रुग्णालयांची नोंदणी.**



**राज्यात दुग्धोत्पादनात भरीव वाढ करण्यासाठी विविध निर्णय घेण्यात आले. उत्कृष्ट दुग्धोत्पादन देणाऱ्या गोवंशीय व म्हैसवर्गीय पशूंच्या संवर्धनासाठी प्रोत्साहन दिले जाते. कुक्कुटपालन तसेच अंडी उत्पादन वाढावे यासाठीही आर्थिक साहाय्याच्या योजना राबवल्या जातात. मत्स्योत्पादनात दुपटीने वाढ करण्यासाठी 'नीलक्रांती धोरण' अंगीकारले आहे. गोवंशाचा सांभाळ करण्याकरिता 'गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजने'मार्फत अर्थसाहाय्य देण्यात येत आहे.**

**महादेव जानकर**

**मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास**

# उत्पन्नवाढीला चालना

सागरी मासेमारीमध्ये महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक आहे. राज्याला ७२० कि.मी. चा सागरी किनारा असून मासेमारीच्या क्षेत्रात अजून खूप वाव आहे. नद्या व नाल्यांच्या लांबीमध्ये आपण देशात दुसऱ्या क्रमांकावर आणि भूजलाशयीन मासेमारीसाठीच्या उपलब्ध क्षेत्रामध्ये देशात तिसऱ्या क्रमांकावर असूनही, गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादनामध्ये मात्र आपला दहावा क्रमांक आहे. या दृष्टीने 'नीलक्रांती' धोरणाच्या माध्यमातून मत्स्योत्पादनात दुपटीने वाढ करण्याचे आव्हान पेलायचे आहे.



## नीलक्रांती

राज्यात मत्स्यव्यवसायाचा विकास करण्यासाठी एकात्मिक धोरण राबवण्यात येत आहे. मत्स्योत्पादनात दुपटीने वाढ करण्याकरिता नीलक्रांती धोरणांतर्गत उपाययोजना केल्या आहे. या धोरणांतर्गत ठरवून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे अंगीकारली जातील. राज्यातील भू-जलाशयीन, सागरी व निमखारे पाणी क्षेत्रातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा पूर्ण क्षमतेने वापर करण्यात येईल. जैविक सुरक्षितता व पर्यावरणाचा समतोल राखून मत्स्योत्पादनात शाश्वत पद्धतीने वाढ करण्यासाठी, केंद्र शासनाने ५० टक्के अर्थसाहाय्य असलेल्या २१ योजना राज्यात राबवण्यात येतील.

**योजना :** भूजलाशयीन क्षेत्रातील मत्स्य संवर्धनासाठी नवीन तळी, अस्तित्वातील तळ्याचे नूतनीकरण, मत्स्यबीज निर्मिती केंद्र उभारणी, मत्स्यबीज संवर्धन तलावसंच उभारणी, संवर्धनांतर्गत निविष्ठा खर्च, पिंजरा (केज)/ बंदिस्त (पेन) उभारणी या ६ योजना तसेच; मूलभूत सुविधांतर्गत नवीन नौका व जाळी खरेदी, लघू मत्स्यखाद्य कारखान्याची स्थापना या योजनांचा समावेश आहे.


सागरी क्षेत्रासाठी खुल्या समुद्रात मत्स्यसंवर्धनासाठी पिंजरा (केज) उभारणी, शिंपले संवर्धन या नावीन्यपूर्ण योजनांचा समावेश आहे. मासेमारी बंदर व मासे उतरवणाऱ्या केंद्रांवर जेट्टीचे नवीन बांधकाम व आधुनिकीकरण, विस्तारीकरण, दुरुस्ती, नूतनीकरण या ६ योजनांचा समावेश आहे. निमखाऱ्या पाण्यातील मत्स्यसंवर्धनांतर्गत कोळंबी संवर्धनासाठी निविष्ठा, कोळंबी बीज उत्पादन केंद्र उभारणीसाठी २ योजनांचा समावेश आहे.

मच्छीमारांच्या कल्याणासाठी नीलक्रांती धोरणांतर्गत बचत व मदतीद्वारे गट विमा योजना, राष्ट्रीय कल्याणकारी बचतीसह मदतीची योजना, मच्छीमारांसाठी घरकूल योजना या योजनांचा समावेश आहे.

पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धनाच्या माध्यमातून सुमारे १ लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन १.५ मेट्रिक टनवरून वर्षभरात दुपटीने वाढवण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे.

## मत्स्यसंवर्धन योजना

**खेकडा व जिताडा बहुप्रजातीय उत्पादन केंद्राची उभारणी:** देशात तामीळनाडूनंतर महाराष्ट्रात वेंगुर्ला तालुक्यातील उभादांडा येथे अशा केंद्राची उभारणी करण्यात येत आहे. राज्यातील ४.१८ लाख हेक्टर क्षेत्रासाठी ११४ कोटी मत्स्यबीजाची गरज आहे.



त्यासाठी एकंदरीत १८६ टन प्रजनकाची आवश्यकता आहे. त्यासाठी सहा ठिकाणी मत्स्यप्रजनक साठा केंद्र स्थापन करण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. मत्स्यबीज निर्मितीसाठी काटेपूर्णा, कोराडी, नागठाणा, इटियाडोह मत्स्यबीज केंद्राच्या नूतनीकरणास आणि मत्स्यबीजाची उपलब्धी वाढण्यासाठी ३६ पोर्टेबल हॅचरीस शासनाची मंजुरी देण्यात आली आहे.

**मत्स्य बोटूकली संवर्धन :** मत्स्यजिरे संवर्धनासाठी आवश्यक ६८४ हेक्टर पैकी ४१८ हेक्टर क्षेत्र उपलब्ध आहे. तसेच २६६ अतिरिक्त हेक्टर संगोपन क्षेत्र विकसित केले जाईल. प्रथमच कोल्हापूर जिल्ह्यातील भोरपाडळे येथे १२० टन प्रतिदिन क्षमतेचा मोठा कारखाना स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

मत्स्यबीजाची नैसर्गिकरीत्या वाढ होऊन मासळी साठ्याचे जतन करण्यासाठी ट्रॉल जाळ्याचा कॉडएंड बदलण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. या विविध योजनांमुळे भूजल मत्स्योत्पादनात वाढ झाली आहे. २०१५-१६ मध्ये असलेल्या १.४४ लाख मे.टनवरून हे उत्पादन २०१६-१७ मध्ये २.०० लाख मे.टनपर्यंत पोहोचले आहे.

## चारायुक्त शिवार



विदर्भ व मराठवाड्यामध्ये दूध उत्पादन वाढीसाठी पशुसंवर्धन विभागाने प्रकल्प राबवण्यास सुरुवात केली आहे. दुधाळ जनावरांचे वाटप तसेच दुग्धव्यवसायासाठी संस्थात्मक उभारणी यासाठी एकूण ४८९ कोटी ६२ लाख रुपये खर्च होणार आहे.

१४ जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर सघन कुक्कुट विकास गटाची स्थापना करण्यात येत आहे. एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रमांतर्गत ५०% अनुदानावर पशुपालकांना १ दिवसाची सुधारित जातीची कुक्कुट पिल्ले, तलंगा/ नर वाटप करून परसातील कुक्कुट पालनास चालना देण्यात येत आहे. दुधाळ पशूंना उत्कृष्ट प्रकारचा चारा उपलब्ध होऊन दुग्धोपादनात वाढ व्हावी यासाठी 'चारायुक्त शिवार' योजना राबवण्यात येत आहे. राज्यात पशुपालक उत्पादक कंपन्यांची स्थापना करण्यात येणार आहे. पशुधनाचे पालन ग्रामीण आणि दुर्गम भागात होत असल्याने 'फिरते पशुवैद्यकीय दवाखाने' सुरू करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांच्या दारात गायी-म्हशीमध्ये कृत्रिम रेतन सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. संतुलित पशुखाद्य सल्ला व मार्गदर्शन सेवा पुरवली जात आहे. गुणवत्तापूर्ण पशुखाद्य व पूरक पशुखाद्य पुरवठा केला जात आहे. वैरण विकास कार्यक्रमांतर्गत बहुवार्षिक गवत लागवड, मुरघास व कडबा कुट्टी यंत्रवाटप केले जात आहे. गाव पातळीवर पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली जात आहे. अंडी उत्पादनात राज्याला स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला जाणार असून १६ जिल्ह्यातील एकूण ४३,३६८ कुटुंबांना याद्वारे लाभ होणार आहे.

## 'राजे यशवंतराव होळकर महामेष योजना'

'राजे यशवंतराव होळकर महामेष योजना' या नावाने ६ मुख्य घटकांसह नवीन योजना २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी राज्यातील ३४ जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणार आहे. पायाभूत सोईसुविधेसह मेंढी गट वाटप, सुधारित प्रजातीच्या नर मेंढ्यांचे वाटप, मेंढीपालनासाठी पायाभूत सोईसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनुदान वाटप, मेंढीपालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी अनुदान वाटप आदी योजना राबवण्यात येणार आहेत.



**शब्दांकन : सचिन गाढवे,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- तलावात संचयन करून मत्स्य बोटुकली वाढ करणे हा कार्यक्रम 'तलाव तेथे मासळी' अशा स्वरूपात नागपूर विभागातील ५ जिल्ह्यांमध्ये प्रथम कार्यान्वित. सप्टेंबरपर्यंत बोटुकली विक्रीमुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न व उर्वरित काळात पाण्यापासून शेतीचे उत्पन्न अशी उत्पन्नात दुप्पट वाढ अपेक्षित.
- राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत विदर्भ, मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांमध्ये दुग्धविकास प्रकल्प राबवण्यास मंजुरी. या प्रकल्पामुळे ६० हजार दुग्ध उत्पादक शेतकरी आणि ग्रामीण भागातील सुमारे १० हजार युवकांना रोजगार.
- दूध उत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासण्याच्या दृष्टीने दूध खरेदी दरात ३ रुपये वाढ. गायीच्या दुधासाठी खरेदी दरात २४ रुपयांवरून २७ रुपये तर म्हशीच्या दुधासाठी खरेदी दरात ३३ रुपयांवरून ३६ रुपये एवढी वाढ.
- राज्यातील गोवंशाचा सांभाळ करण्याकरिता गोशाळांना अर्थसाहाय्य. त्यासाठी 'गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना' सुरू.
- ३० जून २०१७ रोजी सुधारित तलाव ठेका धोरण जाहीर. त्यानुसार एकूण २ हजार ५७९ तलावातील एक हजार हेक्टरपर्यंतचे सर्व तलाव सहकारी संस्थांसाठी राखीव.
- मच्छीमारांच्या मागणीचा विचार करून नवीन नोंदणीसाठी सहकारी संस्थाच्या संख्येत घट. यामुळे तरुण बेरोजगारांना मासळी संलग्न व्यवसाय सुरू करता येणे शक्य.
- 'कामधेनू दत्तक ग्राम योजने'द्वारे पशुपालकांसाठी नव्या तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके, अभ्यास सहल व प्रशिक्षण कार्यक्रम. यामध्ये जंत व गोचीड, गोमाशा व वंध्यत्व निवारण या कार्यक्रमांचा समावेश.



**कामगार कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसह कामगार कल्याणासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. कल्याणकारी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही कामगार विभागाची प्रमुख जबाबदारी आहे. इज ऑफ डुईंग बिझनेससाठी कामगार कायद्यात सुधारणा, बाष्पकांच्या प्रमाणीकरणासाठी स्वयंप्रमाणीकरण आणि एकत्रित वार्षिक विवरण योजना कार्यान्वित करण्यात आल्याने कारखाने स्वयंशिस्त आणि आत्मनिर्भर होण्यास मदत होत आहे.**

**संभाजी पाटील- निलंगेकर**

**मंत्री, कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिक कल्याण**

# कौशल्यातून कामगारांचे हित

विविध कारखाने आणि उद्योग यामध्ये कार्यरत असणाऱ्या कामगारांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी शासनाने गेल्या ३ वर्षात महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. कामगारांचे किमान वेतन न देणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. कामगारांच्या कामाच्या परिस्थितीमध्ये तसेच त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राज्यातून बाल कामगार तसेच वेठबिगार पद्धतीच्या समूळ उच्चाटनावर भर देण्यात आला आहे. घातक उद्योगांना विविध सुरक्षा व आरोग्य उपायांचे कठोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कामगार कायद्याची अंमलबजावणी, कामगारांच्या सर्वांगीण उत्कर्षांच्या दृष्टीने नव्या योजनांचा प्रारंभ यात आपले राज्य नेहमीच पथदर्शक राहिले आहे. कामगारांचे कौशल्य आणि रोजगारामध्ये कायमस्वरूपी वाढ होण्यासाठी प्रभावी उपाय योजले आहेत.

### आघाडी

कामगार विभागाच्या सेवा ऑनलाइन पद्धतीने देण्याकरिता संगणक प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. नागरिकांना तत्पर आणि दर्जेदार सेवा पुरवण्याच्या हेतूने सेवा हमी अधिनियम लागू करण्यात आला आहे. सेवा हक्क अधिनियमांतर्गत कामगार विभागांतर्गत येणाऱ्या १८ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत.

### गतिमान

व्यवसाय करण्यास सुलभीकरण आणि प्रोत्साहन देण्यासाठी कामगार कायद्यात सुधारणा करण्यात येत आहे. आपले सरकार आणि लेबर मॅनेजमेंट सिस्टिम (lms.mahaonline.gov.in) या संकेतस्थळांवर सेवा मिळवण्यासाठी ऑनलाइन अर्ज करता येतो. या दोन्ही संकेतस्थळांवर ऑनलाइन प्रमाणपत्र, थर्ड पार्टी व्हेरिफिकेशन आणि प्रमाणपत्र वैधता तपासता येते.

### स्वयंप्रमाणीकरण

राज्यात गतीने होणाऱ्या औद्योगिकीकरणाच्या अनुषंगाने तपासण्यांचे काम सुटसुटीत व्हावे म्हणून २३ जून २०१५ आणि २४ जून २०१५ च्या अधिनियमाद्वारे १६ कामगार कायदे व बाष्पके अधिनियमांतर्गत स्वयंप्रमाणीकरण व एकत्रित वार्षिक विवरणपत्र योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाचे कामकाज गतिमान, पारदर्शक करण्यासाठी मंडळाच्या कामकाजाची एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येत आहे.

### कल्याणकारी मंडळ

केंद्र शासनाने असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा दिली असून आता त्याच धर्तीवर राज्य शासनामार्फतही असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा देण्यात येणार आहे. याची सुरुवात कामगारांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करून लवकरच होणार आहे.



## उत्कृष्ट व्यवस्थापन पुरस्कार

बदलत्या काळात रोजगाराबाबत आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकासावर अधिक भर देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. पॅरिस येथे झालेल्या ग्लोबल स्किल परिषदेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाला उत्कृष्ट कौशल्य व्यवस्थापन पुरस्कार मिळाला. शासनाचा थेट निधी खर्च न होता, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय)चे आधुनिकीकरण या उपक्रमाचे कौतुक पॅरिस येथे करण्यात आले.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण हा कौशल्य विकासाचा अपरिहार्य व अविभाज्य भाग आहे. त्यामुळेच कौशल्य विकास आणि उद्योगाशी निगडित नवीन परवानग्या यापुढे आता राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषदेमार्फत देण्यात येणार आहेत. यापूर्वी केंद्र शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषदेला असलेले अधिकार आता राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण परिषदेला मिळाले आहेत.

## कुशल मनुष्यबळ

स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. आपल्या अर्थव्यवस्थेत शाश्वत वृद्धी होण्याच्या दृष्टीने प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ आवश्यक ठरते. आजच्या तरुणांना अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानानुरूप कौशल्य आधारित प्रशिक्षणाद्वारे उत्पादनक्षम बनवण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत २०२२ पर्यंत भारतात सुमारे ५० कोटी तर महाराष्ट्रात सुमारे ४.५० कोटी मनुष्यबळ विकसित करण्यात येणार आहे.

## सर्वाधिक ॲप्रेंटिस महाराष्ट्रामध्ये

नवीन ॲप्रेंटिस कायद्यामध्ये बदल करण्यात आल्याने महाराष्ट्रात सर्वाधिक ॲप्रेंटिस आहेत. यापूर्वी या कायद्यामध्ये काही जाचक अटी होत्या त्यामुळे कोणीही ॲप्रेंटिस ठेवायला तयार व्हायचे नाही. आता मात्र या कायद्यातील बदलामुळे हॅण्डस ऑन ट्रेनिंग मिळणार आहे. महाराष्ट्रात पहिल्या वर्षी ६९,००० ॲप्रेंटिसची संख्या होती. तर गेल्या वर्षी एक लाख ॲप्रेंटिस होते. आता ही संख्या वाढतच जाणार आहे. मेक इन इंडिया सप्ताहानंतर उद्योगांशी झालेल्या ३५ हून विविध सामंजस्य करारामध्ये आतापर्यंत ८ लाख तरुणांना कौशल्य प्रशिक्षित करण्यात येत आहे. ३ लाख शेतकऱ्यांच्या मुलांकरिता शेती आणि शेतीपूरक उद्योगातील प्रशिक्षण देण्यासंदर्भातील अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

## निवासी कौशल्यविकास विद्यापीठ

राज्यातील उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी पुण्यात निवासी कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे. पुण्याच्या सिम्बॉयसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठामार्फत हे वैशिष्ट्यपूर्ण विद्यापीठ राज्यात स्थापन होत आहे. या विद्यापीठाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक कौशल्याधारित शिक्षणाच्या संधी प्राप्त होईल.

## फौजी टॅक्स ॲप

महाराष्ट्रातील सैनिकांसाठी शासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती तसेच विविध ॲप्लिकेशन्सची माहिती फौजी टॅक्स ॲपच्या माध्यमातून मिळणार आहे. सैनिकांना देण्यात येणाऱ्या अनुदानात चारपट वाढ करण्यात आली आहे. तसेच दरवर्षी या अनुदानात २० टक्क्यांनी वाढ होणार आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके,** विभागीय संपर्क अधिकारी

## कामगिरी दमदार

- **महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळांमध्ये नोंदणी केलेल्या कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना २ जून २०१७ पासून लागू. असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा पुरवण्यास प्रारंभ.**
- **कामगारांसाठी सर्वसमावेशक वेबपोर्टलची निर्मिती. यावर संघटित, असंघटित कामगारांची तक्रार नोंदणी आणि किमान वेतनाच्या संदर्भातील माहिती उपलब्ध.**
- **राज्यातील शासकीय आयटीआयच्या आधुनिकीकरणास प्राधान्य. आतापर्यंत १०० हून अधिक शासकीय आयटीआयचा कायापालट सामाजिक उत्तरदायित्व निधीतून शक्य. केंद्रीय स्तरावर या प्रकल्पाचे कौतुक आणि इतर राज्यांमार्फत विचारणा.**
- **कौशल्य विकास विभागाच्या महारोजगार, कौशल्य विकास व महास्वयंरोजगार या तिन्ही वेबपोर्टलचे एकत्रीकरण करून महास्वयंम या वेब पोर्टलची निर्मिती विकसित करण्यात आले आहे. या ठिकाणी सर्व प्रकारची माहिती एकत्रितरीत्या उपलब्ध.**
- **गेल्या वर्षभरात कौशल्य आणि उद्योजकता विभागाचे विविध उद्योगांशी सामंजस्य करार. या कराराच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी विभागामार्फत mahamaitree.sded@maharashtra.gov.in या नावाने एक स्वतंत्र ई-मेल आयडी सुरू.**
- **औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू. जानेवारी २०१८ पासून आयटीआयच्या परीक्षा होतील ऑनलाइन पद्धतीने.**

# सर्वांना समान न्याय



## दिलीप कांबळे

**राज्यमंत्री, सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य, मदत व पुनर्वसन, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास व वक्फ**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त २०१५-१६ हे वर्ष 'सामाजिक समता व न्याय वर्ष' म्हणून साजरे करण्यात आले. मुंबईतील चैत्यभूमीलगत असलेल्या इंदू मिलमध्ये भारतरत्न बाबासाहेबांचे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाच्या भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. या जागेवर त्यांच्या महान कर्तृत्वाला साजेसे असे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासंदर्भातील प्रक्रिया सुरू आहे. डॉ. आंबेडकर यांचे लंडन येथील वास्तव्य असलेले १० किंग्ज हे किंग्ज हेन्री रोड येथील निवासस्थान खरेदी करण्यात आले आहे. मेक इन इंडियांच्या धर्तीवर 'मेक इन महाराष्ट्र' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था ( बार्टी) मार्फत विविध कौशल्य विकासावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत.

### अल्पसंख्याक विकास विभाग

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा २.५० लाख रुपयांवरून ६ लाख रुपयांपर्यंत करण्यात आली आहे. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या थेट कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज योजना, मुदत कर्ज योजना, महिला बचत गट योजनांमार्फत ऑनलाइन कर्जवाटप करण्यात येते. अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व विचारात घेऊन मुलींसाठी २३ वसतिगृहांच्या बांधकामास मान्यता देण्यात आली. त्यापैकी १० वसतिगृहे कार्यान्वित करण्यात आली आहेत. केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत एकूण १९ वसतिगृहांपैकी मुलींसाठीची ९ वसतिगृहे कार्यान्वित करण्यात आली असून, ८ वसतिगृहांचे बांधकाम सुरू आहे. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथे नवीन तंत्रनिकेतन सुरू करण्यात येईल. या विविध निर्णयांच्या माध्यमातून शासनाने गेल्या तीन वर्षात संबंधित संवर्गातील नागरिकांना न्याय मिळण्यासाठी अनेक योजना आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी केली आहे.

**शब्दांकन : काशीबाई थोरात,** विभागीय संपर्क अधिकारी

# विकास आणि कुपोषणमुक्ती



## विद्या ठाकूर

**राज्यमंत्री, महिला व बालविकास**

महिलांचे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय सक्षमीकरण वेगाने होत आहे. महिलांना समान संधी मिळून त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबवण्यात येत आहेत.

बचतगटाची चळवळ राज्यभरात व्यापक करण्यात आली असून 'सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजने'तून महिला बचतगटांना शून्य टक्के व्याजदराने कर्ज देण्यात येते.

### जन्मदर वाढवण्यासाठी

मुलींचा जन्मदर वाढविणे व स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी १ एप्रिल २०१६ पासून माझी कन्या भाग्यश्री योजना सुरू करण्यात आली. एक किंवा दोन मुलींवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रीया करणाऱ्या दांम्पत्यांच्या मुलीचे पोषण, शिक्षण इत्यादीसाठी या योजेनेंतर्गत विविध लाभ देण्यात येत आहेत.




### कुपोषणमुक्तीवर भर

महाराष्ट्रातील एकही बालक कुपोषित राहणार नाही यासाठी विभागामार्फत प्रयत्न केले जात आहेत. एकात्मिक बालविकास सेवा योजनेमार्फत राज्यात कुपोषणमुक्तीसाठी विशेष कार्यक्रम राबवला जात आहे.

'मनोधैर्य योजने'मार्फत बलात्कार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसाहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन केले जाते. पीडित महिलेला देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत वाढ करण्यात आली आहे.

### बालगृहांचे कामकाज अधिक पारदर्शक

राज्यातील बालगृहांचे कामकाज पारदर्शक आणि दर्जेदार बनवण्यासाठी त्यांची अ, ब आणि क अशी वर्गवारी करण्यात आली आहे. बालगृहांचे थर्ड पार्टी ऑडिट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) महिला आणि बालकांच्या सक्षमीकरणाचे विविध कार्यक्रम राबवण्यासाठी खासगी कंपन्यांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके,** विभागीय संपर्क अधिकारी

# आरोग्यदायी महाराष्ट्र



## विजय देशमुख

**राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य, परिवहन, कामगार आणि राज्य उत्पादन शुल्क**

नागरिकांना उत्तमोत्तम आरोग्य सेवा - सुविधा पुरवण्यावर सार्वजनिक आरोग्य विभागाने भर दिला आहे.

राज्यातील सहा ठिकाणी 'थॅलेसेमिया मायनर' तपासणी मोफत करण्यात येते. लवकरच राज्यातील १८ ठिकाणी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागपूर व औरंगाबाद या दोन ठिकाणी नवीन 'डे केअर सेंटर' चालू करण्यात येणार आहेत. मुंबईत अत्यंत वर्दळीच्या १० वेगवेगळ्या ठिकाणी बाईक ॲम्ब्युलन्स उपलब्ध करून देण्यात आल्या. त्याद्वारे २३२ रूग्णांना तातडीची वैद्यकीय सेवा पुरवण्यात आली. राज्यातील कुष्ठरोग्यांचे प्रमाण जास्त असलेल्या १६ जिल्ह्यांतर्गत १६९ तालुक्यांमध्ये १९ सप्टेंबर ते १३ ऑक्टोबर या कालावधीत त्वचारोग शोध अभियान राबवण्यात आले.

### विविध समस्या निकाली

संकेतस्थळचलित टॅक्सीचालकांकडून प्रवाशांची पिळवणूक होऊ नये तसेच प्रवाशांची सुरक्षितता यासाठी परिवहन विभागाने महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम लागू केले आहेत. परवाने नूतनीकरणाच्या निर्णयाचा ३७ हजार ऑटोरिक्षा परवानाधारकांनी लाभ घेतला आहे. परवान्यांवरील निर्बंध उठवण्यात आले आहेत. त्यामुळे आता कोणत्याही व्यक्तीला नवीन परवाना घेणे शक्य होईल. 'एअरपोर्ट'च्या धर्तीवर राज्यातील प्रमुख १५ ठिकाणी बसपोर्ट उभारले जाणार आहेत.

### कामगार कायद्याची अंमलबजावणी

कामगार हित जोपासत विविध कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. कामगारांना किमान वेतन न देणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईची तरतूद आहे. घातक उद्योगांमध्ये कामगारांना योग्य मोबदल्यासह पुरेशी सुरक्षा उपलब्ध करून देण्याबाबत उपाययोजना करण्यात येत आहेत. ऑनलाइन अर्ज निकाली काढण्यात कामगार विभागाने आघाडी घेतली. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळामध्ये नोंदणी केलेल्या कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी 'महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना' लागू करण्यात आली आहे.

अवैध दारुच्या समूळ उच्चाटनासाठी गावांमध्ये 'ग्रामरक्षक दल' स्थापण्याची उपाययोजना करण्यात येणार आहे.

**शब्दांकन : आनंद सुरवाडे**

# धोरणात्मक सुधारणा



## संजय राठोड

**राज्यमंत्री, महसूल**

अनेक धोरणात्मक निर्णय महसूल विभागाने गेल्या वर्षभरात घेतले आहेत. त्याला जमीनविषयक सुधारणा असे संबोधता येईल. पुढील शंभर वर्षे याचे चांगले परिणाम सर्वसामान्यांना उपभोगायला मिळतील अशी खात्री वाटते. मंत्रिमंडळ बैठकीत सर्वाधिक प्रस्ताव मांडून विधान मंडळामध्ये सुधारणा मंजूर करणारा महसूल विभाग अग्रेसर ठरलेला आहे. जनसामान्यांशी थेट जोडलेला हा विभाग असल्याने वर्षानुवर्षे धोरणात्मक सुधारणा अभावी जनतेस होणारा त्रास कमी करण्यासाठी महसूल विभागाने काम केले आहे.

२००२ पासून दस्तनोंदणीसाठी संगणकीकृत प्रणालीचा (सरिता) वापर सुरू करण्यात आला. ई-पेमेंट व ई-सर्च यासारख्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. २०१४ पासून विभागाने मोठ्या गृहबांधणी प्रकल्पातील सदनिका विक्रीचे करारनामे आणि लिव्ह ॲण्ड लायसन्सचे (भाडे करार) दस्त नागरिकांना दुय्यम निबंधक कार्यालयात न येता ऑनलाइन नोंदवता येतील अशी ई-रजिस्ट्रेशन प्रणाली सुरू केली.

जमीन महसूल न भरल्यामुळे जप्त झालेल्या आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या व्यवस्थापनाखाली गेलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांना थकीत महसूल व्याजासह आणि दंड भरून परत मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमध्ये सुधारणा केली. शासनास देय असलेले कर अथवा दंड रकमेचा भरणा करण्यास विलंब अथवा टाळाटाळ करण्याची बऱ्याच जणांची प्रवृत्ती असते. त्याबाबतच्या आदेशास स्थगिती मिळवण्याला प्रतिबंध करण्यासाठी; महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमध्ये सुधारणा करणारे विधेयक मंजूर केले आहे. यानुसार देय रकमेच्या एकूण २५ टक्के रक्कम शासनाकडे जमा केल्याशिवाय अशा प्रकरणातील आदेशास स्थगिती दिली जाणार नाही. यामुळे चोरी अथवा करबुडवेगिरी करणाऱ्या अपप्रवृत्तीला वचक बसून शासनाचे उत्पन्न वाढेल.

सरकार निश्चित करेल अशा प्रकल्पग्रस्तांचे राज्य शेती महामंडळाकडील जमिनीवर पुनर्वसन करण्यात येणार असून; त्यासाठी महाराष्ट्र शेतजमीन अधिनियमात आवश्यक ती सुधारणा करण्यात आली आहे. प्रकल्पांना गायरान जमिनी देण्याबाबत शासनाच्या धोरणातही सुधारणा करण्यात आली आहे.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खरात,** विभागीय संपर्क अधिकारी

# गावांची स्वयंपूर्णता



## दादाजी भुसे

**राज्यमंत्री, ग्रामविकास**

ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणात विकास करण्यात येत आहे. सर्व सुविधांच्या उपलब्धतेबाबतीत गावे स्वयंपूर्ण बनवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. पायाभूत सुविधांबरोबरच ग्रामीण जनतेला गावातच रोजगार मिळावा यासाठी लक्ष केंद्रीत करण्यात आले असून त्यासाठी वेगवेगळ्या योजना व उपक्रम राबवण्यात येत आहेत.

कोकणातील ग्रामीण भागातील भूमिपुत्रांना त्यांच्या गावात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी, त्याच भागातील विकासकामांना गतिमानता प्राप्त करून दिली आहे.


कोकणातील पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी 'कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम' सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत ४५ कोटी रुपयांची विकासकामे प्रस्तावित आहेत. अनेक ठिकाणची कामे सुरू झाली आहेत. गावातून पर्यटन स्थळांपर्यंत पोहोचण्याच्या रस्त्याची बांधणी, विद्युत व्यवस्था, वाहनतळ उभारणे, प्रसाधन गृह व स्वच्छतागृहांची बांधणी, जलक्रीडा उपकरणांची खरेदी, सार्वजनिक वाहतुकीसाठी मिनी बसेसची उपलब्धता, नकाशे व पर्यटनविषयक पुस्तके आणि साहित्य यांची खरेदी यासारखी कामे या कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात आली आहेत. पर्यटनपूरक उद्योग उभारण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांना ४ टक्क्यांच्या वर मात्र, १२ टक्क्यांच्या मर्यादेत व्याजाच्या रकमेचा फरक राज्यस्तरीय समितीमार्फत मंजूर करण्यात येतो.



या कार्यक्रमांतर्गत १ कोटींपर्यंतच्या छोट्या प्रकल्पांना मान्यतेसाठी प्राधान्य देण्यात आले आहे. प्रकल्प प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रत्येकी किंमत कमाल ३ कोटी व सरासरी किंमत ५ कोटींपेक्षा कमी असण्यावर भर देण्यात आला आहे. या कार्यक्रमात पर्यटनविषयक सुविधांच्या बांधकामावर ८० टक्क्यांपर्यंतचा खर्च करण्यात येत असून २० टक्के खर्च हा प्रशिक्षण व क्षमता बांधणीसाठी, पर्यटनदृष्ट्या उपयुक्त असणाऱ्या गावांच्या सौंदर्यस्थळांच्या बळकटीकरणासाठी करण्यात येत आहे.

**शब्दांकन : अजय जाधव**, विभागीय संपर्क अधिकारी

# जलसमृद्धीच्या दिशेने



## विजय शिवतारे

**राज्यमंत्री, जलसंपदा, मृद व जलसंधारण, संसदीय कार्ये**

जलयुक्त शिवार अभियान हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम जलसंधारण विभागाकडून राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ५००० गावे, याप्रमाणे ५ वर्षात २५००० गावे दुष्काळमुक्त करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. या कामांमुळे मोठ्या प्रमाणात पाणीसाठ्याची क्षमता निर्माण करण्यात आली. २०१५-१६ मध्ये निवडलेल्या एकूण ६२०२ गावांपैकी ४३९४ गावे पाणीटंचाईमुक्त करण्यात आली. महाराष्ट्रात दरवर्षी कोणत्या न कोणत्या भागात दुष्काळ पडतो. शेकडो गावात पाणीटंचाई निर्माण होते. यावर मात करण्यासाठी जलसंधारणाच्या विविध योजना सुरू केल्या आहेत. 'जलयुक्त शिवार योजने'च्या माध्यमातून हजारो गावांचा पाणीप्रश्न संपला आहे. जलयुक्त शिवार योजनेमुळे यंदा मराठवाडा आणि राज्याच्या अन्य भागात मोठ्या प्रमाणात तूर आणि हरभऱ्याच्या डाळीचे पीक आले. जलयुक्त शिवार योजनेचे हे मोठे यश आहे.

या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत शेतामध्येच जलसंधारणासाठी नवीन शेततळी निर्माण करण्यासाठी अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना प्राधान्याने अनुदान देण्यात येत आहे. या योजनेतर्गत २०१६-१७ मध्ये १,११,१११ शेततळ्यांची निर्मिती करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले. यापैकी जास्तीत जास्त शेततळ्यांची निर्मिती झाली आहे.

याशिवाय कोरडवाहू शेतीची उत्पादकता वाढवणे, जमिनीची धूप थांबवणे यासाठी एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन, गतिमान पाणलोट विकास, ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी अंतर्भूत पाणलोट विकास, आदर्श गाव योजना, पाणलोट विकास चळवळ, महात्मा फुले जलभूमी अभियान, विविध सिंचन क्षमतेच्या योजना राबवल्या जात आहेत. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या निधीमध्ये १० हजार कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे. जलसंधारण विभागांतर्गत औरंगाबाद येथे जलसंधारण आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली आहे. या निर्णयामुळे मराठवाड्यातील जलसंधारणांच्या कामांना गती मिळेल. जलसंधारण आयुक्त पदावर भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येणार आहे.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट**, विभागीय संपर्क अधिकारी

# सर्वांना सुरक्षा



**दीपक केसरकर**

**राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), वित्त व नियोजन**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे राज्यात गुन्हे सिद्धतेचे प्रमाण नऊ टक्क्यावरून ५२ टक्के इतके वाढले.

गुन्हेगारांची माहिती एका क्लिकवर मिळावी, यासाठी सीसीटीएनएस प्रणाली कार्यान्वित. सर्व पोलीस ठाण्यांची डिजिटल जोडणी. पोलीस नियंत्रण कक्षाचे अत्याधुनिकीकरण. या प्रकल्पामध्ये नागरिकांनी नियंत्रण कक्षास दूरध्वनी केल्यावर जीपीएस प्रणालीच्या आधारे त्या दूरध्वनीचे स्थान ओळखून, मदत पाठववयाच्या यंत्रणेची निर्मिती प्रस्तावित. गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढवण्यासाठी पोलीस आयुक्तालये व पोलीस अधिक्षक कार्यालयांमध्ये ४५ फिरत्या न्यायसहायक वैज्ञानिक पथकांची स्थापना. सागरी सुरक्षा पोलिसांसाठी अत्याधुनिक व सुसज्ज बोटी घेण्याचा निर्णय. दोन बोटी सुरक्षा दलाच्या ताफ्यात सामील. सागरी सुरक्षेसाठी गाड्यांची उपलब्धता. ४२ ठिकाणी सायबर लॅबची सुरुवात. नक्षली चळवळीचा बीमोड करण्यासाठी जिल्हा पोलीसांना पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध. नक्षलवाद्यांचा आक्रमकपणे मुकाबला करण्यासाठी सी-६० या विशेष कमांडो दलाची स्थापना. पोलीसांसाठी १ लाख घरे बांधण्याचा निर्णय. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी दामिनी पथकाची स्थापना. प्रतिसाद मोबाइल ॲप, मोफत हेल्पलाइन, मनोधैर्य योजना, समुपदेशन केंद्र, जलदगती न्यायालयांना मान्यता, जिल्हास्तरीय समित्या व कक्ष यांची प्रभावीपणे अंमलबजावणी. शहरांमध्ये सीसीटीव्ही व त्याअनुषंगिक आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळाच्या वार्षिक योजनेतून निधी वितरित करण्यास मान्यता.

### वित्त व नियोजन

- ७४ शासकीय योजनांचे लाभ थेट लाभार्थ्यांच्या खात्यात देण्याचा निर्णय. ■ मुद्रा योजनेतून यंदा सुमारे ९ लाख २३ हजार ९६० प्रकरणांमध्ये ४३३८.०३ कोटी रुपयांचे कर्ज वितरित. ■ सरोगसी पद्धतीने जन्मलेल्या अपत्याचे संगोपन करण्यासाठी महिला कर्मचाऱ्यास १८० दिवसांची विशेष रजा. ■ वस्तू व सेवा कर प्रणालीतून महानगरपालिकांना जकात व स्थानिक संस्थाकरापोटी वेळेत नुकसान भरपाई.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे,** विभागीय संपर्क अधिकारी

# आदिवासींचे सक्षमीकरण



**राजे अम्ब्रीशराव आत्राम**

**राज्यमंत्री, आदिवासी विकास व वने**

राज्यातील आदिवासी बांधवांचा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकास करण्यासाठी शासनाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. गेल्या तीन वर्षांमध्ये या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांचे सक्षमीकरण झाले आहे.

राज्यात अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीना आदिवासी उपयोजनेंतर्गत ५ टक्के निधी थेट अनुदान देण्यात येत आहे.

आदिवासींच्या सामाजिक हक्काचे रक्षण करण्यासोबतच त्यांच्या उपजीविकेसाठी पूरक असणाऱ्या वन, जल, जमीन हक्काचे संरक्षण करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. मूळ निवासी असलेल्या आदिवासी बांधवांचे नैसर्गिक हक्क जोपासण्यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत.

वनहक्क कायद्यांतर्गत दावेदाराने केलेल्या दाव्यांना योग्य तो न्याय देण्यासाठी तालुकास्तरावर अपिले घेण्यात येतात. त्यावर योग्य ती कार्यवाही केली जाते. त्या अनुषंगाने दावेदारांना सनद (पट्टा) देण्यात आली आहे. पट्टा देण्यात आलेल्या दावेदारांची नोंद ७/१२ मध्ये घेण्यात आली. त्यांना आदिवासी विभागाच्या योजनांचा लाभ मिळेल. वैयक्तिक हक्कांबरोबरच दावेदारांचे जीवनमान उंचावण्यासाठी सामूहिक हक्कसुद्धा देण्यात आले आहेत. प्रत्येक गाव/ वाडा/ पाडा यांनी सामूहिक दावा केल्यास त्या जागेवर वृक्षलागवड, गौण वनोपज, मत्स्यव्यवसाय इत्यादी उत्पन्न वाढीसाठी एक चांगला पर्याय या कायद्याने उपलब्ध होईल. आदिवासी युवकांचा क्षमताविकास करण्याकरिता किमान कौशल्यावर आधारित कौशल्य विकास कार्यक्रम राबवण्यात येत आहे. यामुळे आदिवासी युवकांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध झाला आहे. गेल्या तीन वर्षात आदिवासी गावपाडा पातळीवर स्थानिक समूह संस्थांद्वारे एकात्मिक विकास साधला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आदिवासी बांधवांना मोठ्या प्रमाणात स्थान देऊन, विकास प्रक्रियेत प्रत्यक्ष सामावून घेतले आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून स्वच्छ आश्रमशाळा उपक्रम विभागाने हाती घेतला आहे. आदिवासी आश्रमशाळांमध्ये स्वच्छता अबाधित राहण्यासाठी, चालू आर्थिक वर्षात आश्रमशाळा व्यवस्थापन समितीस रुपये एक लाखांपर्यंतचा निधी देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

**शब्दांकन : मयुर गव्हाणे**

# घर हक्काचे...



रवींद्र वायकर

राज्यमंत्री, गृहनिर्माण, उच्च व तंत्रशिक्षण

गेली अनेक वर्षे रखडलेल्या बी.डी.डी चाळींच्या पुनर्विकासासाठी प्राधान्य दिले. हा पुनर्विकास म्हाडाकडूनच व्हावा आणि ५०० चौरस फुटांपेक्षा जास्त घर देण्यात यावे, अशी भूमिका घेतली. ■ एसआरए इमारत पूर्ण झाल्यानंतर विकासकाने सहा महिन्यांमध्ये ओसी न दिल्यास विकासकाला दंड आकारण्यासाठी आग्रही. ■ वेगवेगळ्या कायद्यांमुळे जुन्या इमारतींचा पुनर्विकास होत नसेल तर आवश्यकतेनुसार कायद्यात बदल करण्याची भूमिका. ■ प्रधानमंत्री आवास योजनेप्रमाणे २५ चौरस मीटर क्षेत्रफळाऐवजी एसआरएतील योजनांना ३० चौरस मीटर क्षेत्रफळाचे गाळे देण्याची भूमिका. ■ दक्षिण मुंबईतील धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी बीपीटी जमिनी लीजवर मिळवण्यासाठी पाठपुरावा. ■ गिरणी कामगारांना गिरण्यांच्या जागेवर हक्काचे घर मिळावे, यासाठी प्रक्रिया वेगाने करण्याचे आदेश. ■ धोबी घाटाचे जतन करण्यासाठी आग्रही. ■ राज्यातील मानिव अभिहस्तांतरणासाठी आग्रही भूमिका.

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

■ २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात विभागनिहाय महाविद्यालय तसेच तुकड्यांची निकड लक्षात घेऊन मागणीनुसार वाढ. ■ सरसकट फीवाढ न करता महाविद्यालयांकडे संबंधित अभ्यासक्रमांना आवश्यक पायाभूत सुविधा आहेत की, नाही याची तपासणी करून शुल्क वाढीचा निर्णय. ■ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार उच्च शिक्षण मिळावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळगावी (आंबडवे) येथे मॉडेल कॉलेज उभारण्याचा निर्णय. ■ शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या कर्तृत्वाची माहिती भावी पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी मुंबई विद्यापीठात 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र' सुरू. ■ जोगेश्वरीतील इस्माईल युसुफ महाविद्यालयात शैक्षणिक हब सुरू केल्यानंतरही मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांसाठी २० टक्के आरक्षण ठेवण्याचा निर्णय. ■ अल्पसंख्यांक महाविद्यालयातील शिल्लक जागांवर खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत शासनाने काढलेल्या अधिसूचनेचे लवकरच कायद्यात रूपांतर करण्यासाठी आग्रही भूमिका. ■ विद्यार्थ्यांचा वसतिगृहाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी चर्चगेट येथील मादाम कामा रोड येथे मुलांचे वसतिगृह.

**शब्दांकन : विष्णू काकडे ,** विभागीय संपर्क अधिकारी

# स्वच्छता आणि सुरक्षितता



डॉ. रणजीत पाटील

राज्यमंत्री, गृह (शहरे), नगर विकास, विधी व न्याय, संसदीय कार्य, कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिक कल्याण

राज्यातील विविध शहरांमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबवण्यात येत आहे. ३ सप्टेंबर २०१७ पर्यंत २७ महानगरपालिका व ३५७ नगरपरिषदा / नगरपंचायती अशी एकूण ३८४ शहरे हागणदारीमुक्त झाली आहेत.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानामध्ये १ लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ४३ शहरांचा तसेच विशेष बाब म्हणून शिर्डी शहराचा समावेश आहे. या अभियानांतर्गत ४४ शहरांमधील पाणी पुरवठा व मलनिस्सारण व्यवस्था सुयोग्य करण्यात येणार आहे. प्रत्येक शहरासाठी किमान ३ हरितक्षेत्र विकास प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येत असून २ हरितक्षेत्र प्रकल्प पूर्ण झाले आहेत. या अभियानांतर्गत २०१५-१६ व २०१६-१७ च्या वार्षिक कृती आराखड्यातील सर्व प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यापैकी २४ प्रकल्पांचे काम प्रत्यक्ष सुरू झाले.

स्मार्ट सिटी योजनेत निवड झालेल्या शहरांच्या विकासासाठी केंद्र व राज्य शासनाकडून आतापर्यंत १ हजार २०६ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. या योजनेत सर्वाधिक सात शहरांची निवड झालेले महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे.

मुंबईमध्ये मेट्रो ३ प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. मुंबई शहरामध्ये १५१० ठिकाणी एकूण ४७१७ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात ४२५ ठिकाणी एकूण १२३४ कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले आहेत. नागपूर शहरात सीसीटीव्ही प्रकल्प राबवण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

गुन्हे व गुन्हेगारी यांचा शोध घेण्यासाठी क्राईम ॲण्ड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क ॲण्ड सिस्टिम (सीसीटीएन) प्रकल्पांतर्गत एकूण १०५४ पोलीस ठाणे व ६२९ वरिष्ठ कार्यालये नेटवर्कने जोडण्यात आली.

प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियानाच्या माध्यमातून प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली आहेत. राज्यातील ३२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्हर्च्युअल क्लासरूम प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत.

**शब्दांकन : सिद्धी बोबडे**

# समतोल विकास



## प्रवीण पोटे-पाटील

**राज्यमंत्री, उद्योग व खनिकर्म, पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)**

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ९०,६०८ किलोमीटर रस्त्यांची देखभाल दुरुस्ती तसेच नूतनीकरण करण्यात येते. नाबार्ड कर्जसाहाय्य योजनेंतर्गत सद्य:स्थितीत ११ हजार कि.मी.रस्ते सुधारणा, ६५३ पूल व ११७९ मोऱ्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. कोकणात ७८७ कि.मी. लांबीचा सागरी महामार्ग बांधण्यात येत असून ६५९ कि.मी. लांबीचे रस्ते पूर्ण करण्यात आले आहेत.

मेक इन इंडिया सप्ताहामध्ये विविध क्षेत्रात २६०२ सामंजस्य करार करण्यात आले. या कराराच्या माध्यमातून रुपये ८ लाख कोटींची गुंतवणूक होणार असून यातून ३० लाख रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. याच वेळी विविध उपक्रमात ३३८ करार झाले. त्यातून ३ लाख ८५ हजार कोटी गुंतवणूक अपेक्षित आहे. त्यापैकी २६५ घटक प्रगतीपथावर आहेत. त्यामध्ये १ लाख ६६ हजार कोटी गुंतवणूक प्रत्यक्ष साकारली जाणार आहे.

महाराष्ट्र लघू उद्योग विकास महामंडळातर्फे १३०० हस्तकला कारागिरांना प्रशिक्षण देण्यात आले. संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ मर्यादित(लिडकॉम) मार्फत चामड्यांपासून वस्तू बनवणाऱ्या ५२२९ लाभार्थ्यांना, वस्तू प्रदर्शनाकरिता प्रोत्साहित केले. महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळातर्फे ग्रामीण कारागीर योजना राबवून ६३५८ प्रकल्प मंजूर करण्यात आले. त्यामुळे ३८,९१२ लोकांना रोजगार मिळाला आहे.

याव्यतिरिक्त टेक्सटाइल, रेझिन मेकिंग, फ्लाय ॲश, कोल्हापूरी चप्पल, काजू प्रक्रिया, गणेशमूर्ती, चांदी अशा अनेक क्लस्टरची निर्मिती करून राज्यात लघुउद्योग वाढीला चालना देण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तपासणीत १३ नद्या अप्रदूषित असून १ नदी कोरडी असल्याचे निदर्शनास आले. १४ नद्यांचे पट्टे प्रदूषणाच्या बाहेर निघाले आहेत. शासनाने प्रदूषण वाढण्याच्या कारणांचा अभ्यास केला असून प्रदूषणमुक्तीसाठी कार्यवाही सुरू आहे. हवेचे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी तांत्रिक उपाययोजना करणे, कृती आराखडा तयार करणे व तो अमलात आणणे यासाठी मार्गदर्शक तत्त्वे बनवण्यात आली आहेत.

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट,** विभागीय संपर्क अधिकारी

# सहकाराची शक्ती



## गुलाबराव पाटील

**राज्यमंत्री, सहकार**

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी कृषी सन्मान योजना २०१७ शासनाने जाहीर केली आहे. कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांना मिळण्यासाठी ऑनलाइन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू असून लवकरच कर्जमाफीची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्याद्वारे अदा करण्यात येणार आहे.

विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी अथवा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी परवानाधारक सावकाराकडून घेतलेले कर्ज व त्यावरील व्याज असे एकूण १७१.३० कोटी एवढे कर्ज शासनाने संबंधित सावकाराला अदा करून शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले आहे. २०१४-१५ या आर्थिक वर्षात नैसर्गिक आपत्तीने बाधित जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्पमुदत कर्जाचे मध्यमकर्जात रुपांतर करण्यात आले आहे. जे शेतकरी या कर्जाचा प्रत्येक वार्षिक हप्ता बँकेस विहित मुदतीत परत करतील अशा शेतकऱ्यांच्या कर्जावरील २०१५-१६ या वर्षाचे व पुढील ४ वर्षाचे (२०१६-१७ ते २०१९-२०) ६ टक्के दराने होणारे व्याज शासनामार्फत संबंधित बँकांना अदा करण्यात येईल.

खरीप २०१५ या हंगामात पीक कर्जापैकी शासनाने ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी जाहीर केलेल्या २७,६०९ गावातील शेतकऱ्यांच्या सुमारे रुपये ५ हजार कोटी कर्जाचे पुनर्गठन करण्यात आले. या कर्जावरील प्रथम वर्षाचे संपूर्ण व्याज व द्वितीय वर्षापासून ४ वर्षाचे (२०१७-१८ ते २०२०-२१) ६ टक्के दराने होणारे व्याज शासनामार्फत बँकांना अदा केले जाईल.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पीककर्ज रुपांतरासाठी नाबार्डकडून मिळणाऱ्या ४९५ कोटी रुपये रकमेच्या फेर कर्जास शासनाने हमी दिली आहे. २.५० लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जास मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्कामधून १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीसाठी सवलत देण्यात आली आहे.

सुलभ पीककर्ज अभियान-२०१७ अंतर्गत कमकुवत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या जिल्ह्यात शेतकऱ्यांना यंदाच्या हंगामात (खरीप+रब्बी) व्यापारी बँकांमार्फत पीककर्ज पुरवठा करण्यासाठी निर्देश देण्यात आले आहेत.

**शब्दांकन : विष्णू काकडे,** विभागीय संपर्क अधिकारी

# शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य



**अर्जुन खोतकर**

**राज्यमंत्री, वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास**

गेल्या तीन वर्षांच्या कालावधीत पशुसंवर्धन, मत्सव्यवसाय आणि दुग्धव्यवसाय या क्षेत्रात महत्त्वाचे निर्णय घेतले. पशुसंवर्धन विभागाने मराठवाडा पॅकेज अंतर्गत जालना जिल्ह्यात दोन देशी / संकरित गाई वाटप, २ म्हशींचा गट वाटप तसेच, २० शेळ्या अधिक २ बोकड अशा शेळी गट वाटपाची पथदर्शी योजना सुरू केली. यामुळे जालना जिल्ह्यातील ३,००० शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाद्वारे अर्थार्जनाच्या आणखी संधी उपलब्ध झाल्या.

विदर्भ व मराठवाड्यातील ३,०२३ गावांमध्ये दूध उत्पादन वाढवण्यासाठी दुग्धविकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अंतर्गत नोव्हेंबर, २०१६ पासून मदर डेअरी, फ्रूट अँण्ड व्हेजिटेबल लिमिटेड, नागपूर यांच्यामार्फत ७ जिल्ह्यातील ९१६ गावांमधील १०,८४७ दूध उत्पादकांकडून ५६१ केंद्रांद्वारे दैनंदिन ६०,६५० लीटर दूध संकलन होत असल्यामुळे याव्यवसायास चालना मिळाली आहे. दुधाला किफायतशीर दर मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांना याद्वारे अतिरिक्त उत्पन्न मिळण्याचे साधन निर्माण झाले आहे.

विभागाच्या वतीने विदर्भ व मराठवाड्यातील २ हजार गावांमध्ये दुग्धव्यवसाय विकास कार्यक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. हेटीकुंडी (जि. वर्धा) येथे गवळाऊ गायींचा प्रकल्प कार्यरत केला आहे. शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसाय वाढावे यासाठी दुग्धविकासावर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे.

मत्स्यव्यवसाय वाढावा, यासाठी अनेक निर्णय घेऊन महत्त्वपूर्ण योजना सुरू केल्या आहेत. मत्स्योत्पादनात गेल्या काही वर्षात लक्षणीय वाढ झाली आहे. मत्स्योत्पादनात सुमारे ४,६०,०००० मे. टन एवढी वाढ झाली आहे. वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी नांदगाव पेठ येथे पहिल्या मेगा टेक्स्टाइल पार्कची उभारणी करण्यात येत आहे. मुंबईतील बंद गिरण्या नांदगाव पेठ येथे स्थलांतरित करून तेथे रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न सुरू आहेत. रेशीम उद्योगांसाठी कीटक संगोपनगृहासाठी १२०० शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येत आहे. पुढील काळात या निर्णयाची प्रभावीरीत्या व कालबद्धरीतीने अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,** विभागीय संपर्क अधिकारी

# पारदर्शी प्रशासन



**मदन येरावार**

**राज्यमंत्री, ऊर्जा, पर्यटन, अन्न व औषध प्रशासन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), सामान्य प्रशासन**

सेवा हक्क कायद्याची सेवा ऑनलाइन देणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले आहे. या कायद्यानुसार ४०७ सेवा अधिसूचित करण्यात आल्या असून ३९९ सेवा ऑनलाइन करण्यात आल्या आहेत. ऑनलाइन अपिल दाखल करण्याची सुविधा नुकतीच उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रधानमंत्र्यांच्या 'उडेगा देश का आम आदमी (उडाण)' या योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात नांदेड, गोंदिया, अमरावती, जळगाव, नाशिक, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या विमानतळांचा समावेश करण्यात आला आहे. नांदेड ते हैदराबाद विमानसेवा सरू झाली असून पावसाळ्यानंतर लवकरच नांदेड- मुंबई विमानसेवेचा प्रारंभ होत आहे. ऑक्टोबर २०१७ मध्ये शिर्डी विमानतळाचा शुभारंभ. ■ २०१७ हे वर्ष 'व्हिजिट महाराष्ट्र वर्ष' म्हणून साजरे करण्यात येत आहे. त्यानिमित्त राज्यभरात विविध महोत्सवांचे आयोजन. 'एबीसेलेस्टिअल' हे तरंगते हॉटेल सुरू. ■ सिंदखेड राजा (जि. बुलडाणा) येथे राजमाता जिजाऊ जन्मस्थळ, लोणार सरोवर, रायगड किल्ला व परिसर, तसेच एलिफंटा पर्यटनस्थळ विकास आराखड्यांना मान्यता. ■ ७५ जेट्टींचे प्रस्ताव तयार. प्राधान्याने १५ जेट्टींची निर्मिती. किनारी महामार्गापासून पर्यटन स्थळी पोहोचण्यासाठी ६० जोड रस्त्यांचे नियोजन. ■ विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रातील उद्योगांना चालना देण्यासाठी अनुक्रमे ४० पैसे, ३० पैसे आणि २० पैसे इतकी वीजदरात सवलत. या विभागातील नवीन उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सुधारित आदेश काढून अतिरिक्त ७५ पैसे आणि ५० पैसे प्रतियुनिट सवलत. ■ उदय योजनेत राज्य प्रथम. ■ ग्राहकांना दर्जेदार सुविधा पुरवण्यासाठी महावितरणतर्फे मोबाइल अॅप. ■ सौर कृषी पंप देण्याच्या क्षेत्र मर्यादेत १० एकरपर्यंत वाढ. ■ मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना दोन ठिकाणी पथदर्शी प्रकल्प म्हणून सुरू. त्याद्वारे कृषिपंपांना २४ तास वीजपुरवठा. ■देशातील पहिला कम्युनिकेशन वे (समृद्धी महामार्ग) उभारण्याची कार्यवाही सुरू. ■ केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग विभागाच्या ४ हजार कि.मी. लांबीच्या महाराष्ट्रातील रस्त्यांच्या कामांना सुरुवात. ■ पुणे- मुंबई एक्सप्रेस वे वर ट्रॉमा सेंटर. ■ सामान्य जनतेकरिता ६७ ठिकाणी टोल वसुली बंद.

**शब्दांकन : सचिन गाढवे ,** विभागीय संपर्क अधिकारी

# शेतकऱ्यांना दिलासा



## सदाशिव खोत

**राज्यमंत्री,**
**कृषी व फलोत्पादन,**
**पणन, पाणीपुरवठा व स्वच्छता**

कृषी व पणन विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने शासनाने जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प' ६ वर्षांकरिता राबवण्याचा निर्णय घेतला आहे. हा प्रकल्प औरंगाबाद आणि अमरावती महसूल विभागातील सर्व जिल्हे आणि जळगाव जिल्हा यामधील एकूण ५ हजार १४२ गावांमध्ये राबवण्यात येणार असून, यामध्ये पूर्णा खोऱ्यातील खारपाण पट्ट्यातील ९३२ गावांचा समावेश आहे. प्रकल्पासाठी ४,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली त्यापैकी ८० टक्के हिस्सा जागतिक बँकेचा आणि २० टक्के हिस्सा राज्य शासनाचा असेल.

■ राज्यातील २०६५ महसूल मंडळामध्ये स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी करून हवामानविषयक विविध घटकांची दैनंदिन माहिती गोळा करण्याकरिता 'महावेध प्रकल्प' आतापर्यंत १६०० महसुली मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी. ■ शेतकऱ्यांच्या सबलीकरणासाठी गटशेती योजना २०१७-१८ आणि २०१८-१९ या दोन वर्षासाठी पथदर्शी प्रकल्प म्हणून राबवण्याचा निर्णय. ■ शेतकऱ्यांना फळे व भाजीपाला मोठ्या शहरांमध्ये थेट विक्री करता यावी, म्हणून उत्पादक ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेनुसार 'संत शिरोमणी श्री सावता माळी शेतकरी आठवडे बाजार' सुरू. ■ सध्या १२४ शेतकरी आठवडी बाजार कार्यरत. ■ शेतमालाच्या खरेदी विक्रीसाठी पहिल्या टप्प्यात ३० बाजार समित्यांमध्ये ई- ट्रेडिंग प्लॅटफॉर्म उभारण्याचे काम सुरू व दुसऱ्या टप्प्यातील ३० बाजार समित्यांची निवड. ■ कांद्याच्या निर्यातीस व आंतरराज्यीय व्यापारास चालना देण्यासाठी नाशिक येथे कांदा हब. ■ राष्ट्रीय ग्रामीण पेयजलच्या मागील दोन वर्षात १ हजार ४९५ योजना पूर्ण. ■ मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत १००३ योजना समाविष्ट करण्यात आल्या असून ४८ लाख लोकसंख्येला लाभ. ■ स्वच्छता मोहिमेंतर्गत ११ जिल्हे तसेच एकूण १५६ तालुके हागणदारीमुक्त. ■ २०१६-१७ मध्ये राज्यात १९ लाख १७ हजार ६७० इतक्या वैयक्तिक शौचालयांचे बांधकाम पूर्ण.

**शब्दांकन : चेतन वाणी**

# लोकहिताची आघाडी



## रवींद्र चव्हाण

**राज्यमंत्री, बंदरे, वैद्यकीय शिक्षण, माहिती तंत्रज्ञान, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण**

किनारपट्टीच्या सर्वांगीण विकासासाठी बंदर विकास धोरण जाहीर. बंदरापर्यत रेल्वे / रस्ते बांधणे या योजनेंतर्गत जयगड ते निवळी ४४ कि.मी. चा रस्ता पूर्ण. जयगड ते डिंगणी ३४ कि.मी. रेल्वे मार्गाच्या कामाची पायाभरणी. सागरमाला प्रकल्पांतर्गत ८ रो-रो जेट्टीचे बांधकाम प्रस्तावित. मांडवा येथील बॅकवॉटर व प्रवासी जेटीचे बांधकाम लवकरच पूर्ण. सागरमाला प्रकल्पांतर्गत राज्यातील सहा प्रकल्प सादर. निर्मल सागरतट अभियानास प्रारंभ. किनारपट्टीवर पर्यटनाला चालना देण्यासाठी व स्थानिकांना रोजगार संधी निर्माण व्हाव्यात यासाठी जलक्रीडा धोरण २०१५ जाहीर.

### वैद्यकीय शिक्षण

२०१६-१७ च्या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एक खिडकी पद्धतीनुसार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया. शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नांदेड येथे सशुल्क पंचकर्म विभाग सुरू. राज्य आयुष सोसायटीची स्थापना.अवयवदानासाठी जनजागृती.

### माहिती व तंत्रज्ञान

२९,४०२ आपले सरकार सेवा केंद्रांची स्थापना. ४० कोटी अर्जांची कार्यवाही पूर्ण. अशा ४००० पेक्षा अधिक केंद्राद्वारे २ कोटी जनतेस आधार योजनेशी संबंधित सेवा उपलब्ध. पंतप्रधान डिजिटल साक्षरता अभियानांतर्गत ४.१० लाख नागरिकांना डिजिटल साक्षरतेचे प्रशिक्षण. मतदान ओळखपत्राची छापील प्रत देण्याची सुविधा १० जिल्ह्यातील नागरी सुविधा केंद्रांमध्ये उपलब्ध. २०१५ च्या अंदाजित लोकसंख्येनुसार राज्यातील ११.२७ कोटी रहिवाशांची आधार नोंदणी पूर्ण.


सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत केलेल्या डिजिटायझेशनमुळे सध्या राज्यात २.५ कोटी शिधापत्रिका डिजिटल. आधार लिंकिंगमुळे सुमारे १० लाख शिधापत्रिका कमी. लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून धान्य वितरण. डिजिटायझेशनमुळे दरमहा ३८ हजार मेट्रिक टन धान्याची बचत.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर,** विभागीय संपर्क अधिकारी

# येथे कर माझे जुळती...

स्मरण

**सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये २ ऑक्टोबर रोजी लाल बहादूर शास्त्री, १५ ऑक्टोबर रोजी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम तर ३१ ऑक्टोबर रोजी वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी केली जाते. या थोर व्यक्तींविषयी थोडक्यात माहिती...**



## सरदार वल्लभभाई पटेल


भारतीय स्वातंत्र्यआंदोलनातील एक ज्येष्ठ नेते व स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान. जन्म लेवा पाटीदार शेतकरी कुटुंबात करमसद (खेडा जिल्हा) येथे ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण करमसद येथे घेऊन पुढील शिक्षण त्यांनी पेटलाड, बडोदा व नडियाद येथे घेतले. १८९७ साली नडियादहून ते मॅट्रिक झाले. घरच्या गरिबीमुळे त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेता आले नाही. ते त्या वेळची वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढील वर्षी ते बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला गेले. या परीक्षेत त्यांचा पहिला क्रमांक आला व ५० पौंडांचे पारितोषिक त्यांना मिळाले. प्रारंभी ते लोकमान्य टिळकांच्या जहाल पक्षात सामील झाले. त्यांनी १९१७-१८ सालच्या खेडा सत्याग्रहात हिरिरीने भाग घेतला. अहमदाबाद नगरपारिकेत ते याच वर्षी निवडून आले. त्यांनी अनेक सुधारणा करून अहमदाबाद शहर स्वच्छ व सुंदर केले. गांधीजींच्या असहकारीतेच्या चळवळीत वल्लभभाई आघाडीवर होते. या सुमारास सुमारे दहा लाखांचा निधी गोळा करून गुजरात विद्यापीठाची स्थापना केली (१९२०). १९२३ वर्षी झालेल्या नागपूर झेंडा सत्याग्रहात त्यांच्याकडे नेतृत्व होते. याच सालच्या बोरसद सत्याग्रहातही ते यशस्वी झाले. १९२८ च्या फेब्रुवारीत बार्डोलीला करबंदीची चळवळ जोरात सुरू झाली. त्यात त्यांनी घवघवीत यश मिळवले. याच वेळी सरदार ही उपाधी त्यांना प्राप्त झाली. १९३० साली मिठाच्या सत्याग्रहात त्यांनी भाषणबंदीचा हुकूम मोडला. २ सप्टेंबर १९४६ रोजी हंगामी मंत्रिमंडळात गृहमंत्री म्हणून ते समाविष्ट झाले. सरदारांचे राष्ट्रीय ऐक्याचे काम म्हणजे संस्थानांच्या विलीनीकरणाचे होय. एकात्म भारताचे ते खरे शिल्पकार आहेत. भारताचा पोलादी पुरुष म्हणून त्यांची जगभर ख्याती होती.

## लाल बहादूर शास्त्री



स्वातंत्र्य चळवळीतील निष्ठावान कार्यकर्ते, थोर राष्ट्रभक्त आणि भारताचे दुसरे प्रधानमंत्री. त्यांचे आडनाव श्रीवास्तव. जन्म बनारसजवळील मोगलसराई या रेल्वे वसाहतीत २ ऑक्टोबर १९०४ रोजी झाला. मॅट्रिकला असताना असहकाराच्या चळवळीमुळे (१९२१) ते गांधीजींच्या विचारसरणीकडे आकृष्ट झाले. त्यांनी काशी विद्यापीठातून तत्त्वज्ञान विषयात पदवी मिळवली. लाला लजपत राय यांनी स्थापलेल्या 'सर्व्हंट्स ऑफ द पीपल' या संस्थेचे ते १९२५-२६ मध्ये आजीव सेवक झाले. १९२७ मध्ये ललितादेवींशी त्यांचा विवाह झाला. त्यांनी सामाजिक क्षेत्रातील संघटनांतून बहुविध पदांवर काम केले. स्वातंत्र्य चळवळीत त्यांना सात वेळा अटक होऊन नऊ वर्षे कारावास भोगावा लागला. मादाम क्यूरीच्या चरित्राचे त्यांनी हिंदीत भाषांतर केले. चार लाख भारतीय तमिळांना श्रीलंकेचे नागरिकत्व मिळवून दिले. भारत-पाक यांच्यामध्ये रशियाच्या मध्यस्थीने ताश्कंदला वाटाघाटी होऊन नऊ कलमी ताश्कंद करारावर आयुबखान व शास्त्रीजी यांच्या १० जानेवारी १९६६ रोजी सह्या झाल्या. त्या मध्यरात्रीच शास्त्रींचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांच्या स्मरणार्थ तामिळनाडू राज्यात संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्यात आले.

## डॉ. अब्दुल कलाम



१५ ऑक्टोबर, १९३१ रोजी रामेश्वरम, तामिळनाडू येथे जन्मास आलेल्या डॉ. अवुल पाकिर जैनुलाबदिन अब्दुल कलाम यांनी मद्रास तंत्रज्ञान संस्थेतून वैमानिक अभियांत्रिकीचे (एरोनॉ-टकल) शिक्षण घेतले. जुलै १९८०, साली भारतातील प्रथम उपग्रह प्रक्षेपण वाहनाची निर्मिती करून त्याद्वारे पृथ्वीच्या कक्षेत सोडण्यात आलेल्या रोहिणी उपग्रहाच्या प्रकल्पाचे संचालक म्हणून त्यांनी मोलाचे योगदान दिले. भारतीय अवकाश संशोधन संस्थेत (इस्रो) क्षेपणास्त्र प्रक्षेपण वाहन विकासाचे विशेषतः पीएसएलव्ही (पोलार सॅटेलाइट लॉन्चिंग व्हेइकल) संरचना विकासाचे ते कर्ताधर्ता ठरले. त्यांनी डी.आर.डी.ओ.मध्ये एकात्मिक क्षेपणास्त्र विकास उपक्रमाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदारी उचलली. 'अग्नी' आणि 'पृथ्वी' क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी त्यांनी पार पाडली. त्यांनी अणुशक्ती विभागाच्या सहयोगाने क्षेपणास्त्र प्रणालीचे शस्त्रसंयोजन आणि यशस्वी पोखरण-II अणुचाचणी यशस्वी केली. डॉ. कलाम यांनी नोव्हेंबर १९९९ ते नोव्हेंबर २००१ दरम्यान भारतीय शासनाचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार म्हणून भूमिका पार पाडली. त्यांनी 'अग्निपंख', 'भारत २०२० : नव्या सहस्रकाचा भविष्यवेध', 'माय जर्नी' आणि 'प्रज्वलित मने' यांसारख्या पुस्तकांचे लेखन केले. त्यांना भारतात सर्वोच्च सन्मान 'भारतरत्न' (१९९७) पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. डॉ. कलाम हे २५ जुलै २००२ साली भारताचे ११ वे राष्ट्रपती म्हणून निवडले गेले. शिलाँगमधीलच एका रुग्णालयात त्यांनी २७ जुलै २०१५ रोजी अखेरचा श्वास घेतला.

(संदर्भ : मराठी विश्वकोश / abdulkalam.nic.in)

**संकलन: गजानन पाटील**

# राज्यस्तरीय रांगोळी स्पर्धा

भारतात सणवारांचा ऋतू सुरू झाला आहे. या काळात प्रत्येक घरामध्ये रांगोळी काढली जाते. जर तुम्हालाही रांगोळी साकारण्याची आवड असेल तर तुमची सुंदर रांगोळी सर्व जगाला दाखवण्याची ही सुवर्णसंधी आहे. तीन सोप्या पद्धतीने आपली रांगोळी आमच्यापर्यंत पोहोचवू शकता – रांगोळी काढा, तिचे छायाचित्र काढा आणि खाली दिलेल्या लिंकवर पाठवा...



**स्पर्धेचे नियम आणि अटी खालीलप्रमाणे:**

- **स्पर्धेचा कालावधी:** २ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर २०१७
- स्पर्धेसाठी दिलेल्या कालावधीतच रांगोळी काढलेली असणे आवश्यक आहे.
- रांगोळीमध्ये 'MyGov' हे नाव असणे अनिवार्य आहे. 'MyGov' नावाव्यतिरिक्त प्राप्त झालेल्या रांगोळी स्पर्धेकरिता विचारात घेतल्या जाणार नाहीत.
- स्पर्धेसाठी घरासमोर, घरामध्ये काढलेली साधी रांगोळीही पात्र असेल. पण, याचबरोबर तुम्ही तुमच्या रांगोळीतून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न करू शकता. सर्वोत्कृष्ट तीन रांगोळींना 'MyGov Maharashtra' च्या व्यासपीठावरून प्रदर्शित करण्यात येईल.

**स्पर्धेत भाग घेण्यासाठी भेट द्या:** https://maharashtra.mygov.in/mr/task/rangoli-competition





किंमत रु. ३००/-

महाराष्ट्राविषयी
अधिकृत
वस्तुनिष्ठ
एकत्रित माहितीचा
वार्षिक संदर्भग्रंथ

महाराष्ट्र वार्षिकी
२०१६-२०१७

सर्व जिल्हा माहिती कार्यालयांमध्ये उपलब्ध

समृद्ध महाराष्ट्राचा आरसा

Visit - www.mahanews.gov.in | Follow Us : /MahaDGIPR | Like Us : /MahaDGIPR | Subscribe Us : /MaharashtraDGIPR

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन


Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th October 2017
Date of Publication : 10th of every Month





श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री

पेयजल व स्वच्छता मंत्रालय, भारत सरकार
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

**स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)**



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री



# स्वच्छता ही सेवा

कालावधी : दि. १५ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर, २०१७

अभियानाचा शुभारंभ १५ सप्टेंबर २०१७ पासून सुरू झाला आहे.

**१७ सप्टेंबर २०१७ :** सकाळी १० ते १२ दरम्यान संपूर्ण देशभर स्वच्छतेसाठी श्रमदान. शौचालय उभारणीसाठी खड्डे खोदणे, परिसर स्वच्छता असे विविध उपक्रम.

**१८ ते २३ सप्टेंबर २०१७ :** गावातील सार्वजनिक ठिकाणे (बाजार, बस स्थानक इ.) व पाण्याच्या स्रोताचे परिसर यांची स्वच्छता. शाळांमधून स्वच्छताविषयक उपक्रम. गृहभेटी देऊन शौचालय बांधणीस प्रोत्साहन. महिला मेळाव्यांमार्फत स्वच्छताविषयक जागृती.

**२४ सप्टेंबर २०१७ :** सर्व वयोगटातील नागरिक स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षक, महिला बचत गटांचे प्रतिनिधी, उद्योजक अशा सर्वांचा परिसर स्वच्छतेत व शौचालय बांधकामाच्या श्रमदान कार्यात सहभाग.

**२५ ते ३० सप्टेंबर २०१७ :** आरोग्य केंद्रांची व उपकेंद्रांची स्वच्छता, सार्वजनिक उद्याने, रेल्वे स्टेशन, गावतलाव आदिंची व्यापक प्रमाणात स्वच्छता.

**१ ऑक्टोबर २०१७ :** परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणी किंवा जिल्ह्यातील महत्त्वाच्या पर्यटन ठिकाणी स्वच्छतेचे मोठ्या प्रमाणात उपक्रम. आधीचे व नंतरचे छायाचित्रण.

**२ ऑक्टोबर २०१७ :** महात्मा गांधी जयंती – स्वच्छ भारत दिवस. प्रभात फेरी, स्वच्छता रथ इत्यादी उपक्रमांचे आयोजन.

हागणदारीच्या ठिकाणांची स्वच्छता करून सुशोभिकरण करणे. राज्यातील सर्व ठिकाणी असलेल्या स्वच्छतागृहंची स्वच्छता सुनिश्चित करणे.

स्वच्छ महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी आपल्या सर्वांनी 'स्वच्छता ही सेवा' या अभियानात सहभाग घ्यावा.

श्री. बबनराव लोणीकर
मा. मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता

श्री. सदाभाऊ खोत
मा. राज्यमंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता


प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह